प्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : कथा
दा. क्र. : ३८३९२

IRBK-0117392
IRBK-0117392

वाचनाल
१७३६
२२।६।

# सर्कस सुंदरी

आणि

# इतर रहस्यकथा

IRBK-0117392
IRBK-0117392



# सर्कस सुंदरी

## आणि इतर रहस्यकथा

शेखर

*

प्रस्तावना
'लघुकथा'कार
शं. ह. देशपांडे

*

अंजु प्रकाशन, ६८ शनवार पेठ, पुणे ३०

अंजु प्रकाशन क्र २

प्रकाशक :
यशवंत देशपांडे
अंजु प्रकाशन
६८ शनवार पेठ,
पुणे ३०.

प्रथमावृत्ती
एप्रिल १९७८

किंमत १५ रुपये

© सौ. गंगूबाई देशपांडे

मुद्रक :
अ. वि. पाटील
विशाल सह्याद्रि प्रेस,
सह्याद्रि सदन
टिळक रोड, पुणे ३०

स्फूर्ती.....                .....प्रेरणा





सौ............                ती. विमलाताई...

स, ला, ते.                स, ला, ना, ते.

—शेखर



या कथा संग्रहात त्या नावाची कथा आहे म्हणूनच केवळ त्याला ' सर्कस सुंदरी ' हे नांव दिलेले आहे असे नाही. त्याहूनही महत्त्वाचे एक वेगळेच कारण आहे.

ते म्हणजे साधी कथा आणि रहस्यकथा यातला फरक. कथा म्हणजे एक रूपवती, सुंदरी असे मानले तर रहस्यकथेला सर्कस सुंदरी म्हणता येईल सर्कस सुंदरीला नुसतेच सौंदर्य पुरेसे नसते. कमनीय बांधा, नाकीडोळी नीटसपणा एवढ्याने तिचे भागत नाही. चापल्य हवे असते, ताकद हवी असते सर्कस म्हणजे तारेवरची कसरत.

रहस्यकथेचे असेच आहे. कथेला आवश्यक असलेले सर्व गुण तर तीत हवेतच पण त्याहूनही आणखी गुणांची गरज असते. मांडणीची कल्पकता आणि रहस्य वेधकता टिकविण्याचे कौशल्य म्हणजे तारेवरची कसरत होय.

## अंतरंग : अनुक्रम–


प्रास्ताविक :

लेखकाचे मनोगत ९

प्रस्तावना :

रहस्यकथेची कसोटी १०

कथा :

१. काशीकरांच्या वाड्यात– १४

२. हरवलेला प्रियकर ३१

३. दाराच्या टेकणाचे रहस्य ४८

४. कण्हेरीच्या मळ्यात ६६

५. श्वेतवस्त्रा ८४

६. लक्ष्यवेधी बाण १०१

७. मृत्यूचा मुखवटा १२२

८. सर्कस सुंदरी १४२


● ● ●

## ऋण निर्देश

या संग्रहातील सर्व कथा ( कै. ) श्री. अनंत अंतरकर यांच्या संपादकत्वाखाली हंस व मोहिनी नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या, रूपांतरित आहेत.

ब्लॉक्स–

मुखपृष्ठ तीन रंगी–

खाडिलकर प्रोसेस स्टुडिओ, पुणे.

इतर–

विशाल सह्याद्रि प्रोसेस विभाग.

# लेखकाचे मनोगत

प्रिय वाचक,

माझे स्नेही अनंत अंतरकरांच्या हंस आणि मोहिनी या नियतकालिकातून प्रसिद्ध झालेल्या रहस्यकथांचा हा संग्रह वाचकांच्या हाती देताना मला होणारा आनंद शब्दातीत आहे. वीस–पचवीस वर्षांपूर्वीपासून लिहिलेल्या या कथांचे श्रेय अनंत अंतरकरांचेच आहे. हंसमध्ये आणि नंतर मोहिनी सुरू केल्यावर त्याही मासिकांत दरमहा एक रहस्यकथा देण्याचे त्यांनी ठरविले. अंतरकरांचा आणि माझा १९४० पासून, ते सत्यकथेचे संपादक होते तेव्हांपासूनच संबंध असला तरी मध्यंतरी १९४३ ते ४५ या काळामध्ये मी महाराष्ट्राबाहेर, लेखन थांबविले असल्याने आमचे संबंध दुरावले म्हणणे योग्य नव्हे, परंतु संपर्कविरहित झाले होते. १९४५ साली मी परत लेखन सुरू केल्यावर 'वसंत'कडे कथा पाठविली आणि सुवाच्य लिहून पाठवा म्हणून चिठ्ठीसह ती पुन्हा माझ्याकडे आली तेव्हा आमचे संपादक–लेखक नाते पुन्हा सुरू झाले. तेव्हां मी कथा लिहीत होतो. परंतु मालेसाठी काही निनावी रहस्यकथाहि मी लिहिल्या होत्या. आणि अंतरकरांना ते माहीत होते. त्यांनीहि अशा कथा लिहिल्या होत्या. वसंतनंतर हंसमध्ये त्यांनी माझ्या काही स्वतंत्र कथा, काही अनुवादित कथा प्रसिद्ध केल्या. माझे वास्तव्य पुण्यांत, अंतरकरांचे मुंबई, गोरेगावकर बिल्डिंगमध्ये मुंबई भेटीत मी त्यांच्याकडे आवर्जून जात असे. अशाच एका भेटीला त्यांनी मला रहस्यकथा लिहा म्हणून फर्मावले. रहस्यकथा लेखनाबद्दल भेटीत पत्रद्वारे अपेक्षा कळत. त्यांची फारशी निराशा मी न केल्यानेच हंस–मोहिनीतून असंख्य रहस्यकथा प्रसिद्ध झाल्या, पुनर्मुद्रितहि झाल्या.

त्यातील काही कथांचा हा संग्रह. वाचकांना तो आवडेल अशी आशा वाटते.

– शेखर

# प्रस्तावना

## रहस्यकथेची कसोटी–

रहस्यकथा वाङमय हे इतर कोणत्याही वाङमय प्रकारापेक्षा निकृष्ट, कमी दर्जाचे किंवा कमी महत्त्वाचे नाही. त्याचा वाचकवर्ग भरपूर आहे या निकषावर कदाचित त्याचे महत्त्व जोखता येणार नाही, परंतु ललित साहित्य रचनेच्या कौशल्याचा विचार केला तर रहस्यकथा लेखनासाठी लेखकाच्या अंगी सर्व साहित्यिक गुणविशेषांबरोबरच रचनाकौशल्य आणि मानवी स्वभावाचे विशेष ज्ञान अत्यावश्यक असते हे ध्यानात घेता त्या वाङमय-प्रकाराचा दर्जा किती श्रेष्ठ आहे याची जाणीव होते.

असे असूनही रहस्यकथाकाराकडे इतर कथाकार, कादंबरीकार, समीक्षक आदींनी उपेक्षेच्या भावनेने का पहावे हे समजत नाही. तंत्राच्या दृष्टीने विचार केला तर रहस्यकथा लेखनात प्रारंभाप्रमाणेच अखेर साधण्यातही लेखकाच्या लेखन गुणाचा कस लागतो. भाषेच्या दृष्टीनेही रहस्य-कथा लेखन म्हणजे पोरखेळ नाही. गुन्ह्याच्या वर्णनाप्रमाणेच गुन्हेगारीचा शोध, गुन्ह्यांचा उलगडा हे सारे वर्णन करणे, सोप्या–प्रसंगानुरुप भाषेत कागदावर उतरविणे, निवेदन करणे हे तसे पाहिले तर भाषा प्रभुत्वाचेच काम आहे. रहस्यकथाकाराला प्रसंग वर्णनाप्रमाणच संवाद लेखनाचे कौशल्यही अवगत नसेल तर ती रहस्यकथा कसाला उतरणार नाही, सुजाण वाचकाला आवडणार नाही.

गुन्हा म्हटला म्हणजे त्यामागे कनक आणि कांता यापैकी काहीतरी असणार. त्याखेरीज सत्तेचा हव्यास हेही एक कारण आहे. कनक–मग ते संपत्ती पैशाच्या स्वरूपात असेल. दागदागिने जडजवाहिराच्या स्वरूपात

असेल किंवा जमीन जुमला शेतीवाडीच्या स्वरुपात असेल. कांता, म्हणजे ती पत्नी असेल– प्रेयसी किंवा बहिण, माता, मुलगीही असेल. सत्तेबद्दलही तसेच म्हणता येईल. सत्ता घरातील, कौटुंबियांवरील असो; ग्रामपंचायत, जिल्हापरिषद येथपासून केंद्र सरकारपर्यंत किंवा संस्था–कारखानदारीच्या कारभारावर वर्चस्व अशी कोणत्याही प्रकारची असेल. गुन्ह्यामागे यापैकी काही तरी कारण, निमित्त हे असणारच. हे निमित्त, हाच हेतु. कोणत्याही गुन्ह्याची शाबिती करतांना हेतु सिद्ध करणे हे एक महत्वाचे सूत्र आहे. रहस्यकथाकाराच्या लेखनाचा आवाका केवढा आहे हे यावरून ध्यानी येईल. रुद्रभीषण प्रसंगाप्रमाणेच त्याला मायामोहाचे बारकावे, प्रणय प्रसंग नफाई-दारपणे शब्दांकित करता आले पाहिजेत. इतर कथा कादबरीकार तरी या-पेक्षा वेगळे काय करतात? उलट रहस्यकथेपेक्षा सामान्य कथा कादंबरी लेखन फार सोपे असे मी म्हटले तर कोणावर अन्याय झाला असे मानले जाऊ नये.

रहस्यकथेचा आवाका आणि पसारा अलीकडे खूपच वाढला आहे. मराठी साहित्यात निर्मितीचा आढावा घेतला तर रहस्यकथा वाङमयाचा क्रमांक पहिला लावावा लागेल अनेक मालांमधून दरमहा डझनावारी कादं-बऱ्या प्रसिद्ध होतात. मासिकातूनही प्रसिद्ध होणाऱ्या कथाही असख्य अस-तात. पण रहस्य वाङ्मय म्हणून हे सारे गणले जात असले तरी नेमके, सार्थ नामकरण करावयाचे तर त्याला रहस्य–वाङमयापेक्षा गुन्हेगारी वाङमयच म्हटले पाहिजे. कारण हे साहित्य केवळ 'रहस्य'कथात्मक नसते, त्यात अवां-तर भरणाच जास्त असतो. पण रहस्यकथा म्हणजे केवळ रहस्य उलगडणारे वाङ्मय असे अलीकडे मानलेच जात नाही.

तसे पाहिले तर मराठी रहस्यकथा वाङमयाचे जनकत्व ज्याकडे आहे त्या इंग्रजी साहित्यांतही, परिस्थिती फारशी वेगळी नाही. वेगळी असणं संभवतही नाही. कारण मराठी रहस्यकथा वाङमय हे इंग्रजी साहित्याचेच प्रतिबिंब, प्रतिकृती आहे. 'काही तरी गूढ रहस्य निर्माण करून त्याची उकल तत्वशुद्ध, तंत्रशुद्ध रीतीने करणारी कथा' ही आता रहस्यकथेची व्याख्या राहिलेलीच नाही. 'नवल'कार अंतरकरांनी म्हणूनच नवलमधील कथा साहित्याची विभागणी संदेहकथा, चातुर्यकथा; विस्मयकथा; अशा प्रकारे करण्याचा परिपाठ ठेवला आहे.

गूढ शेवटपर्यंत न उलगडू देणे हाच काही रहस्यकथेचा एकमेव बांधा असला पाहिजे असे मानण्याचे कारण नाही असेही याबाबतीत म्हणता येण्यासारखे आहे गुन्हा कोणी केला हे प्रारंभीच सांगून टाकून तो गुन्हेगाराच्या पदरात टाकण्याची कौशल्यपूर्ण जुळवणी आणि उकल असणारी रहस्यकथाही वाचकाचे चित्त वेधून घेते. परंतु माझ्या मते खरी रहस्यकथा म्हणजे एखाद्या रहस्याची निर्मिती करून शेवटपर्यंत वाचकाला दुग्ध्यात ठेवणे आणि शेवटी त्याची सप्रमाण उकल अशी कथाच खरी आकर्षक रहस्यकथा होय. त्यातही निरनिराळ्या व्यक्तीबद्दल संशय निर्मिती करण्याचे कौशल्य अधिक रंगत आणते

यात लक्षात ठेवण्याची मुख्य गोष्ट म्हणजे रहस्य निर्मितीनंतर त्याची उकल करणारा पोलीस अधिकारी म्हणा किंवा रहस्य उलगडणारा एखादा खासगी हेर—डिटेक्टिव्ह म्हणा, ज्या दुव्यांच्या आधारावर रहस्याचा भेद करतो ते दुवे वाचकापासून आधी लपवून ठेवता कामा नयेत. नेमक्या शब्दात सांगावयाचे तर रहस्यकथा वाचून झाल्यावर 'अरेच्या ! हे आपल्या कसे लक्षात आले नाही बुवा ?' असे वाचकाला वाटले पाहिजे. गुन्ह्याच्या जागचे काही पुरावे, दुवे. घटना अशा ज्या काही गोष्टी तपास करणाऱ्याला माहीत होत्या त्या आपल्यापासून लपवून ठेवून लेखकाने आपल्याला बनविले, अशी त्याची भावना होता कामा नये.

'सर्कस सुंदरी' या रहस्यकथा संग्रहातील कथा या कसोटीला पूर्णपणे उतरतील अशी खात्री वाटते. रहस्यकथेत नायिका असलीच पाहिजे असे नाही. पण नायक अवश्य हवा असतो. हा नायक म्हणजे रहस्य उलगडणारा मानला तर त्या जोडीला गुन्हा करणारा आणि आरोप येणारा असे आणखी दोन नायकही रहस्यकथेत समाविष्ट करता येतात. नायिका असेल तर दुधात साखर. रहस्यात प्रणयाच्या गुंफणीने कथेची रंगत आणखी वाढते. अशी वेगवेगळी पात्रे आणि प्रसंग रंगविण्यातच लेखकाचे लेखन कौशल्य प्रत्ययाला येते. चार मराठी वाक्यांचे प्यारे आणि अशी २५—३० प्याऱ्यांची गुंफण मराठी शुद्ध लिहिता बोलणाऱ्या कोणालाही करता येईल, येते आणि त्यामुळेच मराठी साहित्यात रहस्यकथा निर्मितीचे पीक उदंड आले आहे. परतु ओघवती भाषा, आकर्षक संवाद, घटना डोळ्यापुढे उभी करण्याच्या कौशल्याने केलेली प्रसंगनिर्मिती, तंत्रशुद्ध आकर्षक रचना हे अभिजात साहित्य गुण असणाऱ्यालाच साधेल. या संग्रहातील कथात हे गुण

आहेत की नाहीत हे वाचकांनीच ठरवावयाचे आहे. दर्जेदार साहित्य-निर्मितीच्या उद्देशाने हंस, मोहिनी, नवल ही मासिके सुरू करणाऱ्या श्री. अनंत अंतरकरांनी प्रारंभी हंसमधून, नंतर मोहिनी आणि नवलमधून या कथा प्रसिद्ध केल्या. पुनर्मुद्रितही केल्या एवढेच लक्षात घेतले म्हणजे या कथांची पुन्हा प्रशस्ती करण्याची गरज रहात नाही.

या संग्रहातील अधिक कथा गुन्हेगारीचे संशोधन करणाऱ्या आणि लेखकहि असलेल्या आनंदराव पारसनीस या नायकाच्या आहेत. संस्कृत भाषेचे पंडित शास्त्री बुवांच्याहि कथा त्यांत समाविष्ट आहेत. कथा न नुसतीच गुन्हे–रहस्यांची उकल नाही. त्यात प्रणय भावनांची गुंफणहि आढळते, उदात्त नीतिमत्तचा पुरस्कार आढळतो.

–पण हे सारे मी सांगण्यापेक्षा वाचकांनीच ह्या कथांचा रसास्वाद घेऊन आपले मत बनवावे हे अधिक बरे नाही का ? प्रस्तावनेची लांबण लावून वाचकांच्या उत्सुकतेत मी व्यत्यय आणणे उचित ठरणार नाही.

–शं. ह. देशपांडे



मी,

आनंदराव—

# काशीकरांच्या वाड्यात—

माझे नाव आनंदराव पारसनीस आहे. प्रसिद्ध गुन्हे आणि गुन्हेगार यांच्यासंबंधीच्या पुस्तकांचे तुम्ही वाचक असाल, तर कदाचित् तुम्ही माझे नाव ऐकले असेल. कारण लेखन हा माझा जीवन–व्यवसाय आहे. लोकांत खळबळ माजवून त्यांना गुंगवून टाकणाऱ्या भूतकाळातील खून आणि तसल्याच प्रकारच्या गुन्ह्यांबद्दल मी संशोधन करतो एक महिन्यापूर्वी मी असाच एका जुन्या पुस्तकांच्या दुकानापुढे पडलेल्या पुस्तकांच्या ढिगाऱ्याची उचकाउचक करीत होतो. असेच एक पुस्तक माझ्या हाती आले. पाव शतकापूर्वी घडलेल्या काही गुन्ह्यांचा वृत्तांत त्यांत छापलेला होता. त्यातले एक प्रकरण 'बकुळा खून–प्रकरणा'–संबंधी होते.

१५३४२ । २५।६।५८
कथा



बकुळा खून–प्रकरण त्या वेळी खूपच गाजलेले होते, आणि त्यासंबंधीचे अहवाल, वृत्तपत्रांतील बातम्या वगैरे जमवून एक सुंदरसे पुस्तक लिहिण्याचा विचार माझ्या मनांत अनेक दिवसांपासून खेळत होता. ते पुस्तक विकत घेऊन मी घरी गेलो आणि उत्सुकतेने वाचू लागलो.

पण माझी निराशा झाली. वस्तुतः बकुळेचा खून आणि त्यामागील एकंदर परिस्थिति अत्यंत रहस्यमय, रोमांचकारक होती. पति आणि दोघे

प्रियकर, अशा तिघांवर तिच्या खुनाच्या संशयाची छाया पडलेली होती. पोलिसांनी खूप शोध केला. खुनाचा खटला चालू असताना कोण खळबळ उडाली होती लोकांत! पण अशा अद्भुत घटनेवरील त्या पुस्तकातील प्रकरण मात्र अगदीच नीरस होते; आणि त्यातील माहितीहि विश्वासार्ह नव्हती.

ते पुस्तक मी बाजूला ठेवून दिले आणि तो विषयहि तात्पुरता विसरून गेलो. त्यानंतर काही दिवसानी मात्र, एका रस्त्यावरील नावाची पाटी पाहून मला त्याची एकदम आठवण आली.

'सरदार काशीकर रस्ता!' याच रस्त्यावरील एका घरात,– ज्याचे नाव त्या रस्त्याला मिळालेले होते त्या सरदार काशीकरांच्याच वाड्यात– ती बकुळेच्या खुनाची अद्भुत घटना घडलेली होती. काशीकर वाडा, घर नंबर १० मध्ये ता. १३ जानेवारी १९४९ रोजी सौ. बकुळाबाई काशीकरांचा खून झालेला होता!

नंबर दहा! मी जरा पुढे होऊन नंबर पाहू लागलो. तोच तो वाडा. जुन्या बांधणीचा, कळकट झालेला आणि रिकामा पडलेला.

मी वाड्याच्या मोठ्या दरवाज्याच्या दिंडीवर सहज हात टेकला तो ती उघडली गेली. तळमजल्यावरच्या एकदोन खिडक्याही उघड्या दिसल्या. मी आत शिरलो. वाटले, कदाचित् वाडा पहायला मिळेल. पुढे होऊन मी दार ठोठावले.

दोन–तीनदा कडी वाजवल्यावर एका वयस्क स्त्रीने दार उघडले. तिने माझ्याकडे आश्चर्याने पाहिले. 'तुम्ही दार वाजवलंत?' तिने विचारले.

'हो! मी म्हटले, 'माफ करा, पण हा वाडा सरदार काशीकरांचाच ना? तुम्ही इथं रहाता?'

'हो.' ती उत्तरली, 'आम्हीच हा वाडा संभाळतो. हे शेतीवाडी–जमीन–जुमल्याची व्यवस्था पहातात. पण तुम्ही कशासाठी आला आहात? या वाड्यात काही भाड्यानं जागा द्यायची नाही किंवा हा विकायचाही नाही.'

मी तिच्या हाती रुपयाच्या तीन नोटा दिल्या. 'मला माहीत आहे.' मी म्हटले, 'पण हा वाडा पहाण्याची इच्छा आहे माझी. अर्थात त्यात तुम्हाला काही त्रास नसेल तर'

ती स्त्री–माझ्या अंदाजाप्रमाणे तिचे वय पन्नाशीच्या घरात असावे–जराशी घुटमळली, मग हसली. 'त्रास काही नाही त्यात.' ती म्हणाली, 'पण आपलं आधीच सांगणं बरं. पहाण्यासारखं काहीच नाही इथं!'

'त्याची कल्पना आहे मला. पण–पण–तुमचं नाव नाही समजलं मला अजून.'

'इंदिराबाई.' ती म्हणाली.

'माझं नाव आनंदराव पारसनीस. वाडा कशाही स्थितीत असो, तो पहाण्याची इच्छा आहे माझी.'

'तुमची इच्छा असेल तर बघा बापडे.' इंदिराबाई म्हणाली, 'या.'

मी आत शिरल्यावर तिने दार लोटून घेतले. भयंकर खुनांच्या अनेक स्थळांना मी भेटी दिल्या असतील; पण सौंदर्यवती म्हणून गाजलेल्या बकुळेचा खून झालेल्या त्या वाड्याच्या दिवाणखान्यात प्रवेश केल्यावर माझ्या देहावर रोमांच उभे राहिले.

इंदिराबाईचे केस पांढरे झालेले होते आणि तिच्या पाठीलाही थोडा बाक आला होता. भिंतीत एक वर जाणारा जिना होता. त्याच्या तोंडाशी थबकून ती म्हणाली, 'आम्ही रहातो आहोत तो हा तळमजला बघायचा आहे तुम्हाला ? की–'

'नाही.' मी म्हटले, 'मला वरचा मजला बघायचा आहे.'

'बरं मग, या.'

ती जिना चढू लागल्यावर मी तिच्या मागोमाग वरच्या मजल्यावर जिन्याच्या तबकडीत पोहोचल्यावर तिने दार उघडले. मला आत जाता यावे म्हणून बाजूला होऊन वाट देत ती म्हणाली, 'हा मुख्य दिवाणखाना आहे. ती दोन दार पलीकडच्या खोल्यांची आहेत. सरदार काशीकर त्या पलीकडच्या खोलीत झोपत असत.'

'आणखी न्हाणीघर ?' मी विचारले.

'हे काय—त्या खोलीच्या पलीकडे.'

'हो का ? पण का हो इंदिराबाई, आपण वर आलो त्या जिन्याखेरीज आणखी एक मागचा जिना आहे ना या घराला ?'

'हो. तो नोकर–चाकर वापरीत होते पूर्वी. मागच्या दारानं बाहेर पडता येतं त्या जिन्यावरून गेलं तर'

मी मान डोलावली. 'खुनी इसम त्याच जिन्यानं गुपचुप निघून गेला !' मी स्वतःशी पुटपुटलो.

'खुनी इसम ?' इंदिराबाई आश्चर्याने ओरडली.

अनेक वर्षांपूर्वी त्या नं. १० काशीकर वाड्यात झालेला खून आणि त्यानंतरच्या घटनात माझे मन व्यग्र झालेले होते. मी 'खुनी' हा शब्द उच्चारला तेव्हा इंदिराबाईला आश्चर्य वाटणे साहजिक होते. 'नाही तर

काय !' मी किंचित् गोंधळून म्हटले, 'तुम्हाला कदाचित माहीत असेल इंदिराबाई, पण पंचवीस वर्षापूर्वी या वाड्यात एक खून झाला होता. अगदी याच दालनात ! त्यावेळी खूपच खळबळ उडाली होती, अन् तो खुनाचा खटला पण गाजला होता.'

'हे सगळं तुम्हाला कसं आठवलं साहेब ?' इंदिराबाईने नवलाने विचारले.

मी हसलो. 'आठवण्याचा प्रश्न नाही. मी त्यावेळी जेमतेम चारपाच वर्षांचा असेन.' मी खुलासा केला, 'पण गुन्ह्याबद्दल लेख–पुस्तकं लिहिणं हा माझा व्यवसाय आहे. म्हणूनच या वाड्याचा इतिहास मला माहीत आहे. हा वाडा सरदार जिवाजीराव काशीकरांचा होता.'

'हो साहेब–अजूनही त्यांचाच आहे. पण ते आता फार फार म्हातारे झाले आहेत. नागपूरजवळच्या आपल्या गावी रहातात ते. पुण्याला कधीच येत नाहीत.'

'म्हणजे ? तुम्ही ओळखता सरदार काशीकरांना ?'

'ओळखते म्हणजे काय ?' इंदिराबाई उत्तरली, 'काही दिवस मी बकुळाबाईकडे नोकरीला होते.'

मी थक्क होऊन इंदिराबाईकडे पहात राहिलो. 'पण त्यांच्या एका दासीने खुनाच्या खटल्यात साक्ष दिली होती. त्या दासीचं नाव सुशील होत, सुशीला मोरे.'

'बरोबर आहे साहेब. माझंच नाव सुशीला होत लग्नापूर्वी.'

'म्हणजे ? मला काही समजतच नाही. आपण हा वाडा अन् जमीन-जुमल्याची देखभाल करतो असे म्हणत होता ना तुम्ही ?'

मला वाटणारे आश्चर्य पाहून इंदिराबाईला हसू आले. 'ते खरं आहे' ती म्हणाली, 'त्या खटल्यानंतर जिवाजीरावांनी इथली काही शेती-वाडी अन् हा वाडा ठेवून बाकी सारं विकून टाकलं अन् ते नागपूरकडे निघून गेले. 'घर संभाळ' असं ते मला म्हणाले. जिवाजीराव फारच उदार आहेत. माझ्याही मनातून पुन्हा लग्न करायचं होतं. माझं पहिलं लग्न माझ्या अगदी लहानपणी झालं अन् लहानपणीच मी विधवा झाले. म्हणून तर दासी म्हणून बकुळाबाईकडे नोकरीला राहिले होते. आमच्या लोकात बायका जन्मभर विधवा म्हणून रहात नाहीत. पण मी तसं रहायचा विचार केला होता. पण मग मन बदलल. एकटं कसं अन् किती दिवस रहाणार ? म्हणूनच जिवाजीरावांनी सांगितलं ते ऐकलं मी.'

‘अन् तुम्ही आणि तुमचे धनी त्यानंतर इथंच, या वाड्यात राहिलात?’

‘हो. मी लग्न केलं, त्या वेळी हे जिवाजीरावांकडेच कामाला होते. नंतर लवकरच जिवाजीराव निघून गेले. इथं आम्ही सुखात आहोत. मला मूल–बाळ वगैरे काही झालं नाही, पण त्या दैवाच्या गोष्टी. आम्ही आहे त्यात आनंद मानतो.’

मी तिच्याकडे जिज्ञासेने बघितले. ‘पण–पण या वाड्यात रहाणं तुम्हाला काहीसं विचित्र वाटत नाही ?’ मी विचारले.

‘विचित्र ?– का ?’

‘म्हणजे– इथंच, या वाड्यात खून झालेला– ’

‘हं ! पण त्याला कितीतरी वर्ष झाली आहेत आता’ इंदिराबाई म्हणाली, ‘मी त्याबद्दल काही विचारच करीत नाही कधी. तुम्ही आता हा विषय काढलात. नाहीतर अनेक वर्षात मला कधी आठवणही झाली नाही.’

मी डोके खाजवीत तिच्याकडे पहात राहिलो. ‘गंमत आहे मोठी.’ मी म्हटले, ‘मला काही उमजतच नव्हतं. म्हणजे असं, तुम्ही बकुळाबाई-जवळ होतात, म्हणजे तुम्हाला यशवंतराव मठकर अन् माधवराव राजे माहीत असतीलच ?’

‘हो,– दोघेही चांगले आठवतात मला.’

‘अन्– अन्– बकुळाबाईंचा खून झाला त्या दिवशी रात्री तुम्ही वाड्यातच होता ?’

इंदिराबाईने मान डोलवली, ‘हो !’ ती पुटपुटली, ‘होते तर काय झालं !’ माझ्याकडे पाहून ती मोठ्याने म्हणाली, ‘तुम्हाला एवढं औत्सुक्यच असेल तर माझ्याजवळ त्या वेळच्या वर्तमानपत्रांची पानं कापून ठेवलेली आहेत. खटला चालू असताना मी त्याच्या बातम्या कापून जपून ठेवल्या. पहा हवं असेल तर ते.’

आंधळा मागतो एक डोळा अन् देव देतो दोन, तशी माझी गत झाली. मी होकार दिला तेव्हा माझी उत्कंठा पाहून इंदिराबाईला हंसू आले.

मी तिच्याबरोबर खालच्या मजल्यावर त्यांच्या बैठकीच्या खोलीत गेलो. एका जुन्या टेबलाचा खण ती ओढू लागली. अगदी गच्च बसला होता तो. मी मदत केली. दोघांनी मिळून ओढला तेव्हाच तो खस्कन् बाहेर आला. आत काही जुनी पुस्तके नि वर्तमानपत्राची कात्रणे गच्च भरलेली होती. ‘काय बाई कचरा तरी !’ ती म्हणाली, ‘लग्न झाल्या दिवसापासून हा खण उघडलाच नाही कधी मी. बघा तरी ! तुम्हाला हवी ती कात्रणं निवडूनच काढावी लागतील, उगीचच त्रास तुम्हाला !’

'त्याकामाची मला हौसच आहे. तुमचा वेळ बाकी फुकट जाईल.' मी तिला म्हणालो. पण त्या वेळच्या वर्तमानपत्रातील त्या खटल्याच्या बातम्या वाचायला मिळणार म्हणून इतका हुरळलो होतो की, बोलता बोलताच मी कात्रणे चाळून जुळवायला सुरुवात पण केली.

'चालू द्या तुमचं काम.' इंदिराबाई म्हणाली, 'तोपर्यंत मी चहा करते. चालेल ना ?'

'फारच छान !' मी म्हणालो. टेबलाचा तो खण खाली ठेवून मी जमिनीवरच बसकण मारली आणि ते कात्रणाचे तुकडे चाळू लागलो. बातम्यावरच्या मथळ्यावरून माझे डोळे फिरू लागले.

'बकुळाबाई खून खटला', 'कोर्टात खळबळ', 'सेशन्स कोर्टातील विलक्षण प्रकार', 'आरोपीचे वकील बॅरिस्टर रत्नाकर पोंक्षे यांचे बचावाचे भाषण', 'फिर्यादी सरकार पक्षाचे बॅरिस्टर विजय रानडे यांचे विलक्षण प्रश्न'...

प्रत्यक्ष खून झाला त्याच वाड्यात बसून बकुळाबाईच्या खुनाबाबत माहिती वाचावयास प्रारंभ करताना मी समाधानाचा सुस्कारा टाकला.

आणि तो खटला खरोखरच खळबळजनक होता.

सरदार जिवाजीराव काशीकरांची बकुळेशी पहिली भेट झाली तेव्हा ती एक चित्रपटतारका होती. तो मूक–चित्रपटांचा जमाना होता. चित्रपट व्यवसाय सोडायचा याच शर्तीवर जिवाजीरावांनी तिच्याबरोबर विवाह केला. त्या व्यवसायांतील ओळखीपाळखी, स्नेहसंबंध विसरायचे, हेही त्यात गृहीत होते. पण विवाहानंतर काही महिन्यातच बकुळा आपल्या वचनांना बट्टा लावू लागली. आपल्या जुन्या ओळखीच्या लोकांना ती नं. १० काशीकरांच्या वाड्यात बोलावू लागली .. अंत नसणारी भांडणे झडू लागली, बोलाचाली, खटके उडू लागले. एका घरात राहूनही त्यांचे पति–पत्नीचे नाते संपुष्टात आले. विवाहानंतर एका वर्षाच्या अवधीतच पत्नीच्या वर्तनाबद्दल, तिच्या पातिव्रत्याबद्दल आपल्याला संशय येऊ लागल्याचे जिवाजीरावांनी साक्षीत मान्य केले. विशेषत: माधव राजे हा सिनेमा–नट आपल्या पत्नीचा प्रियकर असावा असा त्यांना संशय होता ..

त्या तेरा जानेवारीच्या घातक दिवशी रात्री, बाहेरगावी गेलेले जिवाजीराव अनपेक्षितपणे वाड्यात परत आले. तळमजल्यावर माधव राजे पेटी वाजवीत बसला होता. काही आडपडदा न ठेवता जिवाजीरावांनी त्याला घराबाहेर निघायला सांगितले. माधव निघून गेला. जिवाजीराव मग तसेच, संतापाने चडफडत, वरच्या मजल्यावरील बकुळेच्या खोलीत

शिरले. माधवला घरात पाऊल टाकू दिल्याबद्दल आपण पत्नीला जाब विचारणार होतो हे त्यांनी मान्य केले. आपल्या पत्नीची दासी सुशीला हिने केलेले अभिवादन स्वीकारून ते खोलीकडे वळले.

'त्या वेळी माझी पत्नी कोचावर लवंडलेली होती.' सरकारी वकिलाच्या प्रश्नाला उत्तर देतांना ते म्हणाले, 'मला वाटले, तिला डुलकी लागली असावी. ती कानोडी निजलेली होती आणि तिची पाठ दाराकडे होती. पण जवळ गेलो तसे मला रक्त दिसले. तिच्या पायाजवळच, जमिनीवर खजीर पडलेला होता. तिची मान कापलेली होती.'

तो खंजीर आपल्या शस्त्राच्या साठ्यातील असल्याचे जिवाजीरावांनी मान्य केले. त्यांना जमिनीवर पडलेला एक रुमाल पण सापडला होता. त्यावरच्या विशेष खाणाखुणांवरून तो आपला एक स्नेही यशवंत मठकर याचा असल्याचे त्यांना ओळखू आले.

'आपल्या पत्नीचा खून झालेला आहे हे लक्षात आल्यावर आपण काय केलेत' असा प्रश्न विचारण्यांत आला तेव्हा ते म्हणाले, 'काही क्षण मी पहातच राहिलो. माझ्या गात्रातील हालचाल करण्याचे सामर्थ्यच नाहीसे झाल्यासारखे वाटले. मग मी ओरडलो. मी काय म्हणालो, तोंडातून काय उद्गार काढले ते मला काहीच आठवत नाही ओरडलो एवढे खरे. माझ्या पत्नीची दासी सुशीला गोंधळली. बकुळेची अवस्था पहातांच तिने माझा दंड पकडला. तिला घेरी येईल या भीतीने मी तिला दाराबाहेर ढकलीत डॉक्टरांना बोलवायला आणि पोलिसांना कळवायला सांगितले!'

यशवंत मठकर आपला जुना मित्र असल्याचे जिवाजीरावांनी मान्य केले. नं. १० काशीकर वाड्यात तो अनेकदा जेवायलाहि आला होता.

'यशवंत मठकर आपल्याला नकळत बकुळाबाईशी काही हिकमती लढवतो आहे असं, खून झाला त्यावेळी तुम्हाला वाटत होत का?' सरकारी वकिलाने विचारले.

'नाही. त्यानं बकुळेला लिहिलेली प्रेमपत्रं कोर्टातच माझ्या दृष्टीस पडली. त्याआधी मला काडीइतकी शंका नव्हती, की हा आपला विश्वासघात करीत असेल.'

एक दिवशी दुपारी सरकारी वकील बॅरिस्टर विजय रानड्यांनी आपली तपासणी संपवली. 'मला सांगा,' त्यांनी जिवाजीरावांना विचारले, 'बकुळाबाईंकडे यशवंत मठकर नऊ वाजता आला आणि त्यापूर्वी थोडा वेळ, नवाला पाचदहा मिनिटं कमी असतांना माधव राजे आला असं सुशीलेनं साक्षीत सांगितलं आहे. माधव आणि यशवंत दोघेही पावणे दहापर्यंत

गप्पा मारीत बसले होते. मग माधव राजे खाली जाऊन पेटी वाजवीत बसला. आणि यशवंत बकुळाबाईशी बोलत बसला. नऊ वाजून पन्नास मिनिटांनी सुशीलेनं त्याला पाणी आणून दिलं आणि मग ती न्हाणीघरात पाणी वगैरे भरून ठेवलेलं आहे की नाही ते पहायला गेली. तुम्ही पुढच्या दारानं आलात ते तिनं ऐकलं. तुम्ही माधवला घराबाहेर घालवलंत तेही तिनं पाहिलं. तुम्ही जिना चढून आलात त्याची चाहूल तिला लागली आणि तुम्हाला अभिवादन करायला ती पुढे आली. ती तुमच्याशी दोन शब्द बोलली. त्यानंतर तुम्ही पत्नीच्या खोलीत शिरलात, त्याचवेळी घड्याळात दहाचे ठोके पडलेले आपण ऐकले असं सुशीला म्हणते. घड्याळाचे ठोके पडलेले तुम्ही ऐकले नाहीत का ? नीट आठवण करून सांगा.'

'ठोके मला ऐकू आले नाहीत.'

'ठीक आहे. सरदार जिवाजीराव, आता मला असं सांगा, पोलीस-अधिकारी आले त्या वेळी आपल्याला अमूक एका व्यक्तीबद्दल संशय येतो असं तुम्ही कुणाला सांगितलं होतंत ?'

'हो.'

'ती व्यक्ति म्हणजे आरोपी यशवंतच का ?'

'नाही.'

'मग कुणाचं नाव सांगितलंत तुम्ही ?'

'माधव राजेचं.'

'त्यानंतर माधव राजेला पोलिसांनी बोलावलं तेव्हा तो आढेवेढे न घेता आला आणि त्यानं सर्व प्रश्नांची राजीखुषीनं सरळ उत्तरं दिली, हे खरं का ?'

'हो.'

'माधवबद्दलचा आपला संशय निराधार आहे हे तुम्हाला कसं पटलं?'

'पोलिसांनी सर्व तपास केल्यावर आणि पावणेदहा वाजताच तो खाली जाऊन पेटी वाजवीत बसला होता असं सुशीलेनं सांगितलं, त्यामुळं माझी खात्री झाली. पाण्याचं भांडं घेऊन सुशीला नऊ वाजून पन्नास मिनिटांनी वर गेली तेव्हा माधव खाली पेटी वाजवीत होता आणि त्या वेळी माझी पत्नी जिवंत होती, त्यामुळं...'

'आभारी आहे मी आपला सरदार जिवाजीराव. माधवनं खून केलेला असणं अशक्य आहे अशी तुमची खात्री झाली ?'

'हो.'

बॅरिस्टर विजय रानडे आज एक वयस्क आणि सर्वांच्या आदराला

पात्र झालेले न्यायमूर्ति आहेत. नऊ पन्नास आणि दहा या दरम्यान केव्हा तरी यशवंत मठकरने बकुळेचा खून केला, मग सुशीलेला कळू न देता, बहुधा जिवाजीराव पुढच्या जिन्याने वर येत असतानाच तो मागच्या जिन्याने निघून गेला असावा, असा बॅरिस्टर रानडयांनी दावा मांडला...

सरदार जिवाजीरावांनी साक्ष फारच उमद्या वृत्तीने दिली असावी, असा त्या बातम्यावरून माझा ग्रह झाला. आपणच पत्नीचा खून केला असावा असा पोलिसांना काही काळ संशय आला याबद्दल आपण दोष देत नाही; माधवला घालवून देऊन वर गेल्यावर पत्नीचा खून करणे आणि यशवंत विसरून गेलेल्या रुमालाला रक्ताचे डाग पाडून त्याच्यावर आळ जाईल अशी तरतूद करणे, आपल्याला शक्य होते हे त्यांनी मान्य केले ..

वस्तुस्थिति अशी होती की, पोलिसांनी सरदार जिवाजीरावांना अटकही केली होती; पण नंतर सोडून दिले—आणि ते अगदी अपरिहार्य होते. काही असो, बॅरिस्टर विजय रानडयांनी सरदार जिवाजीरावांची तपासणी नाटयात्मक रीतीने संपवली. 'आता मी तुम्हाला अगदी स्पष्ट आणि उघडपणाने विचारतो.' ते म्हणाले, 'सरदार जिवाजीराव काशीकर, गेल्या जानेवारीच्या तेरा तारखेला रात्री तुम्ही आपली पत्नी बकुळाबाई हिचा आपल्या खंजिरानं गळा कापून खून केलात की नाही ?'

त्या प्रश्नाला, सरदार जिवाजीरावांनी अगदी सहज, सरळ उत्तर दिले, 'नाही, मी खून केला नाही.'

आरोपी यशवंत मठकरचे वकील बॅरिस्टर रत्नाकर पोंक्षे यानी उलटतपासणीची सुरुवात फारच वाईट केली. त्यांनी साक्षीदाराला निर-निराळे प्रश्न विचारायला सुरुवात केली. तसे बॅरिस्टर रानडे ताडकन् उठून उभे राहिले. दोघा बॅरिस्टरांची चांगलीच शाब्दिक चकमक झाली. शेवटी न्यायमूर्तींनी मध्ये पडून शांतता प्रस्थापित केली.

बकुळेच्या प्रेताजवळ पडलेला रुमाल जिवाजीरावांनी ओळखला, त्याबद्दल त्यांना छेडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाही. मग त्यांनी एकदम दिशा बदलली. 'मला असं सांगा सरदार जिवाजीराव,' त्यांनी विचारले, 'तुमच्या घरी येणारे पाहुणे तुमच्या पत्नीच्या खोलीत जाऊन कोट किंवा कोटाच्या खिशातील रुमाल वगैरे काढून ठेवतात का ? तसा रिवाज आहे का ?'

'हा प्रश्न अपमानास्पद आहे.' सरदार जिवाजीराव तुच्छतेने म्हणाले पण न्यायमूर्तींना तसे वाटले नाही. ते म्हणाले, 'तुमचा अपमान करावा

या हेतूनं त्यांनी हा प्रश्न विचारलेला नाही. प्रश्न सरळ आहे आणि सुसंबद्ध आहे.'

'ठीक आहे.' सरदार जिवाजीराव उपहासाने उत्तरले, 'निमंत्रित पाहुणे तसं कधी करीत नाहीत. रीतिरिवाज निमंत्रितांसाठी असतात.' 'निमंत्रित' या शब्दावर जोर देऊन ते म्हणाले.

सरदार जिवाजीरावाच्या त्या उत्तरानें कोर्टात खळबळ उडाली असा बातमीत उल्लेख होता. मला त्यात नवल वाटले नाही. त्यांचे उत्तर अगदी योग्य असेच होते.

सरदार जिवाजीरावांच्या उलटतपासणीत तसा काही विशेष राम नव्हता. मी कात्रणे चाळू लागलो. 'कोर्टात खळबळ' या मथळ्याने माझे चित्त वेधले बॅरिस्टर रत्नाकर पोक्ष्यांनी सरदार जिवाजीरावांची उलट-तपासणी संपवली होती. ते पिंजऱ्यात उभ्या असलेल्या आरोपीकडे वळले.

बकुळेवर आपले प्रेम होते आणि जिवाजीरावांना सोडून पळून जाण्याबद्दल आपण तिला आग्रह करीत होतो हे यशवंतने मान्य केले. त्याच्या सांगण्याप्रमाणे माधव राजेचेसुद्धा बकुळेवर प्रेम होते. पण ती त्याच्याकडे केवळ एक मित्र या नात्याने पहात होती. खून झाला त्या दिवशी रात्री, बकुळेच्या सांगण्यावरूनच राजे खाली जाऊन तिला आवडणारे एक पद पेटीवर वाजवीत बसला होता. पुढचे दार वाजले आणि सरदार जिवाजी राव आले आहेत असे कळले तेव्हा बकुळेने यशवंतला मागच्या जिन्याने निघून जायला सांगितले. सरदार जिवाजीरावांना टाळण्यासाठी मागच्या जिन्यानेच जाणे त्याला भाग होते. पण बकुळेच्या खोलीतून आपण बाहेर पडलो, तेव्हा न्हाणीघरात असलेली सुशीला आपल्याला दिसली असे तो ठासून सांगत होता. न्हाणीघराचे दार उघडे होते. सुशीला तारेवर कपडे टाकीत होती. तो म्हणाला, 'येतो सुशीला!' त्यावर ती काही बोलली नाही. तसेच तिने आपल्याला कदाचित् पाहिले नसेल हेंहि त्याने मान्य केले. पण 'येतो सुशीला!' हे आपले शब्द तिने ऐकलेच असले पाहिजेत असे त्याला खात्रीने वाटत होते.

'ठीक आहे.' बॅरिस्टर पोंक्षे म्हणाले, 'म्हणजे यावरून असं दिसतं की, बकुळाबाईच्या खोलीतून बाहेर पडलात तेव्हा तुम्हाला सुशीला दिसली. —पण सुशीलेच्या साक्षीवरून तिनं तुम्हांला पाहिलं नाही.'

'असं दिसतं खरं.'

'काशीकरांच्या वाड्यांतून निघाल्यावर तुम्ही काय केलंत?'

'भांबुर्ड्याला माझ्या घरी गेलो.'

'पोलिसांनी येऊन तुम्हाला प्रश्न विचारले तोपर्यंत तुम्ही घरीच होता ना? आणि खुनी गुन्हेगाराला उजेडात आणण्यासाठी पोलिसांना शक्य ते सारं साहाय्य तुम्ही केलत ना?'

'होय.'

पोंक्षाच्या प्रश्न विचारण्याच्या धर्तीमुळे यशवंतबद्दल ज्यूरीचे मत चांगले झाले. पण बॅरिस्टर रानड्यांनी उलटतपासणी सुरू करताच सारा मन् पालटला.

'मला सांगा,' बॅरिस्टर विजय रानड्यानी विचारले, 'बकुळाबाई तुम्हाला वेळोवेळी आर्थिक साहाय्य करीत असत हे खरं आहे की नाही?'

'ती हातभार लावीत असे.'

'माझ्याजवळ तुमच हे एक पत्र आहे.' रानडे पुढे म्हणाले, 'या पत्रात तुम्ही 'आणखी पाचशे कसेहि करून द्यावेत,' अशी मागणी केली आहे. पाचशे म्हणजे काही पाचशे पैसे किंवा आणे नव्हेत. तुम्हाला पाचशे रुपये हवे होते. खरं ना?'

'होय'

'त्याप्रमाणं तुम्हाला 'आणखी पाचशे' मिळाले का?'

'नाही. ती–तिला ते शक्य झालं नाही.'

'अस्सं. म्हणजे तुम्हाला मदत करण्याची तिची इच्छा होती, पण तुम्ही मागितलेली रक्कम तिला उभी करता आली नाही, असंच ना?'

'हो जिवाजीरावांनी तिच्या हाती फारसे पैसे पडू नयेत अशी व्यवस्था केली होती.'

'समजलो, समजलो! तुम्ही आपल्या मित्राचा विश्वासघात केलात, परंतु त्याच्याकडून त्याच्या पत्नीला मिळणारे पैसे घ्यायला तुमची हरकत नव्हती, नाही का?'

'ते उसनवार घेणार होतो मी. नंतर त्यातील पैन् पै परत करणार होतो.'

मग पैसे मिळावेत म्हणून काही दागिने गहाण ठेवण्यासाठी यशवंतने बकुळेचे मन वळवले, तेरा जानेवारीला रात्री तो बकुळेकडे गेला ते, तिने आणखी काही दागिने गहाण टाकावेत असा तिला आग्रह करण्यासाठीच, असे सूचित करणारे प्रश्न रानड्यांनी विचारले. तिच्याकडे आपण आणखी कर्ज मागितले होते, हे यशवंतला मान्य करावेच लागले; पण तिने नकार दिल्यावर राग येऊन यशवंतचे देहभान हरपले, असे बॅरिस्टर रानडे सूचित करू लागले तेव्हा यशवंतने ते साफ नाकारले.

'तुम्ही तिला धमकी दिली नाहीत ?' रानडयांनी विचारले, 'आणि तिनं नकार दिल्यावर अगतिक अवस्थेमुळे निराश मन:स्थितीत तिचा खून करून तुम्ही तिची दागिन्यांची पेटी पळवली नाहीत ?'

'नाही.'

'पोलिसांनी तुमच्या जागेची झडती घेतली तेव्हा तुमच्याकडे तिची हिऱ्याची अंगठी सापडली ती कशी ?'

'ती तिनंच दिली होती मला. खरं सांगतो, तिनंच दिली होती.'

'तुम्ही ती चोरली नाहीत ? तिच्यावर आपलं प्रेम आहे असं सोंग करून तुम्ही तिचा खून केलात आणि ती अंगठी पळवलीत असं माझं म्हणणं आहे.'

रानडयांनी असे म्हटले तेव्हा यशवंत भान विसरला. तो फारच खवळला आणि रानडयांना म्हणाला, 'हे साफ खोटं आहे ! हे ! .. अन् हे जिवाजीला माहीत आहे. हे खोटं आहे हे माहीत आहे त्याला. ती माझ्यावर प्रेम करीत होती म्हणून त्याला माझा राग आला आणि म्हणूनच त्यानं तिचा खून केला . पण मी सांगतो तुम्हाला. . '

यशवंतचे पुढचे शब्द (मी कात्रण वाचीत होतो त्या वर्तमान पत्राच्या) बातमीदाराला ऐकू गेले नाहीत. कोर्टात एकदम खळबळ माजली, गोंधळ उडाला. शांततेचा भंग करणारांचा न्यायमूर्तींनी धिःकार केला.

न्यायमूर्ति काय म्हणाले ते मी वाचीत असतांना इंदिराबाई आत आली. तिच्या हातात चहाचा कप होता. मी तो घेतला, त्याचवेळी दार उघडून एक वयस्क माणूस आत आला. तो इंदिराबाईचा नवरा, जिवाजीरावांचा दिवाणजी होता. तो 'अर्धवट' आहे हे त्याला पहाताच लक्षात येण्यासारखे होते. इंदिराबाईने त्यालाही चहा आणून दिला.

'त्यांच्याकडे लक्ष देऊ नका तुम्ही.' मग ती मला म्हणाली, 'अगदी लहान मुलासारखे वागतात ते डॉक्टर म्हणतात, हा मानसिक विकार आहे.'

चहाचा कप तोंडाला लावतांना मी तिचे आभार मानले. टेबलावर ठेवलेल्या वृत्तपत्रांच्या कात्रणांकडे पाहून तिने भुवया उंचावल्या. 'एवढ्यात वाचलं तुम्ही हे एवढं ?' ती म्हणाली, 'इतके कागद आहेत असं वाटलं नव्हतं मला. उगीचच कचरा पडला आहे. नंतर सारं साफ करायला हवं '

'बाप रे !' मी उद्गारलो, 'म्हणजे हे सारं फेकून देणार आहात की काय तुम्ही ?'

'नाही तर काय ? फार तर शेगडी पेटवायला उपयोग होईल. ती

उत्तरली, ' इतके दिवस मी हा खण उघडलाच नाही म्हणून राहिले हे कागद. तुम्हाला हवे तर घेऊन जा.'

तिने शेगडीचा उल्लेख करताच तिच्या नवऱ्याने कान टंवकारले. ' मला कपाळ शेकायचं आहे. शेगडी आणून दे,' म्हणून त्याने तिला सांगितले. तिने मुकाटयाने स्वयंपाकघरातून शेगडी आणून ठेवली, आणि मग ती मला म्हणाली, ' हवे आहेत तुम्हाला ते वर्तमानपत्रांचे तुकडे ? सगळाच कचरा नको ना ? ती जुनी पुस्तकं ?'

' नको, ' मी म्हणालो, ' फक्त कात्रणंच हवीत. मी ती निवडली आहेत. यांत कांही पत्र पण आहेत, ती नीट ठेवून द्या. '

मी त्या वर्तमानपत्रांच्या कात्रणांचे पुडके गुंडाळूं लागलो. ' का हो ?' मी तिला म्हटले, ' पत्नीच्या मृत्यूमुळे आपल्याला फारसं वाईट वाटलं नाही, असं जिवाजीराव भर कोर्टात म्हणाले तेव्हां तुम्हाला नवल वाटलं असेल, नाही ? '

' गरीब बिचारे जिवाजीराव !, ' इंदिराबाई सुस्कारा टाकून म्हणाली, ' बकुळाबाईंनी बेइमानी केल्याचं समजल्यावर त्यांच्या मनाला फारच मोठा धक्का बसला. '

' विश्वासघात अणि तोसुद्धां आपल्याच एका मित्राकडून ! यशवंत फारच वाईट माणूस असला पाहिजे. ' मी म्हटले.

' चांगलं आणि वाईट ! हे सारं मानण्यावर आहे. ' इंदिराबाई गंभीरपणे म्हणाली, ' त्याच्या रंगेल वागण्यामुळेंच तो कांहो स्त्रियांना आवडायचा. बकुळाबाईंवर तर फारच मोहिनी घातली होती त्यानं. '

' त्याचं खरंच त्यांच्यावर प्रेम होतं म्हणायचं ? '

' हो. प्रेम कसलं ?–पण त्यांना त्याची ओढ वाटे हे मात्र खरं. ' इंदिराबाई उत्तरली, ' त्याच्यासाठी वाटेल ते करायची त्यांची तयारी होती.'

' आपले दागिने गहाण टाकण्याचीसुद्धां ?'

' हो. कित्येकदां त्यांनी मलासुद्धां मारवाड्याकडे जायला लावलं होतं.'

' बाप रे ! खरं म्हणतां ? अन् तरीसुद्धां त्या पशूनं त्यांचा गळा कापला अं ! निदान तसं दिसतं तरी. इंदिराबाई, एकंदर जे मी वाचलं, त्यावरून सर्व साक्षीपुरावा परिस्थितिजन्य दिसतो. खरोखरच त्यानं खून केला असेल कीं काय याची शंका वाटते मला. '

' ज्यूरीनं त्याला दोषी ठरवलं खरं '

मी मान डोलवली. ' हो. तो फांशी गेला शेवटी; पण कदाचित्

जिवाजीरावांनीसुद्धां खून केला असण्याची शक्यता आहे असं नाही वाटत तुम्हांला ? '

इंदिराबाईला धक्का बसलेला दिसला. ' नाही नाही ! ' ती म्हणाली, ' जिवाजीराव तसे नाहीत. '

' तसं कुणाबद्दल काही सांगता येत नाही.' मी म्हटले, ' माणूस कसाही असो, पत्नीनं आणि मित्रानं मिळून आपला विश्वासघात केला हे कळल्यावर तो कितीही शांत असला तरी चिडणारच.'

माझे ते म्हणणे मात्र तिला पटले. ' हो.' ती म्हणाली, ' हे बाकी खरं आहे. आपलं प्रेम असलेल्या माणसाने फसवणूक केली म्हणजे फारच मोठा आघात होतो माणसाच्या मनावर.'

' कोर्टात यशवंत एकदम चिडला ते उगीच नाही. त्याचं खरोखरच बकुळेवर प्रेम असावं असं वाटतं मला तरी निदान ! तो काय म्हणाला पहा ना– 'हे जिवाजीला माहीत नाही हे खोटं आहे हे माहीत आहे त्याला. ती माझ्यावर प्रेम करीत होती म्हणून त्याला माझा राग आला ! ' त्याचं हे बोलणं खरं वाटतं मला.'

इंदिराबाईने हसून मान हालवली. 'एका स्त्रीवर प्रेम करणारा माणूस नव्हता यशवंत.' ती म्हणाली, ' त्याच्यावर विश्वास ठेवणं म्हणजे मूर्खपणा ठरे. अनेक स्त्रियांना हे अनुभवानं पटलंही; पण हानि व्हायची ती होऊन गेल्यावरच ! '

' म्हणजे रगेल अन् रंगेल माणूस होता म्हणायचा तो ! '

' नाही तर काय ! '

' पण एक बाकी दिसतंय.' मी म्हटले, ' बकुळाबाईच्या खोलीतून तो बाहेर पडतांना तुम्हाला दिसला. त्यानं बकुळाबाईंचा निरोप घेतला ते तुम्ही पाहिलंत असं सिद्ध करता आलं असतं. तर त्याच्या मानेभोवतालचा फास चुकला असता.'

' हो.' इंदिराबाई म्हणाली, ' तुम्ही सगळं वाचलेलं दिसत नाही. न्हाणीघरातल्या आरशाबद्दलच्या पुराव्याची हकीकत वाचलीत का ? '

' न्हाणीघरातला आरसा ? '

' हो. कोर्टात त्याचा प्रत्यक्ष प्रयोगसुद्धा करून दाखवला होता. न्हाणीघरात दारासमोर मोठा आरसा आहे. अगदी जमिनीपासून आढ्यापर्यंतच्या उंचीचा आहे तो. त्याचं तोंड दाराकडे आहे. दारावरून जातांना न्हाणीघरात नजर टाकली तर दाराआड कुणी उभं असलं तर आरशात दिसतं. त्यामुळेच मी यशवंतला दिसले पण मला तो दिसला नाही असं त्याच्या

वकिलांनी कोर्टात सांगितलं. मी दारासमोर नव्हते. दाराच्या आड होते. आलं का लक्षात ?'

'हो–हो.' मी उत्सुकतेने म्हणालो, समजलो. पण 'येतो मी' असं आपण सुशीलाबाईला म्हणालो असे तो सांगत होता त्याचं काय ?'

'तसं त्यानं सांगितलं आनंदराव !'

'पण तुम्हाला ऐकू आलं नाही ?'

'नाही ना !'

इंदिराबाई माझ्याकडे काहीशा खजील नजरेने पहात होती. ती किंचित घुटमळली आणि मग म्हणाली, 'तुम्हाला खरं सांगायचं आनंदराव म्हणजे तो खुनाचा प्रकार घडला त्यावेळी मला जरा कमी ऐकू येत होतं. कानात वडस वाढले होते.'

मी तिच्याकडे पहातच राहिलो. 'अरे !' मी ओरडलो, 'पण ही गोष्ट कोर्टातील साक्षीपुराव्यात पुढे आली नाही ?'

'मला कुणी विचारलंच नाही !' इंदिराबाई उत्तरली.

'म्हणून काय झालं ?' मी उद्गारलो, 'समजा, यशवंत सांगत होता ते खरं होतं. त्यानं तुम्हाला पाहिलं आणि तुम्हीही त्याला पाहिलं असावं असं त्याला वाटणं साहजिक आहे. समजा, तुमचे कान त्यावेळी चांगले असते अन् त्यानं येतो म्हणून तुम्हाला म्हटलं ते तुम्हाला ऐकू आलं असतं तर ? तसंच आरशात त्याला तुमचं प्रतिबिंब दिसलं. पण तो किंवा दारापर्यंत आलेल्या बकुळाबाई तुम्हाला दिसल्या नाहीत, हे खरं असेल तर ? तर त्यानं खून केलेला असणं शक्यच नाही.'

'हे सारं समजा, समजा झालं.' इंदिराबाई म्हणाली. 'आत्याबाईला मिशा असत्या तर तशातला प्रकार झाला.'

'हो !' मी उद्गारलो. काही वेळ आम्ही दोघेही गप्प होतो. नंतर मी कात्रणे गुंडाळू लागलो तेव्हा इंदिराबाईने मला ब्राउनपेपर आणि दोरा दिला. कात्रणांबरोबर काही पुस्तके, पत्रे वगैरे बाहेर काढली गेली होती ती खणामध्ये टाकण्यासाठी मी आवरू लागलो. त्यात एक जुने टाइमटेबल होते. ते आत टाकताना पाने उलगडून त्यातून एक चिठोरे खाली पडले. ते उचलतांना सहजच त्यावरून माझी नजर फिरली आणि मग मी ते काळजीपूर्वक वाचले. माझ्या हृदयाचे ठोके एकदम जलदगतीने पडू लागले 'बापरे !' मी उद्गारलो.

इंदिराबाईने माझ्याकडे आश्चर्याने पाहिले. 'काय आहे ते ?' तिने विचारले, 'काय झालं आनंदराव ? तुम्ही असे दचकलात कां ?'

'दचकलो नसतो तरच नवल ! ऐका !' मी म्हटले. ज्या हातात मी ते चिठोरे धरले होते, तो माझा हात थरथरत होता, 'ऐका !' आणि मी ते चिठोरे मोठ्याने वाचले,–

'कृपा करून अशी एकेरीवर येऊन उतावीळ होऊ नकोस. रानहाट विकून टाकण्यासाठी तिचं मन वळवलं अन् ते काम झालं, म्हणजे मग तू अन् मीच आपल्या आड कोण येणार ? तिनं मला आपला दास बनवलेलं नाही. आणि मी तिच्याकडे लक्ष देतो, प्रेम केल्याचं दाखवतो याचा अर्थ, माझं तुझ्यावरचं प्रेम संपलं असा नाही. जरा मन ताळ्यावर ठेव आणि आपलं मत्सरग्रस्त मन भडकू देऊ नकोस. नाहीतर सारंच ओफस् होईल. ही चिठ्ठीताबडतोब जाळून टाक '

मी इंदिराबाईकडे पाहिले. 'ही चिठ्ठी तुम्हांला लिहिलेली आहे आणि त्याखाली यशवंत अशी सही आहे.'

इंदिराबाईने डावा हात मानेवर ठेवला. '–मी–ती चिठ्ठी जाळून टाकली होती मी ! चुकून दुसराच कागद जाळला गेला वाटतं !' ती गोंधळून, धापा टाकीत म्हणाली. तिने आपल्या पतीकडे नजर टाकली. त्या गृहस्थाला एव्हांना बसल्या जागीच झोप लागली होती !

एकाएकी हात पुढे करून तिने ती चिठ्ठी माझ्या हातातून हिसकून घेतली, आणि शेगडींत टाकली. शेगडीतील मंद ज्वाला मोठ्या होऊन त्या कागदाची राख झाली.

मला जबरदस्त धक्का बसला. खरोखरच मोठा धक्का होता तो. 'बाप रे !' मी पुटपुटलो. 'तुम्ही तिचा खून केलात अन् त्याला फासावर जाऊ दिलत !'

दाराकडे धावत जाऊन इंदिराबाईने ते सताड उघडले. प्रारंभी गोंधळाने शरमिंध्या झालेल्या तिच्या नजरेत आता अंगार फुलले होते. 'चालते व्हा इथून !' ती गरजली, 'चालते व्हा ! चालायला लागा . आता काहीहि पुरावा नाही तुमच्याजवळ... जा– निघा !'

मी घाईघाईने घरातून बाहेर पडलो– आंतल्या दारातून आणि दिंडीदरवाज्यातूनहि. रस्त्यावर आल्यावर मी मागे वळून पाहिले. तो वाडा शांत, निवांत होता. त्या वाड्याने पाहिलेले रहस्य वाड्याच्या भिंतीतच दडलेले राहिले.




'कुमारी पुष्पा रणदिवे नावाची एक मुलगी आपली भेट घेऊ इच्छिते,' असे नोकराने येऊन सांगितले तेव्हां आनंदराव आणि सुधीर, नुकत्याच संपवलेल्या एका खटल्याबद्दल गप्पा मारीत होते. सत्य हे कल्पनेपेक्षांही अघटित असते असे आनंदराव म्हणत होते, तर उलट, माणसांची वृत्ति आणि वागणूक नेहमीच एका ठराविक ठशाची असते असा सुधीरचा दावा होता.

आपल्या म्हणण्याच्या पुराव्यादाखल म्हणून सुधीरने टेबलावर पडलेले वृत्तपत्र पुढे केले होते.

'हे पहा, 'पत्नीचा पतीवर प्रतिहल्ला—लोट्या डोक्यांत घातला' असा या बातमीचा मथळा आहे,' तो म्हणाला. 'आता ही बातमी मी वाचलेली नाही. पण तीत काय आहे ते मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो. दारुड्या नवरा, संसाराची वाताहत, आर्थिक कुचंबणा, सारखी मारहाण आणि छळ— अन् शेवटी ते सारं असह्य झाल्यामुळं पत्नीनं चिडून, हाताशी असलेली लोटी भिरकावली. यापेक्षा दुसरं काय असणार आहे?'

'साफ चूक!' त्या बातमीकडे ओझरता दृष्टिक्षेप टाकीत आनंदराव उद्गारले, 'आपल्या म्हणण्याच्या पुष्टोदाखल उदाहरण निवडण्यांत तू सपशेल घसरलास बघ. सकाळीच इन्स्पेक्टर देशमुख भेटले होते, त्यांनी या प्रकरणाची साद्यंत हकीकत मला सांगितली आहे. तू म्हणतोस तसा या स्त्रीचा पति दुष्ट नाही किंवा दारुडाही नाही. तसं पाहिलं तर या दोघांचा संसार फारच सुखानं चालला होता. फक्त एकच वाईट खोड नवऱ्याला होती. जेवायला ही पति–पत्नी बरोबरच बसत. पण वाढण्या– संवरण्यांत वेळ जात असल्यामुळं पत्नीच्या आधीच त्याचं जेवण आटोपे अन् मग पाना-वर बसल्याबसल्या च तो आपली दातांची कवळी काढून तिच्या पानासमोर ठेवायचा जेवताना तिला याची किळस वाटे. अनेकदा सांगूनही त्यानं आपली ती खोड सोडली नाही. शेवटी काल तिला संताप असह्य होऊन तिनं जवळचा तांब्याच त्याच्या कपाळावर भिरकावून मारला बोल आता!'

आपण हरलो हे मान्य करण्यावाचून मुधीरला गत्यंतर नव्हते, पण तेवढ्यातच नोकराने येऊन एक मुलगी भेटायला आल्याचे सांगितल्याने त्याच्यावरची ती आपत्ती टळली. तिला आत पाठव म्हणून आनंदरावांनी सांगण्याआधीच ती धाडकन दार लोटून आत घुसली.

तिला खुर्चीवर बसण्याची सूचना करीतच आनंदरावांनी, आपल्या नेहमीच्या धर्तीनुसार तिचे सूक्ष्म निरीक्षण केले.

'इतकं सतत टंकलेखन करण्यानं तुमच्या अधू दृष्टीला त्रास होत नाही का?' त्यांनी विचारले.

'प्रथम प्रथम व्हायचा त्रास,' ती उत्तरली, 'पण आता संवयीनं यंत्राकडे न पहातांच माझी बोटं नेमकं काम करतात.' हा खुलासा करतां करतांच त्यांना हे नेमके कसे कळले हा प्रश्न मनात उद्भवून ती एकदम दचकली. 'तुम्हाला माझ्याबद्दल कोणाकडून कांहीं माहिती समजली आहे?' आश्चर्यचकित मुद्रेने, आपला उजवा हात कपाळाकडे नेत ती ओरडली. 'एरवी तुम्हाला हे समजणार कसं?'

'तें विचारूं नका!' आनंदराव हंसत म्हणाले, 'निरीक्षणानं इतरांना जे

दिसत नाही ते जाणून घ्यायला शिकलो आहे मी ! तसं नसतं तर तुम्ही तरी कशाला आला असतांत माझ्याकडे सल्ला विचारायला ? '

'कमलाबाईनी मला हकीकत सांगितली आपली, म्हणून मी तुमच्याकडे आलें. त्यांच्या पतीचा तपास पोलिसांनाही लावतां आला नाही. ते मेले असं समजून त्यांचा नाद त्यांनी सोडून दिला असतां तुम्ही त्यांना हुडकून काढलंत ! तशी मलाही मदत कराल का तुम्ही ? मी फारशी श्रीमंत नाही,–पण वर्षांकाठीं वडलांनी ठेवलेल्या शेअर्सच्या डिव्हिडंटचे पांचसहाशें रुपये मिळतात मला; अन् पाचशे रुपये पगार आहे.–ते सर्व खर्च करायला तयार आहे मी ! पण कांहीं करून अशोकांचा पत्ता लावून द्या ! '

'अशोक ? '

'हो ! ' आपण अपुरे नांव सांगितल्याची जाणीव होऊन तिने खुलासा केला, 'अशोक केशव खारकर. गेल्या आठवड्यात त्यांचा अन् माझा विवाह व्हायचा होता. तो आम्ही शक्य तितक्या आटोपशीरपणें उरकायचं ठरवलं होतं. विवाह–कार्यालयाकडे जाण्यासाठी ते आमच्याकडे आले. मी, दोन मैत्रिणी अन् मावशी अशा आम्ही चौघी एका टांग्यात बसलो. त्यात जागा नव्हती म्हणून त्यांना दुसरा टांगा बोलवावा लागला. आमचा टांगा पुढे होता. आम्ही कार्यालयापाशी आधी उतरलो. आत जातांना मी सहज मागे वळून पाहिलं. दुसरा टांगा दाराशी येऊन उभा राहिला होता. पण त्यामधून कोणी उतरतांना दिसेना. अखेर असं आढळून आल की, तो रिकामा होता ! माझ्या समक्ष अशोक त्याच्यात बसले होते. मी गोंधळले, टांगेवालाही गडबडला. जमलेली मोजकी मित्रमंडळी चकित झाली. नंतर आम्ही थोडा वेळ वाट पाहिली, पण अशोक आले नाहीत. या गोष्टीला आठ दिवस होऊन गेले, पण अजूनपर्यंत त्यांचा पत्ता नाही !'

'मग माझ्याकडे तुम्ही आजच इतक्या घाईघाईने का आलात ?' आढ्याकडे पहात आनंदरावांनी विचारले.

पुष्पेच्या हताश चर्येवर पुन्हा एकदा आश्चर्य प्रकट झाले.

'हो ! मी जवळ जवळ धावतच घराबाहेर पडले म्हणा ना !' ती म्हणाली, 'या सर्व भानगडीबद्दल काकांनी–ते माझ्या मावशीचे यजमान–स्वीकारलेली वृत्ती पाहून मला चीड आली. संताप आला–ते पोलिसांकडेही जायला तयार होईनात किंवा तुमच्याकडे यायचंही नाव काढीनात ! 'त्याला काहीही अपाय झालेला नाही. जरा सबुरीने घे उगीच गोंधळ कशाला ?'

असं ते गेले आठ दिवस म्हणत राहिले, तेव्हा मला चीड आली अन् मी एकटीच तुमच्याकडे निघून आले.'

'तुम्ही आपल्या मावशीकडे रहाता ?' आनंदरावांनी विचारले.

'हो ! आई अन् वडील दोघं तीन वर्षांपूर्वी वारल्यापासून मी अन् मावशी एकत्र रहात होतो. मावशीचं लग्न दीड वर्षांपूर्वी रमाकांत आंबेकर यांच्याबरोबर झालं, तेव्हा तिच्याबरोबरच मी पण त्यांच्याकडे रहायला गेले. मी आपली त्यांना काका म्हणते खरी, पण वयानं ते फार तर पाचसहा वर्षांनीच वडील असतील माझ्यापेक्षा !'

पुष्पा ही अवांतर माहिती सांगू लागली तेव्हा आनंदराव नाराज होतील असे सुधीरला वाटले. पण तसे काही झाले नाही. उलट तिची बड-बड आनंदराव उत्सुकतेने ऐकत राहिले.

'शेअर्सबद्दल वर्षाकाठी पाच–सहाशे रुपये मिळतात, असं तुम्ही म्हणालात नाही का ?

'हो ! पांच–सहाशे म्हणजे कमीत कमी झाले. एकंदर पंधरा हजार रुपयांचे शेअर्स आहेत. डिव्हिडंड कमीजास्त मंजूर होईल त्या मानानं पांच–सहाशे ते दहा–बाराशे रुपये मिळतात. शेअर्स मात्र विकता येत नाहीत मला.

'तुमची हकीकत ऐकून मला चांगलीच उत्सुकता वाटू लागली आहे.' टेबलावर दोन्ही हातांची कोपरे टेकून आनंदराव म्हणाले. 'हे येणारे पैसे आणि तुमचा नोकरीचा पगार हे सारं विचारांत घेता तुमची प्राप्ती चांग-लीच आहे असं म्हटल पाहिजे. पण त्या मानानं तुम्ही सिनेमा–नाटक किंवा प्रवास, हिंडणं–फिरणं अशा बाबीत फारसा पैसा खर्च करीत नाही मला वाटतं !'

'नाही, तसे उगीच पैसे खर्च करायची मला हौसच वाटत नाही. शिवाय मी मावशीकडे रहाते– तिला उगीच आपला भार व्हावा हेही मला बरं वाटत नाही. शेअरच्या डिव्हिडंटचे पैसे आले म्हणजे मी ते मावशी-जवळ देऊन टाकते अन् पगारातले निम्मे माझ्या खर्चाला ठेवून बाकीचे रहातात तेही तिलाच देते.'

'स्वतःची परिस्थिती तुम्ही अगदी स्पष्ट केलीत.' आनंदराव म्हणाले 'हा माझा स्नेही सुधीर आहे. तसे तो अन् मी काही दोन नाही. त्याच्या-समोर कसं बोलू म्हणून संकोच बाळगू नका. आता अशोक खारकरांबद्दल माहिती सांगितलीत म्हणजे माझं काम तेवढंच सोप होईल. उदाहरणार्थ त्यांचा अन् तुमचा परिचय कसा, केव्हां झाला ?'

पुष्पेची चर्या एकदम लज्जावनत झाली. अस्वस्थपणे आपल्या पद-

राच्या टोकाचा चोळामोळा करीत तिने एकदा सुधीरकडे ओझरते पाहिले. मग ती म्हणाली, ' माझे वडील इथल्या भारत सायकल्स कारखान्यात नोकरीला होते. दरवर्षी वाढदिवसाच्या निमित्ताने कारखान्यातील लोक कुठली तरी सफर काढतात. वडील होते तेव्हा त्यांच्याबरोबर मीही या सफरीला जात असे. वडील वारल्यानंतरही त्यांचे स्नेही मला आमंत्रण पाठवीत. गेल्या वर्षीही त्यांनी तसं निमंत्रण पाठवलं. मी जाऊ नये असं काकांचं म्हणणं पडलं. कारखान्यातले नाना प्रकारचे लोक त्यात भाग घेणार, आपल्यासारख्या प्रतिष्ठित माणसांनी त्यात मिसळणं चांगलं नाही, असं ते म्हणाले. पण काही झालं तरी जायचंच असं मी नक्की ठरवलं. मला जाऊ नको म्हणून सांगणारे ते कोण ? उगीच भांडण होऊ नये असं मनात आल, पण कर्मधर्मसंयोगानं तेवढ्यात त्यांना त्यांच्या नोकरीच्या कामासाठी नागपूरला जावं लागलं, अन् भांडण–तंटा न होता मी कारखान्यातील मंडळीबरोबर घारापुरीला गेले. तिथेच बोटीवर अशोक खारकरांचा नि माझा परिचय झाला.'

' मग नागपूरहून परत आल्यावर तुमचे काका खूपच रागावले असतील, ट्रिपला गेलात म्हणून !' आनंदराव म्हणाले.

' नाही ! ते त्यांनी तेवढंसं मनावर घेतलं नाही. मावशीने, मी गेले होते म्हणून सांगितलं तेव्हा ते मोठ्यानं हसले. ' स्त्रियांना अमुक एक करू नको म्हणून सांगण्यात अर्थच नाही. मग त्या ते मुद्दाम करणार !' असं म्हणून त्यांनी तो विषयच पुन्हा काढला नाही.'

' हं ! एकूण घारापुरीच्या ट्रिपला जातांना तुमचा अन् अशोक खारकरांचा परिचय झाला म्हणायचा. अन् मग पुढे ?'

' दुसऱ्या दिवशी माझं ऑफिस सुटायच्या वेळेला ते मला भेटले. मग मी त्यांना आमचं घर दाखवलं. त्यानंतर दोनतीनदा ते आले अन् आम्ही बरोबर फिरायला गेलो. पंधरावीस दिवसांनी काका नागपूरहून परत आल्यावर मात्र त्यांनी आमच्या घरी यायचं नाकारलं. ते मला ऑफिस सुटायच्या वेळी येऊन तिथे भेटत अन् आम्ही कधी एखाद्या हॉटेलात चहा फराळ करीत असू, तर कधी तशीच फिरायला जात असू.'

' खारकर घरी येत नसत मुळीच ?'

' नाही ! काकांचा स्वभाव थोडा चमत्कारिक आहे. त्यांना उगीच स्नेहीपरिवार वाढवलेला आवडत नाही. विशेषत: स्त्रियांनी आपलं घरातल्या वातावरणातच सुखी रहावं असं त्यांचं मत आहे. पण प्रत्येक स्त्रीला

आपलं स्वत:चं अस एक निराळं विश्व हवं असं मी मावशीला सांगायची अन् म्हणून मी त्यांच्या बोलण्याकडे विशेष लक्षच दिलं नाही.'

'मग त्यानंतर लवकरच तुम्ही विवाहित व्हायचं ठरवलंत ?'

'हो, ते फिरोजशहा मेथा रोडवरील एका विमा कंपनीत नोकरीला होते. अन्–'

'अन् रहायला ?'

'खारला–आपल्या मामांकडे. पण मी तिकडे कधी गेले नाही. मामांना ते कदाचित् आवडायचं नाही, असं ते म्हणाले. आणि मलाही, ते इथं मुंबईत भेटत असतांना उगीच तिकडे जायची कांही जरुरी वाटली नाही. मी त्यांना त्यांचा पत्ताही विचारला नाही. एक–दोन दिवस भेट झाली नाही तर मी त्याना कंपनीच्या पत्त्यावर पत्र पाठवून बोलावीत असे.'

'मुद्याच्या अन् महत्त्वाच्या अशा बहुतेक गोष्टी तुम्ही सांगितल्या !' आनंदराव विचार करीत म्हणाले, 'आता त्याचा स्वभाव, वागण्या-बोलण्यांतली काही वैशिष्टच तुम्हाला सांगता येतील का ? तुम्हांला क्षुल्लक वाटणारी माहितीसुद्धा न गाळता सांगा.'

'त्यांचा स्वभाव लाजाळू अन् भिडस्त होता. म्हणूनच ते मला नेहमी संध्याकाळी भेटत. ऑफिसमधल्या कोणी पाहिलं तर उगीच सारखी थट्टा करीत रहातील, असं वाटे त्यांना. त्यांचं मन खूप भावनाप्रधान, कोमल होतं अन् आवाजही तसाच मृदु होता. लहानपणी त्यांच्या घशांतल्या ग्रंथी सुजल्या होत्या वाटत. तेव्हांपासून त्यांचा घसा थोडा अधूच राहिला. त्यामुळे त्यांचं बोलणं नेहमी पुटपुटल्यासारखं, अन् बोल् की नको असे विचारपूर्वक शब्द उच्चारल्यासारखं असे. त्यांचे कपडे नेहमी नीट–नेटके अन् रुबाबदार असत. माझ्यासारखीच त्यांची दृष्टी जरा अधू होती; अन् त्यामुळे ते किंचित् निळसर काचांचा चष्मा वापरीत.'

'ठीक, पुरे. तुमचा लग्नाचा बेत केव्हा ठरला, त्याबद्दल जरा तपशीलवार सांगाल तर बरं होईल.'

'त्यानंतर काका पुन्हा नागपूरला गेले. ते मी त्यांना सांगताच, आपण चटकन लग्न करून घेऊ असा त्यांनी आग्रह धरला. माझ्याबरोबर ते घरी आले. माझ्या आईच्या फोटोसमोर उभं राहून, अन् त्या फोटोवर हात ठेवून त्यांनी मला शपथ घ्यायला लावली,– 'काय वाटेल ते झाल तरी मी कायमची तनु–मनानं तुमचीच राहीन' अशी. अर्थात्, आधी त्यांनी स्वत: तशी शपथ घेतली. ते फार भावनाप्रधान असले पाहिजेत– एरवी अशा शपथा घेण्याचं कुणाला सुचणार नाही, असं मावशी म्हणाली. आधी

आमच्या विवाहाबद्दल ती काकू करीत होती, पण ही गोष्ट मी तिला सांगितल्यावर ती राजी झाली. काका नागपूरहून येण्याच्या आत विवाह उरकून घ्यावा, नाहीतर मग ते कदाचित् अडथळा करतील, एकदा होऊन गेल्यावर मात्र त्यांना विशेष काही वाटायचं नाही, अन् काही झालं तरी आपण त्यांची समजूत काढू, असं शेवटी तिनं ठरवलं.'

'आणि शेवटी, लग्नाच्या दिवशी तसा प्रकार झाला?'

'हो, माझ्या दोन मैत्रिणी, मावशी, अन् मी अशा आम्ही चौघी एका टांग्यात बसलो अन् ते दुसऱ्यांत बसले. टांगेवाला तर खूपच चकित झाला होता ते आत नाहीत हे पाहून. असं कसं झालं हे त्यालाही उमगेना. त्यावर आता आठ दिवस होऊन गेले, पण अजून काहीही सुगावा लागलेला नाही.'

'तुम्ही त्यांच्या ऑफिसात चौकशी केलीत?'

'हो! मी समक्ष गेले नाही, पण पत्र पाठवून विचारलं. तर तीन दिवस झाले, सदर गृहस्थ ऑफिसात आलेले नाहीत, एवढच उत्तर आलं.'

'मला वाटत, कोणीतरी तुम्हाला चांगलच फसवलेलं आहे.' आनंदराव उद्गारले.

'नाही. तसं मुळीच नाही. त्यांचं माझ्यावर फार-फार प्रेम होतं. लग्नाचं नक्की ठरल्यावरसुद्धा ते मला सारखं बजावीत की, काही झालं तरी आपण दोघांनी परस्परांशी अगदी प्रामाणिक रहायचं. प्रत्यक्ष विवाहात काही अडचण आलीच तरी मनानं आपला विवाह होऊन चुकला आहे, अन् केव्हां ना केव्हा तरी मी येऊन तुझ्या पाणिग्रहणाचा अधिकार शाबित करीन, असं ते विवाह व्हायचा होता त्या दिवशी सकाळीच म्हणाले होते. विवाह चार तासांवर असताना हे असं का बोलतात याचा त्यावेळी मला अचंबा वाटला, पण नंतर जे काही घडलं त्यावरून त्यांच्या त्या बोलण्याला काही विशेष अर्थ होता हे स्पष्ट झालं आहे.'

'नक्कीच! पण काय झालं असावं याचा काहीच अंदाज तुम्हाला बांधता येत नाही?'

'नाही.'

'आता एकच विचारायच राहिलं. तुमच्या मावशीचं या एकंदर प्रकाराबद्दल काय मत झालं आहे?'

'ती खूप रागावली. पुन्हा म्हणून हा विषय तू काढू नकोस, असं तिनं मला बजावून सांगितलं.'

'अन् त्यांचे पति? त्यांचं काय म्हणण आहे?'

'त्यांच मत बरचसं माझ्यासारखं आहे. काही तरी अनिष्ट

झालं असाव, पण अशोक पुन्हा केव्हा ना केव्हां तरी येऊन भेटतील असं त्यांना वाटतं. माझी अशी फसगत करून त्यांना काय मिळायचं आहे? विवाहाच्या निमित्तानं माझ्याकडून त्यांनी काही पैसे घेतले असते तर एक त्यात त्यांचा काही हेतु होता असं म्हणता आलं असतं, असं ते म्हणाले. पण अशोक तसे फार कांटेकोर होते. पैशांच्या बाबतीत कधी चहाचे चार आणेसुद्धा त्यांनी मला देऊ दिले नाहीत! मग असं का व्हावं तेच उमजत नाही– माझ्या मनाचा अगदी गोंधळ उडाला आहे. रात्रीच्या रात्री मी झोपेवाचून विचारात घालवते. पण काही सुचत नाही.' बोलता बोलताच तिच्या नेत्रातून अश्रुधारा वाहू लागल्या। पर्समधून रुमाल काढण्याऐवजी तिने ते अश्रु पदरानेच टिपले.

'तुमच्याकरिता या प्रकरणात मी लक्ष घालीन.' आनंदराव उठून उभे रहात म्हणाले, 'याचा निश्चित असा काहीतरी छडा लावता येईल याबद्दल मला शंका नाही. या भानगडीचा सर्व भार आता माझ्या खांद्यावर आहे असं समजा अन् तुम्ही तुमच्या मनावरचं दडपण पूर्णपणानं काढून टाका. आणखी एक गोष्ट म्हणजे अशोक खारकर या नावाची व्यक्ति तुमच्या प्रत्यक्ष आयुष्यातून जशी अदृश्य झाली आहे तशीच ती मनातून पण काढून टाका!'

'म्हणजे ते पुन्हा दिसणार नाहीत असं वाटतं आहे तुम्हाला?'

'तसंच काही सांगता येत नाही, पण–'

'मग काय झालं असेल त्यांचं?'

'तो प्रश्न तुम्ही माझ्याकडे सोपवला आहे ना? मग झालं तर! आता त्याचं थोडं वर्णन, अन् त्यांचं एखाददुसरं पत्र तुमच्याजवळ असेल तर ते माझ्याजवळ देऊन ठेवा, म्हणजे झालं.'

'लोकसत्ते'त मी त्याबद्दल जाहिरात दिली होती तिची ही कात्रणं आहेत. त्यात त्यांचं शक्य तेवढं वर्णन आहे' पर्समधून वृत्तपत्राचे दोन कपटे काढून देत पुष्पा म्हणाली. अन् त्यांच्याकडून आलेली ही दोन पत्रं.'

'छान! आता तुमचा पत्ता.'

'४५, गिरगाव रोड.'

'खारकरांचा घरचा पत्ता तुम्हाला माहीत नाहीच. त्यांच्या त्या विमा कंपनीचं नाव अन् तुमच्या मावशीचे यजमान कुठे नोकरीला आहेत त्यांचा पत्ता तेवढा देऊन ठेवा. जमलंच तर आज दुपारी मी त्यांना भेटून येईन. आता ते घरून निघाले असतील बहुधा.'

'हो ! नऊलाच ते जेवून जातात.' आनंदरावांनी पुढे केलेल्या कागदाच्या कपटयावर दोन्ही पत्ते उतरून देत ती म्हणाली.

ती जायला उठली तेव्हा अशोकची मनातली स्मृति काढून टाकण्याबद्दल आनंदरावांनी तिला पुन्हा एकदा बजावले.

'तुम्ही माझ्या हिताचंच सांगाल याबद्दल मला शंका नाही. पण ते माझ्या हाती नाही. मी त्याच्याशी आजन्म एकनिष्ठ राहीन ! ते केव्हाही येवोत– मी त्यांची वाट पहात असेन !' ती म्हणाली.

० ० ०

ती गेल्यावर आनंदराव पुन्हा खुर्चीवर बसून विचारमग्न झाले. सिगारेट पेटवून ती ओढीत तिच्या धुराकडे ते पहात होते.

सुधीरने निस्तब्धेचा भंग केला.

'तुम्ही टंकलेखन करता, तुमची दृष्टि अधू आहे, हे सांगून तिला चांगलच चकित केलंत बाकी तुम्ही !' तो म्हणाला.

'चकित झालेली दिसली खरी ती, पण वस्तुतः नवल वाटण्यासारखं काही नव्हतं !' आनंदराव म्हणाले.

'नाही कसं ? मला सुद्धा नवल वाटलं. तिची दृष्टि अधू आहे आणि ती टंकलेखन करते, या गोष्टी तुम्ही कशा ओळखल्यात ?'

'त्यात कठीण काय होतं ? नेहमी चष्मा लावल्याची खूण तिच्या नाकावर स्पष्ट दिसत होती. शिवाय इथं आत आल्याबरोबर आधी डोळ्यांची थोडी उघडझाप करून रोखून पाहिल्यावरच तिला आपली दृष्टि स्थिर करता आली ' आनंदराव सुधीरकडे सस्मित पहात उत्तरले. 'आता टंकलेखनाचं म्हणशील तर तेही सोप आहे. या दिवाणखाण्यात रेडिओ आहे, इतरही पुष्कळ वस्तु भरल्या आहेत, पण त्या साऱ्याऐवजी तिची नजर आधी टंकलेखन यंत्रावर खिळली, इतकंच नव्हे तर ते कोणत्या जातीचं आहे तेहि तिनं रोखून पाहिलं. अर्थात मी आपलं एक अनुमान काढलं. अन् ते खरं ठरलं.'

'अन् ती घरून घाईघाईनं निघून आली असावी हे कसं ओळखलं ?' सुधीरने पुन्हा विचारले.

'इतक्या दिवसांत वास्तविक या गोष्टी निरीक्षणानं समजायला हव्यात तुला ! ' आनंदराव मिश्किल स्वरांत म्हणाले, 'पहिली गोष्ट म्हणजे ती नेसतं पातळ न बदलतांच आल्याचं स्पष्ट दिसत होतं. दुसरी गोष्ट म्हणजे तिनं पावडर वगैरे लावलेली नव्हती. अन् तिसरी गोष्ट म्हणजे चष्मा लावायचंसुद्धां तिला भान राहिलं नव्हतं.'

'हं ! ' सुधीरने उसासा टाकला. इतक्या सोप्या गोष्टी आपल्या लक्षांत आल्या नाहीत, याबद्दल त्याला थोडेसे वैषम्य वाटत होते. पुष्पेने दिलेल्या जाहिरातीचे एक कात्रण आनंदरावांनी त्याच्यापुढे टाकले.

'वाच बरं ही जाहिरात जरा.'

'हरवल्याचा शोध' या सदराखाली ती जाहिरात होती. सुधीरने ती मोठ्याने वाचली,

'गुरुवार ता. १८ रोजी सकाळी ८ चे सुमारास अशोक केशव खारकर नांवाचे गृहस्थ बेपत्ता झाले आहेत. वय सुमारे तीस. उंची पाच फूट पाच इंच. रंग साधारण गोरा. बांधा बळकट. केस काळे. जाड मिशा आणि सावरकर पद्धतीचे केसांचे कल्ले. अगांत पिवळा कोट आणि तसलीच पँट व रेशमी शर्ट. शोध लावून देणारास–'

'पुरे ! ' आनंदराव म्हणाले, 'आतां पत्रं पाहूं या. अरेच्चा ! ही दोन्ही टंकलिखितच आहेत. त्यांत आणखी एक विशेष दिसतो ! '

'कोणता ? '

'सहीसुद्धां हातानं केलेली नाहीं.'

'हो ! वेळ आलीच तर विश्वासघाताचा किंवा वचनभंगाचा दावा लावतां येऊ नये अशी बेट्यानं खबरदारी घेतलेली दिसते ! '

आनंदरावांनी त्याच्याकडे भुवया उंचावून पाहिले त्याचे बोलणे त्याना पटले नसावे हे स्पष्ट दिसले.

'ते मग बघूं आपण ! आतां मला आधी दोन पत्रं पाठवावयाची आहेत. एक या मुलीच्या मावशीच्या नवऱ्याला, अन् दुसरं एका कंपनीच्या मॅनेजरला. तिनं दिलेल्या पत्त्यावर हे पत्र एवढं तू आबेकरांना देऊन ये दुसरं पत्र मी मुलाबरोबर पाठवण्याची व्यवस्था करतो. या पत्रांची उत्तरं उद्यां मिळायला हवीत ! '

आनंदरावांनी दिलेले पत्र सुधीरने रमाकांत आंबेकरांना त्यांचा ऑफिसचा पत्ता हुडकून काढून नेऊन दिले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत त्याला आनंदरावांकडे जायला झाले नाही. संध्याकाळी बरोबर सहाला घरी येऊन भेटण्याबद्दल आनंदरावानी त्याला सांगितले होते. त्याप्रमाणे घाई घाई करून वेळेवर हजर रहाण्याचा त्याने प्रयत्न केला, पण तरी थोडा उशीर झालाच तो आनंदरावांकडे पोचला तेव्हा सहा वाजून दहा मिनिटे होऊन गेली होती. उशीर झाला म्हणून त्या प्रकरणाचा उलगडा व्हावयाचा प्रत्यक्ष क्षण टळतो की काय, अशी त्याला जिना चढताना भीति वाटत होती. पण तसे काही झाले नव्हते. आनंदराव आरामखुर्चीवर पडून

पुस्तक वाचण्यात गर्क झालेले दिसले. सुधीरला हातानीच बसायची खूण करून ते पुन्हा वाचनात मग्न झाले.

सुधीरला गप्प बसवले नाही 'झालं, संपल का प्रकरण ?'

'नाही अजून–एक–दोन पानं राहिली आहेत.' आनंदरावांनी पुस्तका-वरची नजर न काढता उत्तर दिले.

'पुस्तकाचं नाही म्हणत मी !' सुधीर अस्वस्थपणे उद्‌गारला, 'कालच ते पुष्पाचं प्रकरण !'

'ते होय ? मला वाटलं तू पुस्तकाबद्दलच विचारतो आहेस.' आनंद-रावांनी हातातले पुस्तक मिटून बाजूला ठेवले. 'तशी मोठीशी गुंतागुंत नव्हतीच मुळी त्यात. काही किरकोळ तपशिलाच्या गोष्टी मात्र मोठ्या मनोरंजक होत्या. खेदाची गोष्ट एवढीच की त्या बदमाषाला कायद्यानं शासन करता येईल असा काही मार्ग दिसत नाही.'

'म्हणजे तो बदमाष कोण आहे याचा पत्ता तुम्ही लावला आहे म्हणायचा ! कोण आहे तो ? अन् पुष्पेला असं फसवण्यात त्याचा हेतु तरी काय होता ?'

सुधीरच्या तोंडून प्रश्न जेमतेम उच्चारला गेला असेल, तेवढ्यात जिन्यावर जड पावले ऐकू आली आणि दारावर ठोठावले गेले

आनंदराव खालच्या स्वरात म्हणाले,–

'हे पुष्पेच्या मावशीचे यजमान असावेत. 'सहाला येऊन भेटतो' असं त्यांनी उत्तर पाठवलं आहे, काल मी तुझ्याबरोबर धाडलेल्या पत्राला.' ते मग मोठ्याने उद्‌गारले, 'या आत या ! दार उघडंच आहे.'

आत प्रवेश करणारे गृहस्थ मध्यम उंचीचे, दणकट शरीरयष्टीचे होते. त्यांनी डोक्याचे केस पातळ कापलेले होते, गुळगुळीत दाढी केलेली होती. नाकाखाली बारीक माशीच्या आकाराची मिशी होती. नजर तीक्ष्ण अन् कठोर होती. आत येऊन ते खुर्चीवर बसले.

'नमस्कार.' आनदराव म्हणाले, 'सहा वाजता जरूर भेटतो अशा आशयाचं तुमचं पत्र दुपारी तीनच्या डाकेला मिळालं मला.'

'हो ! मला थोडा वेळ झाला खरा, पण माझा काही इलाज नव्हता.' ते म्हणाले. त्यांचा आवाज खणखणीत होता. 'या किरकोळ गोष्टीबद्दल पुष्पेनं तुम्हांला उगीच तकलीफ दिली याबद्दल मी फार दिलगीर आहे. आपली घरातली लक्तरं अशी उघड्यावर धुवू नयेत अशा मनाचा आहे मी. माझं न ऐकताच ती तुमच्याकडे आली. मोठी भावनाप्रधान पोर आहे ती– अन् एकदा एखादी गोष्ट करायची असं तिनं ठरवलं म्हणजे त्यापासून तिला

परावृत्त करण अशक्य असत. काल समक्ष भेटीत हे तुमच्या लक्षात आलच असेल. आता तुमच्याकडे ती आली याबद्दल मी विशेषसं काही मानीत नाही; कारण प्रत्यक्ष पोलिसांशी तुमचा संबंध नाही. तरी पण एक कौटुंबिक गाष्ट अशी इतरांसमोर मांडली जाण मला उचित वाटत नाही, हेही तितकच खर. शिवाय हा खर्चही अगदी अनाठायी आहे. हा अशोक खारकर तुम्हाला कसा सापडणार हेच कळत नाही मला !'

'का ?' आनंदराव शांतपणे उद्गारले. 'माझं मत तर अगदी उलट आहे. या अशोक केशव खारकरला अगदी नक्की हुडकून काढता येईल, अशी खात्री वाटते मला !'

रमाकांत आवेकर चांगलेच चमकले. 'वा ! असं असेल तर मग फारच चांगल !' आनंदरावांवरची नजर सुधीरकडे वळवीत ते म्हणाले.

'टंकलेखन यंत्राच्या अक्षरातही माणसाच्या हस्ताक्षराइतकेच व्यक्तिमत्त्व असत.' टेबलावरचे पडलेले पत्र उचलून त्याकडे पहात आनंदराव म्हणाले, 'अगदी नव्या यंत्राचा अपवाद वगळला तर कोणत्याही दोन यंत्रांच्या अक्षरात सहसा बिनतोड साम्य आढळत नाही. काही अक्षर जास्त झिजतात, काही एका बाजूलाच झिजतात तर काही विशिष्ट अक्षरातील अंतर कमी—जास्त असतं. आता या तुमच्या पत्रातल्या 'ब' अक्षरात वर्तुळातली मधली रेघ उमटत नाही अन् 'क'च पुढचं अर्धवर्तुळ स्पष्ट न उमटल्यान तो 'क' अर्ध्या 'व' सारखा दिसतो. हा 'र' इतर अक्षरांच्या रांगेपेक्षा थोडासा वर सरकलेला आहे प्रत्येक ठिकाणी. अशी एकंदर दहा वैशिष्ट्य या पत्रातून मला दाखवून दे ा येतील.'

'आमच्या कार्यालयात एवढा एकच टाइपरायटर आहे. अन् त्यामुळे अक्षर बरीच झिजली आहेत.' आपल्या तीक्ष्ण नजरेने आनंदरावांकड पहात आवेकर म्हणाले.

'आता तुम्हाला मी एक मोठं मजेदार उदाहरण दाखवणार आहे.' टेबलाचा खण उघडून आनंदरावांनी त्यातून एक घडी केलेला कागद काढला. 'टंकलेखन यंत्र आणि गुन्हेगारांशी त्याचा संबंध' या विषयावर लवकरच मी एक प्रबंध लिहिणार आहे. त्यासाठी या विषयाचा आतापर्यंत बराच अभ्यास केला आहे मी. त्या बेपत्ता तरुणान पुष्पेला लिहिलेली दोन पत्रं माझ्याजवळ आहेत. ही दोन्ही पत्र टंकलिखित आहेत. तुम्ही नीट पहाल तर त्यातील क अर्धवट झिजलेला आहे अन् ब ची मधली पोटफोडीची रेषा उमटत नाही असं दिसेल तुम्हाला. तसच 'र' हे अक्षर पण रांगेत बरोबर न उमटता किंचित् वर उमटत. थोडक्यात सांगायचं म्हणजे मी ज्या दहा

वैशिष्टयांचा मघा उल्लेख केला ती दाहीच्या दाही या दोन्ही पत्रात आढळतात.'

रमाकांत आंबेकर रागाने उठून उभे राहिले. 'निरर्थक गप्पा ऐकत बसायला मला वेळ नाही !' ते म्हणाले, 'त्या माणसाचा शोध तुम्हाला लावता येण्यासारखा असेल तर लावा अन् मग कळवा मला !'

'नक्कीच !' आनंदराव म्हणाले. चटकन उठून त्यांनी दार लोटून घेतले आणि त्याला कडी घातली. 'आत्तांच कळवतो मी तुम्हाला. त्या माणसाला मी पकडलं आहे !'

'काय ? कुठं ?' सांपळ्यात सांपडलेल्या उंदराप्रमाणे इकडे तिकडे पहात आंबेकर ओरडले. त्यांची चर्या पांढरीफटक पडली होती.

'नाही–त्यात काही अर्थ नाही आता !' आनंदराव दाराला पाठ लावून उभे रहात म्हणाले, 'यातून तुमची सुटका होणं अशक्य आहे. इतक्या सोप्या प्रकरणाचा मला उलगडा करता यायचा नाही असं तुम्ही अनुमान काढावं–म्हणजे तो एक प्रकारे माझ्या बुद्धिमत्तेचा अपमानच समजतो मी ! बसा, खाली बसा ! बोलू या आपण आता जरा निवांतपणे '

आंबेकर हताशपणे खुर्चीवर बसले. त्यांच्या कपाळावर डबडबून घाम आला होता. 'तुम्ही–तुम्हाला काही कायदेशीर इलाज करता यायचा नाही याबद्दल माझ्या विरुद्ध.'

'दुर्दैवानं तुमचं म्हणणं मान्य करायला हवं ! पण कायद्यानं या कृत्याला शिक्षा करण्याची तरतूद नाही म्हणून त्या कृत्यातील दुष्टपणा काही कमी होत नाही. इतक्या दुष्ट मनोवृत्तीची उदाहरणं क्वचितच नजरेस पडतात ! खुनी मनुष्य माणसाचा चटकन् प्राण घेऊन मोकळा होतो, पण तुम्ही एका निष्पाप तरुणीला जिवंतपणी मरणाच्या यातना भोगायला लावीत आहांत. '

'आधी तसा काही हेतु नव्हता माझा. केवळ एक गंमत म्हणून–' आंबेकरांनी खुलासा करण्याचा प्रयत्न केला.

'आता आणखी सारवासारवी करण्याचा प्रयत्न करू नका !' आनंदराव तिरस्काराने म्हणाले, काय झालं ते मीच सांगतो. त्यात मी कुठे चुकलो तर सांगा तुम्ही. '

स्वत:शीच बोलावे, त्याप्रमाणे भिंतीवरील कॅलेंडरकडे नजर रोखून आनंदराव सांगू लागले.

'तुम्ही विवाह केला अन् तुमच्या पत्नीची भाची तुमच्याकडे रहायला आली. सोन्याची अंडी घालणारी हंसी सांपडावी तसं तुम्हांला झालं !

तिच्या शेअर्सचं डिव्हिडंड अन् मासिक पगार मिळून तुम्हाला दरमहा चारशे पाचशे रुपये मिळू लागले. त्यासाठी खर्च मात्र फारच थोडा करावा लागत असे. एका माणसाच्या खाण्यापिण्याचा खर्च असा कितीसा होणार? दोघांच्या संसारांत आणखी एक पोट सहज, विशेष बोजा न पडतां भागू शकत. फारफार तर तीस-चाळीस रुपये जास्त खर्च. तुमची ही भाची प्रेमळ, आनंदी अन् भावनाप्रधान आहे, ती अविवाहित असेल तोपर्यंतच तिच्याकडून मिळणारा हा आर्थिक लाभ चालू रहाणार हे स्पष्ट होतं. त्या द्रव्याचा लोभ तुम्हांला अनावर झाला. काहीही करून तिनं जन्मभर आपल्याकडेच रहावं, अशा कारवाया तुम्ही करू लागलात. शक्य असतं तर तुम्ही तिच्याशी विवाहच जमवण्याचाच प्रयत्न केला असतात, पण कायद्यानं ते अशक्य होतं. मग तिनं समवयस्क तरूणांबरोबर मिळू-मिसळू नये अशी तुम्ही खटपट करू लागलात. पण यानं फार काळ भागण्यासारखं नाही हे लक्षात येताच तुम्ही इतर युक्त्या शोधू लागलात. त्यावर उपाय एकच होता. पत्नीच्या अनुमतीनं अन् तिच साहाय्य मिळवून तुम्ही स्वतःच्या रूपांतराची तयारी केलीत. कृत्रिम मिशा, कानापुढे चिकटविलेले कल्ले, निळसर काचांचा चष्मा अन् मुद्दाम हळू केलेला दबका स्वरोच्चार, या साऱ्या गोष्टींच्या जोडीला पुष्पेची अधू दृष्टीही साहाय्यभूत होतीच! अन् अशा रीतीनं तुम्ही अशोक खारकर बनलात! दुसऱ्या कोणाच्या प्रेमात सांपडून तिनं विवाहाला उद्युक्त होऊ नये म्हणून तुम्हो तिला आपल्यावरच प्रेम करायला लावलंत!'

'सुरुवातीला आम्ही ते आपलं उगीच गंमत म्हणून केलं.' आंबेकर पुटपुटले, 'पुष्पा इतकी वहावेल अशी आम्हाला कल्पना नव्हती.'

'नसेलही कदाचित! पण काही असो, ती वाहवली हे मात्र खरं? आपल्या मावशीचे यजमान नागपूरला गेले आहेत अशी तिची खात्री होती. शिवाय असा काही फसवणुकीचा कार्यक्रम असेल अशी शकाही तिच्या मनात येणं शक्य नव्हतं, त्या तरुणाच्या वागणुकीन — त्यानं केलेल्या प्रशंसेनं तिचं मन विरघळलं. त्यातच तिच्या मावशीनं तिला अप्रत्यक्षरीत्या उत्तेजन दिलं असणार? तिच्या मनावर चिरकाल टिकेल असा परिणाम घडवून आणायचा तर शक्य तितकं पुढं गेलं पाहिजे हे उघड होतं. अर्थात हा लपंडाव अनंतकाल चालू ठेवता येण्यासारखा नव्हता. तुम्ही तिच्या आईच्या फोटोसमोर आणाभाकांचा फार्स केलात. विवाहाच्या दिवशी सकाळी काही घडलं तरी माझ्यावरचं प्रेम कायम ठेव, प्रीतीशी प्रामाणिक रहा असं तिला पुनःपुनः बजावलेत! पुष्पेनं अशोक खारकर या

व्यक्तीच्या प्रेमपाशात इतकं गुरफटावं की निदान कित्येक वर्षे तिने इतर तरुणांच्या वाऱ्यालासुद्धा उभं राहू नये अशी तुम्ही पूर्ण खबरदारी घेतलीत. तुम्ही तिला अगदी विवाह-कार्यालयाच्या दाराशी नेऊन सोडलंत-पण त्यापेक्षा जास्त पुढे जाण्यात धोका होता. कदाचित तेही तुम्ही केलं असतं अन् पुष्पेला गतधवा म्हणून जन्म कंठायला लावायला कमी केलं नसतंत; पण तुमची पत्नी या गोष्टीला तयार होणे अशक्य होतं. म्हणून तुम्ही म्हणजे अशोक खारकर-त्या नेहमीच्या युक्तीने बेपत्ता झालात. टांग्यात एका बाजूने शिरून तुम्ही दुसरीकडून चटकन् उतरून पुन्हा घरात शिरलात अन् पुष्पेला रडत ठेवलंत !'

आनंदराव बोलत असतांना आंबेकरांनी मनातली धास्ती घालवली होती आणि ते स्वस्थचित्त झाले होते. चर्येवर उपहासदर्शक स्मित खेळवी-तच ते उठून उभे राहिले.

'तसे कदाचित् असेल-किंवा नसेलही आनंदराव !' ते म्हणाले, 'पण काही झालं तरी तुम्हाला त्याबद्दल काही करता येण्यासारखं नाही हेही तुम्ही ओळखलं असेलच. आत्ताच्या घडीला कायद्याविरुद्ध वर्तणूक माझ्या हातून घडत नसून तुमच्या हातून घडतं आहे हेही तुमच्या लक्षात यायला हवं. अगदी सुरुवातीपासून कायद्यानं इलाज करता येईल असं मी काहीही केलेलं नाही, पण तुम्ही त्या दाराला कडी घालून उभे रहाण्यात मला इच्छेविरुद्ध अटकाव करून कायदा मोडीत आहात !'

'कायदा तुम्हाला शिक्षा करायला कदाचित असमर्थ ठरेल हे खरं आहे !' कडी काढून दार सताड उघडीत आनंदराव म्हणाले, 'पण तुम्हाला केवढीही मोठी शिक्षा दिली तरी ती कमीच ठरेल असं कृत्य तुम्ही केलेलं आहे. पुष्पेला एखादा भाऊ असता, किंवा एखादा स्नेही असेल तर त्याने चाबूक घेऊन तुमची चामडी लोळवायला हवी !' दाराजवळच टेकून ठेव-लेल्या वेताच्या छडीकडे नजर जाताच त्यांचे नेत्र एकदम चमकले. 'माझ्या पक्षकारासाठी ते करणं माझं कर्तव्य आहे अशातला भाग नाही, पण ही वेताची छडी अगदी हाताशी आहे अन् हातही असे सळसळताहेत की-'

ती छडी उचलण्यासाठी आनंदरावांनी दोन पावलं टाकली; पण त्यांनी ती हातात घेण्यापूर्वीच आंबेकरांनी धूम ठोकली. एकदम काहीतरी गडगडत गेल्यासारखा जिना वाजला. रस्ता ओलांडून जिवाचा आकांत करीत अन् एकीकडे मागे वळून पहात पळणारी ती व्यक्ति सुधीर आणि आनंदरावांना खिडकीतून दिसली तेव्हा तशाही मनःस्थितीत त्या दोघांना हसू लोटले. ० ० ०

‘अगदी दुष्ट प्रवृत्तीचा माणूस आहे खरा ! ’ हंसतच आरामखुर्चीवर अंग टाकीत आनंदराव म्हणाले, ‘गुन्ह्यामागून गुन्हे करीत तो शेवटीं फांसापर्यंत मजल मारील यांत कांहीं शंका नाही.’

‘पण हे सर्व तुम्ही कसं उलगडलंत ते मात्र कळलं नाही मला अजून ! ’ हंसू आवरीत सुधीर म्हणाला.

‘प्रथमपासून एक गोष्ट स्पष्ट दिसत होती की अशा रीतीनं पुष्पेची फसवणूक करण्यांत ह्या ‘अशोक खारकर’ नांवाच्या व्यक्तीचा कांहीतरी विशिष्ट हेतु असला पाहिजे. त्यानंतर त्यावरून दुसरा निष्कर्ष काढतां येत होता. पुष्पेचा हृदयभंग होऊन ती अविवाहित राहण्यानं फायदा होण्यासारखा होता तो एकाच व्यक्तीचा अन् ती म्हणजे तिचे मावसे ! ही दोन माणसं–अशोक खारकर आणि रमाकांत आंबेकर एकत्र–समोरासमोर मुळींच आली नाहीत ही गोष्ट सूचक होती. पुन्हा निळसर चष्मा, दबलेला आवाज, आणि सावरकर पद्धतीचे कल्लेयावरून रूपांतराची शंका उद्भवली त्यानं पाठवलेली दोन्ही पत्रं सहीसुद्धां टंकलिखित होती. माझ्या शंकेला त्यामुळे पुष्टी मिळाली. ही व्यक्ति कोणीही असो, आपलं अक्षर, ते अगदी सहीपुरतंच असलं तरी पुष्पा ओळखील अशी भीति वाटणाऱ्या व्यक्तीखेरीज पत्रावर सही करायचं कोण टाळील ? इतरही गोष्टीनी कल्पनेला पुष्टी मिळाली.’

‘कोणकोणत्या ? ’

‘ज्या विमा कंपनीच्या ऑफिसांत आपण आहोत असं पुष्पेला प्रियकरान सांगितलं होतं तिकडे तपास करतां, अशोक केशव खारकरचा फक्त एजंट म्हणून कंपनीशीं संबंध होता असं मला समजलं. पुष्पेची पत्रं घेण्यापुरता तो तिथं जात असला पाहिजे. आणि एजन्सीही त्यानं अगदी अलिकडे, पुष्पेचा अन् त्याचा परिचय झाला त्याच सुमाराला घेतली होती. नंतर मी रमाकांत आंबेकरांच्या ऑफिसमध्यें मॅनेजरकडून तपास काढला. कंपनीच्या कामासाठी ते नागपूरला कधींही गेलेले नाहीत असं त्यांत मला आढळून आलं. इतकंच नव्हे तर, जव्हां ते गांवाला गेले अशी पुष्पेची समजूत होती, त्यावेळी ते नियमितपणानं ऑफिसांत हजर असल्याचाही पत्ता लागला ! त्यानी पुष्पेला पाठविलेल्या टंकलिखित पत्रांतील खांचाखोचा लक्षांत घेऊन मी काल मुद्दामच आंबेडकराच्या ऑफिसात त्यांना पत्र पाठवून ‘भेटाल का’ म्हणून विचारणा केली. त्यांचं होकारार्थी उत्तर, माझ्या अपेक्षेप्रमाणेंच टंकलिखित आलं त्यावरून ती पत्रं त्याच टंकलेखनयंत्रावर लिहिल्याचं दिसल. नंतर रूपांतरासाठीं आवश्यक असलेल्या गोष्टी

म्हणजे अलिकडे तरुणांत सहसा न आढळणाऱ्या मिशा अन् कल्ले, आणि निळसर चष्मा वगळून अशोक खारकरांचं इतर वर्णन आंबेकराशी जुळतं का हे मी ताडून पाहिलं. ते अगदी बरोबर जमलं झालं !—यापेक्षा आणखी काय हवं मग ?'

'अन् आता पुष्पा ? तिला काय सांगणार ?'

'तोच प्रश्न आहे. एकदा वाटतं, सांगू नये पण तसं केलं तर या बदमाष माणसाचा हेतु साध्य होऊन तिचा पैसा त्याला कायमचा मिळत राहील. तेव्हा तसं होऊ नये म्हणून तिला सर्व समजावून सांगायचं ठरवलं आहे मी. मावशी आणि भाची त्यामुळे परस्परांना मुकतील हे खरं ! पण पुष्पेनं त्या घरात जास्त दिवस रहाण्यात धोका आहे अन् ही सर्व हकीकत तिच्यापुढे ठेवल्यावर ती त्या घरात पाणी प्यायलासुद्धां थांबणार नाही हे उघड आहे. तेव्हा आता तुझी कामगिरी म्हणजे आधी तिला बोलावून आणणं !'



# दाराच्या टेकणाचे रहस्य ....

आनंदरावांची मोटार भरवेगात निघाली आणि मगच मालतीनें एक दीर्घ श्वास घेतला. डोक्यावरचे भले मोठे टेंगूळ एकदा चाचपून तिनें आपले निवेदन सुरू केले—

एक वृद्ध नेपाळी गृहस्थ विजयसिंह थापर यांची शुश्रूषा करण्याचे काम, डॉक्टर सावंताच्या सांगण्यावरून मालतीने पत्करले होते. त्यासाठी तिला थापरांच्या प्रासादतुल्य 'हिमांशु' बंगल्यावर रहायला जावे

लागले होते. त्या बंगल्यात मालतीने पाय टाकला, त्या क्षणीच काहीतरी अनिष्ट घडणार आहे असे तिला उगीचच वाटू लागले होते. त्या 'हिमांशु' बंगल्याभोवती भली मोठी बाग होती, आणि मागच्या बाजूला क्षिप्रानदीचा अथांग प्रवाह संथपणे वहात होता. त्या भावनेमागचे निश्चित कारण मालतीला सांगता आले नाही. बंगल्यातील एकंदर रचना, भव्यपणा आणि आतील मांडणी यांचाहि कदाचित् तो परिणाम असेल. त्या बंगल्यात प्रवेश करतांच आपण एखाद्या बुद्ध भिक्षूच्या मठांत किंवा लेण्यांत आलो आहोत असा भास होई. तिथले एकंदर वातावरण तसेच होते. कदाचित् त्याला कारण तेथील माणसेहि असतील...

'तशी ती माणस चागली आहेत सारी,– एकटी ती ताराबाई जानू सोडून.' असे मालती म्हणाली. विजयसिंह थापर फारच श्रीमंत गृहस्थ होते. त्या गावात ते जवळजवळ चाळीस वर्षे रहात होते आणि स्थानिक रहिवाशांशी इतके समरस झालेले होते को, त्यांनी त्या गावांतल्याच एका प्रौढ विधवेशी विवाह केलेला होता. त्यांची पत्नी मात्र फार दिवस जगली नाही एक भोपळ्यासारखा गरगरीत तरुण भाऊ, पडवळासारखी सडपातळ म्हातारी बहीण आणि बऱ्याचशा सुखद स्मृती मागे ठेवून तिने स्वत: परलोकचा रस्ता धरला होता. आपल्या मेहुण्याला आणि मेहुणीला विजयसिंह काही कमी पडू देत नसत. मेहुण्याला– बाबूरावाला– तर ते जवळजवळ-मुलाप्रमाणेच वागवीत असं म्हणायला हरकत नाही. विजयसिंहाचा सर्व व्यवहार अलीकडे बाबूरावच पहात असे

बाबूरावाची बहीण, विजयसिंह थापरांची मेहुणी ताराबाई ही मात्र इतर सर्वांना जीव नकोसा करून सोडीत असे. बिचाऱ्या विजयसिंहाच्या घरी राहून, त्यांचे अन्न खाऊन ती त्यांचा तिरस्कार करायची.

'नतद्रष्ट, धर्मभ्रष्ट थेरडा' असं म्हणते ती त्यांना चक्क !' मालती म्हणाली.

'हं !' आनंदराव रस्त्यावरचे वळण घेत उद्गारले, 'बरं, हे दाराचं टेकण चोरीला गेलं अस तुम्ही म्हणता ते फार मौल्यवान होत का ?' त्या क्षुल्लक वस्तूच्या चोरीचा विषयच आनंदरावांचा मेंदू खात होता.

'छे : छे ! असेल चारसहा रुपयांचा. एकदा विजयसिंहच म्हणाले होते तस' मालतीने तो दाराच्या टेकणाचा प्रश्न बाजूला सारला, आणि ती आपल्या निवेदनातील खऱ्या नाट्यपूर्ण, रहस्यमय भागाकडे वळली–

आदल्या दिवशी रात्री तिने विजयसिंह थापरांना झोपतेवेळचे औषध दिले होते. विजयसिंहाची खोली बंगल्याच्या मागच्या भागात वरच्या

मजल्यावर होती. त्यांना झोप लागेपर्यंत मालती तिथेच थोडा वेळ वर्तमानपत्र-चाळीत बसली होती. त्यांना झोप लागल्याची खात्री झाल्यावर ती खालच्या मजल्यावरील दिवाणखान्यात, नेहमीप्रमाणे थोडा वेळ पुस्तक वाचायला म्हणून गेली, त्यावेळी घर अगदी शांत होते. भिंतीवरील मोठ्या जपानी घड्याळाची टिक् टिक् तेवढी कानी पडत होती. रोग्याच्या—विजयसिंहाच्या—शुश्रूषेत काही वेळ गुंतल्यामुळे घरातील इतर माणसे कुठे आहेत याची मालतीला काहीच कल्पना नव्हती. बहुधा सर्व झोपली असावीत अशीच तिची कल्पना होती. कारण त्या वेळी अकरा वाजून गेलेले होते ..

मालतीची नजर आता शांत राहिलेली नव्हती, तीत काहीतरी त्रास-दायक पण खळबळजनक छटा चमकू लागली.

'तिथे त्या वेळी इतकं शांत— निवांत होतं.' ती अगदी पुटपुटल्यागत म्हणाली, 'आणि स्तब्ध पण. दिवा माझ्या पाठीमागे, डाव्या बाजूला होता अन् मी 'श्वेतवस्त्रा' कादंबरी वाचीत होते एका केससाठी गेलेली नर्स तिथल्या सेक्रेटरीच्या प्रेमात पडते आणि मग त्यातून प्रेचप्रसंग निर्माण होतो. तर ते पुस्तक मी वाचीत होते.' तिने घुटमळून वाक्य चटकन् पुरे केले 'आणि घरात एकदम वातावरण बदललं, भयानक झालं. पुस्तक वाचण्याचा तो परिणाम नव्हता. ते पुस्तक फारच छान आहे आनंदराव! घड्याळाची 'टिकटिक्' चालू होती अन् घराच्या मागच्या बाजूने नदीच्या पाण्याच्या प्रवाहाचा आवाजही मला ऐकू येत होता. मी एकदम थरथरू लागले. का ते मला सांगता येणार नाही. गार—गार वाटू लागलं मला. मी इकडेतिकडे पाहिले; पण तसं वाटण्याच कारण काही कुठे दिसेना मागच्या बाजूच्या दालनाचं दार उघडं होतं; पण तिकडे संपूर्ण अंधार होता. मी—मला काहीतरीच मूर्खासारखं वाटू लागल. काहीतरी ऐकू येऊ लागलं'

'कसला आवाज ऐकू आला तुम्हाला ?' आनंदरावांनी विचारले.

'कुणास ठाऊक ! ते सांगता यायचं नाही मला. तो—' ती किंचित् घोंधळून मग म्हणाली, 'तुम्ही मला हसाल कदाचित आनंदराव, पण एखादं भूत हलक्या पावलांनी चालावं तसा तो आवाज वाटला मला'

आनंदराव हसले नाहीत, त्यांनी उसासा टाकून म्हटले. 'हलकी पावलं फक्त भूतांचीच नसतात. मांजर अन् त्याच वर्गातला एक प्राणी चित्ता पण हलक्या पावलांनी चालतो. रेडिओवरच्या श्रुतिका तुम्ही ऐकल्या असतीलच, किती मजेदार आवाज निर्माण करतात ते लोक ! एका काचेच्या ग्लासात खडा टाकायचा— आणि एखाद्या सुंदर तरुणाने समुद्रात उडी घेत-

त्याचे श्रोत्यांना भासवायचे. कल्पना ! कल्पना ही फ ,व्या खोलीत डोका-
आहे एक. बरं, हा आवाज कुठून येत होता ?'

'विजयसिंहांच्या बैठकीच्या खोलीतून– अंध ला !' वसंत म्हणाला,
तिची गुलाबी चर्या चांगलीच पाढुरकी होऊन f. सेल असा देखावा करून
छटा चमकू लागली. ती पुढे म्हणाली, ' डोक्यात ' डाव्या बोटांची नखे
येऊ दिल्याबद्दल मी स्वतःवर रागावले अन् मन काही समजतच नाही !'
साठी समक्ष पहाण्याकरता उठले, आणि–आणि 'मला या असल्या भान-
कवाड धाडकन बंद झालं !'

यांनी पाहिले

'अरेच्या !' आनंदराव उद्गारले, 'आ अन् म्हातारपण म्हणजे
उघडून पलीकडे शोधायला गेलात ?' ोत असतील.' आनंदराव

'तो वेडेपणा होता माझा.' मालती सुस्का
यचा धडधडीत तिथं धोका दिसत होता; पण गृहस्थ आहेत. पोरखेळाचं
वागते. दार उघडून मी अंधारात पाऊल टाकलं शंकाच नाही, आनंदराव–
सणसणीत रट्टा बसला. खरोखरच तारे चम कडे आश्चर्याने पाहू लागला.
वेळी, आनंदराव.'

'काही असो.' आनंदराव पुटपुटले, ' ़ी. 'एक सुप्रसिद्ध गुप्त पोलिस
मालतीबाई ! आणि मग ?'

'मग मी जवळजवळ तास मला म्हणजे. तू–' तो अगदी निश्चलपणे
'शुद्धीवर आले तेव्हा तिथं र उभा राहिला. 'म्हणजे तुला काही कल्पना होती
खोलीत अशा मी
बदललेलं नव्ह
तसं होतं. दी अंधुक.' आनंदराव पुटपुटले, 'त्यांना माहिती आहे तेवढं
बंद का ेला सांगितलय सर्व. अन ते औत्सुक्य उत्पन्न करायला पुरेसं आहे.
तुम्ह.ला एक माहिती आहे, वसंतराव ? विजयसिंहांचं एक दाराचं टेकण
नाहीस झालेल आहे.'

'दाराचं टेकण ?–हं हं !–त्यांच्या बसण्या–उठण्याच्या खोलीच्या
दाराला लावलेली असते ती विलक्षण चीज म्हणता होय ? ते नाहीसं कसं
होईल ? कालच रात्री पाहिलं मी ते.'

'पण गेलं ते !' मालती कुरकुरली, 'अन् अन्–कुणी तरी माझ्या
डोक्यावर फटका मारला व–वसंतराव, अन् ते ने–नेलं '

वसंताने डोळे विस्फारले म्हणजे, हे भलतंच आहे ! भलतंच आहे !
तुला लागलं विशेष ? '

'हो ना वसंतराव,– '

मजल्यावर होती. त्या ळगली नसती म्हणा... सारंच काही चमत्कारिक
चाळीत बसली होती व ?'
मजल्यावरील दिवाण एवढं औत्सुक्य वाटलं. इथं वळायचं आपण.
म्हणून गेली, त्यावेळी !

घड्याळाची टिक् टिक्, आणि अस्वस्थ दिसणाऱ्या मोलकरणीने दार उघडून
—शुश्रूषेत काही वेळ गु दोघांना आत घेतले, तेव्हा आनंदरावांना दोन
मालतीला काहीच कल्प क म्हणजे त्यांच्या नेहमीच्या पहाण्यात असलेल्या
तिची कल्पना होती. क ळे होते आणि दुसरे म्हणजे त्यात काहीतरी
मालतीची नज जाणवत होते. पहिल्या गोष्टीला कारण घरातील
दायक पण खळबळज रणीने त्यांना नेऊन बसवले त्या मुख्य दिवाण-
'तिथे त्या वेळ होता, त्यावरील आच्छादन म्हणजे ब्रह्मदेशातील
म्हणाली, 'आणि स्तब्धशी प्रतिकृति होती. खिडक्यादारावरील पडदे
अन् मी 'श्वेतवस्त्रा' यावर चित्रविचित्र आकृती भरतकाम करून
तिथल्या सेक्रेटरीच्या प्रेमळीने मात्र आनंदरावांना अस्वस्थ केले. मोल-
तर ते पुस्तक मी वाचीत स्थ, विचलित मनःस्थितीमुळे कदाचित तसे
आणि घरात एकदम वात
ण्याचा तो परिणाम नव्हता. ते उतरली. आनंदरावांनी वळून पाहिले.
ळाची 'टिकटिक्' चालू होती अन् ल्लीकडच्या दालनात जाणाऱ्या
पाण्याच्या प्रवाहाचा आवाजही मला ऐकू येत नंदरावांनी मालतीकडे
लागले. का ते मला सांगता येणार नाही. गार-गार
इकडेतिकडे पाहिले, पण तसं वाटण्याचं कारण काही कु माझे स्नेही
बाजूच्या दालनाचं दार उघडं होतं; पण तिकडे संपूर्ण अंध गांची ग
मला काहीतरीच मूर्खासारखं वाटू लागलं. काहीतरी ऐकू येऊ ल ठर

'कसला आवाज ऐकू आला तुम्हाला ?' आनंदरावांनी विचारले.

'कुणास ठाऊक ! ते सांगता यायचं नाही मला. तो—' ती किंचित् घोंधळून मग म्हणाली, 'तुम्ही मला हसाल कदाचित आनंदराव, पण एखादं भूत हलक्या पावलांनी चालावं तसा तो आवाज वाटला मला.'

आनंदराव हसले नाहीत, त्यांनी उसासा टाकून म्हटले, 'हलकी पावलं फक्त भूतांचीच नसतात. मांजर अन् त्याच वर्गातला एक प्राणी चित्ता पण हलक्या पावलांनी चालतो. रेडिओवरच्या श्रुतिका तुम्ही ऐकल्या असतीलच, किती मजेदार आवाज निर्माण करतात ते लोक ! एका काचेच्या ग्लासात खडा टाकायचा— आणि एखाद्या सुंदर तरुणाने समुद्रात उडी घेत-

रात्री मी त्यांना झोपवल. सकाळी इथून जाण्यापूर्वी त्यांच्या खोलीत डोका-वून पाहिल. तेव्हा ते झोपलेले–'

'नाही.– ते नव्हतें ! ते आहेत असं वाटलं तुला !' वसंत म्हणाला, 'त्यांनी उशा लोड जुळवून माणसाची आकृति दिसेल असा देखावा करून ठेवलेला होता अन् वर पांघरुण टाकून ठेवल होतं.' डाव्या बोटांची नखे कुरतडीत तो खोलीत फेऱ्या मारू लागला. 'मला काही समजतच नाही !'

'माफ करा हं.' आनंदराव हळूच म्हणाले. 'मला या असल्या भान-गडीचा सराव आहे थोडासा.'

वसंत थबकला. त्याने आनंदरावाकडे आश्चर्याने पाहिले

'तुमचे विजयसिह म्हातारे गृहस्थ आहेत अन् म्हातारपण म्हणजे दुसरं बालपणच असत. ते कदाचित तुमची गंमत करीत असतील.' आनंदराव म्हणाले.

'छे: छे: मुळीच नाही. ते फार गंभीर गृहस्थ आहेत. पोरखेळाचं नावच सोडा ! काही तरी भानगड आहे यांत शंकाच नाही, आनंदराव–आनंदराव ?' तो एकदम चमकून आनंदरावांकडे आश्चर्याने पाहू लागला. 'अरेच्या. हे नाव कुठतरी ऐकलेल आहे मी.'

'आनंदराव–' मालती थंडपणे म्हणाली. 'एक सुप्रसिद्ध गुप्त पोलिस आहेत.'

'बरोबर. आता आठवल मला. म्हणजे. तू–' तो अगदी निश्चलपणे मालतीकड पहात क्षणभर उभा राहिला. 'म्हणजे तुला काही कल्पना होती याची ?'

'अगदी अंधुक.' आनंदराव पुटपुटले, 'त्यांना माहिती आहे तेवढं त्यांनी मला सांगितलय सर्व. अन ते औत्सुक्य उत्पन्न करायला पुरेसं आहे. तुम्हाला एक माहिती आहे, वसंतराव ? विजयसिंहांचं एक दाराचं टेकण नाहीस झालेल आहे.'

'दाराचं टेकण ?–हं हं !–त्यांच्या बसण्या–उठण्याच्या खोलीच्या दाराला लावलेली असते ती विलक्षण चीज म्हणता होय ? ते नाहीसं कसं होईल ? कालच रात्री पाहिलं मी ते.'

'पण गेलं ते !' मालती कुरकुरली, 'अन् अन्–कुणी तरी माझ्या डोक्यावर फटका मारला व–वसंतराव, अन् ते ने–नेलं '

वसंताने डोळे विस्फारले म्हणजे, हे भलतंच आहे ! भलतंच आहे ! तुला लागलं विशेष ?'

'हो ना वसंतराव,–'

'पहा.' आनंदराव जरा जोराने म्हणाले, 'आपण आतां भावना जरा बाजूला ठेवल्या पाहिजेत. बरं, वसंतराव या साऱ्या चक्रव्यूहांत तुमचं स्थान कोणतं ? मालतीबाईंनी मला जी हकीकत सांगितली तीत तुमच्या नांवाचा कांहीच उल्लेख केला नाहीं.

मालती पुन्हा एकदां विलक्षण लाजली आणि यावेळी मात्र आनंदरावांनी तिच्याकडे कांहीशा रागाने पाहिले. रोग्याच्या शुश्रूषेसाठी गेलेली एक नर्स, त्या रोग्याच्या सेक्रेटरीच्या प्रेमांत पडते असे कथानक असलेली एक कादंबरी मालती वाचीत होती हे आनंदरावांना आठवले.

'मी म्हाताऱ्या विजयसिंहांचा सेक्रेटरी आहे.' वसंत म्हणाला, 'पण का हो, विजयसिंहांच्या बेपत्ता होण्याशी त्या दाराच्या टकणाचा काय संबंध ?'

'त्याचाच मला तलास लावायचा आहे ' आनंदराव म्हणाले. कांही क्षण ते गप्प राहिले. मालती त्यांच्याकडे पाहून, त्यांना नजरेनेच क्षमा करण्याची विनति करीत होती.

'आणखी कांही नाहीसं झालेलं आहे का ?' आनंदरावांनी विचारले.

'तुम्हाला त्याच्याशी काय करायचं आहे ?' आंतल्या दारांतून एक स्त्री ओरडली. 'झालं तें बरं झालं ! एक ब्याद नाहीशी झाली ! – अगदी आपलं चंबूगबाळ घेऊन निघून गेलो ! म्हाताऱ्याचा शेवट चांगला व्हायचा नाही असं नेहमीच म्हणत असे मी.'

'अक्का, कृपा करून आता तू गप्प बस.' त्या स्त्रीच्या पाठोपाठ येणारा तरुण उद्गारला. तिला मागे टाकून तो पुढे झाला. बाबूरावाचा देह म्हणजे चरबीचा दांडगा साठाच दिसत होता. त्याचा गुबगुबित देह लालसर गोरा होता. डोळे तर फारच लाल, बरेच दिवस झोप न मिळालेल्या माणसासारखे होते. त्याची म्हातारी बहीण म्हणजे निव्वळ हाडांचा सांगाडा होता. तिची जीभ भयंकर विषारी असावी असा आनंदरावांचा ग्रह झाला; पण तिने ओठ गच्च मिटून धरले आणि त्यानंतर ती फारच थोडे बोलली. सर्व विखार नजरेत एकवटून ती आनंदरावांकडे पहात राहिली.

आनंदरावांनी आपली स्वत:ची ओळख करून दिल्यावर ती सारी आत गेली. मग आनंदरावांनी विचारले, 'चंबूगबाळं घेऊन गेले म्हणालात तुम्ही, मला नाही समजला त्याचा अर्थ ?'

'त्यांची सूटकेस दिसत नाही. ती त्यांनी बरोबर नेलेली दिसते.' बाबुराव उत्तरला, 'अन् त्यांचे कपडे पण बेपत्ता आहेत– सगळे नाहीत, पण बरेचसे गेले आहेत. मी सर्व नोकरा चाकरांना विचारलं; पण ते घराबाहेर पडताना काही कुणाला दिसले नाहीत. घरातले सर्व काने–कोपरे

अन बाहेरची इंच ना इंच जागा आम्ही तपासली. ते हवेतून विरघळून गेलेले दिसतात. बाप रे! काय भयंकर! त्यांचं डोकच फिरलेलं असलं पाहिजे!'

आनंदरावांचे कान उघडे होते; पण त्यांचे लक्ष मात्र दाराकडे होते. त्या दाराला एकच कवाड होतं. मालतीच्या डोक्यात फटका बसला तो त्याच दारात. खोलीभर गालिचा पसरलेला होता. त्या गालिच्याच्या दाराजवळच्या एका विशिष्ट भागाकडे ते टक लावून पहात होते. त्या जागी गालिच्याचे केस दबून एक लांबट चौकोनी खोलगट आकृति तयार झालेली दिसत होती. बेपत्ता झालेल्या दाराच्या टेकणाचाच बहुधा तो परिणाम असावा.

'पोलिसांना फोन करायला हवा, मला वाटतं.' मालतीने सुचविलं.

'एवढी घाई नाही त्याची.' आनंदराव हंसून म्हणाले, 'आपण जरा बोलू या आधी. एखाद्या माणसानं आपलं घर सोडून निघून जाणं ही घटना काही गुन्हेगारीत जमा होणारी नाही. ही दाराच्या टेकणाची बाब मात्र थोडी विचित्र वाटते. टेकणाचं वर्णन करता येईल का कुणाला?'

मालतीने नकारार्थी मान हालवली. इतरांनी एकमेकांकडे पाहिलं

बाबूरावांची चर्या त्रासिक झाली. तो किंचित् पुढे झुकून म्हणाला, 'हे पहा आनंदराव, तुम्ही मूळ मुद्दा बाजूला सारता आहात.' तो चांगलाच अस्वस्थ झाला होता. 'मला वाटतं, पोलिसांना नाही, तर निदान विजयसिंहांच्या वकिलांना तरी हे कळवायला हवं ताबडतोब.'

'ज्यानं त्यानं आपल्या सदसद्विवेक बुद्धीप्रमाणं वागावं.' आनंदराव शांतपणे म्हणाले, 'पण माझं ऐकायचं असेल तर कुणी तरी मला त्या दाराच्या टेकणाची माहिती सांगा.'

'मी सांगतो ती.' आपली लांबसडक बोटे केसांतून फिरवीत वसंत म्हणाला, 'कारण ती वस्तु मी बऱ्याच वेळा हाताळलेली आहे खरं म्हणजे ती आणून देणाऱ्याकडून घेऊन पावती देण्याचं कामही मीच केलेलं आहे. ते टेकण सहा इंच रुंद, सहा इंच उंच अन् एक फूट लांब आहे. त्यावर कोरलेल्या पाणसर्पांच्या आकृती सोडल्या तर त्याचा आकार अगदी सरळ, साधा आहे. जपानी हस्तकौशल्याचा सुंदर नमुना आहे तो. पण तसं विशेष मोल नाही त्याला.'

'म्हाताऱ्याच्या मूर्खपणाचा नमुना होता ना!' ताराबाईंनी तोंड उघडले, 'दारं वाऱ्यानं मिटू नयेत म्हणून आता खिटच्या बसवता येतात, तणावे लावता येतात, पण त्यांना ते टेकणच हवं असे या दाराला.'

आनंदरावांनी तिच्याकडे एक कटाक्ष टाकला. मग ते म्हणाले, 'ते तसं मौल्यवान नाही, हे मालतीबाईनीही सांगितलं मला. कशाचं आहे ते टेकण ?'

'साध्या संगमरवरी दगडाचं.' बाबूराव उत्तरला. तो अजूनही अस्वस्थ दिसत होता 'गुळगुळीत अन् पांढऱ्या सफेत कोरीव कामाचे असे अनेक नमुने म्हातारा नेहमी मागवीत असे '

'हां हां ! म्हणजे त्यांच्या जुन्या संग्रहालयांतील वस्तूंपैकी एक चीज होती तर ती ! '

'नाही,' वसंत म्हणाला, 'चारपांच महिन्यापूर्वी जपानला प्रवासासाठी गेलेला त्यांचा एक स्नेही परत आला त्यानं ते भेट म्हणून पाठवलं होतं जपानहून —बावीस शेर वजनाचा दगड आहे तो.'

आनंदरावानी सिगारेटचे दोन झुरके घेतले आणि उठून दोन फेऱ्या मारल्या. भिंतीच्या बाजूला टांगलेला एक रेशमी पडदा वाऱ्याने सळसळत होता. त्यावरील सर्पाकृतीहि सळसळल्यासारखी वाटत होती. खोलीतल्या इतर व्यक्ती अस्वस्थपणे चुळबुळ करीत एकमेकाकडे पहात होत्या. मध्यभागी टेबलावर चंदनी लाकडात कोरलेली एक बुद्धमूर्ति जणू त्या सर्वांना शांत रहाण्याचा आदेश देत होती.

'अलीकडे नेपाळमध्ये राजकीय पक्षपालट बरेच झाले.' आनंदराव म्हणाले, 'त्या घडामोडीशी त्याचा काही संबंध होता का ? त्यांच्याकडे कुणी वरचेवर येत असे का ? ते अलीकडे घाबरलेले दिसत असत का ?'

त्यांचा आवाज हवेवर विरला. साप पुन्हा सळसळला, बुद्धमूर्ति निश्चल राहिली. कुठून तरी येणारा चंदनाचा वास जास्तच वाढला.

'अन् हे दाराच संगमवरी टेकण भरीव होतं का ? ' आनंदरावानी खिडकीतून बाहेर, संथ वहाणाऱ्या क्षिप्रेकडे पहात विचारले. त्यानी काही क्षण, कुणाकडून तरी उत्तर येईल या अपेक्षेने वाट पाहिली; पण कुणी बोलले नाही. लठ्ठ, गुबगुबित बाबूरावाने पाय चाळवले, वसंताने केसातून हात फिरवला.

'भरीव असणं अशक्य आहे.' आपल्या प्रश्नाला आनंदरावानी स्वतःच उत्तर दिले.

'कां ? असं कशावरून वाटतं तुम्हाला ?' मालतीने दबलेल्या स्वरात विचारले.

'साध्या तर्कशास्त्राचा प्रश्न आहे. त्या वस्तूला तशी काही किंमत नव्हती. मग तिची चोरी कां व्हावी ?' आनंदरावानी म्हटले, 'त्यामागं

काही स्मृती–भावना दडलेल्या होत्या म्हणून ? तशा भावना असल्याच तर त्या फक्त विजयसिंहाच्याच असतील. अन् आपल्या स्वत:च्या मालकीची वस्तु घेतांना मालतीबाईच्या डोक्यांत प्रहार करण्याची त्याना काही जरुरी नव्हती. '

ताराबाई आणि बाबूराव दोघा बहिण–भावांच्या चर्येवर आश्चर्य प्रकटले. आनंदराव म्हणाले, ' हो ! तुम्हाला ती गाष्ट माहीत नाही, नाही का ? काल रात्री मालतीबाईंना चांगलीच डोकेदुखी सहन करावी लागली. त्यांच्या डोक्यावरचं टेंगूळ म्हणजे खरोखरीच एक प्रेक्षणीय चीज आहे... या टेकणाला काही अर्थ होता का ? त्यात काही संदेश होता का, काही इषारा होता का ? . .'

वाऱ्याने पुन्हा साप सळसळला आणि त्यांच्या अंगावर शहारे आले, ताराबाईंच्या डोळ्यातील तिरस्कार नाहीसा होऊन त्या जागी कीव, सहानु-भूति खेळू लागली. म्हताऱ्यावर तसा काही प्रसंग ..

'ते–' बाबुरावाने तोंड उघडले. मग त्याने कोरड्या पडलेल्या ओठांवरून जीभ फिरवली, ' हे विसावं शतक आहे, आनंदराव.' तो म्हणाला.

'हो ना !' आनंदरावांनी मान हालवली. 'म्हणूनच आपण वास्तव दृष्टिकोनातून विचार करू या. तसा विचार केला म्हणजे एकच निष्कर्ष निघतो. दाराचं टेकण चोरीला गेलं आहे त्याअर्थी ते चोरणाराला त्याचं काहीतरी मोल वाटत असलं पाहिजे ! पण त्या टेकणाला तर तशी काही किंमत नव्हती. याचा अर्थ हाच की, त्यात काहीतरी मौल्यवान दडलेले असले पाहिजे. म्हणूनच तो संगमरवरी तुकडा भरीव आहे का असा प्रश्न आला माझ्या मनात.'

'म्हणजे तुम्ही–' बाबूराव म्हणाला, त्याची नजर आनंदरावांवर रोखलेली होती. खांदे किंचित उंचावलेले होते.

' काय म्हटलंत ?' आनंदराव पुटपुटले.

'काही नाही, मी म्हणत होतो–'

' की मी अगदी बरोबर ताडलं आहे, असंच ना बाबूराव ?

त्याची नजर खाली वळली आणि तो शरमला. दोन्ही हात पाठीमागे जुळवून तो येरझारा घालू लागला. त्याच्या चर्येवरचा गोंधळ जास्तच स्पष्ट झाला. मालतीने ओठ चावला, आणि ती एका खुर्चीवर बसली. वसंत अस्वस्थ दिसू लागला. ताराबाईंचे रेशमी पातळ सळसळले. मग बाबूरावाने फेऱ्या थांबवल्या. तो एकदम म्हणाला, ' मला वाटतं, सगळं सांगून टाकावं

हे वरं. बरोबर आहे, तुमचा तर्क बरोबर आहे, आनंदराव. दारावं टेकण भरीव नाही ! पोकळी आहे त्यात.'

'हं ! अन् त्यात काय होतं बाबूराव ?'

'पन्नास हजारांच्या शंभरा-शंभराच्या नोटा ' बाबूराव उत्तरला

० ० ०

पैसा नाही–नाही ते चमत्कार घडवून आणतो असे म्हणतात-विजयसिंह थापरांच्या त्या खोलीतही तो आपल्या नावाला जागला होता. उ कंठेच्या परमावधीला पोचलेल्यांच्या अंतःकरणातील थरकाप थांबला. रेशमी पडदा स्वस्थ झाला आणि त्यावरील पाणसर्पांची सळसळही स्थिरावली. त्या दाराच्या टेकणात काही सूडाचा संकेत, गुप्त कारस्थानाची भानगड वगैरे काही नव्हते; –पैसा होता फक्त. मालती किंचित हसली.

'शंभराच्या नोटांच्या स्वरूपात पन्नास हजार रुपये ?' आनंदराव उद्गारले, 'रक्कम काही लहान–सहान नाही बाबूराव ही. काही खुलासा करता येण्यासारखा आहे का ? म्हणजे तुम्हाला माहीत आहे का ?'

बाबूरावाने जलद खुलासा केला. मनावरचे मोठे ओझे उतरल्यास रखी त्याची चर्या बदलली– विजयसिंहांचा उद्योगधंदा अलीकडे उतरणीला लागलेला होता. जवळजवळ दिवाळे काढण्याचाच प्रसंग आला होता. वेळीच व्यवसाय आवरता घेऊन काही तरी निराळ्या क्षेत्रात नशीब काढावे ही बाबूरावांची सूचना न मानता विजयसिंह आपल्या कापड–गिरणीतच पैसा घालवीत राहिले. संपूर्ण विनाश डोळ्यांपुढे उभा राहिल्यानंतरच त्यांचा निर्धार डळमळला; पण त्या वेळी परिस्थिति सांवरण्याच्या पलीकडे गेलेली होती .

'दोन दिवसांपूर्वी त्यांनी मला बोलावलं.' बाबूराव सुस्कारा टाकून पुढे सांगू लागला, 'दाराला कडी लावून ते दाराचं टेकण त्यांनी उचललं. ते नेहमी दाराला टेकून जमिनीवर पडलेलं असे. त्यातील नक्षीची एक आकृति त्यांनी हातांत धरून फिरवली त्याबरोबर ती खुंटीसारखी बाहेर आली आणि मग एक कप्पा उघडला गेला. तो दगड म्हणजे मुळात दाराचं टेकण नसावंच. जपानी लोक दाराला असली टेकणं वापरीत असतील असं काही वाटत नाही मला. त्या कप्प्यात नोटा ठेवलेल्या होत्या. ते असं वाटेत पडू देणं म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे असं मी म्हणालोही. पण ती गोष्ट कुणालाच माहीत नसल्यानं भीतीचं कारण नाही, असं म्हणून विजयसिंहांनी मला गप्प बसवलं. अर्थानच–' बाबूराव किंचित् घुटमळला.

'आता लक्षात आलं.' आनंदराव म्हणाले, 'हे सांगायचं तुम्ही टाळीत होतात ते योग्यच आहे. कारण तुमच्या दृष्टीनं ते अनिष्ट दिसतं.'

बाबूरावाने दोन्ही हात पसरून पंजे उलटे केले. 'मी ते चोरलेलं नाही; पण कोण विश्वास ठेवणार माझ्यावर ?' खाली बसून तो हातातल्या सिगारेटशी खेळू लागला.

'तुम्हाला अनुकूल अशी एक गोष्ट आहे यात.' आनंदराव पुटपुटले, 'निदान मला वाटतं तसं. तुम्ही त्यांचे वारस आहात ना ?'

बाबूरावाची मान चटकन् वर झाली. 'हो.'

'तेच आहेत.' वसंत काहीशा नाराजीने म्हणाला, 'म्हाताऱ्याच्या मृत्युपत्रावर मीच साक्ष घातलीय्.'

'च्-च् ! क्षुल्लक गोष्टीसाठी उगीचच गोंधळ म्हणायचा. तुमच्याच मालकीची गोष्ट तुम्ही कशाला चोराल ? जीते रहो बाबूराव ! तुम्हाला काही चिंता करायचं कारण नाही.' आनंदरावांनी उठून हॅट डोक्यावर ठेवली. 'ठीक आहे. या भानगडीशी माझं कर्तव्य संपलं.' ते म्हणाले, 'हे प्रकरण पोलिसांच्याच अखत्यारीतलं आहे. त्यांना हवं तर जरूर ते साहाय्य करीन मी; पण स्थानिक अधिकाऱ्यांना परक्याचा हस्तक्षेप आवडत नाही असा आतापर्यंतचा माझा अनुभव आहे. अन् खरं म्हणजे मला काही करता येण्यासारखं नाहीच.'

'पण तुमचा अदाज काय आहे ?' मालतीने हलकेच विचारले, 'तुम्हाला काय वाटतं ? विजयसिंह—'

'मी काही मानसशास्त्रज्ञ नाही मालतीबाई ! आणि तशा शास्त्रज्ञानाही माणसाच्या मनातील सर्व काही जाणता येतंच असं नाही. ठीक आहे करा तुम्ही फोन पोलिसांना'

आनंदरावांच्या सूचनेप्रमाणे वसंत टेलिफोनकडे वळला. पण त्याने 'डायल' पूर्ण फिरविण्यापूर्वीच आनंदरावांनी त्याला थांबवले.

'जरा थांबा हं.' ते म्हणाले, 'तुमच्या पुस्तकसंग्रहात एखादा ज्ञानकोश किंवा शास्त्रावरची म्हणजे सायन्सची काही पुस्तकं आहेत का ?'

'हो !' वसंत फोनचा रिसीव्हर खाली ठेवीत म्हणाला, 'ते पहा—त्या कपाटात 'एन्सायक्लोपिडिया' आहे अन् इकडच्या या कपाटात शास्त्रीय पुस्तकं आहेत. कोणतं हवं तुम्हाला ?'

आनंदराव स्वतःच कपाटाकडे गेले. ज्ञानकोश काढून त्यांनी त्याची पाने भराभर चाळली, मग शास्त्रीय पुस्तकांची यादी पाहून त्यातून एक पुस्तक निवडले आणि ते चाळले.

त्यांची चर्या एकदम पालटली.

'वसंतराव,' ते पुन्हा विजयसिंहांच्या सेक्रेटरीकडे वळून म्हणाले, 'हे दाराचं टेकण तीनचार महिन्यापूर्वीच एका वाहतूक कंपनीनं आणून पोचवलं असं तुम्ही सांगितलंत, त्याबरोबर त्या कंपनीची काही रिसीट वगैरे नव्हती का ? पाहू बरं जरा ती.'

आनंदरावांची बदललेली वृत्ति आणि तीव्र स्वर यामुळे बाबूराव आणि वसंत दोघेही गोंधळले वसंत जास्तच अस्वस्थ झाला. 'म्हणजे,' तो गुरगुरला, 'मी खोटं बोलतो असं तुम्हाला वाटतं की काय ?'

'च्-च् !' आनंदराव उताविळीने उद्गारले, 'रिसीट—वसंतराव, जरा लौकर !'

बाबूराव अस्वस्थपणे म्हणाला, 'ठीक आहे वसंतराव, द्या त्यांना ती. पण तिचा काय उपयोग आहे, समजत नाही मला.'

'किंमत मानण्यावर असते, बाबूराव.' आनंदराव उत्तरले.

वसंताने मुकाट्याने एका कपाटाचा खण उघडला. त्यातील दोनतीन फायली चाळून त्याने एक लहानशी पिवळसर चिठ्ठी काढली.

'ही घ्या.' तो रागारागाने म्हणाला, 'मला काही यात मोठा शहाणपणा दिसत नाही.'

'तुम्हाला काय वाटतं हा प्रश्न नाही, वसंतराव !' आनंदराव शांतपणे म्हणाले ती चिठ्ठी घेऊन त्यांनी बारकाईने पाहिली. टोकिओमधून 'तेन यी सुंग' या कंपनीच्या बोटीने आलेली ती वस्तु मुंबईहून सी. अॅण्ड ओ. कंपनीने विजयसिंह थापरांकडे पोचविलेली होती. वाहतुकीचा खर्च पाठविणाराने टोकिओतच भरलेला होता आणि तो वस्तूचा आकार ६"×६"×१२" आणि वजन चव्वेचाळीस पौंड यावर आधारलेला होता.

'अच्छा !' वसंत उपहासाने उद्गारला, 'त्या आकड्यांवरून काही उमजलं का तुम्हाला ?'

'ते आकडे—' ती रिसीट खिशात टाकीत आनंदराव म्हणाले, 'माझ्या दृष्टीनं फारच महत्त्वाचे आहेत. रिसीट हरवली असती तर फार वाईट झालं असतं. अत्यंत गूढ अशा या भानगडीची ती चावीच आहे म्हणा ना !'

बाबूरावाने दोन्ही हात पसरून मान हालवली. 'काय निरर्थक बडबडता आहात तुम्ही, मला तरी समजत नाही.'

'माझी बडबड निरर्थक नाही.' आनंदरावांनी हसणे थांबवले. 'ठीक आहे, तुम्ही आता आपल्या कामाला लागलात तरी चालेल. डी. एस्. पी..

साहेबांना फोन करायलाच हवा; पण तो मी करतो. तुमच्या संमतीनं एकट्यालाच बोलायचं आहे मला.'

० ० ०

'पहिल्यानं माझ्या डोळ्यात चांगलीच धूळ फेकली गेली.' आनंदरावांनी आढ्याकडे पहात म्हटले, 'पण वेळेवर मी सावध झालो.' ते अगदी शांतपणे, खोलीच्या मध्यभागी असलेल्या टेबलाच्या काठावर बसलेले होते. त्यांचा उजवा हात बुद्धमूर्तीच्या आसनाच्या कमळावरून फिरत होता.

वसंत, मालती, बाबूराव आणि ताराबाई ही चौघे त्यांच्याकडे पहात होती. त्यांची अस्वस्थता अगदी शेवटच्या पातळीवर पोचलेली होती—रेशमी पडदे वाऱ्याने सळसळत होते, त्यावरील सर्पाकृती वळवळत होत्या. खिडकीतून दिसणारे आकाश काळे कुट्ट होते. ढगांमुळे चांदण्या दिसत नव्हत्या. चंद्र उगवायलाही बराच वेळ होता.

फोनवरून पोलिस–अधिकाऱ्यांशी बोलल्यानंतर आनंदराव विजयसिंह थापरांच्या बंगल्यातून निघून गेले, ते संध्याकाळपर्यंत त्या बंगल्यातील कुणा व्यक्तीला दिसले नव्हते. ते परत आले तेव्हा त्यांच्याबरोबर बरीच माणसे होती; पण ती दणकट, कणखर दिसणारी माणसे आनंदरावांबरोबर बंगल्यात शिरली नाहीत; बंगल्याच्या भोवतालच्या अंधारात ती दिसेनाशी झाली. आता बंगल्यामागील नदीतून निरनिराळे आवाज ऐकू येत होते. परंतु काय चालले आहे ते पहाण्यासाठी उठण्याचे धाडस मात्र बंगल्यातल्या कुणी दाखवले नाही.

'मृत्यूची भीति हे एक माणसाच्या मनावरचं मोठं दडपण आहे, वजन आहे.' आनंदराव म्हणत होते, 'पण आज रात्री मृत्यु आपल्याला दिसणार आहे; दडपण, वजन उचललं जाणार आहे...'

श्रोत्यांची हृदये हेलावली, थरथरली. बाहेरून आवाज येतच होते. मध्येच एखाद्या माणसाचे ओरडणे ऐकू येई.

आनंदरावांनी सिगारेट पेटवली. 'आणखी एक चूक केली मी.' त्यांनी एक जोराचा झुरका घेतला. 'त्या दाराच्या टेकणाची चोरी झाली ती त्यामध्ये काहीतरी असेल त्यासाठी असं मी तुम्हाला सांगितलं. पण ती माझी चूक होती. ते दाराचं टेकण, त्यामध्ये काही तरी होतं म्हणून नाहीसं झालेलं नाही.'

'पण ते पन्नास हजार रुपये—' मालतीने क्षीण स्वरात बोलण्याचा प्रयत्न केला.

'आनंदराव!' बाबूराव मध्येच ओरडला, 'इथं हे काय चाललं

आहे ? बाहेर पोलिस काय करताहेत ? हे आवाज कसले येताहेत ? आम्हाला काहीतरी–'

'साधं तर्कशास्त्र !' आनंदराव पुटपुटले 'पण तर्कशास्त्र फार निसरडं असतं–गुळगुळीत संगमरवरी दगडासारखंच ! ते आज माझ्या हातातून निसटून जाऊं पहात होतं. दाराचं टेकण त्याच्या मूळ किमतीसाठी चोरलं जाणार नाही असं मी म्हणालो, पण ती चूक होती माझी. एका विशिष्ट परिस्थितीत ते दाराचं टेकण त्याच्या दर्शनी 'किमती' साठीच चोरलं जाणं अगदी साहजिकच होतं, त्या दाराच्या टेकणाला, रुपये–आणे पैतील त्याच्या मोलाखेरीज आणखी एक निराळी किंमत आहे.–आणि ती म्हणजे त्याचा उपयोग.'

'उपयोग ?' वसंताने आश्चर्योद्गार काढला, 'म्हणजे दाराला टेकण लावण्यासाठीच ते कुणी तरी लांबवलं असं म्हणता की काय ?'

'छे: छे: ! पण त्याचा आणखी एक उपयोग होण्यासारखा आहे, वसंतराव. उपयोग करता येईल असं आणखी काय वैशिष्टच आहे त्या टेकणाचं ? बरं, त्याचं तांत्रिक स्वरूप काय आहे ? त्याचा भरीवपणा आणि वजन. तो दगड आहे अन् त्याचं वजन चव्वेचाळीस पौंड बावीस शेर आहे'

बाबूरावाच्या तोंडातून काही तरी चमत्कारिक स्वर उमटला. जणू कुणी तरी बळेच उठवल्याप्रमाणे तो उभा राहिला, आणि एखाद्या अदृश्य शक्तीने ढकलल्यागत खिडकीकडे गेला इतर मंडळीही अस्वस्थ झाली; त्याच्यामागोमाग उठून खिडकीकडे वळली. आनंदराव त्यांच्याकडे शांतपणे पहात राहिले.

ढग हळूहळू विरळ होऊ लागले होते. क्षितिजाजवळ तर आकाश चांगलेच निवळले होते. चंद्र वर आला होता. चंद्रप्रकाशामुळे नदीचे पात्र स्वच्छ दिसू लागले होते. नदीत दोनतीन होड्या दिसत होत्या त्या होड्यात माणसे होती, काही पाण्यातही होती. एका ठिकाणचे पाणी एकदम खळबळे, माणसाचे डोके वर येई. तो माणूस श्वास घेऊन पुन्हा खाली जाई.

असाच एक माणूस वर आला. जवळच्या होडीत चढून त्याने काही-तरी सांगितले. होडीतील चक्र फिरू लागले. त्याभोवती एक दोर गुंडाळला जाऊ लागला.

'तुम्हीच विचार करा !' आनंदराव बोलत होते, 'एखादी वस्तु. ती दगड आहे आणि तिचं वजन बावीस शेर आहे म्हणून का चोरली जावी ? या दृष्टीनं विचार करू लागताच सर्व चित्र स्पष्ट दिसू लागलं. एक माणूस अत्यंत गूढ अवस्थेत नाहीसा झाला आहे. तो माणूस कसा, तर आजारी,

प्रतिकार करण्यास असमर्थ असलेला आणि श्रीमंत. एक जड दगड पण नाहीसा झालेला आणि मागीलदारीच एक खोल नदी वहात आहे. आता दोन-तीन आणि चार या तीन आकड्यांची बेरीज करा आणि '

होडीत कुणीतरी मोठ्याने ओरडले वर ओढल्या जाणाऱ्या दोर-खंडाच्या टोकाला काही लोंबकळत होते ते होडीत घेतले जात असतांना त्यावर चांदणे पडून ते स्पष्ट दिसले—तीन भाग एकत्र जखडलेले होते. एक होती सूटकेस, दुसरा होता दगडाचा लांबट चौकोनी तुकडा आणि तिसरा भाग म्हणजे एक उघडा मृत देह

'आणि,' टेबलावरून चटकन् उठून बाबूरावाच्या पाठीला पिस्तुलाची नळी भिडवीत आनंदराव म्हणाले, 'विजयसिंह थापरांचा खुनी कोण हे उघड होतं '

नदीतील कोळ्याच्या आरोळ्याना त्या खोलीतील व्यक्तींच्या दृष्टीने काहीच अर्थ नव्हता. कोणताहि स्नायु न हालवता किंवा मुळीच न वळता बाबूराव शांतपणे म्हणाला, 'दुष्ट, घातकी माणसा ! कसं ताडलंस तू हे ?'

ताराबाईनी तोंड उघडले आणि काहीहि शब्द न उच्चारताच मिटून घेतले.

'ते ताडणं सोपं होतं ' हातातील पिस्तुल न हालवता आनंदराव म्हणाले, 'त्या दगडाला मुळीच पोखळी नाही हे कळताच सर्व स्पष्ट झालं '

पण पोकळी नाही हे तुम्हाला कळणं अशक्यकच आहे. तुम्ही ते कधी पाहिलेलं नव्हतं. नुसता तर्क असेल तो तुमचा. शिवाय तुम्हीच—'

'मी तर्क केल्याचा तुम्ही हा दुसऱ्यांदा आरोप करीत आहात.' आनंदराव तक्रारीच्या स्वरात म्हणाले, 'तसं मी काही केलेलं नाही याची खात्री बाळगा, बाबूराव ! दाराचं टेकण भरीव आहे हे कळताच एक गोष्ट स्पष्ट झाली; ते टेकण विजयसिंहानी खोलल आणि त्यात पन्नास हजाराच्या नोटा होत्या त्या आपल्याला दाखवल्या असं तुम्ही सांगितलंत ते साफ खोटं आहे हे मला नक्की कळून चुकलं. मग मी स्वतःला विचारू लागलो हा असा व्यवस्थितपणे वागणारा उमदा माणूस खोटे का बोलतो ? अन् मग मला कळून चुकलं की, तुम्ही काहीतरी लपवीत आहात. अर्थात् आपण जे काही सांगत आहोत ते खोटं असल्याचं कळायला ते दाराचं टकण कुणाला पुन्हा दिसायचं नाही, अशी तुम्हाला खात्री वाटत असावी.'

चांदण्यात नदीचे पात्र निश्चल दिसत होते.

'पण ते टेकण सांपडणार नाही अशी खात्री का होती तुम्हाला ? अर्थात् ते कुठं आहे हे माहीत असल्यामुळंच ! आणि ते माहीत आहे याचाच

अर्थ असा की, मालतीबाईच्या डोक्यात प्रहार केल्यानंतर तुम्ही ते तिथून लांबवलं असलं पाहिजे आणि ज्यानं दाराच्या टेकणाची वासलात लावली त्यानंच बुटक्या विजयसिंहाचं प्रेतही नाहीसं केलेलं असणार–म्हणजे तोच त्यांचा खुनी. नाही, बाबूराव हे काही निव्वळ तर्कट नव्हे.'

मालतीचे ओठ थरथरत होते. ती बाबूरावांकडे काहीशी दया आणि काहीसा राग अशा संमिश्र भावनेने पहात होती

'बाबूराव ! ती उद्‌गारली. 'पण–पण–ही भयंकर गोष्ट तुम्ही–'

'ते पण सांगतो मी' आनंदराव म्हणाले, 'टेकणात पोकळी असल्याचं याचं म्हणणं खोटं आहे हे कळताच मी ताडलं की, ही कहाणी त्यांनी आधी-पासूनच तयार करून ठेवली असली पाहिजे. त्याचं एक कारण हे की, प्रेत बुडण्यासाठी वजन म्हणून बांधून नदीत टाकलेलं ते टेकण नाहीसं का झालं याबद्दल कुणाला शंका राहू नये. पण पन्नास हजार रुपये त्यात होते ही थाप का ? त्याचं कारण हेच की, विजयसिंहाच्या व्यवहारात तेवढ्या रकमेची काही अफरातफर असली पाहिजे. विजयसिंह नाहीसे झाल्यानंतर त्यांचे आर्थिक व्यवहार बारकाईनं तपासले जाणार आणि त्यात एवढी मोठी तूट लक्षात आल्यावांचून रहाणार नाही हे नक्कीच. आपण हळूहळू गडप केलेली रक्कम चोरानं रातोरात लांबवली असं का तुम्हाला दाखवायचं होतं, बाबूराव ?'

बाबूराव गप्पच राहिला.

'म्हणून तुम्ही एकामागोमाग एक घटनांची जुळवणी केलीत.' आनंद-राव सांगू लागले, 'उशा, तक्के, लोड जुळवून माणूस झोपल्यासारखे दिसेल अशी तुम्ही व्यवस्था केलीत. मग तुम्ही त्यांचे काही कपडे एक बॅगमध्ये भरलेत म्हणजे विजयसिंह आपण होऊन कुठं तरी बेपत्ता झाले असा देखावा तयार करायची तुम्ही खबरदारी घेतलीत. कारण त्यांचा शोध कुणी करू नये, खून झाला आहे अशी कुणाला शंकाही येऊ नये म्हणून. खून करण्यावांचून तर तुम्हाला गत्यंतर नव्हतं. तसं केलं नसतंत तर तुम्ही केलेली पैशाची उधळपट्टी, अफरातफर विजयसिंहाच्या लक्षात आली असती आणि मग म्हाताऱ्यानं तुम्हाला घराबाहेर काढलं असतं; मृत्युपत्र बदलून तुमचा वारसा हक्कही नष्ट केला असता.'

पण बाबूराव अगदी गप्पच राहिला तो खिडकीतून दिसणाऱ्या नदी-कडे शांतपणे पहात होता.

'बरोबर आहे' वसंत पुटपुटला, 'फारच धूर्तपणाचा डाव !'

'धूर्तपणाचा कसला, मूर्खपणाचा!' आनंदराव जोराने म्हणाले 'सर्व गुन्हेगारीच्या मुळाशी मूर्खपणाच असतो.'

'ते दाराचं टेकण पोकळ नाही हा तुमचा तर्कच होता तुम्ही काही म्हटलंत तरी.' बाबूराव शांतपणे, एखाद्या तत्त्वाच्या मुद्यावर वादविवाद करीत असल्यासारखा म्हणाला. पण आनंदराव फसले नाहीत. पिस्तुलावरील त्यांची मूठ गच्च आवळली गेली मृत्यु म्हणजेसुद्धा मुक्तताच वाटावी अशा अवस्थेतील माणसाला नदीचे विशाल पात्र आकर्षक वाटणे अगदी साहजिकच होते.

'नाही.' ते म्हणाले, 'अगदी जायला निघण्याच्या बेतात असतांना माझ्या डोक्यात विचार आला की ते टेकण संगमरवरी दगडाचं होतं. तो दगड जड असतो. शिवाय त्याचा आकार अगदी सरळ होता. आणि त्यावरून त्याची घनता काढणं शक्य होतं. ते टेकण पोकळ असल्याचं तुमचं विधान खरं आहे की खोट हे ताडून पहाण्याची युक्ति अगदी सोपी होती.'

'काय सोपं होत?' बाबूरावाने उत्सुकतेने विचारले.

'विज्ञानशास्त्र असं म्हणतं की, एक घनफूट संगमरवरी दगडाचं वजन एकशबासष्ट ते एकशेपंचाहत्तर पौंडांच्या दरम्यान असते. दाराच्या संगमरवरी टेकणाचा आकार काय आहे ६+६+१२ इंच, किंवा चारशेबत्तीस घन इच. निराळ्या शब्दात सांगायचं तर वजन चव्वेचाळीस पौंड असायला हवं ..'

'त्या रिसीटमध्ये आहेच ते वजन.' वसंत पुटपुटला.

'हो ना! पण या चव्वेचाळीस पौंडांचा अर्थ काय? ६×६×१२ इंच संगमरवरी दगड भरीव असेल तरच त्याचं तेवढं वजन भरेल. शंभराशंभराच्या पन्नास हजार रुपयांच्या– म्हणजे पाचशे नोटा मावायला पोकळी तशीच मोठी असायला हवी. तशी मोठी पोकळी असती तर त्या दाराच्या टेकणाचं वजन चव्वेचाळीस पौंड भरलंच नसतं! बाबूराव पोकळीबद्दल अन् नोटांबद्दल जे सांगताहेत ते खोटं आहे हे मी त्यावरूनच उमजून चुकलो.'

बाहेर पावले वाजली. ती खोली एकदम माणसांनी भरून गेली. विजयसिंहांचे प्रेत कोचावर ठेवण्यात आले. बाबूरावाला पोलिसानी मागे वळवले. ते प्रेत पाहिल्यावर आपण केलेल्या कृत्यातील भयंकरपणा जणू प्रथमच त्याच्या ध्यानी आला. त्याचे डोळे विस्फारले; ओठ थरथरले...

आनंदरावांनी एका पोलिसांच्या हातातील ते जड दाराचे टेकण आपल्या हातात घेतले आणि बारकाईने पाहिले. मग त्यांची नजर त्या गडद, लाल रंगाच्या रेशमी पडद्याकडे, त्यावरील सर्पाकृतीकडे वळली.



# कण्हेरीच्या मळ्यात.....

' तो भयानक प्रकार नजीकच्या कण्हेरी या गावी घडला ' वर्तमानपत्रातील तपशील मी पूर्ण वाचलेला असल्यामुळे, आनंदरावांनी तो विषय काढताच मी उल्हासाने सांगू लागलो, ' गावाच्या जरा बाहेरच्या बाजूला, ' गायरान ' नावाचं एक जंगल आहे. त्याला लागून असलेल्या जुन्या, गढीवजा मोठ्या वाड्यात खून झाला आहे. गढीच्या पलीकडेच एक जुना मसणवटा आहे–'

' त्याचा या खुनाशी काही संबंध आहे का ? नाही तर आपल्याला मसणात जायचं कारण नाही ! ' आनंदरावांनी तुटकपणे म्हटले.

'ती गढी कण्हेरीकर जहागिरदाराच्या मालकीची आहे.' मी जरा नाराजीनं पुढं सांगू लागलो, 'अप्पासाहेब जाहागिरदार म्हणूनच लोक ओळखीत त्यांना. सरकारनं त्यांना जे. पी. पदवी दिलेली होती. कण्हेरीच्या गढीत ते स्वतः, त्यांचा भाचा चंद्रकांत पावणे आणि म्हातारा गडी केशव एवढी माणसं नेहमी असतात. शिवाय मोतद्दार, माळी वगैरे आठदहा नोकरमाणसं गढीच्या मागच्या बाजूला राहतात. काल रात्री आठच्या सुमाराला मामा-भाच्याचं नेहमीप्रमाणं जेवण झालं, त्यावेळी दोघांची अंमळ बोलाचाली झाली. नंतर अप्पासाहेबानी आपला घोडा कसायला सांगितला आणि तास दीड तास ते बाहेर गेले होते. रात्री दहाच्या जरा आधी ते परतले आणि त्यानी भाच्याबरोबर दूध घेतलं. ते दोघे त्यावेळी दिवाणखान्यात होते. त्यांचं त्यावेळी काही तरी जोराचं भांडण झालं. आपण दुधाचे पेले घेऊन गेलो तेव्हा जहागिरदारसाहेब रागात होते, असं गड्याचं म्हणणं आहे. गड्याचं नाव केशव हे मी सांगितलंच आहे.'

'अन् तो भाचा—चंद्रकांत ? केशव दिवाणखान्यात गेला तेव्हा तो काय करीत होता ?'

'चंद्रकांत त्यावेळी खिडकीजवळ उभा होता आणि बाहेर पहात होता. यामुळे त्याचं तोंड पहायला मिळालं नाही, असं केशव सांगतो. दुधाचे पेले मेजावर ठेवून तो परत गेल्यावर त्या दोघांचं मोठमोठ्यानं चाललेलं भांडण मात्र त्याला ऐकू गेलं. काही वेळानं भांडण थांबलं आणि बहुतेक मामा-भाचे दोघे निजायला गेले. त्यानंतर ऐन मध्यरात्रीच्या सुमारास एका किंचाळीनं सर्व गढी जागी झाली. सर्वजण धावत दिवाणखान्यात गेले तेव्हा त्याना ते भयंकर दृश्य दिसलं. टाळूची छकलं झालेले अप्पासाहेब रक्ताच्या थारोळ्यांत पडलेले होते. त्या मरणोन्मुख म्हाताऱ्याच्या देहाशेजारीच एक जुना इतिहासकालीन परशु हातात घेऊन चंद्रकांत उभा होता. जवळच्याच भिंतीवर टांगून ठेवलेल्या जुन्या शस्त्रातील ते एक हत्यार आहे. त्या रक्ताकडे पहात असलेला चंद्रकांत इतका भयचकित झाला होता की अप्पासाहेबांचं डोकं उचलून धरायचं, रक्त थांबवण्याचा प्रयत्न करायचा इत्यादि बाबतीत केशवला हातभार लावायचं त्याला प्रथम सुचलंच नाही. केशव जेव्हा अप्पासाहेबांचं डोकं धरण्यासाठी खाली वाकला तेव्हा त्यांनी शेवटची हालचाल केली. कोपर टेकून उठण्याचा प्रयत्न करीत त्यानी बोलण्यासाठी तोंड उघडलं, पण त्यांना बोलता मात्र आलं नाही. 'तो नीच चंद्र—' एवढेच शब्द त्यांच्या तोंडातून बाहेर पडले. अन् लगेच केशवच्या हातात मान टाकून त्यांनी प्राण सोडला. त्यानंतर

पोलिसांना बोलावण्यात आलं. मामा–भाच्याचं आधी झालेलं भांडण, परशु हातात घेऊन चंद्रकांत अप्पासाहेबांच्या देहाजवळ उभा असलेला सर्वांनी पाहिलेला, आणि मरतामरता अप्पासाहेबांच्या तोंडून बाहेर पडलेले ते शब्द, या सर्व गोष्टींवरून चंद्रकांतच खुनी आहे याबद्दल संशयाला काही जागाच उरली नाही. पोलिसांनी खुनाच्या आरोपावरून त्याला अटक केली असल्याची बातमी ' स्टॉप प्रेस'मध्ये दिलेली आहे. या प्रकरणात मुद्याच्या गोष्टी एवढ्याच आहेत.'

आनंदराव काही वेळ विचारमग्न अवस्थेत स्वस्थ बसून होते.

' भांडणाचं कारण काही कळलेलं आहे का ?' त्यांनी अखेरीला विचारले.

' हो. चंद्रकांतानं ती माहिती आपण होऊन सांगितली पोलिसाना. आपल्या मामांनी बकुळीचा मळा विकायचा असं ठरवलं, इस्टेटीची अशी निष्कारण विल्हेवाट लागणं आपल्याला नापसंत होतं. म्हणून आपण जरा रागानं बोललो, असं त्यानं सांगितलं आहे.'

' आणखी ?'

' गेल्या दोन वर्षांत अप्पासाहेबांनी बरीच शेतीवाडी विकली असं दिसतं आहे.' मी वर्तमानपत्र जमिनीवर टाकले. ' आतापर्यंत गुन्हेगाराविरुद्ध इतका जबरदस्त पुरावा असल्याची फारच थोडी उदाहरणं पाहिलेली असतील मी, आनंदराव !'

' वाईट ! फारच वाईट !' आनंदरावांनी मान्य केले. ' पण तुम्ही सांगितलेली सर्व हकीकत लक्षात घेतली तर तीत आपल्याला तार करणाऱ्या या कुलकर्ण्यांचा काहीच संबंध दिसत नाही. ते कशाला येताहेत माझा वेळ फुकट घालवायला ? बाकी ते कळेलच म्हणा लवकरच. हे आले वाटतं तेच !'

आनंदरावांचा अंदाज बरोबर होता. दार ठोठावलेले ऐकून मी पुढे होऊन ते उघडले. भेटीला आलेले गृहस्थ कुलकर्णीच होते.

कुलकर्णी हे किरकोळ देहयष्टीचे, वयस्क गृहस्थ होते. आपल्या चष्म्यातून आम्हा दोघांकडे पहात ते जरा घुटमळले. माझी उपस्थिति त्यांना अनावश्यक, अनिष्ट वाटत असावी असे स्पष्ट दिसले आनंदरावांनी माझी ओळख करून देऊन, ' ह्याचं झालं तर साहाय्यच होईल ' असं सांगितल्यावर ते, मी त्यांच्यासाठी पुढे केलेल्या खुर्चीवर बसले.

' मी चंद्रकांत पावशे यांच्या वतीनं तुमचं साहाय्य मागायला आला

आहे.' जवळच्या स्टुलावर टोपी काढून ठेवून रूमालाने तोंड पुशीत कुलकर्णी म्हणाले, 'त्या दुर्दैवी प्राण्यावर फारच बिकट प्रसंग ओढवलेला आहे.'

'पण मला या बाबतीत काय करता येण्यासारखं आहे ?' आनंद-रावांनी विचारले, 'माधवरावांनी मला आत्ताच सर्व हकीकत सांगितली. आमच्या 'उष:काल'नं ती रातोरात मिळवून प्रसिद्ध करण्यात मोठी तत्परता दाखवली, त्यामुळं सर्व तपशील आम्हाला कळला आहे. ते असो. पण तपासाचं काम कुणाकडे आहे ?'

'प्रकरण जरा महत्त्वाचं असल्यानं स्थानिक पोलिसांनी कुणीतरी चांगला अधिकारी पाठवा असं इथं कळवलं अन् त्याप्रमाणं इन्स्पेक्टर सावंत तिथं जाणार आहेत ताबडतोब. आमचं गाव इथून फक्त वीस मैलावर आहे हे माहीतच असेल तुम्हाला' कुलकर्ण्यांनी खुलासा केला, 'तिथं मी वकिली करतो. कण्हेरीकर जहागिरदाराची सर्व कायद्याची कामं, माझ्या वडिला-पासून आमच्याकडेच सोपवली जातात.'

'तुम्ही वर्तमानपत्रातली बातमी वाचलीत ?' आनंदरावांनी विचारले.

'हो. ती बरोबर आहे. तीत फक्त एकच गोष्ट वगळलेली आहे. रात्री घोड्यावरून बाहेर जातांना, आपण आल्यावर दरवाजा लावू असं अप्पासाहेबांनी केशवला सांगितलं होतं, परंतु ते आल्यावरही तो उघडाच होता. हा मुद्दा तीत आलेला नाही.'

आनंदरावांनी भुवया उंचावल्या. 'दार उघडं होतं म्हणता ? हं,– भाच्याबरोबरच्या भांडणात दार लावायचं विसरले असतील अप्पासाहेब ! तरी पण यातले एकदोन मुद्दे मला नीट उमगलेले नाही.'

'कोणते ?'

'खून झाला तेव्हा अप्पासाहेब बहुधा झोपेच्या वेळच्या कपड्यात असतील ?'

'नाही. त्यांनी अंगात कोट घातलेला होता. चंद्रकांतानं मात्र फक्त धोतर नेसलेलं आणि सदरा घातलेला होता.'

'जेवणानंतर अप्पासाहेब बाहेर गेले होते असं बातमीत म्हटलं आहे. रोजच रात्री ते असे बाहेर जात असत का ?'

तपकिरीच्या बाटलीवर बोट आपटणे बंद करून कुलकर्ण्यांनी आनंद-रावांकडे कटाक्ष टाकला. 'नाही तशी काही संवय नाही त्यांना.' ते म्हणाले 'पण ते सुरक्षितपणे परत आले. आणि मला त्यात काही–'

'ते खरं आहे.' आनंदरावांनी त्यांना मध्येच थांबवले, 'अप्पासाहेब

श्रीमंत होते असं तुम्ही म्हणाल का ? कृपा करून नेमकं अन् खरं उत्तर द्या.'

'अप्पासाहेब कण्हेरीकर फारच श्रीमंत होते. ते दोघा मुलांपैकी धाकटे. चाळीस वर्षांपूर्वी ते वडील भावाबरोबर आफ्रिकेत गेले होते. तिथं त्यांना सोन्याच्या खाणीत चांगला फायदा झाला. नंतर त्यांचा वडील भाऊ वारल्यामुळं कण्हेरीच्या जहागिरीची सर्व मालकी त्यांच्याकडेच आली. स्थानिक रहिवाशात मात्र ते फारसे लोकप्रिय नव्हते, असं दुर्दैवानं म्हणावं लागतं. ते रागीट अन् लहरी होते फार.'

'मामा–भाचे तरी गोडीनं रहात असत का ?'

कुलकर्णी जरा घुटमळले. 'नाही. चंद्रकांत हा अप्पासाहेबांच्या वारलेल्या बहिणीचा मुलगा. लहानपणापासून तो कण्हेरीच्या वाड्यातच वाढला आणि अप्पासाहेबांकडे सर्व मालकी आल्यापासून तोच सर्व व्यवस्था पहातो. अप्पासाहेबांचा जवळचा असा नातेवाईक तो एकटाच असल्यानं तोच साऱ्याचा वारस आहे. अन म्हणूनच अप्पासाहेबांनी अलीकडे काही जमिनी विकल्या ते त्याला आवडलं नाही. त्यावरूनच त्या दोघांची दोनतीनदा कडाक्याची भांडणं झाली. दुर्दैव असं की, काल रात्री त्याची बायको तिथे नव्हती !'

'त्याची बायको ?'

'हो त्याचं लग्न झालेलं आहे. त्याची पत्नी पुष्पा रूपवान् आणि हुषार आहे. दोन दिवसापूर्वीच ती माहेरी गेली, अन् आज सकाळी परत यायची होती. काय बिचारीवर प्रसंग !' कुलकर्ण्यांनी मोठा सुस्कारा टाकला. मामेसासरा वारलेला अन् नवरा अटकेत !'

'आता एक शवटचा प्रश्न.' आनंदराव म्हणाले, 'रात्रीच्या प्रकाराबद्दल चंद्रकांताचा खुलासा काय आहे ?'

'त्याचा खुलासा अगदी साधा अन् सरळ आहे आनंदराव ! आपण वकुळीचा मळा विकणार आहोत असं जेवताजेवता अप्पासाहेबांनी त्याला सांगितलं, तेव्हा 'मळा विकण्याची काही जरुरी नाही, तो एक चांगला मळा आहे,' असं चंद्रकांत साहजिकच म्हणाला. शब्दावरून शब्द वाढला. अप्पासाहेबांनी मग घोडा तयार करायला सांगितलं आणि काही न बोलता ते बाहेर निघून गेले. परत आल्यावर केशवनं त्यांना नेहमीप्रमाणे दूध नेऊन दिलं तेव्हा मामा भाचे खूपच रागानं भांडत होते. चंद्रकांत मग आपल्या खोलीत झोपायला गेला, पण मन अस्वस्थ असल्यानं त्याला लवकर झोप लागली नाही. मोठ्या दिवाणखान्यात एकदोनदा बोलण्याचा

आवाज आलेला ऐकून आपण अंथरुणावर उठून बसलो होतो, असंहि त्याचं म्हणणं आहे.

'मग त्यानं जाऊन पाहिलं का नाही ?' आनंदरावांनी तीव्र स्वराने विचारले.

'मी पण त्याला नेमका हाच प्रश्न विचारला. मामा रागात होते, ते केशव किंवा दुसऱ्या कुणा नोकराचाकराशी बोलत असतील, आपण गेलो तर पुन्हा कदाचित् रागाच्या भरात भांडणाचा प्रसंग येईल, म्हणून आपण गेलो नाही, असं त्यानं उत्तर दिलं.'

'बरं. पुढं ?'

'घड्याळात बाराचे ठोके पडले तेव्हा त्याला थोडीथोडी झोपेची गुंगी येऊ लागली होती. शांत वाड्यात एकाएकी जोराची किंचाळी उमटल्यानं तो खडबडून जागा झाला. अंथरुणातून उडी मारून तो दिवाणखान्याकडे धावला. तिथलं भयंकर दृश्य पाहून त्याला मोठाच धक्का बसला. जमिनीवर अन् जवळच्या गालिच्यावर रक्त उडालेलं होतं. रक्ताच्या थारोळ्यातच हात डोक्यावर उभारून अप्पासाहेब पडलेले होते. पुढे धावून चंद्रकांत आपल्या मामाजवळ आणवा झाला तेंव्हा त्याला त्यांच्या डोक्याजवळ पडलेला, रक्तानं भरलेला तो परशु दिसला. त्याला गरगरल्यासारखं, घेरी आल्यासारखं वाटू लागलं. आपण काय करतो आहोत हे न उमजून त्यानं तो परशु हातात घेतला. त्याचवेळी केशव आणि एक मोलकरीण अशी दोघं धावत तिथं आली. माझ्या दुर्दैवी अशीलाचा खुलासा हा असा आहे.'

'हं !' एवढाच उद्गार काढून आनंदराव बराच वेळ स्तब्ध बसून होते. मी आणि कुलकर्णी त्यांच्याकडं औत्सुक्याने पहात होतो. आनंदरावांची चर्या निर्विकार होती. पण दोन मिनिटांनी ते ताडकन उठून उभे राहिले.

'चला माधवराव ! कण्हेरीला चक्कर मारू या एक !'

० ० ०

कण्हेरीच्या बाजूला असलेल्या रेल्वेस्टेशनवर आम्ही उतरलो, तेव्हा सूर्य डोक्यावर आला होता. आसमंतात बऱ्याच लहानमोठ्या टेकड्या आणि दूरवर जंगलमय झाडी पसरलेला तो टापू कसा शांत निवांत दिसत होता. अशा निवांत जागी असा भयानक खून व्हावा, हे किती विचित्र !

वकीलसाहेबांनी एक टांगा ठरवला आणि आम्ही अल्पावधीतच टेकड्यांना वळसे घालून चढउतार पार करीत जाणाऱ्या रस्त्याला लागलो. टांग्याने चारपाच चढउतार पार केले, मी भोवतालचे सृष्टिसौंदर्य पहाण्यात

गर्क असतांनाच, एका चढाच्या माथ्यावर कुलकर्ण्यांनी माझ्या खांद्यावर थोपटले.

'ती पहा कण्हेरीची गढी !' ते म्हणाले.

समोर दोनतीन फर्लांगावर, एका उंचवटयावर ती जंगी इमारत उभी होती. तिच्या आजुबाजूला मळे, शेतीवाडी होती. डाव्या हाताला जरा अंतरावर लहानसे गाव होते, तर उजव्या हाताला बऱ्याच दूरवर धुराची वाकडीतिकडी रेषा आकाशात जातांना दिसत होती. तिकडून वाफेवर चालणाऱ्या यांत्रिक करवतीचा आवाज ऐकू येत होता.

'चांदणी सागवान मिल.' कुलकर्ण्यांनी माहिती पुरवली, 'त्याच्या-पलीकडे जगल पसरलेलं आहे अन् दहापंधरा मैलांच्या टापूत आम्हाला दुसरा शेजार नाही. चला, आलंच आपलं ठिकाण.'

टांग्याचा आवाज ऐकून गढीच्या भव्य दारात एक माणूस आला. आमच्याबरोबरच्या कुलकर्ण्यांना पहाताच तो घाईघाईने पुढे आला.

'बरं झालं, तुम्ही आलात !' तो ओरडला. 'पुष्पाताई–'

'आली आहे ?' कुलकर्णी उसासा टाकून म्हणाले, 'गरीब बिचारी! मी आधी तिला भेटतो.'

'फौजदार वाकडे आले आहेतच. अन् ते मोठे साहेब पण.'

'ठीक आहे केशव.'

'एक मिनिट !' आनंदरावांनी केशवला हटकले, 'अप्पासाहेबांचं प्रेत हलवलं का ?'

'त्यांना बंदुकखान्याच्या खोलीत ठेवलं आहे.'

'बाकी काही हलवाहलव केलेली नाही ना ?' आनंदरावांनी तीव्र स्वराने विचारले.

'नाही साहेब !' तो पुटपुटला, 'सगळं होतं तसंच आहे जागच्या जागी.'

एकदोन लहान दालने ओलांडून केशवने आम्हाला मोठ्या दिवाण-खान्यात नेले. बऱ्याच खिडक्या असलेल्या त्या दिवाणखान्यात खूप हंड्या-झुंबरे लोंबत होती. बाजूच्या एका मेजावर काहीतरी लिहीत बसलेला एक खाकी पोषाखातला माणूस आम्हाला पहाताच ताडकन उठून उभा राहिला.

'काय हो आनंदराव ! ' तो माणूस ओरडला, 'इथं तुमच्या बुद्धि-मत्तेचा प्रकाश पाडायला काही जागा नाही !'

'तुमचं मत बरोबर आहे सावंतसाहेब !' आनंदराव हसून उत्तरले, 'तरी पण अशी एखादी वेळ येते–'

'की तर्कटवादी माणसाला ती अनुकूल ठरते. असंच ना? काय माधवराव? अन् हे गृहस्थ कोण आहेत बुवा तुमच्याबरोबर?'

'हे कुलकर्णी वकील– कण्हेरीकरांचे कायदेसल्लागार आहेत ते!' मी सांगितले, 'त्यांनीच आनंदरावांना इथं येण्याची विनंती केली.'

'अस्सं काय?' त्या म्हाताऱ्याकडे डोळे मोठाले करून पहात सावंत उद्गारले, 'ठीक आहे. पण आता आनंदरावांना आपलं बुद्धिकौशल्य दाखवायला संधि मिळणं कठीण आहे. आम्ही बरोबर माणूस पकडलेला आहे. तेव्हा तुम्ही––'

'जरा दमानं घ्या सावंत!' आनंदराव जोराने म्हणाले, 'तुम्ही मागे चुका केलेल्या आहेत, आणि भविष्यकाळांतहि त्या तशा घडणार नाहीतच अस काही म्हणता येणार नाही. या भानगडीत तुम्ही योग्य माणूस पकडला आहे असं दिसतं वरवर. तसं असेल तर माझ्या प्रयत्नानं तुम्हाला दुजोराच मिळेल. तुमचं काही नुकसान व्हायचं नाही त्यात. उलट पक्षी–'

'हं! 'उलटपक्षी' हे नेहमीच असत तेव्हां–' सावंत हसून म्हणाले, 'तुम्हाला तुमचा वेळ फुकट घालवायचाच असला तर मी कशाला हरकत घेऊं? काय माधवराव, देखावा मोठा भयंकर आहे, नाही का?'

आनंदरावांबरोबरच मी दिवाणखान्याच्या पलीकडच्या कोपऱ्याकडे गेलो होतो. तेथील दृश्य पाहून मला कसेसेच झाले. जमिनीवर सांकळलेल्या रक्ताचा मोठा डाग दिसत होता. भिंतीवरहि चांगला चारपांच फूट उंचीपर्यंत रक्ताचा शिडकावा उडालेला होता. रक्ताच्या मोठ्या थारोळ्यापासून तीन हातावर गालिचा होता; त्यावर पण रक्ताचे डाग पडलेले होते

कुलकर्ण्यांनाहि चांगलेच गरगरल्यासारखे झाले. ते एका खुर्चीवर टेकले.

'जरा माग रहा माधवराव!' आनंदराव ओरडले, 'इथं काही पावलांच्या खुणा आढळल्या की नाही सावंत?' जमिनीकडे पहात त्यांनी विचारले.

'फक्त एक आहे!' सावंत हंसत म्हणाले, 'अन् ती चंद्रकांतच्या पावलाशी बरोबर जुळते.'

'हं. एकंदरीत तुम्ही बरीच प्रगति केली आहे! पण का हो, आरोपीच्या अंगातला सदरा–'

'त्याचं काय?'

'भिंत पहा सावंतसाहेब–भिंत! अर्थात् आरोपीच्या सदऱ्याच्या

'पुढच्या भागावरच्या रक्ताच्या डागांनी गुन्ह्याची बिनतोड शाबिती होईल.' आनंदराव म्हणाले.

'अरेच्चा !' सावंत उद्गारले, 'सदऱ्याच्या बाह्या अन् धोतराचा सोगा रक्तानं डागळलेला आहे खरा,'

'हं. पण नंतर चंद्रकांतानं अप्पासाहेबांचं डोकं उचलून धरायला साहाय्य केलं तेव्हा सदऱ्याच्या बाह्यांना आणि धोतराच्या सोग्याला रक्ताचे डाग पडणं अगदी साहजिक आहे, हेही तितकंच खरं ! त्याचा सदरा इथंच आहे ना अजून ?'

सावंतांनी बाजूचे एक मोठे कपाट उघडले आणि त्यातून तलम मलमलीचा एक शर्ट काढला. 'हा पहा.'

'फक्त बाह्यांवर डाग आहेत. पुढच्या बाजूला एक ठिपकासुद्धा नाही ! आश्चर्य आहे ! पण त्यावरून काही निष्कर्ष काढता येत नाही. आणि हे ते हत्यार काय ?'

त्याच कपाटातून सावंतांनी एक भयानक हत्यार काढले होते. मोठे चंद्राकार पाते असलेला तो एक परशु होता.

'जुन्या काळातलं हत्यार आहे हे !' दुर्बिणीच्या कांचेतून पहात आनंदराव म्हणाले, 'बरं, यांची जखम कुठं झाली आहे ?'

'सडक्या खरबुजासारखा डोक्याचा वरचा भागच छेदला गेला.' सावंत उत्तरले, 'क्षणभर तरी त्यांना शुद्ध आली हे मोठं नवल वाटतं मला. चंद्रकांताच्या दुर्दैवामुळेच ही आश्चर्यजनक गोष्ट घडली म्हणायची !'

'त्यांनी चंद्रकांताचं नाव घेतलं ?'

'हो—म्हणजे 'चंद्र' एवढाच अर्धवट शब्द उच्चारला त्यांनी. मरता-मरता माणूस यापेक्षा जास्त काय बोलणार नाही तरी ?'

'ते खरंच...पण ह्या कोण येताहेत ? नाही, बाईसाहेब ! पुढं येऊ नका. दृश्य तुम्ही पहाण्यासारखं नाही.'

एक सडपातळ, अत्यंत देखणी तरुणी दिवाणखान्यात घाईघाईने आली होती. तिचे काळेभोर डोळे व्याकुळतेने कांठोकांठ भरलेले दिसत होते.

'त्यांना वांचवा हो !' ती ओरडली, 'ते अगदी निरपराध आहेत. मी शपथ घेते. आनंदराव, त्यांना सोडवा !'

तिच्या त्या भावनावेगाने आम्ही सारेच—अगदी इन्स्पेक्टर सावंतसुद्धा—कळवळलो.

'माझ्याकडून होईल तेवढं मी अवश्य करीन बाईसाहेब.' आनंदराव मृदु स्वरात म्हणाले, 'त्यांच्याबद्दल मला माहिती सांगता का ?'

'फार हळव्या मनाचे आहेत हो.'

'हो. पण मी शारीरिक दृष्ट्या विचारीत होतो. उदाहरणार्थ, अप्पासाहेबाहून ते जास्त उंच आहेत का ?'

पुष्पाने आनंदरावाकडे आश्चर्याने पाहिले. 'बाई बाई !' ती ओरडली, 'अप्पासाहेब पुरे सहा फूट उंच होते. त्यांच्या मानानं यांची उंची कमीच भरेल.'

'अस्सं काय ? कुलकर्णी, तुम्हाला एक माहिती सांगता येईल ? अप्पासाहेबांनी आपली शेती विकायला सुरुवात कधीशी केली ?'

'पहिली विक्री दीड वर्षापूर्वी झाली. दुसरी सात महिन्यापूर्वी.' कुलकर्ण्यांनी माहिती दिली, 'आणि आनंदराव, आता माझी तुम्हाला जरुरी नसेल तर पुष्पाताईंना त्यांच्या खोलीत पोचवतो मी.'

आनंदराव एका खिडकीजवळ जाऊन बाहेरचा दिसणारा भूभाग पाहू लागले. बाजूच्या मेजाजवळ बसून, पेन्सिलीचे टोक चावीत सावंत त्यांच्याकडे पहात होते.

'हं ! केशवराव,' केशव आल्यावर आनंदराव मागे वळून म्हणाले, 'चंद्रकांतरावांना साहाय्य करण्यासाठी हवं ते करण्याची तुमची तयारी असणारच. अन् आम्ही त्याच दृष्टीनं इथं आलो आहोत हे लक्षांत ठेवा.'

त्या माणसाने आनंदरावाकडून सावंतांकडे अस्वस्थ नजर फिरवली.

'तेव्हा आता तुम्ही नीट माहिती सांगितली तर आम्हाला उपयोग होईल तिचा कालच्या टपालानं अप्पासाहेबांना काही पत्रं वगैरे आली होती का ?'

'हो. एक आलं होतं.'

'त्याच्याबद्दल तुम्हाला काही जास्त माहिती सांगता येईल ?'

'नाही. एका हलक्या प्रकारच्या कोऱ्या पाकिटावर तिकिटं चिकटवलेली होती मागच्या बाजूला, एवढंच लक्षांत आहे माझ्या. पण मी ते पत्र धन्याच्या हातात दिलं तेव्हा—'

'तुम्हाला मालकाची मनस्थिति पाहून आश्चर्य वाटलं, असंच ना ?'

'हो. ते पत्र मी त्यांच्या हातात देताच त्यांनी उघडलं आणि ते वाचल्यावर त्यांची चर्या अशी झाली की मी तिथून चटकन सटकलो. जराशानं मी परत आलो तेव्हा धनी निघून गेले होते पण त्यांच्या बैठकी-जवळ एक जळलेला कागद पडलेला होता.'

'तुमची ही माहिती फार महत्त्वाची आहे.' आनंदराव म्हणाले. त्यांच्या स्वरातील विलक्षण बदलाचे नवल वाटून मी त्यांच्याकडे पाहिले.

त्यांची चर्या खूपच पालटलेली दिसली. डोळे चमकत होते, चर्या उल्हसित होती.

'बसा माधवराव !' ते ओरडले, 'त्या तिथं, बाजूला बसा.' खिशातून दुर्बिणीची कांच काढून त्यांनी तपासणी सुरू केली.

मी त्यांच्याकडे पहात राहिलो. रक्ताचे डाग, भिंतीवर टांगलेली काही हत्यारे वगैरे पाहून झाल्यावर ते जमिनीची पहाणी करू लागले.

दिवाणखान्यात मध्यभागी एक उंची गालिचा अंथरलेला होता; त्याच्या कांठाशी पोचताच ते थबकले.

'हे तुमच्या लक्षात यायला हवं होतं सावंत.' ते उद्गारले, 'पावलाचा अस्पष्ट ठसा दिसतो आहे इथं.'

'मग काय म्हणणं आहे तुमचं ?' डोळे मिचकावून माझ्याकडे पहात, हंसून सावंत म्हणाले, 'बरीच माणसं त्या गालिच्यावरून आली–गेली असतील.'

'हो, पण बऱ्याच दिवसात या भागात पाऊस पडलेला नाही. ही खूण ज्या बुटामुळे झालेली आहे तो बूट थोडासा ओलसर असावा असं दिसतं आणि त्याचं कारण काय असावं हे मी सांगायला नको ! वा: ! हे काय आहे पहा !'

आनंदरावांनी गालिच्यावरून काही तरी खरडून घेतलेले होते आणि त्याची ते बारकाईने पहाणी करीत होते. मी आणि सावंत त्यांच्याजवळ गेलो.

'काय आहे ते ?'

काही न बोलता आनंदरावांनी काच त्यांच्या हाती देऊन आपला तळहात पुढे केला.

'कचरा–भुकटी आहे कसली तरी.' काचेतून पहात सावंत म्हणाले.

'लाकडाचा भूसा.' आनंदराव शांतपणे म्हणाले, 'अगदी बारीक भुगा सहज लक्षात येण्यासारखा आहे. या बुटाच्या जागेवरून मी खरडला हे तुम्ही पाहिलंच असेल.'

'खरंच आनंदराव !' मी ओरडलो, 'मला तरी याचा काही संबंध–'

आनंदरावांनी माझ्याकडे हसून पाहिले. 'चला !' ते म्हणाले, 'आपण तबेल्यापर्यंत जाऊन जरा पाय मोकळे करून येऊ.'

नोकरवर्गाशी आपुलकीने बोलून त्यांचा विश्वास आणि आपुलकी संपादन करण्याची आनंदरावांची शैली काही अपूर्व आहे. तबेल्यातील मोतद्दार त्यांच्याशी अल्पवधीतच मोकळ्या मनाने बोलू लागला. रात्री

आपले धनी खंड्या घोड्यावर बसून बाहेर गेले होते अशी माहिती पुरवून त्याने तो घोडाही आनंदरावांना दाखवला.

त्या घोड्याचे खूर उचलून आनंदराव पहाणी करू लागले, तेव्हा मोतद्दाराला हसू आले. 'खुरावर खून करणाचं नाव सांपडणार आहे का तुम्हाला ?' असे त्याने नवलाने विचारले.

'हो ना ! तेच तर पहातो आहे !' असे म्हणून आनंदरावांनी खुराच्या खळग्यातील थोडी माती खरडून घेतली आणि एका कागदात तिची नीट पुडी करून ती खिशात ठेवली.

त्यानंतर आम्ही, कुलकर्ण्यांनी आमच्या मुक्कामाची सोय स्वतःच्या घरी केली होती तिकडे, गावात गेलो. जातांना इन्स्पेक्टर सावंतांचा निरोप घेतांना 'खुनाच्या जागेजवळील खुर्ची लक्षात असू द्या.' असे आनंदराव म्हणाले तेव्हा सावंत चकितच झाले.

'तिथं जवळपास कुठं खुर्ची नव्हती बुवा !' ते उद्गारले.

'हं ! तेच तुमच्या लक्षात आणून द्यायचं होतं मला. चला माधवराव इथं आज जास्त काही माहिती मिळण्यासारखी नाही.'

आमची संध्याकाळ तशी मजेत गेली. पण आनंदरावांचा मला थोडा राग आला होता. माझ्या प्रश्नांची उत्तरे देण्याचे टाळून, 'सकाळी आपण बोलू' असे म्हणून ते कुलकर्ण्यांबरोबर कण्हेरी गांव, गांवकरी, हवापाणी याबद्दलच गप्पा मारीत बसले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मला जाग आली तेव्हां आनंदराव पहाटेच बाहेर पडल्याचे कळले. मी प्रातर्विधि उरकून चहा वगैरे घेतो तेवढ्यात ते परत आले.

'कुठं गेला होतात तुम्ही ?' मी विचारले.

'पहाटेच जागा होणाऱ्या कोंबड्याच अनुकरण केलं. चला माधवराव!' ते हुरूपाने म्हणाले, 'आपण गढीवर जाऊन सावंतांना बरोबर घेऊ. कित्येकदा त्यांचा फार उपयोग होतो.

अर्ध्या तासांच्या आंतच आम्ही पुन्हा गढीत प्रवेश केला. सावंतांनी अर्धवट नाराजीनेच आमचे स्वागत केले.

'पण रानात फेरी कशाला आनंदराव ?' ते उद्गारले, 'काय तुमच्या डोक्यांत वळवळतं आहे आता ?'

आनंदरावांची चर्या खूपच गंभीर होती. ते मागे वळले. 'ठीक आहे!' ते म्हणाले, 'अप्पासाहेबांच्या खऱ्या खुनीला पकडण्याचं संपूर्ण श्रेय तुम्ही संपादाव असं मला वाटत होतं. नसेल तुमची मर्जी, तर राहिलं !'

सावंतांनी घाईघाईने आनंदरावांचा दंड पकडला. 'तुम्ही हे खरच गंभीरपणानं बोलतां आहात का?' त्यांनी विचारले, 'पण पुराव्याचं काय? त्याचा तर सरळ रोख–'

हातातील काठी उचलून तिच्या टोकाने आनंदरावांनी दूर अंतरावरच्या जंगलाकडे निर्देश केला.

'तिकडे!' एवढेच ते उद्गारले.

० ० ०

ती वाटचाल माझ्या कायम स्मरणात राहील. माझ्याप्रमाणेच सावंतांनाहि काही कल्पना नसावी, याबद्दल मला मुळीच शंका नव्हती. भराभर पाय उचलीत चालणाऱ्या आनंदरावांमागोमाग आम्ही जात होतो. अल्पावधीतच आम्ही झाडीच्या गार सावलीत प्रवेश केला. यांत्रिक करवतीचा आवाज आता जास्त जास्त जोराने ऐकू येऊ लागला. काही मिनिटातच आम्ही इमारती लाकडाचे ढीगच्या ढीग आणि छोटया छोटया इमारती असलेल्या गिरणीत पोचलो.

न घुटमळता, न गोंधळता, 'मॅनेजर' अशी पाटी असलेल्या एका छोटया इमारतीकडे आनंदराव वळले आणि त्यानी जोराने दार ठोठावले. काही क्षणानच दार सताड उघडले गेले

दारात उभ्या असलेल्या त्या माणसाइतका धिप्पाड देहयष्टीचा माणूस मी त्यापूर्वी क्वचितच पाहिला असेल. तो खूप उंच होता आणि त्याचे खांदेही रुंद होते.

'कोण आहात तुम्ही? काय हवं आहे तुम्हाला इथं?' तो गुरगुरला.

'आपण शांताराम काटकरच ना?' आनंदरावांनी अदबीने विचारले.

तो माणूस एकदम काही उत्तरला नाही. तोंडातले सुपारीचे खांड चघळीत त्याने आम्हा तिघांवर थंड नजर फिरवली.

'मग? असेन! तुम्हाला काय कर्तव्य आहे त्याच्याशी?' तो शेवटी म्हणाला.

'तुमचे जवळचे नातलग, मित्र वगैरे तुम्हाला चंद्रोजी नावानं ओळखतात हे खरं ना?' आनंदराव शांतपणानेच बोलत होते, 'एक निरपराधी माणूस तुमच्या कृत्यासाठी फांसावर चढणार होता, तो वाचला! पण त्याचं श्रेय तुम्हाला नाही.'

तो धिप्पाड माणूस काही क्षण दगडी पुतळ्यासारखा निश्चल उभा राहिला. मग एखाद्या रानटी जनावरासारखी आरोळी मारून त्याने आनंदरावांवर झेप टाकली. मी ताबडतोब त्याची कंबर पकडून त्याला मागे खेचू

लागलो आणि आनंदरावांनी त्याची मानगूट पकडण्याचा प्रयत्न केला. पण सावंतांनी आपले पिस्तुल त्याच्या मस्तकाला भिडवले नसते तर आम्हा दोघानाही तो एक माणूस भारी झाला असता. मस्तकाला त्या थंड लोखंडी नळीचा स्पर्श होताच त्याची धडपड थांबली. सावंतांनी डाव्या हाताने खिशातून काढून दिलेली हातकडी आनंदरावांनी त्याच्या दणकट मनगटावर ठोकली.

तशा स्थितीतही तो पुन्हा हल्ला चढवणार असे त्याच्या डोळ्यातील चमक पाहून मला वाटत होते पण तो एकदम खदखदून हंसला. त्याने आनंदरावांकडे वळून पाहिले.

'मिस्टर ! आपण कोण आहात मला कल्पना नाही.' तो म्हणाला, 'पण तुम्ही शिताफीनं शिकार पकडलीत हे निःसंशय ! तेव्हा तुम्ही हे कसं ताडलंत ते मला सागाल तर मी तुमच्या प्रश्नांची सरळ उत्तरं देईन.'

सावंत चटकन् पुढे झाले. 'तुमच्यावर आम्ही खुनाचा आरोप ठेवणार आहोत हे लक्षात ठेवून बोला. न समजता मी बोलून गेलो असं मग–'

पण आमच्या कैद्याने त्यांना तेवढ्यावरच थांबवले.

'जाऊ द्या हो ती कायद्याची लटपट !' तो म्हणाला, 'अप्पासाहेब कण्हेरीकराचा मी खून केला आहे ! अन् आता वेळच आली आहे तर त्याबद्दल खुषीनं फासावर चढेन ! झालं तुमचं समाधान ! या आत या.'

आत जाऊन तो आपल्या खुर्चीवर बसला. आम्ही पण जागा मिळेल तसे बसलो.

'तुम्ही कसं काय ताडलंत हे ?' त्याने आनंदरावांकडे वळून पुन्हा विचारले.

'त्या निरपराधी माणसाच्या सुदैवानंच मला तिथं तुमच्या अस्तित्वाच्या खाणाखुणा दिसल्या' आनंदराव गभीरपणाने म्हणाले, 'यात लक्ष घालण्याची मला विनंती करण्यात आली, तेव्हा चंद्रकांत पावशे हाच गुन्हेगार असावा असाच माझा ग्रह झालेला होता, आणि गुन्ह्याच्या जागी पोचल्यावरहि तो बदलण्यासारखं लगेच काही आढळलं नाही मला तरी ! पण एकंदर प्रकरणावर नवा प्रकाश टाकणारा तपशील लवकरच माझ्या ध्यानात आला परशूनं अप्पासाहेबांचं टाळकं फुटलं तेव्हा जमीन आणि भिंतीवरहि रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. मग ज्या माणसानं तो घाव घातला त्याच्या कपड्यावर काही शितोडेसुद्धा कां पडू नयेत ? ही गोष्ट जरा न पटणारी आणि भानगडीची वाटली मला...

'नंतर आणखी एक गोष्ट माझ्या लक्षात आली. खून झाला तिथं

खुर्ची स्टूल वगैरे काहीहि नव्हतं तेव्हा अप्पासाहेब उभे असतानाच वार केला गेला हे उघड दिसत होतं. तरीसुद्धा तो वार मस्तकाच्या वरच्या बाजूला केला गेला. तेव्हा परशु चालवणारा माणूस किमान अप्पासाहेबां इतका उंच असला पाहिजे. चंद्रकांतच्या मानानं अप्पासाहेब बरेच उंच होते असं मला पुष्पाताईकडून कळलं, तेव्हा त्याच्यावर आरोप ठेवणं न्यायाचं होणार नाही अशी माझी खात्री होऊन चुकली. पण चंद्रकांतानं खून केला नसेल तर तो केला कुणी ?

'अप्पासाहेबांना सकाळी एक पत्र आलं होतं, ते त्यांनी जाळून टाकलं असंहि मला तपासानं कळलं. त्यानंतर जमिनीच्या विक्रीच्या प्रश्नावरून त्यांचं चंद्रकांताशी भांडण झालं. अप्पासाहेब श्रीमंत होते; मग दोन वर्षांपूर्वीपासून जमिनी विकण्याचा हा प्रकार कां सुरू झाला ? अर्थात् तशी विक्री करण्यासाठी—म्हणजे विक्रीच्या नावाखाली जमीन दुसऱ्याच्या हवाली करण्यासाठी—त्यांच्यावर धाकदपटशाचं काही तरी अन्याय्य दडपण आणलं गेलं असावं हे उघड आहे.'

'अन्याय्य दडपण ? साफ खोटं आहे हें !' शांताराम त्वेषाने उद्गारला, 'न्यायानं जे आपलं नाही ते तो गृहस्थ खऱ्या मालकाला परत देत होता, ही वस्तुस्थिति आहे.'

'दिवाणखान्यांतल्या तपासांत मला बुटाची अस्पष्ट खूण दिसली.' आनंदराव पुढे सांगू लागले, 'ती मी सावंतांच्या लक्षांत आणून दिलीच होती. पाऊस पडलेला नसल्यामुळे ती खूण खुनानंतरच केली गेली असावी असंच स्पष्ट दिसत होतं. त्या माणसाचा बूट ओलसर असण्याचं कारण त्यानं रक्तात पाय दिला असावा हेच असणार जमिनीवर खूण दिसू नये म्हणून ओला झालेला बुटाचा पाय त्यानं आधी गालिच्यावर टेकला, एवढंच बुटाच्या खुणेच्या जागी कसली तरी भुकटी सूक्ष्मदर्शक कांचेतून दिसली. आणखी जरा बारकाईनं पाहिल्यावर तो लाकडाचा भुसा आहे हे ओळखू आलं. अप्पासाहेबांच्या घोड्याच्या खुराला लागलेल्या मातीतहि मला असाच भुशाचा अंश सापडला. हे सर्व लक्षात आल्यावर रात्री काय घडलं असावं याचं बरचस स्पष्ट चित्र माझ्या नजरेसमोर उभं राहिलं.

'बकुळीचा मळा विकू नये असा भाच्यानं फारच नेटाचा आग्रह धरला; तेव्हां अप्पासाहेब जेवणानंतर ताबडतोब घोड्यावर बसून बाहेर पडले. अर्थात् त्या बाबतींत कुणाची तरी समजूत घालण्याचा, कुणाला तरी विनवण्याचा त्यांचा हेतु असावा. तो 'कुणी तरी' लाकडाचा भुसा असलेल्या टापूतलाच असला पाहिजे, हे घोड्याच्या खुरांत सांपडलेल्या

भुशाच्या अवशेषावरून स्पष्ट झालं. तोच माणूस, अप्पासाहेब गढीत परतल्यावर काही वेळानं – मध्यरात्रीच्या सुमारास – त्यांच्या मुलाखतीला आला असला पाहिजे, हे त्या बुटाच्या ठशावरून स्पष्ट झालं रात्री आपण झोपायला गेल्यावर, दिवाणखान्यांत अप्पासाहेबांशी कुणीतरी बोलत असल्याचं आपल्याला ऐकू आलं, असं चंद्रकांताचं म्हणणं होतंच. हा अपरात्री आलेला माणूस चांगला उंच आणि एक फटक्यांत कवटी फोडण्याइतका शक्तिवान् असला पाहिजे, हे अप्पासाहेबांच्या शवाची पहाणी करताच समजून चुकलं. दोघांची बोलाचाली झाली आणि रागाच्या भरांत त्या माणसानं, भिंतीवर टांगून ठेवलेल्या हत्यारांपैकी हाती लागलं ते हत्यार घेऊन अप्पासाहेबांच्या डोक्यांत हाणलं आणि तो अंधारांत निघून गेला...

'बुटांना आणि घोड्याच्या खुरांना लाकडाचा भुसा लागण्याची शक्यता कुठं आहे असा मी मनाला प्रश्न विचारला. अर्थात् लाकडं कापण्याचं काम करणाऱ्या लाकडाच्या गिरणींत ! आणि गढीपासून थोड्याच अंतरावर तशी एक गिरणी असल्याचं कुलकर्णी वकिलांनी अगोदरच सांगितलेलं होतं...

'या सर्व प्रकरणाचा अप्पासाहेबांच्या गतायुष्याशी काही तरी संबंध असावा हे मी ताडलंच होतं. म्हणूनच इकडच्या–तिकडच्या गप्पा मारण्यांत कालची संध्याकाळ घालवून, मिळेल तेवढी माहिती मिळविण्याचा मी प्रयत्न केला. दोन वर्षांपूर्वी आफ्रिकेतून आलेल्या एका माणसाला अप्पासाहेबांच्या शिफारशीमुळं लाकडाच्या गिरणीत मॅनेजरच्या जागेवर नेमण्यात आलं आहे असं कुलकर्ण्यांनी मला सांगितलं. आज सकाळी दिवसाच्या कामासंबंधी माणसांना सूचना देण्याकरिता तुम्ही या खोपटाबाहेर आलांत, तेव्हां मी त्या लाकडाच्या ढिगाआड दडून बसलेलो होतो. तुम्हांला प्रत्यक्ष पहातांच माझा तपास पुरा झाला !'

आनंदरावांचे सर्व निवेदन शांताराम अगदी उत्सुकतेने ऐकत होता. खुर्चीवर मागे मान टेकून तो हंसला.

'माझ्या दुर्दैवानंच तुम्हाला इथं पाठवलं मिस्टर !' तो म्हणाला, 'पण शब्द मोडणारा मी माणूस नाही. तेव्हां तुम्हांला आणखी थोडी माहिती हवी आहे ती ऐका.

'ही कहाणी बऱ्याच वर्षांपूर्वी आफ्रिकेत सुरू झाली. माझ्या वडील भावानं तिथं अप्पासाहेबांच्या भागीदारीनं सोन्याच्या खाणीचा एक पट्टा मिळवला...

'त्या वेळी त्या भागांत तेवढीशी व्यवस्था नव्हती. सोन्याच्या खाणीचा

धंदा धोक्याचा होता, माझ्या भावानं आणि अप्पासाहेबांनी घेतलेल्या जागेत सोन्याचा चांगला सांठा असलेली शीर सांपडली. त्यानंतर एका आठवड्यानं सोनं नेणारी घोड्याची गाडी रस्त्यांत अडवली गेली. ड्रायव्हर आणि पहारेकरी त्यांत ठार झाले.

'अप्पासाहेबांनी केलेल्या खोट्या आरोपावरून अन् बनावट पुराव्यावरून माझ्या भावावरच त्या गुन्ह्याचा आरोप ठेवला गेला. त्याकाळी आजच्यासारखे हुषार वकील आणि संशयाचा सढळ फायदा देणारे उदार न्यायमूर्ति नव्हते. खटल्याचा झटपट निकाल लागून माझ्या भावाला फांसावर चढवण्यांत आलं. अप्पासाहेबांकडे खाणीची पूर्ण मालकी आली.

'त्या वेळी मी लहान होतो. काही वर्षांनी मला खरी गोष्ट कळली. पैशाच्या थैलीनं तोंड बंद केलेल्या एका स्वयंपाक्यानं मरतांमरतां मला खरी हकीकत सांगितली.

'तोपर्यंत आपली तुंबडी भरून अप्पासाहेब मायदेशांत परत निघून आले होते. त्यांचा पिच्छा पुरवायला माझ्याजवळ पैसा नव्हता. त्या दिवसापासून भावाच्या खुनाचा सूड उगवायचा असा निर्धार करून मी निरनिराळ्या नोकऱ्या करीत पैसा साचवू लागलो. खरं म्हणायचं तर माझ्या भावाचा खूनच झालेला होता. तो कायद्याच्या पांघरुणाखाली करण्यात आला, एवढच...

'माझ्या वैऱ्याला गांठायला मला वीस वर्षं लागली. मला पहातांच अप्पासाहेब थंडच झाले ! आमचं बोलणं झालं आणि त्यांनी मला ही नोकरी मिळवून दिली. मग मी हळूहळू त्यांना पिळू लागलो. ही अन्याय्य, धाकदपटशाच्या जोरावर केलेली लूट नव्हती. दोन दिवसांपूर्वी मी त्यांना एक पत्र पाठवलं. त्या पत्रांत मी त्यांच्याकडे बकुळीच्या मळ्याची मागणी केली होती. त्या विलक्षण रात्री ते इथं आले. मी छळतो आहे, विध्वंस करतो आहे, अशा त्यांनी मला शिव्या दिल्या. त्याबद्दल निर्णय घेण्यासाठी मी त्यांना मध्यरात्रीपर्यंत वेळ दिला. मागणी मान्य करा, नाही तर मी सारं जगजाहीर करीन, असं मी त्यांना सडेतोड सांगितल होतं

'रात्री माझी भेट घेऊन परतल्यावर ते दिवाणखान्यांत माझी वाटच पहात होते. त्यांनी मला हव्या तशा शिव्या दिल्या 'काय हवं ते कर, पोलिसांकडे जा नाही तर आणखी कुठं जा, जहागिरदाराच्या शब्दापुढं तुझं कोण ऐकतो ? त्या तुझ्या कवडीमोल भावाची जी गत केली तशीच तुझी पण करीन.' अशी मला त्यांनी धमकी दिली ..

'त्या शब्दांनी माझा तोल सुटला. माझा मेंदू भणभणला. भिंतीवरचं

सर्वात जवळचं हत्यार उचलून मी ते त्यांच्या त्या उन्मत्त टाळक्यांत हाणलं..

'क्षणभर मी त्यांच्याकडे पहात राहिलो. 'माझ्या आणि दादाच्या वर्तीनं–' मी पुटपुटलो–अन् तत्काळ दिवाणखान्यांतून बाहेर पडून, अंधारातनंच गुपचुप इथं परत आलो. झाली माझी हकीकत. आता माझी कुणी माणसं इकडे येण्यापूर्वी मला इथून हलवाल तर मी तुमचे आभार मानीन.'

सावंत उठून शांताराम काटकरसह दाराकडे निघाले. इतक्यांत आनंदरावांनी हाक मारली, 'अहो काटकर !–

'मला एकच विचारायचं आहे.' ते म्हणाले, 'ज्या हत्यारानं तुम्ही अप्पासाहेबांना ठार केलंत ते कोणतं होतं हे माहीत आहे का तुम्हांला ?'

'सांगितलं ना, अगदी हाताजवळ होतं ते मी हिसकलं. जुना परशु होता तो.'

'पूर्वी अपराध्याच्या शिरच्छेदासाठी तो वापरीत असत.' आनंदराव म्हणाले.

शांताराम त्यावर काही बोलला नाही. पण दाराबाहेर पडताना त्याच्या राकट चर्येवर स्मित चमकत होते.

*



# श्वेतवस्त्रा

रात्री–बेरात्री बागेत फिरणाऱ्या त्या श्वेतवस्त्रा स्त्रीला पहाण्यासाठी आनंदरावांनी लतेला पाठविले, त्याला तसेच कारण होते.

पहिली गोष्ट म्हणजे त्यांची स्वतःची प्रकृति तेवढीशी बरी नव्हती. एक आठवडाभर घराबाहेर पडायचे नाही, असे डॉक्टरांनी त्यांना सांगितले होते.

–आणि दुसरी गोष्ट म्हणजे त्या श्वेतवस्त्रा स्त्रीची हकीकत ऐकून लतेला चांगलेच कुतूहल वाटले होते. आनंदरावांनी त्या हकीकतीचा उल्लेख केला तेव्हा ती म्हणाली, ' भूत–पिशाच्यांच्या गोष्टी मी अनेकदा ऐकल्या

आहेत. पण प्रत्यक्ष असं अजून काही दिसत नाही मला. ही 'श्वेतवस्त्रा' पहायला मिळाली तर कळेल तरी खरं काय आहे ते.'

–आणि म्हणूनच आनंदरावांनी तिला तिकडे जायला सांगितले.

लता आनंदरावांकडे नोकरीला राहिली त्याला आता चांगले सहा महिने होऊन गेले होते. तरीसुद्धा आनंदरावांबद्दल आपल्याला आदर वाटतो की धाक वाटतो ते तिचे तिलाच सांगता आले नसते. त्यांची चर्या रुबाबदार पण काहीशी उग्र होती. त्यांच्या वागण्यात मात्र, माणसांत सामान्यतः न आढळणारा समजतदारपणा होता.

'मला स्त्रियांबद्दल सहसा औत्सुक्य वाटत नाही,' ते तिला म्हणाले होते, 'पण एका स्त्रीनं सध्या माझं मन वेधलं आहे. ती स्त्री मोठी 'और' आहे तिची नाजुकता अवर्णनीय–नव्हे, केवळ 'स्वर्गीय' आहे कारण–' किंचित् आवाज खालावून ते पुढे म्हणाले, 'ती स्त्री भूत आहे असं म्हणतात!'

लता त्यावर काहीच बोलली नाही. तिला वाटले, काय हा माणूस बोलतो आहे! म्हणे भूत! कसले भूत अन कसले काय!...तरी पण खांद्यावरून मागे वळून पहावे, ती श्वेतवस्त्रा स्त्री आपल्या पाठीशी उभी आहे की काय याची खात्री करून घ्यावी, अशी इच्छा तिच्या मनाला चाटून गेल्यावाचून राहिली नाही. पांढरीशुभ्र वस्त्रे परिधान केलेली, जणू वाऱ्यावर अलगद तरंगत जाणारी ती श्वेतवस्त्रा...

आनंदराव पुढे बोलू लागले,–' मुंब्रा स्टेशनपासून पांच मिनिटांच्या रस्त्यावर एक बंगला आहे.' त्यांनी तिला त्या बंगल्याचे नाव आणि नेमका ठिकाणा सांगितला. 'तो बंगला अगदी अलग, एकवशी असा आहे. दुमजली आहे, आणि भर वस्तीत नसल्यामुळं त्याची दारं अन् खिडक्या पक्क्या ठेवण्याची खबरदारी मालकानं घेतलेली आहे. आलं लक्षात?'

'हो.' लतेने होकार दिला.

'काही दिवसांपूर्वी त्या बंगल्यात एक खुनी वावरत होता. त्या खुनीचं नाव होतं शिवराम.'

आनंदराव कोचावर नीट रेलून बसले. काही क्षण दोघेहि शांत होती. लतेच्या मनात त्याक्षणी विचित्र भावना तरळत होऱ्या. आनंदरावांनी तिच्या मनाची अवस्था ओळखली. 'खुनाबद्दलच्या विचारानं तुमचं मन अस्वस्थ होतं, खरं ना? माझी पण स्थिति तशीच होते. तुम्ही म्हणाल, हे आनंद-राव–यांनी अनेक खून पाहिलेले आहेत. दुसऱ्या महायुद्धात अनेक मुडदे तुडवलेले आहेत. खून अन् मृत्यु म्हणजे यांना काय हो! पण तसं नाही.

खून या प्रत्यक्ष कृत्याबद्दल मला विशेष काही वाटत नाही. पण त्या मागची मानसिक अवस्था, खुनी व्यक्तीच्या मनांतली आंदोलनं, आणि खुनी हल्ला होतो त्या वेळची बळी पडणाऱ्या माणसाची मानसिक स्थिति, या साऱ्या गोष्टींचा विचार करूं लागताच माझं मन हादरून जातं ! ... पण मी या शिवरामबद्दल सांगत होतो, नाही का ?– घ्या, चहा घ्या !'

नोकराने पुढे आणून ठेवलेल्या ट्रेमधला एक कप उचलून लतेने तोंडाला लावला. आनंदरावहि एकीकडे चहाचे घोट घेत पुढील हकीकत सांगू लागले,–

'मी आत्तांच नांव सांगितलं त्या 'जयमहाल' बंगल्यात हा शिवराम कामाला होता या शिवरामला दारू आणि गांज्याचा भयंकर नाद ! दारू तो आठवड्यांतून एखाददुसऱ्या वेळी प्यायचा, पण त्याची गांज्याची चिलीम मात्र सदैव धुमसत असे. बागेत गवत खुरपीत असतांनाहि मधेच केव्हा त्याला गांज्याची तलफ येईल, याचा नेम नसे. त्याच बागेमधे त्या बंगल्याची मालकीण एके दिवशी सकाळी मरून पडलेली त्याला आढळली. जयमाला-बाई पांढरंशुभ्र तलम पातळ नेसलेल्या होत्या. त्यांचं डोकं ..' आनंदराव किंचित् घुटमळले 'जाऊ द्या ! तपशील तुमच्यासमक्ष वर्णन करण्यात काही अर्थ नाही ..

'बापूसाहेब बाबळे – म्हणजे त्या बंगल्याचे मालक, जयमालाबाईंचे पति–डॉक्टर आहेत. दुःखानं ते बेभान झाले. अंत्यतपासणीनंतर ते पांढरे शुभ्र पातळ उराशी कवटाळून कितीतरी वेळ ते हुंदके देत बसले होते. असं ते प्रकरण गूढ आहे. कारण त्या खुनामागचा हेतूच कळत नाही. जय-माला बाईंची स्वतःची अशी काही संपत्ति नव्हती. त्यांचा विमा उतरलेला नव्हता. त्यांचं आणि त्यांच्या पतीचं एकमेकांवर गाढ प्रेम होतं. पोलिस-खात्यानं जंगजंग पछाडले. प्रत्येक धागा घेऊन शेवटापर्यंत, पण शेवट हाती न लागताच छेडून पाहिला. आणि नंतर काही दिवसांनी हा शिवराम पोलिस चौकीत गेला ! जयमालाबाईंचा खून आपणच केला, असं तो सांगू लागला. तो चांगला शुद्धीत होता. दारूच्या किंवा गांज्याच्या अंमलात नाही सांगितलं त्यानं हे. सकाळी तो गांज्याच्या कैफांत असताना मालकीणबाई त्याला बागेत भेटल्या. त्याच्या कामाबद्दल त्या त्याला काही तरी बोलल्या. तेव्हा रागावून आपण हातातली पहारच त्यांच्या डोक्यांत घातली, असा शिवरामनं कबुलीचा जबाब दिला. ती पहार कुठं पुरून ठेवलेली आहे ते पण त्यांना सांगितलं...'

आनंदराव किंचित् थांबले. 'त्यावेळी माझा पण त्यावर विश्वास

बसला. त्यानं जर काही विशेष कारण सांगितलं असतं तर मला शंका आली असती. पण त्यानं सांगितलं ते इतकं साध, सोपं, सरळ होतं की संशय वाटूच नये. अगदी माणसाला शोभेसं होतं ते. कालपर्यंत माझा त्यावर विश्वास होता.– कालपर्यंत ! पण काल मात्र माझ्या मनात प्रश्न उभा राहिला '

'काल ? –काय झालं काल ?' लतेने विचारले.

'काल त्या बंगल्याजवळच्या भागांत रहाणाऱ्या एका व्यक्तीनं मला मुद्दाम भेटून काही माहिती सांगितली. माझ्याकडे घरकामाला चंद्राबाई आहे ना, तिचा भाऊ आहे तो. तो म्हणाला की, रात्री त्या बंगल्याच्या आवारात एक भूत वावरतं, झाडाझुडपांतून फिरत.'

उजव्या हाताचा पंजा पसरून त्याकडे पहात आनंदराव पुढे म्हणाले, 'म्हटलं, हे काहीतरी विशेष आहे ! काहीतरी 'अ- मानवी' असं आहे ! आपण ज्या जिवंत विश्वात वावरतो, त्या विश्वाच्या दुसऱ्या थडीवरील प्रकार आहे हा ! जगांत काहीतरी इच्छा उरली म्हणजे माणूस भूत होतं म्हणतात. त्याला मुक्ति मिळत नाही. भूतपिशाच्चसृष्टीबद्दल मी अभ्यास केलेला नाही. लोक भूत म्हणून घाबरतात, त्या विशिष्ट आकृतीबद्दल मला तुच्छता किंवा तिरस्कार वाटत नाही, आणि त्यांच्याबद्दल भीति बाळगण्याचं पण काहीच कारण नाही. तेव्हा आपण या प्रकाराचा छडा लावू या ! आपण म्हणजे–मी आणि तुम्ही मिळून. तुम्ही मुंब्र्याला जा. बरोबर वाघ्या असू द्या. सशस्त्र अगर निःशस्त्र, कुणी का असेना, त्याच्याकडे बोट दाखवा नुसतं–आणि वाघ्या मग दोन माणसांनाहि जे साधायचं नाही ते करून दाखवील. संकट अंगावर ओढवून घेऊं नका. नुसतं पहा आणि मला येऊन सांगा. मग आपण इथंच, कॉफी घेताघेता ते गूढ उलगडून टाकू. चंद्राबाईच्या भावाचा पत्ता मी लिहून देतो. त्याच्याकडे जा आधी. तिथं उतरायला चांगलंसं हॉटेल असेल असं मला वाटत नाही. असलं तर मात्र हॉटेलांतच उतरा.'

आनंदरावांनी तिच्याकडे हसून पाहिले.

'तुम्ही सारं सांगितलत, पण एक सांगितलं नाहीत.' लता म्हणाली.

'काय ?'

'शिवरामचं काय झालं ?'

'फांशी गेला तो !' आनंदराव उद्गारले. त्यांनी एक खोल उसासा टाकला.

आनंदरावांकडे लता नोकरीला राहिल्यानंतर महिन्या–दीड

महिन्यातच आनंदरावांनी तिच्याकरिता एक मोटार खरेदी केली होती. त्यांच्या वैशिष्टचपूर्ण स्वभावाचा तो एक नमुना होता.

एक दिवशी सकाळी त्यांनी तिला सँढर्स्ट ब्रिज्‌जवळच्या स्टँडर्ड मोटार डीलर्सकडे जायला सांगितले. ते म्हणाले, 'तुम्हांला आवडेल ती मोटार पसंत करा, अन्‌ त्यांना त्या रकमेचा चेक द्या. तुमचा चेक पास व्हायची व्यवस्था होईल.'

आणि अशा प्रकारे लता एका अद्ययावत्‌ मोटारीची मालकीण झाली.

त्या मोटारीनेच लता दुसऱ्या दिवशी सकाळी मुंब्र्याकडे जायला निघाली. जाताना तिचे मन विचार करीत होते. आनंदरावांनी जे सांगितले तेवढ्या आधारावर काहीतरी निष्कर्ष काढण्याची धडपड ती करू लागली.

—ती मेलेली स्त्री कदाचित्‌ जयमाला नसेलच! अशी घटना तिने एकदा ऐकली होती. कदाचित्‌ कादंबरीत वाचली असेल. ओळखता येणार नाही अशा स्थितीत मृत देह असायचा. तसेच असावे या प्रकरणात... लतेला खूप आनंद वाटू लागला. या गूढाचा उलगडा आपणच आता हां हां म्हणता करू, या विचाराने तिचे मन खुलले.

मनाच्या तशा प्रफुल्ल अवस्थेतच ती मुंब्र्याला पोचली. आनंदरावांना भुताची माहिती सांगणाऱ्या यशवंताचा पत्ता शोधून काढायला तिला फारसा वेळ लागला नाही. यशवंत आणि त्याची पत्नी तारा–दोघेहि घरीच होती. त्यांनी लतेचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले आणि तिला सारी माहिती पण सांगितली.

—यशवंताला हा सारा भासच झालेला असावा, असे ताराचे म्हणणे होते. उलट, तो प्रकार आपण अगदी चांगला पाहिला असे यशवंत खात्री-पूर्वक सांगत होता.

'त्यादिवशी रात्री आम्ही भजन करायला एकाच्या घरी जमलो होतो. परत येतांना मी एकटाच फिरत फिरत त्या बंगल्याच्या बाजूनं निघालो.' यशवंत म्हणाला, 'त्यावेळी बारा वाजून गेले होते. त्या बंगल्यासमोर आल्यावर मला जयमालाबाईंच्या खुनाची आठवण झाली. माझी पावलं आपोआप थबकली आणि मी त्या बंगल्याकडे पाहू लागलो. बागेत विरळ धुकं पसरलेलं होतं आणि त्या धुक्यातच मला पांढरंशुभ्र पातळ नेसलेल्या त्या स्त्रीची आकृति दिसली.'

—त्या आठवणीनेच त्याच्या अंगावर एकदम कांटा उभा राहिला.

'माझ्या अंगावर त्यावेळी असा काही कांटा उभा राहिला म्हणता!

सुदैवानं त्या आकृतीची पाठ होती माझ्याकडे. अगदी सावकाश, मुगीच्या पावलानं– जणू हवेवर तरंगतच ती चालली होती.. '

यशवंत किंचित् थांबला. लता मध्ये काही न बोलता उत्सुकतेने त्याच्याकडे पहात राहिली.

' मग एकदम एक शीळ वाजली. ' बाई, ' यशवंत आवाज खालावून म्हणाला. जणू त्याचे बोलणे ऐकायला कोणी दाराशीच उभे होते. ' तुमच्याबरोबर हा वाघ्या आहे ना, त्याला हांक मारायला तुम्ही जशी शीळ घालता, तशीच ! अगदी स्वच्छ, स्पष्ट ऐकली मी ती शीळ. थांबूनथाबून तीनचारदा वाजली ती. मोठा गोड नाद होता त्या शीळेचा. मी आधीच घाबरलो होतो. त्या आवाजानं तर मी खूपच चरकलो आणि मग जी धूम ठोकली म्हणता ती थेट घरापर्यंत ! '

' असे धापा टाकीत आले होते हे ! ' त्या आठवणीनं ताराला हसूंच आले.

लता काहीच बोलली नाही. आनंदरावांनी तिला ती हकीकत सांगितली, तेव्हा तो प्रकार म्हणजे कदाचित् सारा भास असेल असे तिला वाटले होते. पण आता यशवंताच्या तोंडून सारे ऐकल्यावर, तो केवळ भास नसावा अशी तिची खात्री झाली.

' त्या दिवसानंतर रात्री असा मी त्या बंगल्याच्या बाजूला पुन्हा कधीच गेलो नाही.' यशवंता शेवटी म्हणाला.

' त्या शिवरामशी तुमची ओळख होती का ?' लतेने विचारले.

' हो तशी ओळख होती. पण तो एक माणूसघाणा माणूस होता. सारखा आपल्याच तंद्रीत चिलमीमागून चिलमी ओढीत बसायचा. तो एकटाच होता. लग्न झाल्यावर दोन वर्षांनीच त्याची बायको मेली, अन् मग लग्न करण्याऐवजी तो गांजा ओढू लागला.'

' 'जयमहालां'त डॉक्टर बापूसाहेबांखेरीज आणखी कुणी असतं का ?'

' हो. शांता नावाची एक पोरगी कामाला आहे डॉक्टरांकडे. इथे पार्वतीबाई म्हणून एक विधवा बाई आहे. तिची ती मुलगी. पार्वतीबाई भांडी घासते. शांता पण पूर्वी तेच काम करीत असे. अलिकडे डॉक्टरांकडे कामाला राहिल्यापासून तिची परिस्थिति जरा सुधारली आहे. त्यांच्या बंगल्याची आवराआवर पाहून दुपारचा स्वैंपाक पण करते. ती संध्याकाळी बहुधा आपल्या घरी परत येते. पण डॉक्टर कसलेतरी औषधाचे प्रयोग करीत असतात आणि एखाद्या दिवशी संध्याकाळीं त्यांना स्वत:ला स्वैंपाक करायला वेळ नसला तर ती तिथंच रहाते.'

महिन्यातच आनंदरावांनी तिच्याकरिता एक मोटार खरेदी केली होती. त्यांच्या वैशिष्टयपूर्ण स्वभावाचा तो एक नमुना होता.

एक दिवशी सकाळी त्यांनी तिला सँढर्स्ट ब्रिज्‌जवळच्या स्टँडर्ड मोटार डीलर्सकडे जायला सांगितले. ते म्हणाले, 'तुम्हांला आवडेल ती मोटार पसंत करा, अन् त्यांना त्या रकमेचा चेक द्या. तुमचा चेक पास व्हायची व्यवस्था होईल.'

आणि अशा प्रकारे लता एका अद्ययावत् मोटारीची मालकीण झाली.

त्या मोटारीनेच लता दुसऱ्या दिवशी सकाळी मुंब्र्याकडे जायला निघाली. जाताना तिचे मन विचार करीत होते. आनंदरावांनी जे सांगितले तेवढ्या आधारावर काहीतरी निष्कर्ष काढण्याची धडपड ती करू लागली.

—ती मेलेली स्त्री कदाचित् जयमाला नसेलच! अशी घटना तिने एकदा ऐकली होती. कदाचित् कादंबरीत वाचली असेल. ओळखता येणार नाही अशा स्थितीत मृत देह असायचा. तसेच असावे या प्रकरणात... लतेला खूप आनंद वाटू लागला. या गुढाचा उलगडा आपणच आता हा हां म्हणता करू, या विचाराने तिचे मन खुलले.

मनाच्या तशा प्रफुल्ल अवस्थेतच ती मुंब्र्याला पोचली. आनंदरावांना भुताची माहिती सांगणाऱ्या यशवंताचा पत्ता शोधून काढायला तिला फारसा वेळ लागला नाही. यशवंत आणि त्याची पत्नी तारा—दोघेहि घरीच होती. त्यांनी लतेचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले आणि तिला सारी माहिती पण सांगितली.

—यशवंताला हा सारा भासच झालेला असावा, असे ताराचे म्हणणे होते. उलट, तो प्रकार आपण अगदी चांगला पाहिला असे यशवंत खात्री-पूर्वक सांगत होता.

'त्यादिवशी रात्री आम्ही भजन करायला एकाच्या घरी जमलो होतो. परत येतांना मी एकटाच फिरत फिरत त्या बंगल्याच्या बाजूनं निघालो.' यशवंत म्हणाला, 'त्यावेळी बारा वाजून गेले होते. त्या बंगल्यासमोर आल्यावर मला जयमालाबाईंच्या खुनाची आठवण झाली. माझी पावलं आपोआप थबकली आणि मी त्या बंगल्याकडे पाहू लागलो. बागेत विरळ धुकं पसरलेलं होतं आणि त्या धुक्यातच मला पांढरंशुभ्र पातळ नेसलेल्या त्या स्त्रीची आकृति दिसली.'

—त्या आठवणीनेच त्याच्या अंगावर एकदम कांटा उभा राहिला.

'माझ्या अंगावर त्यावेळी असा काही कांटा उभा राहिला म्हणता!

सुदैवानं त्या आकृतीची पाठ होती माझ्याकडे. अगदी सावकाश, मुगीच्या पावलानं– जणू हवेवर तरंगतच ती चालली होती..'

यशवंत किंचित् थांबला. लता मधे काही न बोलता उत्सुकतेने त्याच्याकडे पहात राहिली.

'मग एकदम एक शीळ वाजली. 'बाई,' यशवंत आवाज खालावून म्हणाला. जणू त्याचे बोलणे ऐकायला कोणी दाराशीच उभे होते. 'तुमच्या-बरोबर हा वाघ्या आहे ना, त्याला हांक मारायला तुम्ही जशी शीळ घालता, तशीच ! अगदी स्वच्छ, स्पष्ट ऐकली मी ती शीळ. थांबूनथाबून तीनचारदा वाजली ती. मोठा गोड नाद होता त्या शीळेचा. मी आधीच घाबरलो होतो. त्या आवाजानं तर मी खूपच चरकलो आणि मग जी धूम ठोकली म्हणता ती थेट घरापर्यंत !'

'असे धापा टाकीत आले होते हे !' त्या आठवणीनं ताराला हसूंच आले.

लता काहीच बोलली नाही. आनंदरावांनी तिला ती हकीकत सांगितली, तेव्हा तो प्रकार म्हणजे कदाचित् सारा भास असेल असे तिला वाटले होते. पण आता यशवंताच्या तोंडून सारे ऐकल्यावर, तो केवळ भास नसावा असो तिची खात्री झाली.

'त्या दिवसानंतर रात्री असा मी त्या बंगल्याच्या बाजूला पुन्हा कधीच गेलो नाही.' यशवंता शेवटी म्हणाला.

'त्या शिवरामशी तुमची ओळख होती का ?' लतेने विचारले.

'हो तशी ओळख होती. पण तो एक माणूसघाणा माणूस होता. सारखा आपल्याच तंद्रीत चिलमीमागून चिलमी ओढीत बसायचा. तो एकटाच होता. लग्न झाल्यावर दोन वर्षांनीच त्याची बायको मेली, अन् मग लग्न करण्याऐवजी तो गांजा ओढू लागला.'

''जयमहालां'त डॉक्टर बापूसाहेबांखेरीज आणखी कुणी असतं का ?'

'हो. शांता नावाची एक पोरगी कामाला आहे डॉक्टरांकडे. इथे पार्वतीबाई म्हणून एक विधवा बाई आहे. तिची ती मुलगी. पार्वतीबाई भांडी घासते. शांता पण पूर्वी तेच काम करीत असे. अलिकडे डॉक्टरांकडे कामाला राहिल्यापासून तिची परिस्थिति जरा सुधारली आहे त्यांच्या बंगल्याची आवराआवर पाहून दुपारचा स्वैंपाक पण करते. ती संध्याकाळी बहुधा आपल्या घरी परत येते. पण डॉक्टर कसलेतरी औषधाचे प्रयोग करीत असतात आणि एखाद्या दिवशी संध्याकाळीं त्यांना स्वतःला स्वैंपाक करायला वेळ नसला तर ती तिथंच रहाते.'

'डॉक्टरांना ओळखता तुम्ही ?'

'तशी थोडीशी ओळख आहे. अलिकडे ते रोग्यांकडे जात नाहीत की रोग्यांना तपासून औषध वगैरे पण देत नाहीत. पूर्वी त्यांची डॉक्टरकी फार जोरात चालायची म्हणतात मुंबईत. आता ते निवृत्त झाले आहेत. कसल्या. तरी नवीन औषधाचा शोध लावण्याची खटपट मात्र ते करीत असतात.'

त्या दांपत्याकडून आणखी काही माहिती मिळण्याची शक्यता नाही अशी खात्री झाल्यावर मोटार त्यांच्याच दारापुढे ठेवून लता पायीच 'जयमहाला'कडे निघाली.

बंगला गावापासून सुमारे अर्ध्या मैलावर होता. बंगल्याच्या पलिकडे, एक फर्लांगावर काही घरांची मिळून एक वाडी बनलेली होती. पण खुद्द बंगला मात्र एकाकीच दिसला. तसा तो मोठ्या रस्त्यावरही नव्हता.

बंगल्याभोवती बाग होती. विशेषत: पुढच्या बाजूला विस्तृत बगीचा होता. खुद्द इमारत तशी बरीच आत होती. रस्त्याला लागून मोठे लोखंडी फाटक होते आणि बागेभोवती खांद्याइतक्या उंचीची दगडी भिंत होती. रस्ता सोडून देऊन लता त्या भिंतीच्या बाजूने चालू लागली.

ती भिंत चारहि बाजूंना नाही, हे लवकरच तिच्या लक्षांत आले. बंगल्याच्या मागच्या बाजूला मोठी खोल घळ होती. बंगल्याच्या त्या बाजूने घळीचा खडक अगदी उभा होता. या कड्याच्या कांठावर भिंत नव्हती. काही ठिकाणी मोडलेले एक लाकडी कुंपण तेवढे दिसले. फार पूर्वी कधीतरी येथे दगड काढण्याचे काम चालू असावे आणि त्यामुळेच खडकांत ती घळ पडली असावी. तळाशी अजूनही मोठमोठे दगड पडलेले होते.

त्या घळीत उतरण्यासाठी सोयिस्कर अशी वाट पाहून खाली जावे की काय, या विचारात लता असतानाच तिला तळाशीं फिरणारा एक तरुण माणूस दिसला. खाली पहात. आपल्याच तंद्रीत तो हळूहळू चालला होता.

केवळ अंत:स्फूर्तीने कळल्यामुळे म्हणा किंवा लतेकडून अजाणता काहीतरी आवाज झाला म्हणून म्हणा, त्याने एकदम लतेकडे वळून पाहिले आणि मग त्याची वृत्ति चटकन् पालटली. तो घाबरला.

तिच्याकडे क्षणभर पहात राहून तो मागे वळला नि पळत सुटला. लतेने वाघ्याकडे पाहिले. 'वाघ्या ! छू: ! पकड त्याला !—अडव !'

वाघ्या ताबडतोब धावला. त्याच्या मागोमाग लता पण, खाली उतरण्यासाठी सोयिस्कर जागा पाहून शक्य तितक्या वेगाने धावू लागली. वाघ्याला तिने एकदम इशारा दिला खरा; पण नंतर मात्र, आपण उगीचच

एखाद्या सरळमार्गी माणसाला त्रास तर देत नाही ना, अशी आशंका तिला वाटू लागली.

ते दोघेहि तिला जरा अंतरावर, खडकांच्या आडोशामागे उभे असलेले दिसले. एका मोठ्या दगडाच्या आधाराने तो माणूस उभा होता. आणि त्याच्यासमोरच मागचे पाय मोडून आणि पुढचे पाय ताठ ठेवून, तोंडातून 'गुर्रर्र' असा आवाज करीत वाघ्या बसला होता. त्याचे कान टवकारलेले, मान किंचित् कललेली, असा तो पहारा करीत होता.

'माफ करा हं!' लता म्हणाली, 'वाघ्या तशी काही इजा करणार नाही तुम्हाला.'

त्या तरुणाने खिशातून एक रंगीत रुमाल काढून कपाळावरचा घाम पुसला. त्याच्या कपड्यांवरून तो एक मध्यमवर्गीय माणूस दिसत होता आणि चर्येवरून प्रामाणिक– सरळमार्गी. त्याने वाघ्याकडे एकदा संशयाने पाहिले. मग त्याच्या डोळ्यातील भीतीची छटा नाहीशी झाली. लतेकडे पाहून तो किंचित् हसला तेव्हा तर लतेच्या मनातील त्याच्याबद्दलच्या साऱ्या शंका-कुशंका निघून गेल्या. तिचे मत त्याच्याविषयी अनुकूल बनले.

'असले कुत्रे भयंकर असतात असं म्हणतात. त्यानं चांगलच घाबर-वलं मला! अहो, घेता काय? उडी घेईल तर माझं नरड फोडील सहज! मला वाटलं चावणार आतां! पण नाही. नुसताच गुरगुरत राहिला.'

काही क्षण ती दोघे एकमेकांकडे पहात राहिली आणि मग त्याने प्रथम तिच्याकडे पाहिले त्यावेळी त्याच्या डोळ्यात चमकलेली भीतीची छटा लतेला आठवली.

'काय करीत होता तुम्ही इथं– या खळग्यात?' तिने औत्सुक्याने विचारले.

'काही-नाही– फिरत होतो आपला.' तो उत्तरला. पण त्याने तिच्या-कडे सरळ पहाण्याचे मात्र टाळले.

'काहीतरी शोधीत होतात?'

'छे छे!' त्याने जोराने मान हलवली. 'नाही बुवा.' आणि मग त्याचा स्वर एकदम तीव्र झाला. 'पण त्याच्याशी तुम्हाला काय करायचं आहे? तुम्ही कोण आहांत?'

त्याच्या त्या वृत्तीने लतेचे औत्सुक्य जास्तच वाढले. 'मी कोण आहे हा प्रश्न फारसा महत्त्वाचा नाही.' ती म्हणाली. तिने वाघ्याचा पट्टा धरून त्याच्या डोक्यावरून हात फिरवला. वाघ्या अजून माझ्या हाताशी आहे,

अजूनही मी त्याला छू: करीन, असेच जणू तिने त्या तरुणाच्या ध्यानात आणून दिले.

'तुमचं कोणत्याही प्रकारे नुकसान करण्याची माझी इच्छा नाही. पण कृपा करून खोटं बोलू नका. इथं ते यशवंतराव कामटे रहातात ना, त्यांच्याकडे पाहुणी आलेली आहे मी. लता माझं नाव. तुमचं नांव काय बरं?'

'प्रभाकर शिंदे.'

'अस्सं. या 'जयमहाल' बंगल्यात कुणी तुमच्या परिचयाचं आहे का ? मला वाटतं, तुम्ही कुणाचीतरी वाट पहात असताना मी बघितलं म्हणून तुम्ही दचकून पळायला सुरुवात केलीत !'

त्या माणसानं आवंढा गिळला. 'हो. शांता बंगल्याबाहेर येते की काय याची वाट पहात होतो मी'

'ती डॉक्टरांकडे घरकामाला पोरगी आहे, तिची ?'

'हं.'

'अन् या घळीत ती तुम्हांला भेटायला येणार, असं ठरलेलं असावं बहुधा !'

त्याचे डोळे चमकले.

'बरोबर आहे तुमची कल्पना. दुसरा काही उपाय नाही. डॉक्टरांना राग येईल म्हणून असा आडमार्ग पत्करावा लागतो आम्हांला. तुम्ही डॉक्टरांच्याच कुणी असाल म्हणून मी पळालो.'

लता हंसली 'तुमच्या मार्गांत मी व्यत्यय आणला याबद्दल वाईट वाटतं मला. मी सहज फिरत होते. या भागात मी नवखी आहे. ही जागा काहीशी विचित्र दिसते म्हणून माझं मन तिच्याकडे वेधलं.'

त्याने अस्वस्थपणे मान हलवली. लतेच्या वृत्तीमुळे आणि बोलण्यामुळे त्याच्या मनातील साशंकता गेली होती. त्याला अचानक एक विचार सुचला. त्याला वाटले, या बाईजवळ मन मोकळे करायला काहीच हरकत नाही.

'तुम्हाला खरं सांगायचं म्हणजे, मला हल्ली शांताबद्दल काळजी वाटायला लागली आहे. ती अलिकडे बदलली आहे. डॉक्टरांकडे तिला खूप काम पडतं. रात्री उशीर होतो अन् मग ती दमते. फारशी बोलत नाही. शिवाय इथं पांढरी बाई रात्री दिसते अशी बातमी फैलावली आहे.—हो पण तुमचा भुताखेतांवर विश्वास आहे का हो ?'

'तुमच्या प्रश्नाचं उत्तर देणं फार कठीण आहे. पण कशासाठी हे तुम्ही विचारता आहांत ?'

त्याच्या बोलण्यातला संकोच आणि गोंधळ नाहीसा झाला होता. बंगल्याकडे हात दाखवून तो आवेगाने म्हणाला, 'रात्री पांढरंशुभ्र पातळ नेसलेली एक स्त्री या बंगल्याभोवतालच्या बागेत वावरते असं म्हणतात लोक. ते जयमालाबाईंचं भूत आहे म्हणे. पण माझा त्यावर विश्वास नाही. पण मग ही स्त्री कोण असावी ? अन् मग मनांत येतं, बंगल्यावर तर एकटी शांताच आहे. ती अलिकडे खूपच बदलली आहे. दमलेली, त्रासलेली असते ती सदान्कदा.'

'अस्सं.' लता शांतपणे म्हणाली, 'अन् या रहस्याचा काही दुवा या घळीत आहे का ?'

त्याची चर्या बदलली. वृत्ति एकदम पालटली. तो म्हणाला, 'ही आमची एक भेटीची जागा आहे--एवढंच.'

त्यापेक्षा जास्त काही बोलायची त्याची तयारी नव्हती.

त्याला सोडून देऊन लता रस्त्याकडे वळली. प्रभाकर शिंदेच्या वृत्तीचा तिला नीटसा उलगडा झाला नव्हता. शांतावर त्याचे गाढ प्रेम आहे एवढे मात्र तिला स्पष्ट दिसले. शांतासारख्या तरुण मुलीने बंगल्यावर दिवस रात्र वावरावे ही गोष्ट तिला जरा चमत्कारिक वाटत होती. डॉक्टर तसे पोक्त आहेत हे खरे असले तरी स्त्री-पुरुषांचा सहवास म्हणजे शंकांना जागाच. पण तरीही प्रभाकरला तिचा राग आलेला दिसत नव्हता. या अशा वेळी बहुधा काम सोडून तो तिच्या भेटीसाठी आला होता; आणि ती तशी त्या बंगल्याच्या भिंती आड अडकून पडलेली. बंगल्याच्या मागची ती घळ, मोडके कुंपण, बंद असलेल्या खिडक्या...

चालताचालताच तिच्या मनात एक विचित्र कल्पना आली. ती कल्पना खरोखरच विचित्र होती. परंतु तिने ती ताबडतोब अंमलांत आणली. फाटकातून आत शिरून बाग ओलांडून ती बंगल्याच्या दाराशी गेली आणि तिने कडी ठोठावली.

—मग मात्र तिला एकदम अस्वस्थता वाटू लागली. त्या दिवशी सकाळपासून दुसऱ्यांदा ती अकल्पित विचाराने वाहवली होती.

कडी ठोठावल्यावर तिला फार वेळ वाट पहावी लागली नाही. थोड्याच वेळात एका सडपातळ तरुणीने दार उघडले. तिचे केस काळेभोर दाट आणि लांबसडक होते. तिची चर्या थोडीशी पांढूरकी आणि फिकट असली तरी काळ्याभोर, तेजस्वी डोळ्यांमुळे ती देखणी दिसत होती. ती शांता असावी असे लतेने ताडले.

'मला डॉक्टरांना भेटायचं आहे.' तिनं सुरुवात केली, 'जरा काम आहे.'

ती मुलगी किंचित घुटमळली. तिच्या डोळ्यात एक प्रश्न उमटला. मग बाजूला होऊन तिने लतेला आत येऊ दिले. दिवाणखाना जरा अंधेरा होता. आतली हवाही कोंदट होती. जणू तिथे मोकळी हवा कधी खेळलीच जाऊ दिली नसावी. तिथे विचित्र वासही दरवळत होता. तो कसलातरी औषधी द्रव्याचा असावा. ते द्रव्य कसले ते मात्र तिला समजणे अशक्य होते.

शांता काहीच बोलली नाही. लतेकडे पाठ वळवून ती आतल्या जिन्याने वर निघून गेली. लतेने वाघ्याकडे पाहिले. त्याच्याकडे पाहून तिला तेवढाच धीर आला.

जराशाने जिन्यावर पावलांचा आवाज आला आणि डॉक्टर खाली आले. ते खूप धिप्पाड, उंच होते एवढी दणकट शरीरयष्टि यापूर्वी लतेने कधी पाहिली नव्हती. त्यांचे व्यक्तिमत्व प्रभावी होते. एखाद्या भव्य दगडी पुतळ्यासारखी त्यांची चर्या गंभीर, कठोर दिसली. आपल्यापेक्षा खूपच हीन दर्जाच्या, क्षुल्लक माणसाकडे पहावे अशा नजरेने त्यांनी लतेकडे बघितले.

'काय हवंय् तुम्हाला ?'

त-त प-प करीत बोलण्याचे मोठ्या मिनतवारीने टाळून तिने स्वर शांत ठेवला आणि इतक्या वेळात मनाशी ठरवून ठेवलेली थाप उच्चारली.

'मुंबईचे ते 'कामत आणि कंपनी'चे केशवराव कामत आहेत ना,— जागा मिळवून देण्याची कामं करतात ते; त्यांनी मला सांगितलं, की हा बंगला काही दिवस भाड्यानं मिळण्याची शक्यता आहे. येत्या उन्हाळ्यात मला दोन महिने शहराबाहेर रहायचं आहे. तेव्हा म्हटलं, पहावी ही जागा —एकदा नजरेखाली घालावी.'

डॉक्टर अगदी निश्चल उभे राहिले. ते तिचे आपादमस्तक निरीक्षण करीत होते. एकदा त्यांची नजर वाघ्याकडेही वळली.

'अस्सं !' शेवटी ते म्हणाले, 'हे काम आहे होय ? चला मग, आधी बाग दाखवतो तुम्हांला.'

लता इतकी आश्चर्यचकित होऊन गेली की, तिला काय बोलावे हेच सुचेना. तिने सहज आपली सुचली ती थाप ठोकून दिली. बंगला भाड्याने द्यायचाच नाही असे डॉक्टर म्हणतील, मग आपण उगीच त्रास दिल्याबद्दल त्यांची क्षमा मागू, आणि इकडच्या तिकडच्या दोन गोष्टी बोलून निघून जाऊ, तेवढ्यात बंगल्याचा जास्तीत जास्त भाग पाहू, जमलेच तर गावात फैलावलेल्या 'अफवे'बद्दल बोलू, असे तिने ठरवले होते. पण तसे काहीच

झाले नाही खरोखरच तो बंगला भाड्याने द्यायचा डॉक्टरांचा विचार होता, हा योगायोगच म्हणायचा !

त्यांनी तिला बाग दाखवली. ती दाखवितांना ज्या ठिकाणी आपल्या पत्नीचा खून झाला ती जागाही त्यांनी दाखवली. जाईच्या एका मोठ्या मांडवाखाली थांबून ते म्हणाले, ' इथंच माझ्या पत्नीचा खून झाला शिव-रामनं मारलं तिला. तो नेहमी अंमलात तर्रर्र असायचा. बंगल्यामागं एक घळ आहे, तिच्या काठावर कठडा बांधण्याबद्दल तिनं त्याला अनेकदा सांगूनही त्यानं ते काम केलं नाही. ती रागानं त्याला बोलली, आणि त्यानं चिडून तिला ठार मारलं. मद्यपानानं त्याला खुनी बनवलं आणि फासावर चढवलं !'

ही सारी हकीकत सांगतांना डॉक्टरांनी एकदाही लतेच्या नजरेला नजर दिली नाही. बाग दाखवून झाल्यावर ते बाजूच्या एका दारानं घरात शिरले. लताला एका खुर्चीवर बसायला सांगून ते म्हणाले, ' जरा बसता का इथं ? मी आत जाऊन येतो– एक मिनिट. त्याचं असं आहे, तुम्ही अचानक आलात–आत जरा पसारा आहे, तो नीट आवरतो आधी. तुमच्या कुत्र्याला मात्र धरून ठेवा. इकडेतिकडे भटकू देऊ नका त्याला !– तुमचं नाव ?'

लतेने आपले नांव सांगितले. आपण या बंगल्यात पाऊल टाकण्याचा वेडेपणा कुठून केला असे तिला आता झाले होते. डॉक्टरांनी तिला बसवले ती बाहेरच्या दिवाणखान्याला लागून असलेली खोलीही अर्धवट अंधारातच होती. खिडक्या लावलेल्या होत्या. लतेला खूपच वाट पहावी लागली. बऱ्याच वेळाने डॉक्टर परत आले.

' तुमच्या कुत्र्याला इथंच राहू द्या ' त्यांनी फर्मावले, ' तो घरभर भटकलेलं आवडायच नाही मला. जागा भाड्यानं घेतांना ते कुत्रं इथं आणायचं नाही, ही अट आधी मान्य करावी लागेल तुम्हांला.'

लता क्षणमात्र घोटाळली. वाघ्या जवळ असणे म्हणजे सुरक्षितता होती. आनंदरावांनी सांगितल्याप्रमाणे वाघ्या दोन माणसांइतका उपयुक्त आणि सोबतीच्या दृष्टीने योग्य असा होता. पण डॉक्टरांची ती सूचना इतकी हुकमी होती की, ती अवमानणे अशक्य होते. शिवाय आता माघार घेणे म्हणजे आपण खोटे बोललो असे मान्य करण्यासारखेच होते. हा अजब, शांत बंगला नीट पहाण्याची संधि घालवण्याची तिची तयारी नव्हती.

डॉक्टरांच्या मागोमाग ती बाहेरच्या दालनात आली. लगेच डॉक्ट-रांनी दार लावून कडी घातली. ती एकदम शक्य तितक्या घाईने मागे

वळली; पण तेवढ्यात डॉक्टरांनी तिचे मनगट इतक्या जोराने गच्च आवळून धरले की तिच्या तोंडून जोराची किंकाळी बाहेर पडली. किंकाळी ऐकून बाघ्या जोरजोरात भुंकू लागला. पण दार बंद असल्याने भुंकण्या-खेरीज त्याला काहीच करता येईना.

'तुम्ही नाव सांगितलत त्या एजंटला मी आत्ताच फोन केला. मला जागा मुळी द्यायचीच नव्हती– आणि नाही! कदाचित् त्या कामतांनी कुठूनतरी असंच ऐकून तुम्हाला सांगितलं असेल असं वाटलं मला, म्हणूनच खात्री करून घेतली. खरं म्हणजे तुम्हाला पाहिल्याबरोबरच मी ताडलं, की तुमचा काहीतरी डाव आहे. त्या कामतांना तुमचं नावसुद्धा माहीत नाही!'

डॉक्टरांनी तोंडाचा चंबू करून बारीक पण स्पष्ट शीळ घातली, आणि शीळीने साद घालताच कुत्र्याने धावत यावे तशी शांता दड्दड् जिना उतरून खाली आली.

बाघ्याच्या भुंकण्याने घर निनादून गेले.

० ० ०

बंगला नि:शब्द होता. रात्र झाली होती. बंगल्याच्या मागच्या भागातील एका मोठ्या खोलीत लता एका खुर्चीवर बसली होती. ती खोली म्हणजे एक मोठी प्रयोगशाळाच होती. बाटल्या, स्टोव्ह, वाकड्यातिकड्या काचेच्या नळ्या– असा सारा पसारा एका टेबलावर पडलेला होता.

खालच्या मजल्यावर, मधूनच शांततेचा भंग करणारे बाघ्याचे भुंकणे उमटत होते. सगळी दुपार आणि संध्याकाळहि त्याने भुंकूनभुंकूनच घालवली होती.

शांता मागच्या बाजूला शांतपणे, आवाज न करता वावरत होती. ती जवळपास आहे याची जाणिवहि लतेला उरली नाही.

डॉक्टर बापूसाहेब बावळे टेबलाला खेटून उभे होते. त्यांनी अगदी चमत्कारिक कपडे केलेले होते. पायात खडावा, खांद्यावर रंगीत झूल, उजव्या हाताच्या तर्जनीत एक मोठ्या हिरव्या खड्याची अंगठी– असा त्यांचा अजब पोषाख होता.

'सत्ता– श्रेष्ठत्व!' ते गंभीरपणे, संथ आवाजात म्हणाले, 'दुसऱ्यावर सत्ता गाजवण्यासाठी, श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी माणूस धडपडत असतो. सर्व जन्मभर तो झगडत असतो. उगाचच नको तिथं नाक खुपसणाऱ्या पोरी, माझं म्हणणं ऐकून घे. तू तत्त्वज्ञानी, राजकीय नेत्यांची भाषणं ऐकली असशील. काही लोक किमया करून मातीचं सोनं करण्याचा प्रयत्न करतात. हे सारं ते कशासाठी करतात?– सत्तेसाठी करतात?–

सत्तेसाठी ! – आपला श्रेष्ठपणा प्रस्थापित करण्यासाठी ! संपत्तीनं सत्ता मिळते. राज्यसत्ता म्हणजे तरी काय ? लोकांवर सत्ता गाजवण्याचा अधिकार !'

ते हंसले. 'वेडे – वेडे लोक आहेत हे सारे ! संपत्ती म्हणजे क:पदार्थ चीज आहे. राज्यसत्ता म्हणजे तरी काय ? पैसा संपला की तुम्हाला कोण विचारत ? आणि ते राजकारणी तरी काय करतात ? निवडून येतात– कायदेमंडळातून जागा मिळवतात– मंत्री होतात. याचा अर्थ काय ?– त्यांना प्रशस्त, भव्य इमारतीतून मोठ्या सुशोभित खुर्च्यांवर बसता येतं, एवढंच ! पैसा देता येण्याची पात्रता हेच त्यांचं सामर्थ्य ! त्यांचे नोकर त्यांचं ऐकतात ते का ? तर पैसा–पगार मिळतो म्हणून. त्यापेक्षा चांगली संधि मिळाली तर ते नोकर नोकरी सोडून देतील ! माणसं जगभर सत्तेची सूत्रं खेळवण्याचा प्रयत्न करतात. ती सूत्रं कित्येकदा–नव्हे, अनेकदा तुटतात ! राष्ट्राच्या भवितव्यतेच्या ताब्यात जातात. खोटं–सारं खोटं ! आता गुलामगिरी नष्ट झाली आहे ! '

–त्यानी जोराने छातीवर हात मारून घेतला 'पण मी– या बापूसाहेब बाबळयानं एक नवं गुपित शोधून काढलं आहे. मी गुलामांचा राजा होणार आहे ! गुलाम बनवण्याची किमया मी शोधून काढली आहे. याचा अर्थ समजतो तुला ? '

त्यानी शीळ घातली आणि चुटकी वाजवली. तशी शांता धावत येऊन त्यांच्याजवळ उभी राहिली. क्षणातच मानेच्या इषाऱ्याने त्यानी तिला परत मागे पाठवले.

मग त्यानी टेबलावरची एक बाटली उचलून लतेच्या समोर, तिला दिसेल अशी धरली.

'जगांत अनेक वस्तू आहेत. अफू, गांजा, चरस–आणि कितीतरी ! सगळयांचीच नावं सांगायला हवीत का ? या साऱ्या चिजांमध्ये माणसांना गुलाम बनविण्याचं सामर्थ्य आहे. दुसऱ्यांना गुलाम बनवू पाहणाऱ्यांना ही द्रव्यं गुलाम बनवतात !'

छाती पुढे काढून त्यानी मान किंचित एका बाजूला झुकवली. 'एक दिवशी माझ्या मनांत विचार आला, मालक बनू पाहणाऱ्या या लोकांचे आपण मालक होऊं ! ही द्रव्यं अशा प्रमाणात मिसळूं कीं, ते मिश्रण माझ्या सत्तेचं अधिष्ठान बनेल. माझ्या इच्छा, मी व्यक्त करण्यापूर्वीच ओळखून अमलांत आणल्या जातील. हिंदुधर्मांत पतिव्रतेची काही लक्षणं सांगितलेली आहेत– त्यावर ताण करणारे गुलाम या औषधाच्या साहाय्यान तयार होतील.

सत्तेसाठी मी प्रयत्न केला. आणि ती मिळवलीहि ! पैसा किंवा संपत्तीवाचून अनिर्बंध सत्ता ! कसलीहि अपेक्षा नसतांना माणसाला पायाशी झुकवण्याची किमया ! ती मला साधली. आणि तूं .. माझ्याशी बनवाबनवी करणाऱ्या पोरी, आता अनुभवानंच तुला ते समजेल ! '

बोलणे थांबवून ते लतेकडे पहात राहिले. ते आवेगाने बोलत असतांनाच लतेला खालच्या बाजूने काही चमत्कारिक आवाज ऐकूं येत होता. मध्यंतरी, काही मिनिटांपूर्वी तो बंद झाला होता. पण डॉक्टरांचे बोलणे थांबतांच तिला जिन्याच्या दाराशी काहीतरी खसखसल्यासारखे वाटले.—आणि मग एकदम दार उघडले गेले.

संतापाने मोठा चित्कार काढून डॉक्टर मागे वळले लतेला अगदी प्रथमच शांतेचा आवाज ऐकूं आला. घाबरलेल्या मुलाला गप्प बसणे अशक्य झाले म्हणजे त्याच्या तोंडून जसा उद्‌गार निघेल तसा आवाज होता तो.

उघडलेल्या दारांतून आनंदराव आत आले. त्यांच्या एका हातात काठी आणि दुसऱ्या हातात पिस्तूल होते. त्यांच्या मागेच प्रभाकर शिंदे आणि एक गणवेषांतील पोलिस–इन्स्पेक्टर होता.

' सत्ताधीशमहाराज ! ' आनंदराव म्हणाले, 'तुमची सत्ता संपली ! लक्षांत ठवा, गुलामगिरीचे दिवस कधीच संपले आहेत ! —हां ! टेबलाजवळून मागं सरका ! भिंतीला खेटून उभे रहा ! खुनाच्या आरोपावरून तुम्हाला अटक होणार आहे आता ! '

डॉक्टर वाबळे काहीतरी पुटपुटले. त्यांनी शीळ वाजवली. त्याबरोबर शांता पुढे येऊ लागली. पण प्रभाकरने आपल्या बळकट हाताने तिचा दंड धरून तिला मागे खेचले.

' डॉक्टरसाहेब ! ' आनंदराव पुढे येऊन म्हणाले, ' तुमच्या औषधानं प्रस्थापित होणाऱ्या सत्तेपेक्षाहि प्रेमाची सत्ता फार श्रेष्ठ अन् बळकट आहे!'

डॉक्टर ओरडले, ' मी माझ्या पत्नीचा खून केलेला नाही ! '

आनंदरावांनी मान हलवली ' नाही. पण शिवरामला मारलत तुम्ही ! '

वाघ्या आवेगाने लतेच्या हाताचे पंजे चाटण्याचा प्रयत्न करीत होता. आनंदरावाचे ते शब्द ऐकून ती चकित झाली ! शिवराम फाशी गेला असे सकाळीच आनंदराव म्हणाले होते, आणि आता ते डॉक्टरांना म्हणताहेत, ' तुम्ही त्याला मारलंत ! ' आनंदरावांनाहि आज वेड लागले आहे की काय?

० ० ०

लता कोचावर बसून आरामात, गरमगरम कॉफीचे घुटके घेत होती. पलिकडे आनंदराव बसले होते. मधे वाघ्या ब्रेडचे तुकडे खात बसला होता.

'फारच चमत्कारिक माणूस!' आनंदराव म्हणाले, 'तुमच्या मुक्ततेबद्दल तुम्ही त्या प्रभाकरचे आभार मानायला हवेत. त्याला मी पोलिसखात्यात लावून घेणार आहे तो मोठा चलाख गुप्त पोलिस होईल. तुम्ही त्या बंगल्यात शिरलात हे त्यानं पाहिलं. त्याला औत्सुक्य वाटलं. तो गावात गेला आणि यशवंताला भेटला. यशवंतानं त्याला तुमच्याबद्दल माहिती सांगितली. मग तर त्याला फारच काळजी वाटू लागली. तुम्हांला भेटण्याची उत्सुकता वाटू लागली. 'त्या परत येताच मला कळवा,' असं त्यानं यशवंताला सांगून ठेवलं. चार तासानंतरहि तुम्ही परत आला नाहीत, तेव्हा तो बंगल्याभोवती फिरू लागला. वाघ्याचं भुंकणं सारखं बाहेर ऐकू येत होतं! शेवटी पाच वाजता त्यानं मला फोन केला. मी ताबडतोब मुंब्रा गाठलं आणि प्रभाकर नि इन्स्पेक्टर देशमुखांना बरोबर घेऊन 'जयमहाला'-कडे धावलो...'

आनंदराव किंचित् थबकून म्हणाले, 'पण प्रभाकरचं कर्तृत्व एवढ्यावरच संपत नाही. त्या घळीत काहीतरी गूढ दडलेलं आहे, या प्रकरणाचे धागेदोरे तिथंच गुंतलेले आहेत, असं त्याला वाटत होतं. म्हणूनच तो काल सकाळी तिथं घुटमळत फिरत होता. आणि म्हणूनच मी त्याची पोलिसखात्यात शिफारस करणार आहे ..

'डॉक्टर बापूसाहेब वाबळे अगदी प्रथमपासूनच काहीसे हेकट स्वभावाचे गृहस्थ आहेत. आपल्या इच्छेच्या आड कोणी आलेलं, काही मनाविरुद्ध झालेलं त्यांना आवडत नसे. नवल असं की, अशा या विक्षिप्त माणसाचं आपल्या पत्नीवर मात्र गाढ प्रेम होत. त्या घळीच्या बाजूचं कुंपण नीट करण्याबद्दल त्यांनी शिवरामला अनेकदा सांगितलं होतं. ते त्यानं ऐकलं नाही . आज करू, उद्या करू असं त्यानं दुर्लक्ष केलं. जयमालाबाईंना झोपेत चालायची सवय होती. एक दिवशी अशा झोपेत चालतांना त्या मोडक्या कुंपणाच्या बाजूला गेल्या आणि उंचावरून खडकावर आपटून मरण पावल्या.

'त्यावेळी डॉक्टर बापूसाहेबांची काय अवस्था झाली असेल याची कल्पनाच करा. संतापानं त्यांचा किती जळफळाट झाला असेल! ज्याच्या कामचुकारपणामुळं हे घडून आलं, त्या शिवरामचा त्यांना किती राग आला असेल! त्यांच्या प्रेमाचं एकमेव अधिष्ठान असलेली व्यक्ति नष्ट झाली होती. सांगितल्याप्रमाणे शिवरामन, ते कुंपण ताबडतोब नीट केलं असतं तर जयमालाबाई त्या घळीत कड्यावरून पडल्या नसत्या, त्यांना मृत्यु

आला नसता. नोकरानं आज्ञेचं उल्लंघन केलं म्हणूनच त्यांचा सत्यनाश झाला. यापुढं आपल्या आज्ञेचं उल्लंघनच होता कामा नये, आपले नोकर आपले गुलामच असायला हवेत, असं त्यांनी ठरवून टाकलं.

'आणि– वर्षानुवर्षं त्यांच्या डोक्यात वास करीत असलेला माथेफिरूपणा त्या रात्री भडकून उठला ! मृत पत्नीचा देह त्यांनी घळीतून उचलून आणला आणि जाईच्या मांडवात, तिथंच मृत्यु आला असं दिसेल अशा रीतीनं ठेवून दिला. गांज्याच्या तारेत असलेल्या शिवरामला धरून त्यांनी त्याला ते आपलं अनेक प्रयोगानंतर सिद्ध केलेलं रसायन पाजलं. त्याला कोंडून ठेवून ते रोजच्या रोज ते औषध पाजू लागले 'तूच जयमालेला पहारीनं ठार केलंस, ती पहार बागेच्या कोपऱ्यात पुरून ठेवलीस' असं सारखं सारखं ते त्याला बजावून सांगू लागले. तशी एक पहार त्या ठराविक ठिकाणी पुरून ठेवण्याची खबरदारी त्यांनी घेतली होती. दिवसेदिवस तो 'धडा' शिवरामच्या मेंदूवर ठसला जाऊ लागला. दिवसेदिवस तो माणूस त्यांचा गुलाम बनू लागला .. मग, त्याचा सूड उगवण्याची कामगिरी डॉक्टरांनी परभारे कोर्ट–कायद्याकरवी उरकून घेतली. ज्या माणसानं त्यांच्या हुकुमाची अवज्ञा केली होती, त्याच माणसानं कोर्टात, 'मीच जयमालाबाईनां ठार मारलं' असं कबूल केलं, आणि तो फांशी गेला...

'पण डॉक्टरांचा माथेफिरूपणा आता चांगलाच भडकला होता. एका गुलामाची वासलात लावून झाल्यावर त्यांना दुसरा कुणीतरी गुलाम असावासं वाटू लागलं. त्या औषधाचा प्रयोग त्यांनी शांतेवर सुरू केला. त्या गरीब बिचाऱ्या पोरीला ते नेहमी आपल्या पत्नीच्या गोष्टी सांगत असावेत. तिचं स्मरण म्हणून जपून ठेवलेलं ते तलम पांढरं पातळ ते तिला दाखवीत असावेत. तिच्या मनावर डॉक्टरांच्या औषधाचा नि शिकवणुकीचा फार विलक्षण परिणाम झाला. रात्री ते पातळ नेसून ती बागेत फिरू लागली डॉक्टरांनी शीळ घातल्यावरच ती परत बंगल्यात जायची. तिची मनःस्थिति कल्पनेनंच जाणायला हवी.

'आता डॉक्टरांना जन्मभर बंदिवासात–किमानपक्षी वेड्यांच्या इस्पितळात डांबून रहावं लागेल. साम्राज्य नसलेला सम्राट–सामर्थ्य नसलेला गुलामांचा सत्ताधीश !'

'आणि शांता ?' लतेने थरथरत्या हृदयाने विचारले.

आनंदराव हंसले. 'महिन्याभरात ती चांगली सुधारेल. आणि आता, एका गुलामगिरीतून बाहेर पडल्यावर ती दुसरी गुलामगिरी पत्करणार आहे असं कळतं. पण ही गुलामगिरी स्वेच्छेची, प्रेमाची आहे. मात्र तितकीच बळकट हं ! प्रभाकरनं आपल्याला विवाहाचं आमंत्रण दिलेलं आहे. अन् आपण गेल्यावाचून भागायचं नाही, बरं का लता !'



# लक्ष्यवेधी बाण !

एखाद्या लक्षाधीशाच्या खुनाचे प्रकरण कुणाचेहि चित्त वेधून घेईल ! मग, उत्तर-प्रदेशातील रत्नपूर गांवात पाय ठेवताच आनंदराव पारसनीसांपुढे एक-दोन नव्हे, तर तीन लक्षाधीशांची भानगड उभी राहिली, तेव्हा त्यांचे औत्सुक्य चांगलेच जागृत झाले, यांत नवल नाही.

एका परिषदेला उपस्थित राहण्यासाठी म्हणून आनंदराव रत्नपूरला आले. विमानांतून उतरतांना कुठे उतरावे, परिषदेव्यतिरिक्तचा इतर वेळ कुठे घालवावा हाच विचार त्यांच्या मनांत घोळत होता; परंतु त्याबद्दल त्याना फारसा विचार करावा लागला नाही. विमानतळावर उतरताच जाड चौकटीचा चष्मा घातलेल्या एका व्यक्तीने त्यांना हटकले,—

'आपण कॅप्टन राजेंद्रसिहजींना भेटूं इच्छिता ना ? ' त्या व्यक्तीने हंसून विचारले.

आनंदराव चटकन् काहीच उत्तरले नाहीत. कॅप्टन राजेंद्रसिह म्हणजे आनंदरावांच्या एका स्नेह्याचे स्नेही. रत्नपूरच्या मुक्कामात अमूक अमूक



१७३०२ २२।६।८१

माणसांना भेटायचे म्हणून त्यांनी जी एक यादी केलेली होती, तीत राजेंद्रसिंहाचे नाव होते, एवढेच.

'अं ?' ते पुटपुटले 'अ.पण राजेंद्रसिंह का ?–त्यांना ओळखतां तुम्ही?'

'नाही– मी राजेंद्रसिंह नाही.' जाड फ्रेमीतल्या काचांआडचे डोळे आकुंचित करीत तो माणूस म्हणाला, 'त्यांचा एक स्नेही आहे मी. अन् त्यांचे एक मित्र शिवराज पांडे आहेत ना, त्यांना पण ओळखतो मी. चला, राजेंद्रसिंहजी मोटारीत तुमची वाट पहाताहेत.'

आणि आनंदरावांना 'हो–नाही' म्हणायला सवडही न देता त्यांचा हात धरून तो माणूस त्यांना विमानतळाबाहेर पडण्याच्या मार्गाकडे नेऊ लागला.

'माझं नाव मेहेरा आहे' तो माणूस म्हणाला, 'हरदीप मेहेरा. तुमचे स्नेही राजेंद्रसिंहजी बाकीचा खुलासा करतीलच.'

त्या माणसाने आनंदरावांना एका मोटारीकडे नेले. मोटारीत कुरळ्या केसांचा एक तरुण बसलेला होता. हरदीप मेहेराने 'हे कॅप्टन राजेंद्रसिंहजी' म्हणून त्या तरुणाची आनंदरावांना ओळख करून दिली. आनंदरावाचे सामान मोटारीत ठेवण्यात आले कुठे जायचे याबद्दल आनंदरावांनी काहीच नक्की ठरविलेले नव्हते. हो ना करीत ते मोटारीत बसले. मोटार चालू होताच कॅप्टन राजेंद्रसिंहाचे तोंड उघडले. त्याने आणि हरदीपने मिळून आनंदरावांना ज्योतिर्मय शिवलिंग आणि तोपर्यंत घडलेल्या दोन गुन्ह्यांची माहिती दिली–'

निर्मलकुमार नावाचे राजेंद्रसिंहांचे एक चुलते होते. त्यांचे भागीदार शिवराज पांडे हे त्या ज्योतिर्मय शिवलिंगाचे, अलिकडच्या काळातील तिसरे मालक होते. त्या शिवलिंगाचे पहिले मालक, तांब्याच्या व्यापारातील राजे समजले गेलेले जगदीश चोप्रा यांना धमकीची पत्रे आली होती. त्यावर 'वीरभद्र' अशी सही असे. हे नाव अर्थातच कुणीतरी बनावट धारण केलेले असावे. आपल्याकडील 'उमाजी नाईक', 'नाना फरारी', 'तंट्या भिल्ल' इत्यादींच्या नावासारखीच वीरभद्राने त्या भागात जरब उत्पन्न केलेली होती. ही धमकीची पत्रे लिहिणारा तो माणूस फक्त पत्रे लिहूनच थांबला नाही, तर एक दिवशी सकाळी जगदीश चोप्रा आपल्या बागेत मरून पडलेले आढळले ! खुनीचा काहीही मागोवा पोलिसांना आढळला नाही. शिवलिंग मात्र बँकेच्या तळघरातील कोठारात सुरक्षित होते. जगदीश चोप्रांच्या इतर सर्व संपत्तीबरोबर शिवलिंगहि त्याचे मावसभाऊ उत्तम चक्रवर्ती यांच्या मालकीचे झाले. उत्तम चक्रवर्ती पण खूप श्रीमंत होते. त्यांनाहि वीरभद्राकडून धम-

कीची पत्रे येऊ लागली. एका टेकडीवर त्यांचा हवेशीर बंगला होता, त्या टेकडीच्या पायथ्याशीच एक दिवशी त्यांचे प्रेत पडलेले दिसले. बंगल्यातील सर्व सामानाची लुटालूट झालेली होती. त्या लुटालुटीत ते 'ज्योतिर्मय शिवलिंग' मात्र बचावले होते; पण कॅश सिक्युरिटीज्, नोटा, सोने वगैरे सव गमावल्यामुळे त्यांची सर्व संपत्ति नष्ट झाली.

'उत्तम चक्रवर्तीच्या विधवा पत्नीला त्यांचं होतं–नव्हतं ते सर्व विकावं लागलं ' राजेंद्रसिंह पुढे म्हणाला, 'तिच्याकडून शिवराज पांड्यानी ते ज्योतिर्मय शिवलिंग विकत घेतलं. माझा अन् पांड्यांचा परिचय झाला तेव्हांपासून ते त्याच्याजवळच आहे पण ते जवळ असणं ही काही मोठी सुखाची गोष्ट नाही '

'या शिवराज पांड्यांनाहि काही धमकीची पत्र आली आहेत काय?' आनंदरावांनी विचारले.

'आली असावीत असा माझा अंदाज आहे.' हरदीप मेहेरा म्हणाला, त्याच्या विशिष्ट स्वरामुळे आनंदरावांनी त्याच्याकडे चमकून पाहिले, तेव्हां तो हसत असल्याचे त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आले.

'तशी पत्रं आली असावीत यात शंकाच नाही.' राजेंद्र म्हणाला. 'ती मी पाहिलेली नाहीत. त्याची पत्रं फक्त त्यांचा सेक्रेटरी पहातो. पण काही पत्र वाचताना ते भयंकर अस्वस्थ झालेले, अन् काही पत्र तर सेक्रेटरीकडे न देताच त्यांनी टरकावून टाकलेली मी पाहिली .. मुद्दा एवढाच की, या बाबतीत त्यांना थोडा सल्ला मार्गदर्शन हवं आहे. गूढ रहस्य उलगडण्यातील तुमचं कौशल्य सर्वांना माहीत आहे म्हणूनच तुम्हाला शिवराज पांड्याच्या भेटीला आणावं असं सेक्रेटरीनं मला सुचवलं.'

–आपल्याला विमानतळावरून एवढ्या घाईगर्दीने, जवळजवळ ओढीत ताणीतच का आणले याचा आनंदरावांना उलगडा झाला.

त्यांची मोटार एव्हांना गावाबाहेर पडली होती अल्पावधीतच ती एका लांबलचक भिंतीसमोर उभी राहिली ती भिंत दगडमाती किंवा विटासिमेंटचुन्याची दिसत नव्हती. ती भिंत कसल्या तरी धातूची आहे हे बारकाईने पाहिल्यावर आनंदरावांच्या लक्षात आले.

ते मोटारीतून उतरल्यावर त्या भिंतीतील एक लहानसे प्रवेशद्वार उघडले गेले. एखाद्या मोठ्या बँकेतील खजिन्याच्या बंदिस्त जागेचे दार उघडले जावे तसाच तो प्रकार होता. हरदीप मेहेराने आत प्रवेश करण्याऐवजी त्यांचा निरोप घेतला तेव्हा आनंदरावांना नवल वाटले.

'मी आत येत नाही.' हरदीप म्हणाला, 'मला पाहिलं की पांडेजींना भलताच हर्ष होतो. उगीच हर्षवायू व्हायचा एखादवेळी.'

–आणि तसाच मागे वळून तो चालू लागला. राजेंद्रसिंहाबरोबर आनंदराव दारांतून आत शिरताच ते फटकन् बंद झाले.

आत एक विस्तीर्ण सुशोभित बगीचा होता. तऱ्हेतऱ्हेच्या रंगीबेरंगी फुलझाडांनी तो बाग फुललेला असला तरी त्यात एक गोष्ट आनंदरावांच्या लक्षात आल्यावाचून राहिली नाही –बागेत एकहि मोठे झाड किंवा झुडुपहि नव्हते. बागेच्या मध्यभागी एक कलात्मक बांधणीची इमारत होती, पण ती इतकी अरुंद आणि उंच होती की, एखादा उंच सुटा बुरुजच बांधून ठेवलेला आहे असे वाटावे. त्या इमारतीत प्रवेश केल्यावर वर जाण्यासाठी फक्त एक लिफ्ट आहे; जिना वगैरे काही नाही, हे पाहून आनंदराव चकित झाले. लिफ्टच्या प्रवेशद्वाराशी साध्या वेषांतील पोलिसांसारख्या दिसणाऱ्या माणसाचा पहारा होता.

'संरक्षणाची खबरदारी घेण्यात हा थोडा अतिरेक होतो आहे असं वाटेल तुम्हाला.' राजेंद्र हंसून म्हणाला, 'पण हा 'वीरभद्र' म्हणजे काही सामान्य, भुरटा चोर–खुनी नाही, अन् शिवराज पांडे ही पण काही अशी तशी असामी नाही. तसे ते दिसायला अगदी सामान्य माणूस वाटतात; पण त्यांचं काही बरंवाईट झालं, तर श्रीनगरपासून रामेश्वरपर्यंत उभा हिंदुस्थान हेलावेल. इतकंच काय, परदेशांतहि त्यानं खळबळ माजेल. सम्राट–बादशहांचे दिवस गेले; पण आजकाल उद्योगपती हेच अनभिषिक्त राजे असतात. राजापेक्षाहि त्यांचं सामर्थ्य अधिक असतं हे तुम्हाला माहीत आहेच. अशाच एका कोट्याधीशाची भेट घेण्यात कुणालाहि धन्य-ताच वाटेल.'

'हो.' आनंदराव शांतपणे म्हणाले, 'बंदिवासात कठिण काळ कंठणा-रांना भेटणं हे माझं कर्तव्यच आहे.'

त्यांच्या बोलण्यातील खोच जाणवून राजेंद्र गंभीर झाला. काही न बोलताच त्याने उसासा टाकला.

भोवती खूप जाड भिंती असलेल्या त्या इमारतीच्या अगदी वरच्या मजल्यावर दोन दालने होती. राजेंद्रसिंह आणि आनंदराव लिफ्टमधून बाहेर पडले ते एक, आणि दुसरे पलीकडचे क्रोडोपति शिवराजांचे विश्राम-स्थान. ते लिफ्टबाहेर पडले त्याचवेळी आतील दालनातून दोन व्यक्ती बाहेर आल्या. त्यापैकी एकाला राजेंद्रसिंहाने 'काका' म्हणून अभिवादन केले. राजेंद्रसिंहाचे हे 'काका'– निर्मलकुमार तसे ठेंगण्या पण बळकट

बांध्याचे इसम होते आयुष्यातील बराचसा काळ उन्हातान्हातून घालवल्यामुळे त्यांच्या गोरेपणात तांबूस काळसरपणाची झाक आलेली होती. काही वर्षांपूर्वीच पोलिस–खात्यातून ते निवृत्त झालेले होते. आपल्या आमदानीत त्यांनी सातपुड्यातील काही भिल्ल डाकूंचा मोठ्या साहसाने कसा पाडाव केला याची आनंदरावांना माहिती होती. आपल्या बरोबरच्या माणसाची निर्मलकुमारानी आनंदरावांशी ओळख करून दिली. ते त्यांचे कायदेसल्लागार गोपालराव पंत होते.

ते चौघे त्या दालनाच्या मध्यभागीच बोलत उभे होते. आतल्या खोलीत जाण्याच्या प्रवेशद्वाराच्या बाजूला, कोपऱ्यात भिंतीला टेकून ठेवलेल्या टेबलाजवळ एक धिप्पाड माणूस बसलेला होता. तो येणाराजाणारांपैकी कुणाशीहि बोलत नव्हता की हंसत नव्हता. तो शिवराजांचा 'बॉडीगार्ड'– शरीररक्षक आहे हे सांगण्याची जरुरी नव्हती.

'मालकाबरोबर कुणी आहे आत?' राजेंद्राने त्या माणसाकडे पहात अस्वस्थपणे निर्मलकुमारांना विचारले.

'काही घाबरू नकोस बेटा.' त्याचे काका चुकचुकले, 'सेक्रेटरी विश्वास आहे आत. अन् मला वाटतं, तो आहे तोपर्यंत आपल्याला काळजीचं कारण नाही. शिवराजांवर लक्ष ठेवताठेवता त्याला बिचाऱ्याला पुरेशी झोप तरी मिळते की नाही कुणास ठाऊक! वीस शरीरसरक्षकांपेक्षा तो एकटा बरा... अन् बरं का, त्याचा चपळपणा एखाद्या भिल्लालासुद्धा लाजवील.'

'ते बाकी तुम्हालाच समजेल.' त्यांचा पुतण्या हसत म्हणाला, 'लहानपणी तुम्ही आम्हाला भिल्लांच्या किती मजेदार गोष्टी सांगितल्या असतील, पण त्या बिचाऱ्यांच्या नशीबी नेहमीच अपयश असे'

'तसंच काही नाही! ते कित्येकदा अगदी सुसज्ज पोलीस–दलावरही मात करीत असत. निर्मलकुमार म्हणाले.

'खरं?' गोपालरावांनी उत्सुकतेने विचारले. 'पण पोलिसांच्या आधुनिक दारूगोळ्याच्या शस्त्रांपुढं त्याचं काय चालणार?'

'तुम्हाला त्याची कल्पना येणार नाही. शंभर बंदुकी रोखलेल्या असतांना एका भिल्लानं किल्ल्याच्या तटावर माझ्या शेजारी उभ्या असलेल्या एका गोऱ्या अधिकाऱ्याला ठार केलं होतं.– त्या भिल्लाजवळ फक्त एक छोटीशी सुरी होती, तिच्या साह्यानं.'

'सुरीनं तटावरच्या माणसाला ठार केलं? ते कसं काय?' गोपालरावांनी प्रश्न केला.

'सुरी फेकून !' निर्मलकुमार उत्तरले, ' डोळ्याचं पातं लवतं न लवतं एवढ्यात,–बंदुकीचा चाप ओढला जाण्याच्या आत त्यानं ती सुरी नेमकी फेकली. ती युक्ति तो कुठं शिकला बेटा, कुणास ठाऊक !'

'तुम्ही नाही शिकलात ना त्याच्याजवळून ती युक्ति ?' त्याच्या पुतण्यानं हसून म्हटले

ते चौघे बोलत असतांनाच आतून शिवराज पांड्यांचा सेक्रेटरी, विश्वास बाहेर आला होता

'दहा पंधरा मिनिटात शिवराज भेटतील तुम्हाला.' एवढेच तो म्हणाला; पण तेवढ्यानेच ती गप्पा मारणारी चौकडी पांगली. 'चला, मला जायला हवं, ' असे निर्मलकुमार म्हणाले. ते आणि वकील गोपालराव पंत या दोघांबरोबर राजेंद्र पण बोलत बोलत लिफ्टमध्ये शिरला.

त्या बाहेरच्या दालनात आता आनंदराव आणि विश्वास असे दोघेच राहिले. दाराजवळच्या कोपऱ्यातील ती तिसरी व्यक्ति हिशेबात घेण्याचे काही कारणच नव्हते. आनंदरावांची नजर वरचेवर तिकडे वळतांना पाहून विश्वासने खुलासा केला–

'इथं आम्ही ठेवलेला बंदोबस्त पाहून तुम्हाला आश्चर्य वाटत असेल, पण 'वीरभद्र' ही व्यक्ति अशी आहे की, खबरदारी घ्यावी तेवढी थोडीच. म्हणूनच मालकाना एकटं ठेवीत नाही आम्ही सहसा,'

'पण आता ते एकटेच आहेत ना ?' आनंदरावांनी विचारले.

सेक्रेटरीचे निळसर डोळे आनंदरावांवर रोखलेले होते ' चोवीस तासातली फक्त पंधरा मिनिटं त्यांना खरा निवांतपणा लाभतो, अन् त्याला कारणही तसंच आहे.'

'ते काय ?'

'ते ज्योतिर्मय शिवलिंग !' विश्वास उत्तरला, ' तुम्हाला त्याचा विसर पडला असेल, पण शिवराज कधीच त्याला विसरत नाहीत, अन् त्या शिवलिंगाबद्दल बोलायचं म्हणजे त्या बाबतीत ते आम्हापैकी कुणावरच विश्वास ठेवीत नाहीत ते शिवलिंग ते त्या खोलीत कुठंतरी, कसंतरी पण पक्क्या कुलुपात ठेवतात, अन् आम्ही सर्व खोलीबाहेर आल्यावर मगच ते बाहेर काढून त्याची उपासना करतात. तेवढ्यासाठीच त्यांना पंधरा मिनिटं एकटं ठेवावं लागतं आम्हाला. तसा काही त्यात धोका नाही म्हणा. कारण हे घर म्हणजे एक पक्का सापळा केलेला आहे आम्ही. त्या वीरभद्राला आत येता यायचं नाही अन् कदाचित् तो आलाच, तर बाहेर मुळीच पडता यायचं नाही त्याला. पंधरा मिनिटं मी अगदी जीव मुठीत धरून असतो.

एखादा बार किंवा झटापटीचा आवाज येताच मी हा स्विच् दाबीन. दारो-भोवतालच्या कुंपणाच्या भिंतीत विजेचा प्रवाह सुरू करायचा स्विच् आहे हा. स्विच् दाबला की भिंतीवरून जायचा– नव्हे, तिला नुसता स्पर्श करायचा मूर्खपणा करणारा माणूस तत्काळ ठार होईल. अर्थात दार होणंही अशक्यच आहे. वर यायची ही एकच वाट आहे. शिवराज ज्या खिडकीशी बसतात ती अगदी उंच, गुळगुळीत खांबासारख्या अन् बुरुजासारख्या असलेल्या इमारतीच्या शेवटच्या टोकाला आहे. शिवाय आम्ही सर्व सशस्त्र आहोत. तो वीरभद्र आत शिरलाच तर जिवंतपणी काही बाहेर पडणार नाही.'

'छान !' आनंदराव हंसून म्हणाले, 'पण माझ्या मनात एक विचार येतो हे सारं ऐकून.'

'तो काय ?'

'या वीरभद्राला पकडायचं या एकाच कल्पनेनं तुमच्या मनाचा ताबा घेतलेला दिसतोय्. शिवराजांना वाचवण्यापेक्षा वीरभद्राला पकडणं हीच गोष्ट जास्त महत्त्वाची वाटतेय् तुम्हाला. कारण हा सारा बंदोबस्त वीरभद्राला पकडायचं हेच ध्येय मनात ठेवून आखलेला दिसतोय्. अन् ही आखणी पण तुमचीच दिसतेय्.'

आनंदरावांच्या त्या बोलण्याने विश्वास प्रारंभी दचकला, ओठ चावून त्याने क्षणभर मान खाली घातली.

'आनंदराव !' बोलण्यासाठी त्याने तोंड उघडले तेव्हा त्याचा स्वर बराच स्थिर होता. 'तुम्ही फारच धूर्त अन् चलाख आहात. पण त्यापेक्षाहि विशेष म्हणजे तुमच्यापासून काही लपवून ठेवू नये असंच कुणालाहि वाटावं असं काहीतरी तुमच्या व्यक्तिमत्वात आहे. वीरभद्राला पकडायचं मला वेड लागलेलं आहे असं सारेच म्हणतात; पण त्यांना माहीत नाही अशी एक गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहे. माझं संपूर्ण खरं नाव 'विश्वास उत्तम चक्रवर्ती' आहे.

'स्वत:ला 'वीरभद्र' म्हणवणाऱ्या त्या माणसानं माझ्या वडलांचा आणि काकांचा खून केला, माझ्या आईला भयंकर आपत्तीत टाकलं. शिवराजांना सेक्रेटरी हवा आहे असं कळलं तेव्हा मी खटपटीनं ही नोकरी मिळवली कारण हे ज्योतिर्मय शिवलिंग असेल तिथंच गुन्हेगार आज नाही उद्या प्रकट होणार अशी मला खात्री वाटते. शिवराजांची नोकरी प्रामाणिकपणानं करायची आणि वीरभद्राच्या मागावर रहायचं हे सध्या माझं ध्येय आहे.'

'समजलो मी.' आनंदराव समजुतीच्या सुरात म्हणाले, 'बरं, मला वाटतं, आता आपल्याला आत जायला हरकत नाही.'

'हो, खरंच!' आपल्या विचारांच्या तंद्रीतून जागा होऊन विश्वास उद्गारला, 'जा, आत जा तुम्ही.'

आनंदराव सरळ आत गेले. आतून परस्पर अभिवादनाचे शब्द ऐकू आले नाहीत. काही क्षणांनी आनंदराव परत दारात आले.

त्याच क्षणी दाराजवळ बसलेला तो रक्षक, एखाद्या दगडी पुतळ्यात जीव यावा त्याप्रमाणे उठून उभा राहिला. आनंदरावांच्या चर्येवरील आविर्भावच काही विचित्र होता.

'तो स्विच् दाबायला हरकत नाही, विश्वासराव!' ते उसासा टाकून म्हणाले.

'अं?' विश्वासने नवलाने विचारले. झोपेतून खडबडून जाग आल्याप्रमाणे त्याने मान हालवली. तो पुढे धावला. ते दोघे बरोबरच आत शिरले. आतल्या दालनात फर्निचर मोजके, पण श्रेष्ठ प्रतीचे आणि आल्हादक होते. पलीकडच्या बाजूची खिडकी उघडी होती. खिडकीला लागूनच एक खुर्ची आणि टेबल होते.

त्या छोट्या टेबलावर ज्योतिर्मय शिवलिंग ठेवलेले होते. त्या शिवलिंगाला 'ज्योतिर्मय शिवलिंग' नाव का मिळाले हे एका दृष्टिक्षेपातच लक्षात येण्यासारखे होते. सुवर्णाच्या कोंदणात बसवलेल्या मोठमोठ्या हिऱ्यांनीच शिवलिंगाची आकृति तयार केलेली होती. त्या हिऱ्यांचे तेज इतके अपूर्व होते की, त्या लिंगातून जणू प्रकाशज्योतीच बाहेर पडत आहेत असा भास व्हावा. कुणीही पहात रहावे असेच ते शिवलिंग होते. पण शिवराज त्याकडे पहात नव्हते. खुर्चीच्या पाठीवरून त्यांची मान मागे झोकलेली होती, हनुवटी वर उचलेली होती आणि मोठ्या घेऱ्याच्या मध्यमागी असलेली शेंडी खाली लोंबत होती. मागील टोकाला लाल पिसे असलेला करड्या रंगाचा बाण त्यांच्या मानेत घुसलेला होता.

'मुळीच आवाज न होणारा बार!' आनंदराव खालच्या स्वरात पुटपुटले, 'पिस्तुलाच्या बाराचा आवाज होऊ नये म्हणून त्याला 'सायलेन्सर' बसवतात, त्या नव्या शोधाबद्दल मी विचार करीत होतो. पण हा शोध अतिप्राचीन काळातला आहे.'

मग क्षणभराने ते म्हणाले, 'मला वाटतं, ते गतप्राण झालेले आहेत. काय करणार आता तुम्ही?'

'आधी तो स्विच् दाबणार.' विश्वास उद्गारला, 'आणि तेवढ्यानं

जर वीरभद्र रोखला नाही, तर त्याच्या किंवा माझ्या कुणाच्या तरी एकाच्या आयुष्याचा शेवट होईपर्यंत मी त्याचा पिच्छा पुरवणार.'

'आपल्या दोस्तांपैकी कुणाचा बळी पडायचा नाही तर.' आनंदराव म्हणाले, 'ते अजून फार लांब गेलेले नसतील.'

'त्या साऱ्यांना भिंतीची माहिती आहे.' विश्वास उत्तरला, 'फारच घाई असल्याशिवाय त्यांच्यापैकी कुणीही भिंतीला स्पर्श करणार नाही.'

बाण पलीकडच्या खिडकीतून आल्यासारखा दिसत होता. आनंदराव तिकडे वळले. त्यांनी खिडकीतून बाहेर नजर टाकली. खूप उंचावर होती ती खिडकी. भुईसपाट असलेले फुलझाडांचे वाफे, बागेभोवतालची ती भिंत आणि भिंतीपलीकडील सपाट जमीन, हे सारे अत्यंत सुबकपणे रंगवलेल्या एखाद्या निसर्ग–चित्रासारखे दिसत होते. ती इमारत आकाशात इतकी उंचावर पोचलेली होती की, आनंदरावांना एक वाक्प्रयोग आठवला–

'आकाशीची कुऱ्हाड !' ते उद्गारले, 'खालचं सारं किती खोल, किती दूर दिसतंय पहा ! जमिनीवरून मारलेला बाण इथवर येईल तरी कसा ?'

तो स्विच् दाबून विश्वास परत आला होता. परंतु काही न बोलता तो गप्पच राहिला.

'इतक्या उंचावर असतांना विमानोड्डाणाची आठवण येणं साहजिक आहे.' आनंदराव म्हणाले, 'आपण राजेंद्रसिंहांना विचारू या–विमान-विद्येबद्दल.'

'या भागात विमानं हवी तेवढी फिरतात. पलीकडेच विमानतळ आहे.' विश्वास उत्तरला.

'या भानगडीत अतिप्राचीन आणि अतिआधुनिक या दोन्ही साधनांची संभवनीयता दिसते.' आनंदरावांनी मत व्यक्त केले, 'त्यातील काहींशी राजेंद्रसिंहाचे चुलते चांगले परिचित असतील. बाणासंबंधी आपण त्यांनाच विचारायला हवं. भिल्ल वापरतात तसल्यापैकीच हा बाण दिसतो. भिल्लानं तो कसा अन् कुठून मारला, कोण जाणे ! मघा निर्मलकुमारांनी एका भिल्लाची गोष्ट सांगितली ती तुम्ही ऐकलीच असेल. तीत काहीतरी तात्पर्य आहेत.'

'कसलं तात्पर्य ?' विश्वास म्हणाला, 'असेल तर ते एवढंच की, आपल्याला वाटतं त्यापेक्षा फार लांबवर भिल्ल एखादी वस्तू फेकू शकतात.'

'नाही. त्याचं तात्पर्य तुम्हाला बरोबर समजलेलं नाही. आनंदराव म्हणाले.

० ० ●

दुसऱ्या दिवशी आनंदराव रत्नपूरच्या दोनतीन लाखांच्या लोकवस्तीत मिसळून आपल्या कामात गर्क झाले तरी, शिवराज पांड्यांच्या खुनाची भानगड ते विसरले नव्हते. जाबजवाब आणि साक्षी यापलीकडे स्थानिक पोलिसांनी त्यांचे काही साहाय्य मागितले नाही. परंतु आनंदरावांनी स्वतःच त्यात लक्ष घालायचे ठरवले. त्या प्रकरणांत न्याय डावलला जाऊ नये अशी त्यांची इच्छा होती.

पंधरा दिवस ते आपल्या कामात गर्क होते. एक दिवशी संध्याकाळी तिथल्या एका बागेत फिरत असता त्यांना निर्मलकुमार भेटले. ते एका बाकावर हवा खात बसलेले होते. आनंदरावांनी त्यांना भिल्लांच्या धनुर्विद्येबद्दल विचारले, तेव्हा ते हुरूपाने बोलू लागले.

'हो!' ते म्हणाले, 'आपली प्राचीन भारतीय धनुर्विद्या भिल्ल जमातीत अजूनहि टिकून आहे. या भागात भिल्ल नाहीत; पण एखादा असता तर शिवराज पांड्यांच्या इमारतीभोवतीच्या भिंतीपलीकडून त्या उंच खिडकीतील व्यक्तीला नेमका बाण मारणं काही त्याला अशक्य नव्हतं. पूर्वी मी त्यांच्या धनुर्विद्येचे अचाट प्रयोग पाहिलेले आहेत.'

'केवळ पाहूनच थांबला नसाल तुम्ही;' आनंदराव म्हणाले, 'ते आत्मसात् करून स्वतःहि करून दाखवले असतील.'

निर्मलकुमार हंसले आणि मग म्हणाले, 'तो जुना इतिहास झाला आता.'

'काही लोकांना जुन्या इतिहासाचा अभ्यास करायचा छंद असतो.' आनंदराव म्हणाले, 'या प्रकरणात तुमच्याबद्दल लोकांना काही वेडंवाकडं बोलता येईल अशी काही कारणं—हेतू शोधून सापडणार नाहीत ना?'

'तुमच्या बोलण्याचा अर्थ काय?' एकदम चमकून निर्मलकुमार ओरडले. त्यांच्या भुवया आकुंचित होऊन डोळे वटारले गेले.

'आता तुम्ही त्या भिल्ल जमातीत वावरलात, त्यांच्यावर मात केलीत म्हणून—'

निर्मलकुमार ताडकन् उठून उभे राहिले. त्यांनी हातातील काठी आवेगाने सरसावली.

'काय?' निर्मलकुमार किंचाळल्यागत ओरडले, 'मी माझ्या व्यवसायबंधूचा खून केला असा आरोप करता आहात तुम्ही—माझ्यासमोर उभे राहून?'

त्यांच्या ओरडण्यामुळे भोवतालची बरीच मंडळी जमा झाली. दुरून एक पोलिसहि लांबलांब टांगा टाकीत येऊ लागला. म्हातारा हातातील

काठी, समोर शांतपणे उभ्या असलेल्या व्यक्तीच्या टाळक्यात हाणणार असे तिथे जमलेल्यांना वाटू लागले.

'मी त्याबद्दल काही आडाखे बांधलेले आहेत.' आनंदराव शांतपणे म्हणाले, 'पण माझा शोध पुरा होईपर्यंत त्या बाबतीत मी काही बोलणार नाही.'

जवळ आलेल्या पोलिसांच्या चाहुलीमुळे म्हणा किंवा आनंदरावांच्या शांत नजरेने वचकून म्हणा, निर्मलकुमारांनी हातातील काठी मुकाटयाने बगलेत मारली. आनंदरावांनी त्यांना रामराम केला आणि कॅप्टन राजेंद्रसिंह हा संध्याकाळी हटकून ज्या एका हॉटेलांत सांपडत असे, तिकडे आपला मोर्चा वळवला.

शिवराज पांड्यांचा खून झाला त्या इमारतीच्या आसमंतांत विमाने वगैरे फिरतात का, याबद्दल त्यांना राजेंद्रसिंहाजवळ चौकशी करायची होती.

'आपण तिथं होतो तेवढ्या मुदतीत तुम्हाला एकही विमान दिसलं नाही म्हणता ?' राजेंद्राने नवलाने विचारले, 'आश्चर्यच आहे ! रमरौली विमानतळ तिथून अगदी जवळ आहे.'

'म्हणजे त्या निवासस्थानाजवळून एखादं विमान एखाद्या वेळी गेलं तर ते विशेषसं लक्षात यायचं नाही कुणाच्या. असंच ना ?' आनंदरावांनी विचारले.

'हो.' तो तरुण वैमानिक उत्तरला.

'समजा,' आनंदराव पुढे म्हणाले, 'एखादा माणूस माहितीतला असला अन् त्यानं एखादं विमान त्या विमानतळावरून नेलं तर ते पण लक्षात यायचं नाही. नाही का ? आता तुमचंच उदाहरण घेऊ. तुमचं स्वतःचं विमान कदाचित् कुणी ओळखीलही. पण ओळखीच्या एखाद्या माणसाचं निराळं विमान घेऊन तुम्ही तिथं जवळून गेलात तर कुणाला उमजणार नाही'

'अर्थात् नाहीच.' राजेंद्र अगदी सहजपणे उत्तरला आणि मग एकदम थबकला. त्याचे डोळे विस्फारले.

'बाप रे !' तो तोंडातल्या तोंडात पुटपुटला, 'बाप रे !'

मग तो तावातावाने खुर्चीवरून उठून उभा राहिला; आणि आनंदरावांकडे रागाने बघू लागला.

'तुमचं डोकं फिरलं आहे का ?' तो म्हणाला, 'वेड लागलं आहे का तुम्हाला ?'

तो किंचित्– क्षणभर गप्प राहिला आणि मग ओठ चावून उद्गारला ' तुम्ही इथं आत्ता असं सुचवायला आला आहात का, की–'

' नाही, सुचवायला नव्हे; सूचना गोळा करायला आलो आहे मी.' आनंदराव उठून म्हणाले, ' तसे काही अंदाज बांधले आहेत मी; पण ते आत्ताच जाहीर करण्यात अर्थ नाही.'

रात्री नऊच्या सुमाराला आनंदरावांना आणखी एक व्यक्ति भेटली. हरदीप मेहेरा त्याच जाडजाड चौकटीच्या चष्म्याआडून जगाकडे पहात होता. पण तेवढा तो चष्म्याचा अपवाद वगळला तर त्याचे बाकीचे स्वरूप पार पालटलेले होते. कडक इस्त्रीचा कोट, वुलनची पॅंट यांची जागा साध्या बिनइस्त्रीच्या पांढऱ्या शर्टानं आणि तसल्याच पायजम्याने घेतली होती. पायात बट तेच होते; पण त्यांची चकाकी गेलेली होती. आनंदराव त्याच्या मागोमाग एका भिकार हॉटेलात शिरले. तिथल्या कळकट खुर्चीवर बसताना त्यांना मुळीच संकोच वाटला नाही.

' अच्छा !' हरदीपने त्यांचे अभिवादन स्वीकारून म्हटले, ' मग काय त्या धर्मनिष्ठ क्रोडोपतीच्या खुनाचा बदला घेतलात की नाही अजून? ही श्रीमंत धेंडं नेहमीच धर्माचे अवतार असतात. असा एखादा कुणी मेला म्हणजे दुसऱ्या दिवशी त्याच्या उदारपणाबद्दल, दानधर्माबद्दल रकानेच्या रकाने भरतात वर्तमानपत्र. काही असो, शेवटी या प्राण्याला तरी इहलोकीच प्रायश्चित्त मिळालं हे बरं झालं. बाण अगदी रामबाण ठरला !'

' पण तो बाण काही तसा स्वर्गलोकांतला नव्हता.' आनंदराव हळूच म्हणाले.

' काही असो. तुमच्या हिशेबी ते एक हुतात्मे बनले असतील.' हरदीप तुच्छतेने म्हणाला, ' बाणानं खून, लक्षाधीश माणूस, –मग तो हुतात्मा होणारच !... त्याला ते योग्यच प्रायश्चित्त मिळालं असं कबूल का करीत नाही ? तुम्हाला या धनिकांबद्दल नीट माहिती नसते. मी सांगतो तुम्हाला या बेट्यांना शंभरदां असं मारलं तरी ती शिक्षा अपुरीच ठरेल !'

' असं ?' आनंदरावांनी हळूच विचारले, ' मग तुम्ही त्यांना ठार का केलं नाहीत ?'

' मी खून केला नाही हे जाणून घ्यायचं आहे तुम्हाला ?' हरदीप आनंदरावांकडे आश्चर्याने पहात म्हणाला, ' छान ! अगदी लायक आहात गुप्त पोलिस व्हायला !'

' कसचं–कसचं !' आनंदराव पुटपुटले

' हां !' हरदीप चुटकी वाजवून म्हणाला, ' हे मीच केलं असं सुच-

वायची ही तऱ्हा असेल तुमची ! ठीक आहे. करा शाबीत तसं. बाकी मी एवढं अगदी न भिता म्हणेन की, त्यांच्या मृत्यूनं कोणतीही हानि झालेली नाही.'

'हो, झालेली आहे.' आनंदराव जोराने म्हणाले, 'इतरांचं काही असो, पण तुमची मोठीच हानि झालेली आहे. म्हणूनच तुम्ही त्यांच्या खुनाचं 'पुण्यकृत्य' आधीच उरकलं नाहीत.'

—आणि त्या चष्मेवाल्याला तसेच आश्चर्यमग्नावस्थेत ठेवून आनंदराव तिथून बाहेर पडले.

० ० ०

त्यानंतर जवळजवळ महिनाभराने आनंदरावांनी शिवराज पांड्यांचा खून झालेल्या त्या जागेला भेट दिली. त्या बाबतीत विशेष औत्सुक्य आणि संबंध असणारांची एक बैठकच भरली होती तिथे. एका लांबरुंद टेबलाच्या मध्यभागी म्हातारे निर्मलकुमार बसलेले होते. त्यांच्या उजव्या हाताला त्यांचा पुतण्या राजेंद्रसिंह आणि डाव्या हाताला कायदेपंडित गोपालराव पंत बसलेले होते. केवळ एक साक्षीदार म्हणून शिवराजांचा तो धिप्पाड शरीररक्षकही तिथे उपस्थित होता. धारदार नाकाचा आणि तीक्ष्ण नजरेचा जगदीश नावाचा एक गुप्त पोलिस समोरच्या बाजला बसलेला होता. त्याच्या शेजारच्या रिकाम्या खुर्चीवर आनंदराव हळूच जाऊन बसले.

शिवराज पांड्यांच्या मृत्यूमुळे उद्योगव्यवसायाच्या झालेल्या हानीची वर्णने अनेक वृत्तपत्रातून फडकली होती. पण त्यांच्या मृत्यूच्या वेळी त्यांच्याजवळ असणारांकडून मृत्यूचे रहस्य उलगडेल अशी काहीच माहिती मिळालेली नव्हती. धोक्याचा इषारा वाजला तेव्हा राजेंद्रसिंह, निर्मलकुमार आणि त्यांच्याबरोबरचे वकील गोपालराव पंत हे तिघेही कंपौंडाच्या भिंतीबाहेर पडून थोड्या अंतरावर पोहोचलेले होते. पहाऱ्यावरील सर्व माणसांनी या गोष्टीला दुजोराच दिला होता. नाही म्हणायला एकाच गोष्टीचा नीट उलगडा झालेला नव्हता. खून झाला त्या सुमाराला एक माणूस शिवराजांना भेटण्यासाठी म्हणून बाहेरच्या प्रवेशद्वाराशी घुटमळत होता. .

राजेंद्र किंचित् पुढे झुकला. त्याचे डोळे लुकलुकत होते. तो म्हणाला,

'तो कोण असेल याची कल्पना आहे मला—हरदीप मेहेरा.'

'हा हरदीप मेहेरा कोण आहे बुवा ?' राजेंद्राच्या चुलत्याने—निर्मलकुमारांनी विचारले.

'तो एक अजब मनुष्य आहे.' पुतण्या उत्तरला.

'म्हणजे गुन्हेगार ?' निर्मलकुमार उद्गारले.

'गुन्हेगार आहेच; पण स्पष्ट शब्दात सांगायचं म्हणजे हा खून न करणारा गुन्हेगार आहे तो.' आनंदराव शांतपणे उत्तरले.

'स्पष्ट शब्दांची व्याख्या तरी काय आहे तुमची ?' गोपालरावांनी नम्रपणे विचारले.

'माझ्या म्हणण्याचा अर्थ एवढाच की, हरदीपनं गुन्हा केलेला, म्हणजे हा गुन्हा केलेला नाही.' आनंदरावांनी स्पष्टीकरण केले, 'कसला तरी धाक दाखवून पैसे उकळायचा गुन्हा तो करीत असे. अन् त्यासाठीच तो आला होता त्या वेळी. ज्या गुपिताच्या आधारावर धाक दाखवून तो पैसे उकळायचा ते गुपित जगजाहीर व्हावं किंवा मृत्यूनं फुकट जावं अशी त्याला इच्छा नव्हती. त्याबद्दल आपण मागून बोलू. त्याचा प्रश्न सत्याच्या आड येऊ नये एवढ्यापुरताच हा खुलासा आहे.'

'सत्याच्या आड ?' गोपालरावांनी विचारले, 'म्हणजे सत्य तुम्हाला माहीत आहे असा तुमचा दावा आहे की काय ?'

'मला वाटतं तसं.' आनंदराव शांतपणे म्हणाले.

त्यांच्या त्या उद्गारांनी सर्वजण काही क्षण गोंधळून गप्प राहिले. मग निर्मलकुमार एकदम ओरडले,—

'आँ ? तो सेक्रेटरी कुठंय् ? विश्वास ! करतो आहे काय तो इथं हजर रहायचं सोडून ?'

'मला माहीत आहे ते.' आनंदराव गंभीरपणाने म्हणाले, 'खरं म्हणजे जरा वेळानं फोन करायला सांगितलेलं आहे मी त्यांना. त्यानी आणि मी मिळूनच हे रहस्य उलगडलं असं म्हणायला हरकत नाही.'

'तुम्ही दोघे परस्परसहकार्यानं काम करीत असाल तर बरंच आहे.' निर्मलकुमार कुरकुरले, 'कारण तो माणूस एखाद्या शिकारी कुत्र्यासारखा त्या अज्ञात 'वीर भद्रा'च्या तपासात होता. पण—पण यातील सत्य तुम्हाला कसं कळलं ?

'ते तुमच्याकडूनच कळलं मला !' रागाने फणफणणाऱ्या निर्मलकुमारांकडे शांत नजरेने पहात आनंदराव म्हणाले, 'उंच तटावर उभ्या असलेल्या एका अधिकाऱ्याला एका भिल्लानं कसं मारलं याची तुम्ही हकीकत सांगितलीत ना, तिच्यावरून ताडलं मी यातलं रहस्य.'

'ते तुम्ही अनेकवार सांगितलयत आतापर्यंत.' निर्मलकुमार आश्चर्यानं उद्गारले, 'पण खुनीनं किल्ल्यासारख्याच बंदिस्त जागेत उंचावर असलेल्या माणसाला बाण मारून ठार केलं एवढंच त्या दोन घटनात साम्य दिसतंय् मला. पण अर्थात् हा बाण काही फेकला गेलेला नाही; तो मारला

गेला आहे. बाण खूपच लांब अंतरावरून मारावा लागला असणार हे मान्य आहे मला. पण त्यानं रहस्य कसं उलगडतं, कळत नाही मला ?'

'त्या गोष्टीतला मुख्य मुद्दा तुमच्या लक्षात आलेला नाही.' आनंदराव म्हणाले, 'एक वस्तु इतक्या लांब गेली तर दुसरी तितकीच किंवा त्यापेक्षाहि जास्त लांब जाऊ शकेल, हा एकच मुद्दा घेऊन बसू नका. एखाद्या वस्तूचा रूढ कल्पनेपेक्षा निराळ्या पद्धतीनं उपयोग करता येतो हे त्यातलं तात्पर्य आहे. सुरी हे हत्यार फक्त समोरासमोर, जवळून झटापट करताना वापरायचं हत्यार आहे अशी त्या किल्ल्यावरच्या लोकांची समजून होती. उलट एखादं विशिष्ट हत्यार लांबून मारूनच उपयोगात आणता येतं असा समज करून घेऊन तुम्ही गप्प बसलात. बाणाचा उपयोग भाल्याप्रमाणं जवळूनही होईल हे कुणाला सुचलं नाही. थोडक्यात सांगायचं म्हणजे, सुरीचा बाण करता येतो, तर बाणाचीही सुरी करता येणं शक्य आहे, हे या गोष्टीचं तात्पय आहे.'

आता सर्व मंडळी आनंदरावांकडे औत्सुक्याने पहात होती. पण ते आपल्याच तंद्रीत पुढे बोलत राहिले,–

'साहजिकच तो बाण खिडकीतून कसा आला, फार दूरवरून तो कसा मारला गेला, कुणी मारला, इत्यादि गोष्टींचा आपण विचार करीत बसलो. पण सत्य गोष्ट अशी आहे की, बाण धनुष्याला लावून मारला गेलेलाच नाही खिडकीतून आलाच नाही मुळी तो.'

'मग तो आला तरी कसा तिथं ?' कायदेपंडितानं मान किंचित खाली झुकवून विचारले.

'कुणीतरी बरोबर आणला असावा.' आनंदराव म्हणाले, 'फूट–दीड फूट लांबीचा बाण लपवून नेणं कठीण नाही फारसं. शिवराज पांड्यांबरोबर बोलत असतांना कुणीतरी तो आपल्या कोटाच्या बाहीत लपवून ठेवला असेल. तो बाण त्यानं खंजीरासारखा त्याच्या मानेत खुपसला; आणि मग तो पक्ष्याप्रमाणे खिडकीतून येऊन लागला असावा असाच कुणाचाही समज व्हावा अशा प्रकारे एकंदर मांडणी केली त्यानं.'

'त्यानं–कुणीतरी !' निर्मलकुमार जड स्वराने म्हणाले.

• ० ०

बाहेरच्या दालनातील टेलिफोनची घंटा जोरात खणखणली. दुसऱ्या कुणी उठण्यासाठी हालचाल करण्यापूर्वीच आनंदराव उठून बाहेर धावले.

'काय भानगड आहे ही सारी ?' गोंधळून गेलेला राजेंद्र ओरडला.

'जरा वेळानं विश्वास फोन करणार आहे असं म्हणाले होते ते.' त्याच जड आवाजात निर्मलकुमार पुटपुटले,

'विश्वासचाच फोन असेल तो.' गोपालराव पुटपुटले. फोन कुणाचा आहे, याचे औत्सुक्य साऱ्यानाच होते; पण उठून पहावे असे मात्र कुणालाच वाटले नाही. अल्पावधीतच आनंदराव परत आंत आले.

'सद्गृहस्थ हो.' आपल्या जागी बसल्यावर आनंदराव म्हणाले, 'या कोडयातील सत्य शोधून काढायची सूचना तुम्हीच मला केलीत, आणि ते सापडल्यावर आता तुम्हाला ते सांगणं माझं कर्तव्य आहे. माफ करा, पण अशा प्रकरणात एकदा नाक खुपसलं म्हणजे मग कुणाच्या प्रतिष्ठेला धक्का लागेल म्हणून डगमगता येत नाही.'

'समजलो.' आनंदरावांच्या त्या विधानानंतर पसरलेल्या शांततेचा भंग करीत निर्मलकुमार म्हणाले, 'आमच्यापैकीच कुणी तरी संशयित आरोपी आहे असा याचा अर्थ आहे.'

'संशयित आपण सारेच आहोत.' आनंदराव म्हणाले, 'प्रेत आधी मी पाहिलं, तेव्हा माझ्याबद्दलही संशय घेणं रास्तच ठरेल.'

'अर्थात् आपणा साऱ्यावरच संशय आहे.' राजेंद्र गुरगुरला, 'विमानातून या किल्ल्याचा भेद करणं मला कसं शक्य आहे हे तुम्ही त्या दिवशी दाखवून दिलंतच मला.'

'नाही.' आनंदराव हंसून उत्तरले, 'ती गोष्ट आपल्याला कशी करता आली असती हे तुम्ही मला सांगितलंत. हीच गंमत आहे यात.'

'मीच भिल्लाच्या धनुष्यबाणाचा उपयोग केला असावा असं पण त्यांनी सुचवलं.' निर्मलकुमार पुटपुटले.

'छे. छे: ! ते कसं अशक्य आहे हें मी सांगत होतो.' आनंदरावांच्या चर्येवर दिलगिरी दिसत होती. 'माझं बोलणं गैरसमज होण्यासारखं होतं याबद्दल मी क्षमा मागतो, पण यातील सत्य स्थिति धसाला लावायचा दुसरा काही उपायच मला सुचेना. कॅप्टन राजेंद्रसिंहजी विमानात बसून या किल्ल्याला फेऱ्या मारीत असावेत ही कल्पना अशक्य कोटीतली होती. त्याचप्रमाणं उभी हयात प्रामाणिकपणं घालवलेल्या निर्मलकुमारांनी धनुष्यबाणाचा उपयोग केला असेल अशी समजूत करून घेणं म्हणजेहि मूर्खपणाच होता. कारण यापेक्षा अत्यंत सोप्या अशा अनेक मार्गांनी त्यांना हे कृत्य अमदी सहज पार पाडता आलं असतं. पण त्यांचा यात काही संबंध आहे की काय हे मला जाणून घ्यायचं होतं. त्यांचा निर्दोषीपणा सिद्ध करण्यासाठीच मला त्यांच्यावर आरोप करावा लागला.'

'अन् त्यांचा निर्दोषीपणा कसा सिद्ध केलात तुम्ही ?' गोपालरावांनी किंचित् पुढे झुकून विचारले.

'त्यांच्यावर आरोप केला जाताच त्यांना जो त्वेष आला त्यावरून. खरा गुन्हेगारहि असं सोंग करतो; पण त्वेषाचं सोंग आणि खरा त्वेष ओळखायला शिकलो आहे मी आता.'

'तुमचं बोलणं अजूनहि उमजत नाही मला.'

'माफ करा.' आनंदराव निर्मलकुमारांकडे पहात म्हणाले, 'तुम्हा दोघांचा आणि सर्वांचाच संशय घेणं हे माझं कर्तव्य वाटलं मला. राजेंद्र नि निर्मलकुमार या दोघांनाहि हा खून करता येण्यासारखा असल्यानं त्यांचा संशय घेणं रास्तच होतं. मी काही अंदाज बांधलेले आहेत असं त्यावेळी मी म्हणालो होतो. ते अंदाज काय होते हे आता सांगतो. बेसावधपणातून ते एकदम सावध होऊन ज्या क्षणी आणि ज्या रीतीनं चिडले त्यावरून ते निर्दोषी आहेत हे मी नक्की ओळखलं. आपल्यावर आरोप असावा असं त्यांना वाटत नव्हतं तोपर्यंत ते तशा आरोपाला अनुकूल ठरेल अशी माहिती पुरवीत होते; आपल्याला तो गुन्हा करणं कसं शक्य होतं हेच त्यानी मला समजावून दिलं. मग आपल्यावर आरोप केला जात आहे हे एकदम त्यांच्या ध्यानी आलं, त्याबरोबर ते भडकले. आपल्यावर आरोप येण्याची शक्यता आहे याची जाणीव त्यांना वस्तुत: व्हायला हवी होती, त्यानंतर कितीतरी वेळानं, पण मी प्रत्यक्ष आरोप करण्याआधीच ती झाली. खरा गुन्हेगार असं करणं अशक्य आहे. खरा गुन्हेगार अगदी प्रारंभापासूनच साशंक, सावध राहील, किंवा अगदी शेवटपर्यंत बेसावधपणाचं सोंग करील. आपल्यालाच प्रतिकूल ठरेल असं काहीतरी बोलून मध्येच एकदम भडकणार नाही तो. म्हणूनच मी तुम्हा दोघांना संशयितांच्या यादीतून वगळलं. त्याला आणखीहि काही कारण होती; त्यांचा विचार आत्ताच नको. उदाहरणार्थ, हा सेक्रेटरी—विश्वास.

'पण त्याबद्दल इतक्यात बोलणार नाही मी. आत्ताच मला विश्वासचा फोन आला होता. काही विशेष गंभीर बातमी तुम्हाला सांगायची त्यानं मला परवानगी दिली आहे. आता हा विश्वास कोण अन् त्याचं ध्येय काय होतं हे तुम्हाला एव्हांना माहीत झालेलं असेल असं समजतो मी.'

'वीरभद्राचा पत्ता लावण्यासाठी त्याची सारी धडपड होती असं समजलं आहे मला.' राजेंद्रसिंह उत्तरला, 'आणि तो उत्तम चक्रवर्तींचा मुलगा आहे; आपल्या पित्याच्या मृत्यूचा सूड त्याला उगवायचा आहे असंही

एकलंय मी. काही असो, 'वीरभद्र' नाव धारण करणाऱ्या व्यक्तीच्या शोधात तो आहे एवढं खरं.'

'हो.' आनंदराव म्हणाले, 'त्यानं 'वीरभद्रा'चा पत्ता लावलेला आहे.'

कॅप्टन राजेंद्र उठून उभा राहिला.

'तोच खुनी !' तो म्हणाला, 'त्या खुनीला कैद केलंत ना ?'

'नाही.' आनंदराव मान हालवून म्हणाले, 'बातमी गंभीर आहे असं मी म्हटलं, आणि ती त्याहूनही गंभीर आहे. विश्वासनं स्वतःवर फार मोठी जबाबदारी घेतलेली आहे अन् मला भीति वाटते,— त्यानं आपणा सर्वांवरही फार मोठी जबाबदारी टाकलेली आहे. त्यानं गुन्हेगाराचा पिच्छा पुरवला आणि शेवटी त्याला गाठल्यावर त्यानं कायदा आपल्या हाती घेतला.'

म्हणजे काय ? काय सांगता आहात तुम्ही ? हा वीरभद्र—'

'हो. मी सांगतो आहे की, 'वीरभद्र' मेला !' आनंदराव म्हणाले 'दोघात त्वेषाची झटापट झाली आणि विश्वासनं त्याला ठार मारलं.'

'छान झालं ! अगदी योग्य तेच केलं त्यानं.' निर्मलकुमार गरजले.

'त्या भयंकर माणसाचा निकाल लावल्याबद्दल विश्वासला कुणीही दोष देणार नाही.' राजेंद्राने दुजोरा दिला. 'विशेषतः त्या वीरभद्रानं जो दरारा निर्माण केलेला होता तो विचारात घेता तर हे फारच चांगलं झाल असंच म्हणावं लागतं.'

'हे तुमचं मत मला मान्य नाही.' आनंदराव म्हणाले, 'रक्ताचा बदला रक्तानं घ्यावा हे तत्त्वज्ञान काव्यात शोभेल एक वेळ; पण कायद्याच्या चौकटीत ते बसत नाही. कायदा आणि व्यक्तिस्वातंत्र्य आपण घालवून बसलो तर त्याबद्दल आपल्याला पश्चात्ताप करावा लागेल. विशेषतः वीरभद्रानं जे गुन्हे केले त्याबद्दल त्याचं म्हणणं काय आहे तेही ऐकून घ्यायला विश्वास थांबला नाही हे मला जास्त आक्षेपार्ह वाटतं. वीरभद्र हा एक सामान्य गुन्हेगार असेल की काय याबद्दल मला शंका आहे. कदाचित् ज्योतिर्मय शिवलिंगाच्या ध्यासामुळच केवळ त्यानं ते गुन्हे केले असतील. जगदीश चोप्रा आणि उत्तम चक्रवर्ती या दोघांनाही मृतावस्थेत त्यांच्या घराबाहेर फेकून दिलेलं आढळलं. वीरभद्रानं त्या शिवलिंगाची मागणी केली असेल अन् ती मागणी सरळपणं मान्य होणं अशक्य आहे असं दिसल्यावर नाईलाजानं त्याला खून करावे लागले असतील. विश्वासच्या मार्गाबद्दल आक्षेप घेण्याचं कारण हेच की, या प्रकरणांत वीरभद्राची बाजू आपल्याला आता कधीच ऐकता येणार नाही.'

हूं ! नालायक, खुनी व्यक्तीला उगीचच नसता मोठेपणा द्यायचा,

हा भावनाप्रधान प्रकार मला मुळीच मान्य नाही.' राजेन्द्र जोराने म्हणाला, 'विश्वासनं गुन्हेगाराला ठार केलं असेल तर ते एक चांगलंच कृत्य केलं त्यानं. त्याबद्दल खंत बाळगण्याची मुळीच जरुरी नाही '

'अगदी बरोबर आहे !' त्याच्या चुलत्याने–निर्मलकुमारांनी मान डोलावली. आनंदरावांनी गंभीरपणाने सभोवती बसलेल्यांच्या चर्यांवरून नजर फिरवली आणि त्यांनी विचारले, 'तुमचं सर्वांचं मत असंच आहे ?'

'ठीक आहे.' त्यांनी उसासा टाकला, 'या दुर्दैवी माणसानं केलेल्या गुन्ह्याबद्दल किंवा व्यक्तिशः न्यायाची अंमलबजावणी केल्याबद्दल म्हणा हवं तर, तुम्ही सर्वांनी त्याला क्षमा केलीत असं मी समजतो. तसं असेल तर त्याच्याबद्दल आणखी काही माहिती सांगता येईल मला.'

ते एकदम उठून उभे राहिले. त्यांच्या त्या हालचालीत इतरांना काही विशेष अर्थ दिसला नाही तरी, त्यामुळ तेथील वातावरण एकदम बदलल्या-सारखे झाले.

'विश्वासनं वीरभद्राचा खून जरा विचित्र पद्धतीन केला.'

'कसा काय ?' निर्मलकुमारांनी विचारले.

'बाणानं.' आनंदराव उत्तरले.

खोलीतला प्रकाश हळूहळू बदलला होता. सूर्यप्रकाशाची जागा संध्या-प्रकाशाने घेतलेली होती. शिवराजांना मृत्यु आला त्या जागेच्या खिडकीतून तो प्रकाश आत येत होता. सर्वांच्या नजरा तिकडे वळल्या. निर्मलकुमारांचा तीव्र स्वर खोलीत निनादला,–

'म्हणता काय तुम्ही ? म्हणता काय ? शिवराज पांड्यांचा खून बाणानंच झाला आणि या बदमाषाचा खूनहि बाणानंच–'

'त्याच बाणानं !' आनंदराव म्हणाले, 'आणि त्याच क्षणी.'

पुन्हा एकदा सारे गप्प बसले. राजेंद्रसिंहाने तोंड उघडायचा प्रयत्न केला, 'म्हणजे –'

'म्हणजे तुमचे स्नेही शिवराज पांडे हेच 'वीरभद्र' होते.' आनंदराव जोराने म्हणाले, 'वीरभद्र या नावाची दुसरी कुणी व्यक्ति तुम्हाला आढळ-णार नाही. शिवराज पांड्यांची ज्योतिर्मय शिवलिंगावर भलतीच भक्ति-श्रद्धा होती. ते रोज त्याची उपासना करीत असत. ते मिळवण्यासाठी तरुण-पणी त्यांनी दोन खून केले; पण ते खून म्हणजे चोरीच्या प्रयत्नात घडलेले अपघात असावेत असं अजूनही वाटतं मला. काही असो, त्यांनी ते मिळवलं. हरदीप मेहेराला हे माहीत होतं आणि त्या गुपिताचा स्फोट करायचा धाक दाखवून तो पांड्यांकडून पैसे उकळीत असे. शिवराजांच्या खुनानंतर ती

प्राप्ति बंद होऊन त्याची अवस्था केविलवाणी झाली. कारण ही मिळकत कायमची आहे अशी खात्री असल्यामुळं त्यानं पैशाची कधी कदर केली नाही. पण विश्वास त्यांच्यामागं लागला तो अगदी निराळ्या हेतूनं. तो सेक्रेटरी म्हणून या घरात आल्यावरच त्याला सत्य उमगलं असावं. ते काही असो, पाठलागाचा शेवट इथं, या खोलीतच झाला आणि आपल्या वडलांची हत्या करणाराची हत्या विश्वासनं इथंच केली.'

बराच वेळ कुणीच काही बोलले नाही. निर्मलकुमार टेबलावर बोटांनी 'टक्टक्' करीत राहिले.

'पण पुढं काय?' राजेंद्र एकदम ओरडला, 'आपण आता काय करायचं? ही परिस्थिती निराळी आहे. शिवराज पांडे म्हणजे काही अशी-तशी व्यक्ति नव्हे.'

'हो.' गोपालराव खडबडून जाग आल्याप्रमाणे उद्गारले, 'अशा परिस्थितीत—'

आनंदरावांनी टेबलावर जोराने मूठ आपटली.

'नाही!' ते गरजले. 'परिस्थितीत काहीहि फरक झालेला नाही. मी तुम्हांला आधी संधि दिली होती. पण तो एक सामान्य गुन्हेगार म्हणून सहानुभूतीनं विचार करायला तुमची तयारी नव्हती. 'बरं झाल,' 'असंच व्हायला पाहिजे होतं.' असं तुम्ही सारे आग्रहानं म्हणत होता. आता मत बदलायचं कारण काय?'

आनंदरावांच्या त्या प्रश्नावर कुणीच काही बोलले नाही. फक्त कायदेपंडित गोपालराव पंतच उपहासाने उद्गारले—

'आपण गुन्हेगाराला माफी देणार असं म्हटलं तर पोलिस काय म्हणतील?'

'तुम्ही माफी देऊन चुकला आहात असं मी सांगितलं तर काय म्हणतील ते? कायद्याची आठवण तुम्हांला फार उशीरा होते आहे, गोपालराव!'

क्षणभराने जरा स्वर खाली आणून आनंदराव म्हणाले, 'माझ्या-पुरतं म्हणाल तर योग्य अधिकाऱ्यांनी विचारलं तर खरं काय ते सांगायची माझी तयारी आहे. तुम्ही तुमचं काय ते ठरवा. पण तुम्ही काही केलंत तरी परिणाम सारखाच होणार. विश्वासनं मला फोन केला तो त्याचा कबुली-

जबाब तुमच्यापुढं मांडायची मला परवानगी देण्यासाठीच. कारण तुम्ही तो ऐकलात तेव्हां विश्वास पाठलागाच्या पलीकडे पोचलेला होता.'

आनंदराव सावकाश पावले टाकीत खिडकीकडे गेले. त्या खिडकीच्या जवळ टेबलावर ते ज्योतिर्मय शिवलिंग अजूनहि तसेच होते. त्यातील प्रकाशज्योती तशाच झगमगत होत्या. त्या ज्योती आणि त्यापलीकडच्या खिडकीतून दिसणारी क्षितिजावरच्या विविधरंगी प्रकाशाची खुलावट पहात आनंदराव किती तरी वेळ उभे होते...

*

# मृत्यूचा मुखवटा

कुंदा आनंदरावांकडे आली ती अत्यंत अस्वस्थ मन:स्थितीतच. प्रारंभीचे तिचे बोलणे अगदीच असंबद्ध होते. तिचा पहिला आवेग ओसरू देऊन मगच आनंदरावांनी तिला प्रश्न केला,—

'तुम्ही कर्नल वढावकरांकडे रहाता ?'

'रहात होते म्हणा !' कुंदा आवेगाने उद्गारली, 'कर्नल अप्पासाहेब वढावकर ठार झालेले आहेत आणि त्यांची पत्नी इतकी भयंकर जखमी झालेली आहे की कदाचित या क्षणापर्यंत तिचाही प्राण गेला असेल. ती दोघं त्या भयंकर 'मृत्यूच्या मुखवटया' खाली पडलेली दिसली तेव्हा मला वाटलं, त्या भीतीदायक आकृतीनंच अप्पासाहेबांना वेड केलं असाव. एरव्ही बंद खोलीत पत्नीवर अन् स्वत:वर गोळ्या का झाडून घेतल्या त्यांनी ? अन् तरीसुद्धा त्यांनी असं भयंकर कृत्य केलं नसावं असं मला वाटतं. त्यांच्या नावाला लागलेला हा कलंक धुतला जावा अशी माझी इच्छा आहे. म्हणून मी तुमच्याकडे आले !'

'तुमचं मन अस्वस्थ होणं साहजिक आहे.' आनंदराव सहानुभूतीने म्हणाले, 'पण सर्व हकीकत सुसंगतपणे सांगाल तर मलाही विचार करता येईल. जरा मन घट्ट करा.'

करते.' कुंदा आवंढा गिळून म्हणाली, 'महायुद्धात पराक्रमाची पदकं मिळवलेल्या कॅप्टन मोहोऱ्यांची मी मुलगी आहे.'

'वा: ! तेच म्हणतो मी. सांगा बरं मग !'

'कर्नल अप्पासाहेब वढावकर आणि त्यांची पत्नी खारला कमल-निवासात राहतात.' कुंदा म्हणाली, 'त्या भागात तुम्हाला तशा दगडी इमारती थोड्याच दिसतील. पुढच्या दोन्ही बाजूंना दोन खोल्या आहेत आणि समोर लहानशी बाग आहे. दोन्ही बाजूच्या खोल्यांना प्रत्येकी दोन–दोन खिडक्या आहेत. सगळ्या खिडक्या बिनगजांच्या आहेत. झडपांना मोठाली काचेची तावदानं लावलेली आहेत, अन् आतून बंद करण्यासाठी बोल्ट आहेत. त्या दोन खोल्यांपैकी डावीकडच्या खोलीत अप्पासाहेब कमल-अक्काशी बोलत होते, त्या खोलीला आम्ही अजबखानाच म्हणतो. तिथ निरनिराळ्या अजब वस्तूंचा संग्रहच केलेला आहे अप्पासाहेबांनी. अन् त्यापैकी सर्वांत अजब वस्तू म्हणजे तो भयानक 'मृत्यूचा मुखवटा.' काल रात्री जेवणानंतरची थोड्याच वेळाची गोष्ट आहे. त्या खोलीचं दार आतून बंद केलेलं होतं. दोन्ही खिडक्यांचे वरचे अन् खालचे बोल्ट बंद केलेले होते. त्यांचे पडदे मात्र सरकवलेले नव्हते. खोलीत तिसरं कुणी लपूनहि बसलेलं नव्हतं. दारंखिडक्या बंद असतांना आत प्रवेश करणं अशक्य आहे. कर्नल-साहेबांच्या उजव्या हाताशी एक पिस्तुल पडलेलं होतं. दाराखिडक्यांच्या कड्या–कोयंड्यांत काहीहि गडबड किंवा घोटाळा नव्हता. खोली एखाद्या किल्ल्यासारखी पक्की बंद होती, याबद्दल तुम्ही माझ्या शब्दावर विश्वास ठेवा.'

(कुंदेने दिलेला विश्वास अगदी वाजवीच होता हे नंतरच्या तपासांत आनंदरावांना कळले.)

'तरूण मुलीत सहसा न आढळणारा समजूतदारपणा तुमच्या अंगी दिसतो.' आनंदराव म्हणाले, 'त्या खोलीत कर्नलसाहेबांनी नव्यानेच विकत आणलेला 'मृत्यूचा मुखवटा' ही प्लास्टिकची आकृति टांगलेली होती म्हणता? ते असू द्या...पण लष्करात बरीच वर्षे घालवल्यानं कर्नलसाहेबांचं स्वभाव शिस्तप्रिय आणि हेकट बनलेला होता, हे खरं ना?'

'होय. तरी पण मला वाटतं की त्यांनी–'

'ते आपण शोधूच. पुढं काय झालं मग रात्री?'

कुंदेची मान किंचित् खाली झुकली.

'पिस्तुलाच्या दोन बारांनी सारं घर जागं झालं-' क्षणभर घुटमळून ती सांगू लागली, 'आम्ही खिडकीच्या तावदानातून पाहिलं तेव्हा त्या दोन

आकृत्या जमिनीवर अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या भिंतीवरच्या शेड लावलेल्या दिव्याच्या प्रकाशात त्या 'मृत्यूच्या मुखवटचा'चे निळे डोळे चमकत होते. त्या दृश्यानं मी चांगलीच घाबरले.'

'माधवराव, पलीकडचं ते सिगरेटचं पाकीट घ्या बरं!' आनंदराव हात पुढे करीत म्हणाले, 'अर्थात् कुंदाताईची हरकत नसेल तर--'

'माझी कसली हरकत?' कुंदा हंसून उद्गारली, 'नोकरी करणाऱ्या तरुणीला सिगरेटच्या धुराच्या वासाची संवय आपोआपच होते.' दातांनी ओठ चावीत ती किंचित् घुटमळली आणि पुढे म्हणाली--

'काल रात्रीचंच पहा ना! मेजर प्रकाशराव आरोळे अन् कॅप्टन मधुकर लहाने यांच्याबरोबर काचा फोडलेल्या खिडकीतून मी खोलीत घुसले तेव्हा मला पहिल्यानं सिगरेटच्या वासाची जाणीव झाली. तो वास चांगला आठवतो मला.'

माधवने दिलेले सिगरेटचे पाकीट तसेच हातात ठेवून आनंदराव क्षणभर कुंदेकडे पहात राहिले.

'तुम्हाला उगीचच प्रश्न विचारून त्रास देण्याची माझी इच्छा नाही. पण तुम्ही म्हणता आहात त्याबद्दल खात्री आहे तुमची?'

'आनंदराव,' कुंदा जोराने म्हणाली, 'निष्कारण काहीतरी बडबडण्याची मला संवय नाही. अजबखान्यात वस्तुतः सिगरेटच्या वासाऐवजी अत्तराचा घमघमाट ठेवायला हवा असा विचारही त्या वेळी माझ्या मनात येऊन गेला, अन् अशा वेळी असा विचार मनात येणं किती विलक्षण, असं वाटून माझी मीच मनात खजील झाले.'

आनंदराव किंचित्काल गप्प राहिले.

'हं! माणसाचं मन अजब आहे!' ते म्हणाले, 'बरं, मला आणखी जरा माहिती सांगा. मेजर आरोळे आणि कॅप्टन लहाने या दोघांबरोबर आपण त्या खोलीत शिरलो असं तुम्ही सांगता. ते दोघेही कमलनिवासात पाहुणे म्हणून होते का काल रात्री?'

'मेजर प्रकाशराव आरोळे गेले काही दिवस आहेत. पण कॅप्टन मधुकर--' त्या नावाचा उच्चार करताना कुंदा किंचित् घुटमळते, लाजते ही गोष्ट आनंदरावांप्रमाणेच माधवच्या पण लक्षात आली. 'काल थोडा वेळ आले होते. ते अप्पासाहेबांचे पुतणे आहेत. अप्पासाहेबांच्या जवळच्या नातलगापैकी असे मधुकरराव एकटेच. प्रकाशराव तसे वयस्क आहेत. त्या मानानं मधुकरराव खूपच तरुण आहेत.'

'बरं, काल रात्री मग काय झालं पुढं?'

'कमल माझी आत्या. ती फारच सुंदर आहे. अप्पासाहेबांबद्दल मला अनादर वाटतो असं नाही; पण तिनं त्यांच्याशी लग्न करण्याचं ठरवलं तेव्हा आम्हाला सर्वानाच जरा आश्चर्य वाटलं. तसे ते कर्तबगार आणि नावलौकिकाचे गृहस्थ होते. पण जन्माचा साथीदार निवडण्याच्या दृष्टीनं त्यांच्याकडे पहाता कुणाचंही मन प्रतिकूलच झालं असतं. ते फार रागीट होते. त्यांच्या लहरी तर विचित्रच होत्या. त्या अजबखान्यातल्या वस्तूंबाबत ते नेहमीच तिरीमिरीवर येत...

'ते काही असलं तरी अप्पासाहेबांबद्दल माझ्या मनात अत्यंत आदर आणि आपुलकी आहे. एरव्ही मी तुमच्याकडे आलेच नसते. त्या दोघांची नेहमी भांडणं होत हे खरं आहे. काल रात्रीसुद्धा कशावरून तरी त्यांची कुरबुर झाली हे खरं असलं तरी तसला भयंकर प्रसंग घडण्याजोगं काहीही कारण कधी घडलं नाही. भांडणाची ती वेळ गेली की ती दोघं नितक्याच उत्कटपणानं दिलजमाई करीत असत...

'मला इथं नोकरीनिमित्त राहाण्याची पाळी आली तेव्हा त्या दोघां-नीही अत्यंत आग्रह करून मला आपल्याकडे राहायला भाग पाडलं. अप्पा-साहेब सैन्यातून गेल्याच वर्षी निवृत्त झालेले असले तरी त्या घरात एखाद्या छावणीतल्या क्वार्टरमध्ये राहात असल्यासारखीच त्यांची रहाणी होती. नोकरीवर असतांना त्यांनी ठेवलेला नोकर केशव अजून आहेच...

'काल रात्री जेवणानंतर, 'तुमच्याशी जरा बोलायचं आहे' असं कमल अप्पासाहेबांना म्हणाली. ती दोघं अजबखान्याच्या खोलीत गेली आणि मी अन् प्रकाशराव दिवाणखान्यात बोलत बसलो.'

'एक मिनिट!' समोरच्या कागदावर काहीतरी खुणा करीत आनंद-राव उद्‌गारले, 'घरासमोरच्या बागेला लागून, पुढच्या दाराच्या दोन बाजूंना दोन खोल्या आहेत असं तुम्ही म्हणाला. त्यातली एक खोली म्हणजे तो अजबखाना, अन् दुसरी खोली म्हणजे दिवाणखाना का?'

'नाही. पुढची उजव्या बाजूची खोली म्हणजे जेवणघर आहे. कर्नल-साहेबांकडे पाश्चात्य पद्धतीनं—म्हणजे टेबलखुर्च्यांवरच जेवण्याची पद्धत आहे. येणारे-जाणारे नेहमीच असतात. म्हणून जेवण्याची खोली मुद्दाम मोठी निवडली त्यांनी. दिवाणखाना त्याच्या आतल्या बाजूला आहे. प्रकाश-राव जांभया देण्याच्या बेतात असतानाच मधुकर आले,'

'अन् तुम्हा दोघांनाही जरा बरं वाटलं, असंच ना?' आनंदरावांनी मधेच विचारले.

'हं. आम्ही दोघं जरा अस्वस्थ होतो. त्यामुळे तिसऱ्या व्यक्तीचं

आगमन आम्हाला आनंददायक वाटलं.' कुंदा हंसली आणि लगेच गंभीर झाली मधुकर जरा अस्वस्थ दिसले. 'दालनांतून येतांना आपल्याला कमल अन् अप्पासाहेबांचं भांडण चालू असलेलं ऐकू आलं.' असं ते म्हणाले. 'गिरगावातून मी इथपर्यंत अप्पासाहेबांशी बोलण्याकरिता आलो अन् इथं त्यांची भांडणं चाललेली. आता कसं बोलणार मी त्यांच्याशी ? नेहमीनेहमी काय ही भांडणं !' ते अस्वस्थपणानं कुरकुरले.

'त्यांच्या त्या बोलण्याबद्दल मी नापसंती दाखवली, तेव्हा 'माफ करा–पण मला भांडणं आवडत नाहीत' असं ते म्हणाले. 'अप्पासाहेबांचा स्वभाव एकदा माहीत झाल्यावर कमलाकाकूंनी जरा जुळतं घ्यायला हवं. एरव्ही घरात शांतता कशी नांदणार ? मी काय आपला असून नसून सारखाच.' असंही ते म्हणाले.

'तिचं तुमच्या काकांवर प्रेम आहे अन् त्यांच्याकरिता ती हवा तेवढा त्याग करायला तयार आहे.' मी म्हणाले, 'तुमच्याबद्दल म्हणायचं तर तुम्ही जरा बेदरकारपणानं राहता–वागता असं तिचं मत आहे.'

'आपण पांच–तीन–दोन खेळू या असं प्रकाशराव म्हणाले. पण ते मधुकरना पटलं नाही. माझ्या बोलण्यानं ते थोडे रागावले होते. 'चहाची सोय होणं कठीणच आहे, निदान पाणी तरी पिऊन येतो' असं म्हणून चडफडतच ते दिवाणखान्याबाहेर पडले. मग मी अन् प्रकाशराव दोघंच 'ओपन–सीक्रेट' डाव खेळू लागलो.'

'त्यानंतर तुम्ही किंवा प्रकाशराव तिथून बाहेर गेला होतात का ?' आनंदरावांनी विचारले.

'हो ! वरच्या मजल्यावरून तपकिरीची डबी आणण्याकरिता प्रकाशराव गेले होते बाहेर.' कुंदा उत्तरली, 'आपले खिसे चाचपून पहात, अन् 'छे बुवा ! तपकिरीवाचून नाही सुचायचं' असं पुटपुटत ते अर्ध्या डावावरच उठले.

'दिवाणखान्यात पत्ते मांडून मी एकटीच बसले होते. शांत खोलीत माझ्या मनात नाही नाही ते विचार येऊ लागले. जेवणाच्या वेळी कमलच्या डोळ्यात चमकणारी ती विचित्र छटा आठवून मी अस्वस्थ झाले. केशवच्या चर्येवरचा तो किंचित् घाबरटपणा ..तो 'मृत्यूचा मुखवटा' घरात आणल्यापासून केशव जरा अस्वस्थच झालेला आहे. हे सर्व मनात येत असतानाच पिस्तुलाचे दोन बार मला ऐकू आले आनंदराव !'

बोलण्याच्या आवेगात कुंदा एकदम उठून उभी राहिली.

'माझा काही गैरसमज झाला असेल असं तुम्हाला वाटेल. दुसऱ्याच

कसल्यातरी आवाजानं माझी फसगत झाली असेल– किंवा ज्या बारानं अप्पासाहेब ठार झाले अन् कमल–'

एक खोल श्वास घेऊन आणि तो सोडून ती परत खाली बसली.

'क्षणभर मी अगदी घाबरून गेले. मग बाहेरच्या दालनात धावले, तेव्हां प्रकाशरावांशी माझी जवळ जवळ टक्करच झाली. पाण्याचं भांड हातात घेऊनच मधुकर जेवणाच्या खोलीतून बाहेर आले तेव्हा 'काय झालं?' या माझ्या प्रश्नाला प्रकाशराव काहीतरी पुटपुटून उत्तर देत होते 'तुम्ही मागं थांबा जरा!' मधुकरनं मला सांगितलं, 'कदाचित् चोर डाकू असतील!'

'ते दोघे अजबखान्याच्या दाराकडे धावले.

'दार बंद आहे आतून! काय बुवा!' प्रकाशराव ओरडले, 'जरा मदत करा बरं मधुकरराव. आपण हे दार उघडू.'

'ते दार उघडायला तोफखानाच आणावा लागेल.' मधुकर मान हालवीत म्हणाले, 'तुम्ही या दाराशीच थांबा– कुणी आत असलं तर पळून जाईल. मी बाहेरून एखाद्या खिडकीतून आत जाता येतं का पहातो.' परिणाम असा झाला की आम्ही सारीच धडपडत बाहेर गेलो.'

'तुम्ही सारी?'

'हो! प्रकाशराव, मधुकर, केशव, अन् मी! दाराजवळच्या खिडकीतून, एका दृष्टीक्षेपातच आम्हाला अप्पासाहेब आणि कमल उताणी पडलेली दिसली. मध्यभागी लाल गालिचा अंथरलेला आहे, त्याच्या बाजूला ती दोघं पडलेली होती. कमलच्या छातीच्या जरा बाजूला झालेल्या जखमेतून रक्त वहातच होतं'

'मग पुढे?'

'घरापुढच्या बागेत मध्यभागी टेकाडासारखा एक लहानसा उंचवटा केलेला आहे. त्याचा एक मोठा दगड मधुकरनी उपसला. 'चोर पळेल. लक्ष असू द्या!' असं म्हणून त्यांनी त्या दगडानं पलिकडच्या खिडकीची काच फोडली. चोर वगैरे कुणी नव्हताच! खिडक्यांचे वरचे–खालचे बोल्ट लावलेले होते. नंतर दाराकडे दुसरं कुणी जाण्याआधीच मी जाऊन पाहिलं. त्याची कडीही लावलेली होती. चोर नसणार हे मला माहीत होतं.'

'माहीत होतं?'

'त्या खोलीतल्या सामानाला अप्पासाहेब फार जपत असत' कुंदा उत्तरली, 'ते तिथं उपस्थित असतांना चोर तिथपर्यंत पोचणं अशक्य होतं. केशवनं भिंतीवर टांगलेल्या त्या मुखवट्याच्या निळ्या डोळ्यांकडे पाहिलं



आणि मेजरसाहेबांनी अप्पासाहेबांच्या उजव्या हाताजवळ पडलेलं पिस्तुल पायानं ठोकरलं, ' फार वाईट झालं. डॉक्टरांना बोलवायला हवं लवकर,' असं ते पुटपुटले.'

तिचे बोलणे संपल्यावर काही मिनिटे आनंदराव टेबलासमोर गप्प उभे होते.

' हं ! ' ते मग उद्‌गारले, ' आणि आता काय परिस्थिती आहे ?'

' बिचारी कमलआत्या इस्पितळात अत्यवस्थ स्थितीत पडलेली आहे. ती शुद्धीवर येईल की नाही शंकाच आहे. अप्पासाहेबांचं प्रेत पोलिसांनी दवाखान्यात नेलं. पत्नीला ठार मारण्याच्या प्रयत्नानंतर आत्महत्या केली असा बट्टा अप्पासाहेबांना लागेल. तो शक्य तर टाळायच्या कामी तुमचं

साहाय्य मिळालं तर पहावं म्हणून मी तुमच्याकडे यायला निघाले, तेव्हा कमलनिवासात पोलिस-इन्स्पेक्टर सावंतांनी येऊन तपासाला सुरवात केली होती.'

'खरं!' आनंदराव उद्‌गारले, 'इन्स्पेक्टर सावंत तिथं आहेत हे एका दृष्टीनं बरंच म्हणायचं. चला माधवराव, मी कपडे करतो अन् आपण निघू लगेच. बघू या चक्कर टाकून कमलनिवासात!'

'आनंदराव!' त्यांचे बोलणे मुकाट्याने ऐकत असलेला माधव अस्वस्थपणे म्हणाला, 'कुंदाताईंना उगीच भलती आशा दाखवण्यात काय अर्थ आहे?'

'चुकता तुम्ही!' आनंदराव त्याच्याकडे पहात शांतपणे म्हणाले, 'मी उगीच आशाही दाखवीत नाही किंवा निष्कारण निराशही करीत नाही. मी फक्त पुरावा शोधणार आहे. चला.'

आनंदरावांनी लेन्स वगैरे जरूर त्या वस्तू खिशांत टाकल्या. मोटारीतून जात असताना ते विचारमग्नावस्थेत खालचा ओठ सारखे चावीत होते.

ती एप्रिल महिन्यातील सकाळ होती. सूर्याचे ऊन्ह नुकतेच तापू लागले होते. कुंपणाच्या दगडी भिंतीत दगडी बांधणीची कमलनिवासाची इमारत निस्तब्ध, निर्जीव भासत होती. दगडी भिंतीतील खिडक्यांना पिवळा आणि दारांना हिरवा रंग दिलेला होता. ती तिघे फाटकांतून आत जाताच, डाव्या बाजूच्या खिडक्यांजवळ उभा असलेला, नोकरासारखा पांढरा कोट आणि तांबडे पागोटे घातलेला एक माणूस त्यांना दिसला. त्यांना पाहून क्षणभरच तो निश्चल उभा राहिला आणि दुसऱ्याच क्षणी एका खिडकीतूनच घरात गेला.

त्याला खिडकीतून आत शिरतांना पाहून माधवप्रमाणेच आनंदरावही जरा दचकले. दाराच्या अगदी जवळची खिडकी सुस्थितीत बंद होती. पण पलीकडच्या खिडकीच्या कांचा मात्र फुटलेल्या होत्या. त्या खिडकीखालीच एक मोठा दगड पडलेला होता. केशव त्या खिडकीतूनच आत गेला होता.

कुंदा समोरच्या दरवाज्यातून आत शिरली. आनंदरावांनी माधवचा हात धरून त्याला बाहेरच थोपवून धरले.

'का हो माधवराव!' आनंदराव म्हणाले, 'कुंदेनं सांगितलेल्या हकीकतीत तुम्हांला काही असंबद्ध किंवा विचित्र असं आढळलं का?'

'विचित्र, भयंकर खूपच आहे.' माधव उत्तरला, 'पण असंबद्ध काही वाटलं नाही बुवा मला.'

'पण त्याबद्दल निषेध असा तुम्हीच दर्शविलात प्रथम!'

'वा: ! आज सकाळपासून निषेधाचा असा एक शब्दहि मी उच्चारलेला नाही !'

'आज सकाळी नसेल कदाचित्.' आनंदराव म्हणाले. तेवढ्यात त्यांचे त्या खिडकीकडे लक्ष वेधले. 'काय सावंतसाहेब ! बऱ्याच दिवसांनी आपली गाठ पडते आहे.'

फुटलेल्या काचांचा खच असलेल्या खिडकीत, काळजीपूर्वक काचा टाळून इन्स्पेक्टर सावंत उभे होते.

'कोण आनंदराव ! तुम्ही इकडे कुठं वाट चुकलात ?' ते उद्गारले, 'यात काही रहस्य किंवा वादग्रस्त मुद्दा आहे असं म्हणणं आहे की काय तुमचं ? कर्नलसाहेबांचं डोकं का फिरलं, हाच झाला तर वादाचा प्रश्न होईल.'

'ठीक ठीक !' आनंदराव हंसत म्हणाले, 'पण आम्हाला आत तरी येऊ देणार की नाही ?

'अवश्य !— सुस्वागतम् !' सावंत हसतच बाजूला झाले.

ती खोली किंचित् लांबोळी होती. आत चांगले फर्निचर असले तरी एकंदरीत तिला कोठाराचे स्वरूप आलेले दिसत होते. खिडकीच्या समोर एक मोठा माणसाचा मुखवटा टांगलेला होता. त्याचे दोन मोठाले निळसर डोळे चमकत होते.

'मोठी विचित्र चीज आहे, नाही ?' इन्स्पेक्टर सावंत म्हणाले, 'या मृत्यूच्या मुखवट्यानंच कर्नसाहेबांच्या घरात खळबळ उडवली म्हणतात. मेजर आरोळे आणि कॅप्टन लहाने दिवाणखान्यात बसले आहेत, एकमेकांची डोकी खात !'

आनंदरावांनी त्या विचित्र वस्तूकडे विशेषशी नजर टाकली नाही, हे पाहून माधवला नवल वाटले.

'हं, मग काय इन्स्पेक्टरसाहेब,' भिंतीलगत कपाटातून ठेवलेल्या वस्तूंवरून नजर फिरवीत आनंदरावांनी विचारले, 'घरातल्या माणसांचे जाबजबाब घेतलेच असतील तुम्ही ?'

'मग काय ! त्याखेरीज दुसरं काहीच केलं नाही मी.' सावंत कुरकुरले, 'पण तो काय सांगणार ? ही खोली आतून बंद होती. पत्नीला आणि स्वत:ला गोळी घालून ठार करणारा इसम मेलेला आहे. पोलिसांच्या पुरतं पहायचं तर हे प्रकरण संपलेलं आहे...आता बोला,— काय म्हणणं आहे तुमचं ?'

आनंदराव एकदम खाली वाकले.

'अरेच्या ! हे काय आहे ?' जमिनीवर पडलेली एक वस्तू उचलून न्याहाळीत ते उद्गारले.

'कर्नल वढावकरांच्या सिगरेटचं थोटूक दिसतं आहे. जळत्या स्थितीत पडल्यानं गालिच्याला भोक पाडलेलं दिसतं आहे त्यानं.' सावंत उत्तरले.

'अगदी बरोबर.'

ते गालिच्याकडे पहात असतांनाच दार उघडून एक पोक्त, धिप्पाड गृहस्थ आत आले. ते मेजर प्रकाशराव आरोळे असावेत हे न सांगताच आनंदरावांनी ओळखले. त्यांच्यामागोमाग एक लष्करी रुबाबाचा तरुण होता. त्याच्याबरोबरच कुंदा होती.

'आपण आनंदराव का ?' मेजर आरोळे ताठ्याने बोलू लागले, 'या सर्वस्वी खाजगी भानगडीत कुंदाबाईंनी तुम्हाला का बोलावून आणलं समजत नाही मला !'

'त्याचं कारण कुणाही सुज्ञाला सहज उमजण्यासारखं आहे.' आनंदराव शांतपणे म्हणाले, 'तुमचे काका नेहमी याच सिगरेटस् ओढीत असत का, कॅप्टनसाहेब ?'

'होय !' आनंदरावांकडे चकित नजरेनं पहात कॅप्टन मधुकर उत्तरला, 'त्या बाजूच्या टेबलावर त्यांचा सिगरेटचा डबा पडलेला आहे.'

आनंदरावांनी टेबलाकडे जाऊन सिगरेटचा डबा उचलला तेव्हा सर्वजण त्यांच्याकडे काही न बोलता पहात होते. त्यांनी तो डबा उघडला आणि नाकाला लावला.

'टेनॉर !' ते म्हणाले, 'कुंदाताई, तुमचा विश्वास रास्त आहे ! कर्नल वढावकरांना वेड लागलेलं नव्हतं किंवा त्यांचं माथंही फिरलेलं नव्हतं.'

मेजर आरोळ्यांनी नाकावाटे जोरात श्वास टाकून 'हूं' केले.

मधुकरने मात्र मनातली तुच्छतेची भावना वरकरणी दिसू न देण्याची खबरदारी घेतली मिशांवरून हात फिरवीत त्याने हसू लपविले.

'तुमच्या या आश्वासनानं आम्हाला सर्वांनाच किती तरी हलकं वाटतं आहे !' तो म्हणाला, 'कर्नलसाहेबांच्या सिगरेटच्या अभिरुचीवरूनच तुम्ही हा निष्कर्ष काढलेला दिसतो.'

'अंशतः.' आनंदराव गंभीरपणाने उत्तरले, 'सिगरेट–पान–तंबाखूसंबंधी मी बरंच संशोधन केलेलं आहे. त्याची माहिती माझे मित्र माधवराव सांगू शकतील तुम्हाला. कर्नलसाहेबांच्या सिगरेटच्या आवडीनं इतर पुराव्याला दुजोरा मिळून बळकटी आलेली आहे फक्त ! काय सावंत ?'

सावंतांच्या कपाळावर आठया चढलेल्या होत्या. ते आनंदरावांकडे आश्चर्याने पहात होते.

'पुरावा ? तुमचं म्हणणं तरी काय आहे आनंदराव ?' ते ओरडले, 'सर्व काही अगदी उघड उघड दिसतं आहे. कर्नलसाहेब आणि त्यांची पत्नी —दोघांनाही बंद खोलीत गोळया लागलेल्या आहेत. दारं—खिडक्या आतून पक्क्या बंद होत्या, हे तुम्ही नाकारता का ?'

'नाही.'

'मग आपण वस्तुस्थितीला चिकटून राहू या.'

आनंदराव भिंतीजवळ जाऊन, दोन्ही हात पाठीशी जुळवून, बारकाईने त्या मुखवटयाचे निरीक्षण करू लागले होते.

'एकदम कबूल.' ते उत्तरले, 'बंद दाराबद्दल तुमचं काय मत आहे इन्स्पेक्टरसाहेब ?'

'कुणाचा व्यत्यय येऊ नये म्हणून कर्नलसाहेबांनी ते बंद केलं.'

'हो. तसंच असणार. सूचक आहे ही गोष्ट.'

'कर्नलसाहेबांनी माथेफिरूपणानं नंतर जी गोष्ट केली त्या दृष्टीनं खरोखरच सूचक घटना आहे ही.' सावंत म्हणाले.

'हें पहा आनंदराव,' मधुकर मध्येच म्हणाला, 'रहस्य उलगडून योग्य न्यायदानाला मदत करण्यात तुम्ही मोठी हुषारी दाखवता हे आम्हाला माहीत आहे. तसंच काकांचं नाव साफ रहावं असंहि आम्हाला फार फार वाटतं. पण उघडउघड दिसणाऱ्या गोष्टीपुढे काही इलाज नाही. आपल्याला आवडो वा न आवडो, कर्नलसाहेब स्वत:च्या माथेफिरूपणाला बळी पडले आणि त्यात त्यांच्या पत्नीहि जखमी झाल्या— वाचतील की नाही यांची शंका आहे— हे आपल्याला मान्य करायलाच हवं.—'

आनंदरावांनी हात वर उचलून त्याला थोपवून धरले. 'कर्नल वढावकर एका भयंकर आणि धूर्त खुनाच्या कटाला बळी पडलेले आहेत !' त्यांनी शांतपणे पुकारा केला.

त्यांच्या त्या घोषणेने त्या खोलीतील सर्वच व्यक्ती स्तिमित होऊन एकमेकांकडे पहात राहिल्या.

'बाप रे ! कुणावर खुनाचा आरोप करता आहात तुम्ही आनंदराव?' मेजर आरोळे ओरडले, 'या देशात निष्कारण बदनामी करण्याला प्रतिबंध करणारा कायदा आहे हे मी तुम्हाला दाखवून देईन.'

'ठीक ठीक !' आनंदराव हसून म्हणाले, 'नव्या गोष्टी समजून घ्यायला मी नेहमीच तयार असतो. पण तुम्हाला विश्वासात घेऊन एक

गोष्ट सागतो मी मेनरसाहेब. माझा सर्व भर खिडकी आणि मग काचावर आहे. त्यांचे सर्व तुकडे मी गोळा करून ठेवतो आ[illegible] तर सकाळी ते जुळवून पाहण्याकरता येणार आहे मी. मग तुमचं [illegible] देता येईल मला .. का हो इन्स्पेक्टरसाहेब, तुम्हाला ब[illegible] आवडतात, नाही का ?'

सावंतांचे डोळे वटारले गेले.

'आनंदराव, तुमच्याबद्दल मला नेहमीच आदर वाटत आलेला आहे.' ते तीव्र स्वराने म्हणाले, 'पण एखादेवेळी– आता या वेळी तुम्हाला बटाटे वडे कुठे आठवले ? यात त्यांचा काय संबंध ?'

'संबंध तसा काही नाही. मला एवढंच विचारायचं आहे की, बटाटेवडयाची बशी समोर आल्यावर तुम्ही घास उचलून तो समोरून तोंडात घालाल, की उजवा हात मानेमागे नेऊन डाव्या बाजूनं हात पुढं आणून तो खाल ? तुम्हीच याचा जरा विचार करा मनाशी !'

सावंत काही क्षण आनंदरावांकडे पहात राहिले.

'ठीक आहे आनंदराव !' ते म्हणाले, 'तुमची सूचना विचार करण्यासारखी आहे. आणखी काही सुचवायचं असेल तर सांगा.'

'त्या खिडकीची तावदानं फुटलेली आहेत त्या जागी तूर्त फळ्या मारून घ्या.' आनंदराव उत्तरले, 'दुसरं असं की–आपण सर्व उद्या सकाळी इथं एकत्र जमू, तोपर्यंत या खोलीत कुणालाही कशालाही हात लावू देऊ नका. चला, माधवराव, बारा वाजायला आले आहेत. घरी ताटं आपली वाट पहात असतील.'

० ० ०

दुपारी इतर काही कामाच्या गर्दीत माधवला आनंदरावांकडे जायला सवड झाली नाही. संध्याकाळी तो तिकडे गेला तेव्हा सुधाताईंनी दार उघडले. 'चहा पाठवते जराशानं वरती' असे त्या म्हणतात तेवढ्यात वरून 'ठो' असा आवाज आला. सुधाताईंनी जवळच्या खुर्चीच्या पाठीवर हात ठेवून ती गच्च पकडून ठेवली.

'झाली पुन्हा सुरुवात !' त्या कुरकुरल्या, 'ती मेली पिस्तुलं...सहा महिन्यापूर्वी अशीच एकदा भिंतीची खराबी केली. म्हणे न्यायाचं काम आहे ! जरा बघा माधवराव. मी कालच काही नव्या वस्तू आणून ठेवल्या आहेत, त्यांचा निकाल लावतील ते !'

सुधाताईंना दिलासा देऊन माधव धावतच जिना चढला. तो दारापर्यंत पोचतो न पोचतो तोच आणखी एक बार झाला. उग्र वासाच्या काळ-

सावंतांच्या कपाळावर आठचा चढलेल्या होत्या. ते आनंदरावांकडे आश्चर्याने पहात होते.

'पुरावा ? तुमचं म्हणणं तरी काय आहे आनंदराव ?' ते ओरडले, 'सर्व काही अगदी उघड उघड दिसतं आहे. कर्नलसाहेब आणि त्यांची पत्नी –दोघांनाही बंद खोलीत गोळ्या लागलेल्या आहेत. दारं–खिडक्या आतून पक्क्या बंद होत्या, हे तुम्ही नाकारता का ?'

'नाही.'

'मग आपण वस्तुस्थितीला चिकटून राहू या.'

आनंदराव भिंतीजवळ जाऊन, दोन्ही हात पाठीशी जुळवून, बारकाईने त्या मुखवटयाचे निरीक्षण करू लागले होते.

'एकदम कबूल.' ते उत्तरले, 'बंद दाराबद्दल तुमचं काय मत आहे इन्स्पेक्टरसाहेब ?'

'कुणाचा व्यत्यय येऊ नये म्हणून कर्नलसाहेबांनी ते बंद केलं.'

'हो. तसंच असणार. सूचक आहे ही गोष्ट.'

'कर्नलसाहेबांनी माथेफिरूपणानं नतर जी गोष्ट केली त्या दृष्टीनं खरोखरच सूचक घटना आहे ही.' सावंत म्हणाले.

'हें पहा आनंदराव,' मधुकर मध्येच म्हणाला, 'रहस्य उलगडून योग्य न्यायदानाला मदत करण्यात तुम्ही मोठी हुषारी दाखवता हे आम्हाला माहीत आहे. तसंच काकांचं नाव साफ रहावं असंहि आम्हाला फार फार वाटतं. पण उघडउघड दिसणाऱ्या गोष्टीपुढे काही इलाज नाही. आपल्याला आवडो वा न आवडो, कर्नलसाहेब स्वत:च्या माथेफिरूपणाला बळी पडले आणि त्यात त्यांच्या पत्नीहि जखमी झाल्या– वाचतील की नाही याची शंका आहे– हे आपल्याला मान्य करायलाच हवं.–'

आनंदरावांनी हात वर उचलून त्याला थोपवून धरले. 'कर्नल वढावकर एका भयंकर आणि धूर्त खुनाच्या कटाला बळी पडलेले आहेत !' त्यांनी शांतपणे पुकारा केला.

त्यांच्या त्या घोषणेने त्या खोलीतील सर्वच व्यक्ती स्तिमित होऊन एकमेकांकडे पहात राहिल्या.

'बाप रे ! कुणावर खुनाचा आरोप करता आहात तुम्ही आनंदराव?' मेजर आरोळे ओरडले, 'या देशात निष्कारण बदनामी करण्याला प्रतिबंध करणारा कायदा आहे हे मी तुम्हाला दाखवून देईन.'

'ठीक ठीक !' आनंदराव हसून म्हणाले, 'नव्या गोष्टी समजून घ्यायला मी नेहमीच तयार असतो. पण तुम्हाला विश्वासात घेऊन एक

गोष्ट सांगतो मी मेजरसाहेब. माझा सर्व भर खिडकीच्या ह्या फुटक्या काचावर आहे. त्यांचे सर्व तुकडे मी गोळा करून ठेवतो आहे आज ! उद्या सकाळी ते जुळवून पाहण्याकरता येणार आहे मी. मग तुमची खात्री पटवून देता येईल मला .. का हो इन्स्पेक्टरसाहेब, तुम्हाला बटाटेवडे फार आवडतात, नाही का ?'

सावंतांचे डोळे वटारले गेले.

'आनंदराव, तुमच्याबद्दल मला नेहमीच आदर वाटत आलेला आहे.' ते तीव्र स्वराने म्हणाले, 'पण एखादेवेळी– आता या वेळी तुम्हाला बटाटे वडे कुठे आठवले ? यात त्यांचा काय संबंध ?'

'संबंध तसा काही नाही. मला एवढंच विचारायचं आहे की, बटाटेवड्याची बशी समोर आल्यावर तुम्ही घास उचलून तो समोरून तोंडात घालाल, की उजवा हात मानेमागे नेऊन डाव्या बाजूनं हात पुढं आणून तो खाल ? तुम्हीच याचा जरा विचार करा मनाशी !'

सावंत काही क्षण आनंदरावांकडे पहात राहिले.

'ठीक आहे आनंदराव !' ते म्हणाले, 'तुमची सूचना विचार करण्यासारखी आहे. आणखी काही सुचवायचं असेल तर सांगा.'

'त्या खिडकीची तावदानं फुटलेली आहेत त्या जागी तूर्त फळ्या मारून घ्या.' आनंदराव उत्तरले, 'दुसरं असं की–आपण सर्व उद्या सकाळी इथं एकत्र जमू, तोपर्यंत या खोलीत कुणालाही कशालाही हात लावू देऊ नका. चला, माधवराव, बारा वाजायला आले आहेत. घरी ताटं आपली वाट पहात असतील.'

० ० ०

दुपारी इतर काही कामाच्या गर्दीत माधवला आनंदरावांकडे जायला सवड झाली नाही. संध्याकाळी तो तिकडे गेला तेव्हा सुधाताईंनी दार उघडले. 'चहा पाठवते जराशानं वरती' असे त्या म्हणतात तेवढ्यात वरून 'ठो' असा आवाज आला. सुधाताईंनी जवळच्या खुर्चीच्या पाठीवर हात ठेवून ती गच्च पकडून ठेवली.

'झाली पुन्हा सुरुवात !' त्या कुरकुरल्या, 'ती मेली पिस्तुलं...सहा महिन्यापूर्वी अशीच एकदा भिंतीची खराबी केली. म्हणे न्यायाचं काम आहे ! जरा बघा माधवराव. मी कालच काही नव्या वस्तू आणून ठेवल्या आहेत, त्यांचा निकाल लावतील ते !'

सुधाताईंना दिलासा देऊन माधव धावतच जिना चढला. तो दारापर्यंत पोचतो न पोचतो तोच आणखी एक बार झाला. उग्र वासाच्या काळ-

सर धुरात त्याला आनंदरावांची अस्पष्ट आकृती दिसली. ते आरामखुर्चीवर आरामात बसलेले होते. त्यांच्या तोंडात सिगरेट आणि उजव्या हातात पिस्तुल होते.

'या माधवराव !' ते उद्गारले.

'बाप रे !' माधव उद्गारला, 'काय हे आनंदराव ! आता मात्र कमाल झाली ! हे असह्य आहे. सुधाताई उगीच नाही कुरकुरत ! इथं गोळीबार मैदानासारखा वास भरला आहे. घराच्या नुकसानीची पर्वा नसली तरी निदान सुधाताईंच्या भावनांची कदर करायला हवी तुम्हाला.' त्याने पुढे होऊन प्रथम भराभर खिडक्या उघडून टाकल्या. रस्त्यावर मोटारी–गाड्यांच्या खडखडाटात पिस्तुलाच्या बाराकडे कोणाचे लक्ष गेलेले नाही हे त्याला जरा बरे वाटले. 'असलं वातावरण आरोग्याला अत्यंत प्रतिकूल आहे.' तो पुटपुटला.

आनंदरावांनी हात लांब करून पिस्तुल टेबलावर ठेवले.

'खरंच, माधवराव ! तुमचं सहाय्य नसतं तर मला कितपत यश आलं असतं राम जाणे.' ते म्हणाले, 'एखाद्या प्रकरणांतल्या नेमक्या मुद्याकडे लक्ष वेधून तुम्ही मला बरोबर मार्ग दाखवता.'

आपली ही प्रशंसा कशाबद्दल आहे आणि ती खरीच आहे की तो उपहास आहे, हेच माधवला समजेना !

'अलिकडे पुन्हा तुम्ही सिगरेटस् जास्त ओढू लागला आहात !' एका खुर्चीवर टेकत तो आनंदरावांना म्हणाला.

'ते मनःस्थितीवर अवलंबून असतं माधवराव ! आज मी सिगरेटस् ओढतो आहे त्या कर्नल वढावकरांच्या सांठ्यातून लाटलेल्या आहेत.' त्यांनी मागे वळून घड्याळाकडे नजर टाकली. 'अजून एक तासभर वेळ आहे. तेवढ्यात आपण मानवी स्वभावातील सुष्टदुष्ट प्रवृत्तींबद्दल, काल अपुरी राहिलेली चर्चा पुरी करू या. ते पुस्तक घ्या बरं–तुमच्या मागच्या स्टुलावर आहे पहा.'

जवळजवळ आठ वाजेपर्यंत ते दोघे वाचीत आणि चर्चा करीत होते. इन्स्पेक्टर सावंतांच्या आगमनामुळे त्यांना आपली चर्चा थांबवावी लागली.

'तुमचा निरोप कळला आनंदराव !' सावंत आत येतायेताच ओरडले, 'तुमच्या सूचनेप्रमाणे सर्व काही बरोबर होईल ! बाहेरच्या बागेत पोलिस ठेवण्याची व्यवस्था केली आहे. खिडकीचीही काळजी करायला नको. कुणाला चाहूल लागू न देता त्या खोलीत जाता येईल आपल्याला.'

'छान ! तुम्ही सर्व व्यवस्था नीट कराल याची खात्री आहे मला.'

आनंदराव उत्साहाने म्हणाले, 'आपण जराशानं जेवण उरकू आणि मग वेळ घालवण्यासाठी जरा गप्पा मारू. योग्य वेळेच्या आधी तिथं गेलो तर आपला बेत कदाचित् फसेल.'

गप्पा मारण्यात वेळ केव्हा गेला ते कळलेही नाही सरकारी नोटांच्या छापखान्यातील नोटांच्या चोरीच्या प्रकरणाची माहिती सावंतांनी तेवढ्यात अगदी रंगून सांगितली.

साडेअकराचा ठोका पडताच आनंदराव उठून उभे राहिले. टेबलाच्या खणांतून त्यांनी दोन वीत लांबीची, आत्मसंरक्षणाची भरीव नळी काढून ती माधवकडे दिली.

'हे खिशात असू द्या माधवराव!' ते म्हणाले, 'आपला माणूस अत्याचाराला प्रवृत्त होण्याचा चागलाच संभव आहे. चला सावंत! तुमच्या मोटारीचं प्रदर्शन नको आपल्याला. आपण एखादी टॅक्सी करू या.'

कमलनिवासाच्या बऱ्याच अलिकडे आनंदरावांनी टॅक्सी थांबविली. आकाशात चंद्राच्या अभावी असंख्य चांदण्या लुकलुकत होत्या. पायांचा आवाज होऊ न देण्याची खबरदारी घेत ते तिघे फाटकातून आत शिरले.

फळचा ठोकलेल्या खिडकीचे एक तावदान सावंतांनी हळूच उघडले.

'कोयंडा उघडून ठेवण्याची व्यवस्था केली आहे मी.' ते पुटपुटले, 'पण जपूनच या.'

एक– अर्ध्या मिनिटांनच ते तिघे कर्नल वढावकरांच्या अजबखान्याच्या अंधारात प्रविष्ट झाले सावंतांनी खिडकी परत ओढून घेतली. आनंदरावानी बारीक किरणाचा झोत टाकणारी बॅटरी खिशातून काढली. त्या अस्पष्ट प्रकाशझोताच्या साहाय्याने ते तिघे एका कोपऱ्यातील मोठ्या कोचामागे तयार झालेल्या त्रिकोणाकृति आडोशाच्या जागेत दडून बसले.

बाहेर अगदी शांतता होती. त्यांचा पहारा कंटाळवाणा होता. मध्येच कुणी गुलहौशी तरुण सिनेमातली गाणी तारस्वराने गात रस्त्यावरून गेला. दूरवरच्या रेल्वेलाइनवरच्या लोकलची रहदारी आता जवळजवळ थांबल्याने गाड्यांचा आवाजहि येईनासा झाला होता. खोलीत एका भिंतीवर टांगलेल्या घड्याळाच्या टक् टक् आवाजाखेरीज पूर्ण शांतता होती.

डोळ्यांवर येणारी झोप बाजूला सारताना माधवला जड जाऊ लागले होते. खोलीत संपूर्ण अंधार असला तरी बराच वेळ अंधारात राहिल्यावर सरावाने त्याना खोलीत अस्पष्ट दिसू लागले होते. लांब रस्त्यावर असलेल्या एका दिव्याच्या प्रकाशाची अस्पष्ट तिरीप, काचा असलेल्या खिडकीतून आत येत होती, तिकडे माधवचे लक्ष मधूनमधून वळत होते. तिकडून नजर वळ-

वून त्याने एकदा इतस्ततः नजर फिरवली. भुतासारखी दिसणारी एक चर्या आपल्याकडे पहात आहे हे लक्षात येताच तो किंचित् दचकला.

'मुखवटा आहे तो !' त्याच्या शेजारीच असलेल्या आनंदरावांना त्याचे दचकणे जाणवले. 'रेडिअमनं त्यावर मधूनमधून रंगवल्यानं भयंकर आभास निर्माण होतो आहे.'

माधवचे मन जरा निवांत झाले. पण त्याची नजर वरचेवर तिकडे वळू लागली. लष्करी अधिकाऱ्याकडेच शोभणारा पांढरा पोषाख घालणारा तो केशव त्याच्या डोळ्यांसमोर उभा राहू लागला.

दाराच्या बिजागरांचा सूक्ष्म आवाज कानी येताच तो खडबडून सावरून बसला. कुणी तरी आत येते आहे याची आनंदरावांना जाणीव करून देण्यासाठी त्याने आपला हात लांबवला.– पण आनंदराव आपल्या जागी नाहीत हे त्याच्या लक्षात आले.

मग काही क्षण शांततेत गेल्यावर खिडकीच्या मंद प्रकाशाच्या तिरिपीतून एक आकृति पुढे सरकून त्यापलीकडच्या अंधारात शिरलेली त्याला दिसली. त्यामागोमाग दुसरी एक आकृति त्याच्या डोळ्यापुढून सरकली. दाराच्या अगदी उलट दिशेच्या एका कोपऱ्यातल्या फुटक्या काचाच्या ढिगाऱ्याला कुणी तरी हात लावल्याने, काचांच्या तुकड्यांचा होणारा तो विशिष्ट आवाज त्याला ऐकू आला.

माधव उठून उभा रहात असतानाच एक अवाच्य शिवी आणि पाठोपाठ झटापटीचा आवाज त्याला ऐकू आला.

'माधवराव !– माधवराव !'

अर्धवट गुदमरलेला आनंदरावांचा तो आवाज कानी पडताच माधवने अंधारातच त्या आवाजाच्या दिशेने झेप घेतली. परस्परांशी झटणाऱ्या दोन माणसांवर तो आदळला.

एका दणकट पंज्याची पोलादासारखी पकड त्याच्या मानेभोवती आवळली गेली. आपल्या प्रतिस्पर्ध्याला हाताने मागे रेटण्याचा त्याने प्रयत्न केला, तेव्हा त्याने त्याच्या मनगटाला कडकडून चावा घेतला. त्या माणसाची शक्ति अजस्र होती. दिव्याचा स्विच् लावून सावंत मदतीला आले, तेव्हाच त्या माणसाला हतबल करून डांबून ठेवण्यात त्यांना यश आले.

आनंदरावांची चर्या पांढरी फटक पडलेली होती. उजव्या हाताने त्यांनी आपला डावा खांदा दाबून धरलेला होता. सकाळी त्यांनी अजबखान्याच्या एका कोपऱ्यात जो काचाचा ढीग जमा करून ठेवलेला होता,

त्यांच्या शेजारीच एक जड दंडुका पडलेला होता. त्या दंडुक्यानेच त्यांच्या खांद्यावर प्रहार करण्यात आला होता.

'हाच तुमचा माणूस सावंतसाहेब!' आनंदराव ओरडले, 'कर्नल वढावकरांचा खून करणं आणि कमलाबाईंच्या खुनाचा प्रयत्न करणं अशा दोन आरोपांवरून अटक करा ह्याला!'

इन्स्पेक्टर सावतांनी त्या व्यक्तीच्या डोक्यावरील बुरखावजा काळसर फडके मागे सारताच त्यांच्या स्वतःच्या आणि माधवच्या तोंडून आश्चर्योद्गार उमटला. त्यांच्यासमोर कॅप्टन मधुकर लहाने उभा होता!

० ० ०

सर्व सोपस्कार उरकल्यानंतर आनंदरावांबरोबर माधव त्यांच्या घरी परतला, तेव्हा उषःकालीन प्रकाश खिडक्यांतून डोकावू लागलेला होता. सुधाताईंनी दिलेल्या गरम चहाचे घुटके घेताना त्या दोघांनाही खूपच बरे वाटले

'खरंच माधवराव' आनंदराव म्हणाले, 'मला तुमची क्षमा मागितली पाहिजे. कॅप्टन मधुकर धोकेबाज आणि भयंकर माणूस आहे. तो रानटी इसम तुम्हाला चावला तो हात कसा आहे आता?'

'दुखला थोडा, पण आयडीन लावून बॅंडेज बांधलं आहे मी. आता काळजीचं काही कारण नाही.' तो म्हणाला, 'तुमच्या खांद्याचीच मला काळजी वाटते. बेट्यानं जोरात फटका मारला. तपासून पहायला हवं नीट!'

'नंतर! नंतर! तसं काही विशेष नाही.' ते उत्तरले, 'बाकी आपला माणूस पिंजऱ्यात येतो की नाही कुणास ठाऊक, अशी चांगलीच काळजी वाटू लागली होती मला.'

'पिंजरा?'

'आमिष लावलेला सापळा म्हणा हवं तर! माझ्या आमिषाचा गोड घास घेण्याचा प्रयत्न त्यानं केला नसता तर त्या कॅप्टन मधुकरला पकडणं कठीण झालं असतं. आपल्या खुनी माणसाच्या मनात ठाण मांडून राहणारी भीति त्याच्या अकलेवर मात करते, या अनुभवावरच मी फाशाचं दान टाकलं अन् ते मनासारखं पडलं.'

'खरं सांगायचं तर या रहस्याचा उलगडा तुम्ही कसा केलात हे मला अजूनही उमजलेलं नाही.' माधव म्हणाला.

आनंदरावांनी खुर्चीत मागे रेलून डोळे मिटले.

'त्यांत तसं फारसं रहस्य नव्हतंच. वस्तुस्थिति स्पष्ट होती. खुनी इसमानं स्वतः काहीतरी हालचाल करून एकंदर निष्कर्षाला थोडी बळकटी

आणून देण्याची आवश्यकता होती, एवढंच. परिस्थितिजन्य पुरावा हाच तज्ञ संशोधकाचा मार्गदर्शक असतो.'

'मला तर काही आढळलं नाही बुवा निरीक्षणात !'

'तुम्हाला आढळलं, पण त्यातले दुवे तुमच्या लक्षात आले नाहीत. दार बंद होतं, खिडक्या पण बंद होत्या, पण पडदे मात्र सरकवलेले नव्हते असं कुंदेनं सांगितलं, कांचेची तावदानं असलेल्या खिडक्यांचे पडदे, हे लक्षात घ्या ! शिवाय त्या तळमजल्यावरच्या खिडक्या आहेत.

'एकंदर परिस्थितीवरून मी असा तर्क केला की, कर्नलसाहेब कुणाची तरी वाट पहात असावेत आणि ती येणारी व्यक्ति अन् खुद्द कर्नलसाहेब या दोघांनाही घरात विशेष बोभाटा न होता परस्परांना भेटायचं असावं. त्यासाठी मुख्य दाराऐवजी बाजूच्या खिडकीतून येणं बरं असं त्यांना वाटत असावं त्या खिडक्या फ्रेंच धर्तीच्या आहेत. दारांसारखाच त्यांचा आकार आहे मध्यमवयीन लष्करी अधिकाऱ्याचा विवाह नुकताच एका तरुण आणि सुंदर स्त्रीशी झालेला आहे, तेव्हा चोरून भेटीमागे तसं काळंबेरं काही असण्याची शक्यता मला वाटली नाही घरांतल्या कोणा तरी व्यक्तीला त्या दोघांची तशी भेट होणं आक्षेपार्ह वाटत होतं, म्हणून खिडकीवाटे यायचं, एवढंच'

'पण खिडक्या तर बंद होत्या ?'

'अर्थात् ! जेवणानंतर कमलाबाई लगेच पतीबरोबर त्या खोलीत गेल्या अन् पति-पत्नीची काही तरी बोलाचाली झाली, असं कुंदेनं सांगितलं. तेव्हा मी विचार केला, कुणीतरी येणार आहे हे कर्नलसाहेबांना माहीत होतं, परंतु अकल्पितपणं त्यांची पत्नी त्यांच्याबरोबर खोलीत आली तेव्हा आपण एकटे नाही हे भेटीला येणाऱ्या व्यक्तीला कळावं म्हणून कर्नलसाहेबांनी खिडक्यांचे पडदे उघडे ठेवले. अर्थात प्रारंभी माझे हे सर्व अंदाज होते.'

'पण खिडकीवाटे गुपचुप येणारी ही व्यक्ति म्हणजे कोण होतं ?'

'आपल्या पुतण्याबद्दल-मधुकरबद्दल-कमलाबाईचं मत प्रतिकूल होतं हे आपल्याला माहीत आहे. प्रारंभी माझ्या मनात तोच त्या खिडकीवाटे येणार असला पाहिजे असा केवळ संशय होता. कुंदेच्या निवेदनातील नंतरच्या भागानं संशयाचं खात्रीत रूपांतर झालं. एका भयंकर खुनी इसमाचा यात हात आहे हे नक्की ठरलं'

'मी नाही समजलो !'

'आणि तरीही तुम्हीच ती गोष्ट ठासून उघडकीस आणलीत ! असं पहा, मी आमच्या माडीवर सिगरेट ओढीत पिस्तुलातून गोळ्या झाडण्याचे

प्रयोग करीत होतो, तेव्हा तुम्ही काय म्हणालात ? 'असह्य आहे. काय हा गोळीबार मैदानासारखा वास '–असं तुम्हीच म्हणालात ना ?'

'हां ! हां ! असं होय ?' माधव ओरडला, 'म्हणजे त्या खोलीत शिरताच कर्नलसाहेबांच्या सिगरेटचा वास आपल्याला जाणवला असं कुंदा म्हणाली त्यावरून तुम्हाला संशय आला ?–'

'अर्थात् ! दारं–खिडक्या बंद असलेल्या खोलीत दोनदा बार झाल्यानंतर तिथं दारूचाच वास दरवाळायला नको होता का ? त्याऐवजी कुंदेला सिगरेटचाच दर्प आला. यावरून त्या अजबखान्यात गोळ्या मुळीच झाडल्या गेल्या नाहीत याबद्दल तावडतोब खात्री झाली माझी. '

'पण घरातल्या माणसांना तर बार ऐकू आले '

'बंद खिडकीच्या बाहेरून गोळ्या झाडण्यात आल्या. मधुकरनं खिडकीच्या बाहेरून अप्पासाहेब अन् कमलाबाई यांच्यावर गोळ्या झाडल्या. खुनी पट्टीचा नेमबाज असला पाहिजे आणि म्हणूनच तो लष्करांतला माणूस असावा असा निष्कर्ष निघत होता. पण काही तरी खात्री पटायला हवी होती. म्हणूनच मी काल संध्याकाळी तुम्ही येण्याच्या वेळी आमच्या माडीवर कर्नलसाहेबांची सिगरेट पेटवून बसलो. तुमचा बोलण्याचा आवाज ऐकू येताच, कर्नलसाहेबांचा खून झाला त्याच आकाराच्या पिस्तुलामधून मी दोन गोळ्या झाडल्या.'

'ते काही असलं तरी पावडरच्या खुणांचा पुरावा होताच.' माधव पुटपुटला.

'नाही. पिस्तुलाच्या कार्ट्रिजमधून बाहेर पडणाऱ्या पावडरच्या खुणा हा एक मोठा वादग्रस्त अन् फसवा विषय आहे. त्याचा अभाव असणं हा काही आधार मानता येत नाही. ते असो. आपला तो प्रयोग पुष्कळच उपयुक्त ठरला हे खरं; पण आपण कमल निवासांत पाऊल टाकलं तेव्हाच माझ्या मनाची खात्री झाली होती. '

'तिथं तो नोकर पाहून तुम्ही जरा चमकलात खरे !'

'नाही, नोकराला पाहून नाही माधवराव ! तो ज्या खिडकीतून आत गेला ती फुटलेली खिडकी पाहून चमकलो मी. '

'पण मधुकरनं काचा फोडल्यावर त्या खिडकीतून आम्ही आत गेलो असं सांगितलंच होतं कुंदेनं !'

'एखाद्या तरुण स्त्रीच्या निवेदनात आपल्याला हवा तितका अचूकपणा नसतो. माधवराव, तुम्हाला आठवतं का ? कुंदा काय म्हणाली ?

खिडकीतून आतला भीषण प्रकार पाहिल्यावर मधुकरनं दगडानं खिडकी फोडली असं ती म्हणाली.'

'अगदी बरोबर!'

'तो नोकर खिडकीतून आत जातांना पाहून मी चकित झालो ते तो दाराजवळच्या खिडकीऐवजी पलिकडची खिडकी फोडलेली आहे, हे पाहून! मधुकरनं दगड उपसून काढला ती जागा पहिल्या खिडकीखालची आहे हे स्पष्ट दिसलं, दगड काढलेली जागा अलीकडे दिसते. मग त्यानं पलीकडच्या खिडकीकडे धाव घेऊन ती खिडकी का फोडली? हात मानेमागून पुढं आणून तोंडात घास घालण्यासारखाच हा द्राविडी प्रकार नाही का? कर्नलसाहेब कोणत्या सिगरेटस् ओढतात हे पाहिल्यावर प्रकरणाचा पाया पक्काच झाला कर्नलसाहेबांना कडक वासाच्या सिगरेटस् ओढण्याची संवय नव्हती.'

आनंदरावांनी खिशातून सिगरेटचे पाकीट काढून शांतपणे एक सिगरेट शिलगावली.

'माधवराव, त्या काचांचे सर्व तुकडे जुळवून त्यात पिस्तुलाच्या गोळ्यांची दोन लहानशी छिद्रं आहेत हे शाबीत करणं मला केवळ अशक्य होतं, तो माझा एक डाव होता. खिडकीच्या तावदानातील काचांचे तुकडे नष्ट करण्याचा प्रयत्न कोण करणार? अर्थात खुनीच. मी मुद्दामच त्याला तशी संधि दिली. त्यासाठी खोलीच्या कोपऱ्यात त्या सर्व काचा गोळा करून ठेवल्या. खोलीच्या दाराच्या कुलुपाची दुसरी चावी हस्तगत करून खुनी रात्री खोलीत शिरला. ती चावी आपल्याला त्याच्या खिशात सांपडलीच आहे. पुढचं सर्व माहीतच आहे तुम्हाला!'

'पण या साऱ्यामागचा हेतू काय आनंदराव?' माधव उद्गारला.

'हेतू शोधण्यासाठी फार धडपडायला नको.' आनंदराव हसून उत्तरले, 'कमलाबाईंनी अप्पासाहेबांशी विवाह करण्यापूर्वी मधुकर हा एकटाच अप्पासाहेबांचा वारसदार होता. त्याची बेजाबाबदार राहणी कमलाबाईंना आवडत नव्हती हेही आपल्याला कुंदेच्या बोलण्यावरून कळलंच आहे. अर्थात रूपवान, तरुण पत्नीच्या मताचा प्रभाव अप्पासाहेबांच्या मनावर पडणार यात शंकाच नव्हती. मधुकरच्या दृष्टीनं ती गोष्ट घातक होती. म्हणून त्याला कमलाबाईचा काटा काढायचा होता. अन् त्यांच्या खुनाला साक्षीदार नको म्हणून त्यांच्याबरोबर अप्पासाहेबांचाहि खून करणं त्याला भाग पडलं.

'त्या दिवशी रात्री, कर्नलसाहेब आपल्या पत्नीशी बोलताहेत हे पाहिल्यावर मधुकर उघडपणे दिवाणखान्यात शिरला. कुंदेशी आणि मेजर प्रकाशरावांशी जरा बोलून, पाणी पिण्याच्या निमित्तानं तो जेवणाच्या

खोलीत गेला आणि जेवणघराच्या खिडकीतून हळूच बाहेर पडून, अजबखान्याच्या खिडकीबाहेरून त्यानं अप्पासाहेब आणि कमलाबाई यांना गोळ्या घातल्या.

'आल्या वाटेनं परत जाऊन पाण्याचं भांडं हातात घेऊन मधल्या दारानं दिवाणखान्यात यायला काही सेकंदांचा अवधि पुरेसा होता. कर्नल वढावकरांच्या माथेफिरूपणाचाच हा प्रकार आहे ही समजूत पुरी करण्यासाठी, गोळ्यांमुळं फुटलेल्या काचा फोडून तो सर्वांच्या आधी अजबखान्यात शिरला आणि अप्पासाहेबांची नाडी पहाण्याच्या निमित्तानं खाली वाकताना त्यानं त्यांच्या हाताजवळ पिस्तुल टाकून ठेवलं.'

'आणि तिथं त्यावेळी कमलाबाई नसत्या आणि ठरल्याप्रमाणं चुलत्यापुतण्याची गाठ पडली असती तर?' माधवने विचारले.

'तर काय झालं असतं याची हवी ती कल्पना करता येईल आपल्याला. पण तो पिस्तुल घेऊन तयारीनिशी आला होता, त्या अर्थी काहीहि करून आपला डाव साधण्याचा त्याचा बेत होता हे नक्की दिसतं. त्यानं काय केलं असतं हे सांगणं कठीण आहे. हवे तितके पर्याय निघतील. एक गोष्ट मात्र नक्की. भयंकर आर्थिक अडचणीत असल्यामुळं तो जास्तच बेदरकार झाला होता. आपल्या हेतूआड येणारे सर्व अडथळे दूर करण्याचा त्याचा निर्धार होता. बाकी त्याच्या एकदर आर्थिक परिस्थितीचा छडा पोलीस लावतीलच म्हणा. सावंत भेटणार आहेत उद्यां आपल्याला.'

*



# सर्कस सुंदरी

कलेचा एक अप्रतिम नमुना असलेला तो खंजीर कुणातरी कलावंताने आपले कौशल्य पणाला लावून तयार केलेला असावा. कदाचित् पूर्वी एखाद्या शूरवीर सरदाराच्या कमरेला तो डौलाने लटकून मिरवला असेल. आता मात्र तो, जमिनीवर पालथ्या पडलेल्या एका माणसाच्या पाठीत खुपसलेला होता.

बोटांच्या ठशाचे तज्ञ त्या ऐषआरामी खोलीतील दिमाख लक्षात न घेता आपले काम करण्यात गर्क झालेले होते. छायाचित्रकाराचे काम पुरे होईपर्यंत डॉक्टर दावके निवांत उभे राहिले. इन्स्पेक्टर अनंत कामत नेहेमीप्रमाणेच आपल्या कडक इस्त्रीच्या पोषाखात एका खुर्चीच्या पाठीला रेलून उभे होते. त्यांची काळीशार बुबुळे सर्व तपशील टिपून घेण्यासाठी भिरभिरत होती.

उघडचा, बिनगजांच्या खिडकीतून सूर्यकिरणे आत आलेली होती. जमिनीवरील गालिचा, त्यावरील उंची फर्निचर ह्या साऱ्यांना त्यामुळे एक प्रकारची झळाळी आली होती. नानासाहेब कारुलकर हे केवळ धरणगावातीलच नव्हे, तर उभ्या देशातील एक धनाढ्य असामी; पण त्यांच्या त्या अलोट वैभवाचा आता त्यांना स्वत:ला असा काही उपयोग नव्हता. साध्या रायवळ लाकडाऐवजी फार तर चंदनाची चिता त्यांना त्यामुळे लाभण्याची शक्यता होती, एवढेच.

आपल्या जागेवरुन, उभ्याउभ्याच इन्स्पेक्टर कामतांनी काही वेळ मयताकडे निरखून पाहिले. मयत नानासाहेबांच्या चर्येचा अर्धवट भाग कामतांना तिथून दिसत होता, त्यावर अखेरच्या क्षणी भीतीचा आणि आश्चर्याचा उमटलेला ठसा अजूनही कायम होता. मयताच्या उजव्या हाताच्या मुठीत, अगदी पातळ निळसर काचेच्या पेल्याचा बुडाचा भाग अजूनही तसाच गच्च पकडलेला होता. पेल्यातील सरबत अंगावर सांडल्यामुळे मयताचा ओला झालेला शर्टही अजून पुरा वाळला नव्हता. प्रेताच्या शेजारीच दुसरा एक तसलाच काचेचा रिकामा पेला पडलेला होता.

—सुमारे चाळिशीच्या वयातील त्या धनाढ्य उद्योगपतीला इतकी वर्षे अविवाहित स्थितीत कंठल्यावर आता अलिकडेच आपला स्वत:चा असा संसार थाटण्याची इच्छा झाली होती. दोन आठवड्यांच्या अवधीनच कुमारी रंजना धारणे हिच्याबरोबर त्यांचा विवाह होणार होता. एका कोटयाधीश खाण–मालकाची मलगी त्यांनी पत्नी म्हणून निवडली होती. तसे पाहिले तर, नानासाहेबांसंबंधीच्या एकंदर लोकवार्तांत थोडाफार तरी तथ्यांश आहे असे मानले तर कुणाहि तरुणीला त्यांचे पत्नीपद तेवढेसे भूषणावह वाटले नसते. पण कदाचित् रंजना मोठ्या मनाची असेल...; मोठ्या घराण्यातील माणसे अशा गोष्टी महत्त्वाच्या मनोत नाहीत असेहि कदाचित् असेल.

डॉक्टरांनी आपले काम सुरू केल्यावर, कामतांनी नानासाहेबांचा नोकर दत्तोबा याला बोलावले.

'तो खंजीर नेहेमी नानासाहेबांच्या टेबलाच्या खणात असायचा. रात्री दहा वाजता नानासाहेबांनी पेय तयार करायचं सामान मागितलं. त्याप्रमाणं बाटली, पेले, पाणी वगैरे खोलीत नेऊन ठेवल्यावर मी झोपी गेलो,' अशी माहिती दत्तोबाने सांगितली. त्यानंतर रात्री काय झाले ते त्याला काहीच माहीत नव्हते. सकाळी साहेबांच्या खोलीचे दार बंद आहे म्हणून झाडझूड करणारी मोलकरीण ओरडत आली, तेव्हा दत्तोबाने आधी दार ठोठावले आणि मग बाहेरच्या बाजूने बागेतील खिडकीकडे धाव घेतली विनगजांची ती खिडकी उघडीच होती. तिच्यातून धन्याची अवस्था पाहिल्यावर दत्तोबाने ताबडतोब, काही हलवाहलव न करता पोलिसांना फोन केला होता.

कामतांनी दत्तोबाची चौकशी संपवली. त्यानंतर थोड्या वेळातच डॉ. दाबक्यांची तानडीची पहाणीही पुरी झाली ते उठून उभे राहिले.

'मध्यरात्री मृत्यु आला असावा.' त्यांनी मत व्यक्त केले, 'पूर्ण उत्तरीय तपासणीनंतर निश्चित सांगता येईल. पण खंजीर हृदयात शिरलेला दिसतो. हत्यार तसं विशेष धारदार नाही. घाव खूप जोरानं घातलेला असावा.'

'काल रात्री ते एखाद्या स्त्रीची वाट पहात असावेत, असं दत्तोबाचं मत झालेलं आहे.' कामत म्हणाले.

'हे काम एका स्त्रीन केलं असेल तर ती चांगलीच बळकट असायला हवी.' डॉक्टर म्हणाले.

'मृत्यु तावडतोब आला असावा का ?' कामतांनी विचारले.

'होय.' डॉक्टर उत्तरले.

प्रेत मोटारीत घालून दवाखान्यात पाठविण्याची व्यवस्था केल्यावर कामतांनी बोटांच्या ठशासंबंधी चौकशी केली. खंजिराच्या मुठीवर कसलेही ठसे नव्हते. येणाऱ्या दुसऱ्या रिकाम्या पेल्याची बाहेरची बाजूही साफ पुसून ठेवलेली दिसत होती.

'आश्चर्य आहे !' कामत उद्गारले, 'एक स्त्री–अन् नानासाहेबांच्याच टेबलाच्या खणातला खंजीर ! क्षणिक अवसानानं ह कृत्य घडलेलं दिसतं. खुनीनं शांतपणे आपल्या अस्तित्वाचे पुरावे नष्ट करण्याशी ते सुसगत दिसत नाही ! काय हवालदार ?

'काय की बुवा !' हवालदार मोरे उद्गारले, 'तुमचा अंदाज सहसा चुकत नाही. बघा साहेब आजूबाजूला. मी पेल्याच्या कांचा गोळा करतो तोपर्यंत.'

ते काम त्रासदायक आणि कंटाळवाणे होते. अगदी पातळ कांच असलेल्या त्या पेल्याचे शेकडो तुकडे झालेले होते आणि ते जमवल्याने काही निष्पन्न होणार आहे असेही कामतांना वाटत नव्हते. पण तपासातला एक आवश्यक भाग म्हणून त्यांना ते काम पुरे करायचे होते.

तुकडे गोळा करून झाले तेवढ्या वेळात खोलीची पहाणीही पूर्ण झाली होती. बिनगजाच्या खिडकीजवळ थोडी माती पडलेली होती, तीवरून त्या खिडकीवाटे कुणीतरी येऊन गेल्याचा अंदाज बांधता आला. पण पाव-लांचे स्पष्ट आकार उमजण्याइतपत ठसे जमिनीवर कुठेच उमटलेले नव्हते.

मोऱ्यांना जमिनीजवळ आढळलेला एक ओरखडा पहाण्यासाठी कामत खाली वाकले. चारपाच इंच लांबीची ती रेघ खिडकीच्या दिशेने सरळ खरडल्यासारखी उमटली होती. कामतांना तिच्यापासून काही बोध झाला नाही.

'काय असेल बुवा हे ?' त्यांनी प्रश्नोद्गार काढला.

'देव जाणे !' मोरे उत्तरले.

'रात्री थोडा पाऊस असता तर ओल्या मातीनं पायातल्या बुटांच्या किंवा चप्पलच्या खुणा उमटल्या असत्या काही असो. बागेत काही माग सापडतो का पहा तुम्ही लोक ! नानासाहेबांच्या भेटीला स्त्री आली होती की पुरुष, एवढं तरी निदान नक्की समजेल तर बरं ! नानासाहेबांनी दार आतून बंद कां करून घेतलं होतं तेहि समजत नाही.' कामत पुटपुटले.

तेवढ्यात दत्तोबाने आत येऊन रंजना आणि केशवराव काळे आल्याची वर्दी दिली.

'मीच रंजनाबाईकडे निरोप पाठवला होता, साहेब.' दत्तोबाने खुलासा केला.

'ठीक ठीक ! काळे म्हणजे नानासाहेबांचे वकील ना ?' कामतांनी विचारले.

'हो. केवळ वकीलच नाहीत; सारेच व्यवहार ते पहात होते.' दत्तोबाने माहिती पुरवली, 'साहेबांच पान हलत नव्हतं त्यांच्यावाचून.'

'ठीक आहे. पाठव त्यांना आत.'

कुमारी रंजना धारणे सुमारे पंचविशीच्या घरातली, उंच आणि दणकट बांध्याची तरुणी दिसत होती. तिची चर्या देखणी होती आणि तीवर काही रंगरगोटा नव्हता की भावनाहि नव्हत्या. नानासाहेबांच्या मृत्यूमुळे ती विशेष अस्वस्थ झालेली दिसली नाही. त्यामुळे तिला प्रश्न विचारणे

कामतांना अवघड गेले नाही. पण त्या प्रश्नोत्तरातून विशेष काहीच माहिती निष्पन्न झाली नाही.

केशवराव काळयांना विचारल्या गेलेल्या प्रश्नांचा मात्र चांगला उपयोग झाला. पन्नाशीच्या घरातील त्या उमद्या गृहस्थाचे सारेच केस काही पांढरे झालेले नव्हते. कामतांचे बोलणे त्यांनी शांतपणे ऐकून घेतले. या प्रकरणात कदाचित् एखाद्या स्त्रीचा संबंध असण्याची शक्यता कामतांनी व्यक्त केली, तेव्हा त्याच्या भुंवया उंचावल्या.

'रंजनाताई, तुम्ही जरा पलिकडच्या खोलीत जाता का?' शेजारच्या खुर्चीवर बसलेल्या रंजनेकडे वळून ते म्हणाले, 'मला यांच्याशी जरा मोकळ्या मनानं बोलायचं आहे.'

रंजना मुकाटयाने तिथून उठून गेली. कामत तिच्याकडे कौतुकाने पहात होते.

'पोरगी धीराची आहे, नाही?' ते पुटपुटले.

केशवराव हसले. 'मला वाटतं, तिला एका आपत्तीतून सुटका झाल्यासारखंच वाटत असेल. खरं म्हणजे मी असं बोलू नये. पण हे लग्न म्हणजे एक व्यावहारिक सोईचा भाग होता. म्हाताऱ्या धारण्यांना नानासाहेब कारुलकरांच्या भांवडलाची गरज होती, आणि रंजनेला संसारात तसा काहीच विशेष रस वाटण्याजोगा नाही. या विवाहात आपलं व्यक्तिगत स्वातंत्र्य अबाधित राहील अशी तिला खात्री होती. आणि तेच तिला हवं होतं! अलिकडे तिला काही गोष्टी समजल्या होत्या; पण ते आपले लोकप्रवाद आहेत. अन् तुम्हाला सत्य गोष्टी हव्या आहेत, नाही का? काल रात्री नानासाहेबांना कोण भेटलं होतं हे मी तुम्हाला सांगू शकेन.'

'छान!' कामत म्हणाले, 'बोला!'

'मात्र कृपा करून ह्या गोष्टीचा बभ्रा होणार नाही याची काळजी घ्या.' केशवरावांनी आपला आवाज खालावला. 'तुम्हाला माहिती देणं हे माझं कर्तव्य आहे. पण तिचा उपयोग करण्याची पाळी तुमच्यावर येणार नाही अशी मला आशा वाटते कारण त्या गोष्टीचा नानासाहेबांच्या मृत्यूशी काही संबंध असावा असं मला तरी वाटत नाही.'

'तसं झालं तर चांगलंच, असं मला म्हणता येत नाही!' कामत हंसून उद्गारले, 'शक्य त्या सर्व दिशांनी शोध करून नंतर एक दिशा ठरवायची हेच आमचं काम.'

'मी शक्य तेवढं थोडक्यात सांगतो; पण एकंदर परिस्थिति ध्यानी येण्याच्या दृष्टीनं थोडं मागे जाणं भाग आहे.' केशवराव सांगू लागले, 'तीन

वर्षापूर्वी, धरणगावातल्या ' राजविलास ' नाटचगृहात दोन महिने नाटकाचे प्रयोग करीत असलेल्या एका कंपनीत माधवी सावे नावाची एक तरुणी होती. मुख्य नायिकेची भूमिका काही तिच्याकडे नव्हती; नृत्य आणि गाण्याचं काम करायची ती. तमासगिरांच्या जीवनावरची दोन नाटकं त्या कंपनीची हातखंडा होती. तेव्हा तिची अन् नानासाहेबांची ओळख झाली अन् त्यातून पुढं–काय म्हणायचं त्याला, समजत नाही मला ! पण आपलं स्पष्ट बोललेलं बरं–त्या दोघांचा संबंध जुळला.' केशवरावांनी घसा खाकरला नानासाहेबांनी त्या पोरीला फारच वाईट तऱ्हेनं वागवलं आणि तिनं त्यांचा निरोप घेतला तो काही गोडीत होता असं म्हणता येणार नाही. त्यानंतर आत्ताच, आठदहा दिवसांपूर्वी त्यांना तिचं पत्र आलं. ' नेर्लेकर ग्रँड सर्कस ' बरोबर आपण धरणगांवाला येत आहोत आणि झालेल्या अपमानाचा बदला घेण्याच्या दृष्टीनं आपण ह्या वास्तव्याचा उपयोग करणार आहोत असं तिनं त्या पत्रांत नानासाहेबांना लिहिलेलं होतं.'

' असं होय ?' कामतांची उत्सुकता चांगलीच वाढली.

' लौकरच विवाह होण्याचं ठरलेलं असल्यामुळे नानासाहेब या पत्रानं फार अस्वस्थ झाले ' केशवराव पुढे सांगू लागले, ' ही भानगड मिटवून टाकायचं काम त्यांनी माझ्यावर सोपवलं. मी चौकशी केली, तेव्हा सर्कस-मधल्या ' प्रसन्न–प्रतिभा ' नांवाच्या खास खेळात माधवीचं काम असतं असं मला समजलं. सोमवारी सर्कशीचा पहिला प्रयोग झाला, त्याला मी गेलो आणि तिचं काम पाहिलं.

' सर्कस पहातांना मला परत बालपणांत गेल्यासारखं वाटलं. कदाचित् अंतःकरणातून आपण सारी मुलंच असतो, असंही म्हणता येईल. पण ती सर्कस मला फार आवडली. ' प्रसन्न–प्रतिभा ' हा खेळ तर फारच आवडला. 'प्रतिभा' आपल्या प्रियकराला पाठमोरी होऊन दुसऱ्याच एका तरुणाशी लघळपणा करते, त्याच्याबरोबर नाचते, गाते. तिचा प्रियकर, ' प्रसन्न ' रागावतो. तिला एका झाडाला खेटून उभी करतो अन् एकापाठोपाठ एक भराभर सुरे फेकून मारतो. फारच सुरेख काम होतं ते इन्स्पेक्टरसाहेब ! परस्परांवरील प्रेमाचा त्यांचा अभिनय इतका अकृत्रिम वाटतो ! उत्कंठेनं आणि भीतीनं पोटात गोळा उभा राहिल्यासारखं होतं. सुरे धडाधड त्या तरुणीच्या देहाभोवती, झाडाच्या बुंध्यात खुपसले जातात. नेमबाजी आणि मनाची धमकहि अजब बुवा ! इंचाच्या थोडचाशा भागानंहि नेम चुकला, की आटोपलच ! मला वाटतं, वर्षानुवर्षाच्या सरावान ही गोष्ट–'

'मान्य आहे. तुम्ही म्हणता तसंच असलं पाहिजे.– पण काळे ! त्या पोरीशी बोललांत का तुम्ही ?' कामतांनी अधीरपणे विचारले.

'तर !' केशवराव काहीसे नाराज झाले. 'मोटारीच्या गाड्यांवरच त्यांच्या रहाण्याच्या जागा आहेत. त्यापैकी तिच्या खास जागेत एका नोकरानं मला नेऊन पोचवलं आणि काही कामासाठी मोठ्या तंबूत गेलेल्या माधवीला बोलावून आणलं. मी तिला माझी ओळख करून दिली, आणि नानासाहेबांना आलेल्या पत्राचा उल्लेख करून, तुमच्या मनात काय आहे असं तिला स्पष्टच विचारलं. एकंदरीत ती बाब खरोखरच गंभीरपणाची झानली गेल्याबद्दल ती जरा घाबरल्यासारखी वाटली मला. सहज गंमत, नानासाहेबांना थोडी भीति दाखवावी म्हणून आपण ते पत्र लिहिलं, तसा त्यांना काही त्रास देण्याचा आपला मुळीच हेतु नाही, असं तिनं आवर्जून सांगितलं. खरं सांगायचं म्हणजे सुरे फेकण्याचं काम करणाऱ्या त्या तरुणावर तिचं प्रेम बसलेलं आहे असंहि मला समजलं. संजय पाठक नावाचा तोहि एक महाराष्ट्रीय तरुण आहे. जमलं तर माधवीजवळ एकदा समक्ष भेटीचं ठरवायला नानासाहेबांनी मला सांगितलं होतं. त्याप्रमाणं काल रात्री मी त्यांच्या भेटीची वेळ ठरवली होती. सर्कस रात्री आठला सुरू होते आणि नंतर तासाभरातच माधवीचं काम असतं. ते झाल्यावर तिनं नानासाहेबांना भेटावं आणि त्यांच्या मनातली भीति घालवून टाकावी अशी मी तिला सूचना केली, अन् तीहि त्याला तयार झाली.'

'आणि तिनं हा खून केला असावा असं तुम्हाला वाटतं ?' कामतांनी थेट विचारले.

'मुळीच नाही ! ती तशातली मुलगी आहे असं मला मुळीच वाटत नाही. ठरल्याप्रमाणं ती आली असावी. पण तिनंच हे कृत्य केलं असेल असं काही मला–'

'ठीक ठीक ! आम्ही पाहू ते. तुम्ही निश्चिंत रहा काळे !' कामतांनी त्यांना निरोप दिला.

केशवरावांच्या मागे दार लोटले जाईपर्यंत कामत त्यांच्याकडे पहात राहिले. मग मोऱ्यांकडे वळून ते म्हणाले, 'दत्तोबांनी सांगितलेल्या गोष्टीशी ही हकीकत जुळते, नाही ? बंद केलेलं दार. .आपल्या जुन्या प्रेयसीला भेटतांना व्यत्यय नको असं नानासाहेबांना वाटणं साहजिक आहे. पण खंजिराच्या वारामागं फारच मोठं बळ असावं, असं डॉक्टर म्हणतात... काय मोरे, तुमचं काही मत ?'

'अंहं !' मोरे पुटपुटले.

'या कांचा संभाळा आणि कुणालातरी त्या जुळवायला सांगा. बाकी त्याचा काही उपयोग होईल असं मला वाटत नाही म्हणा ! पण सर्व तपास पूर्ण झाला पाहिजे काय ? मला वाटतं, आपण आता नेर्लेकर ग्रँड सर्कसला भेट द्यावी.'

दत्तोबाने पुन्हा दार ढकलले. डॉक्टर दावक्यांना इन्स्पेक्टरांशी बोलायचे होते. फोनवरून त्यांच्याशी बोलतांना कामतांच्या तोंडातून आश्चर्योद्‌गार उमटला.

'पाच मिनिटांत आलोच !' त्यांनी रिसीव्हर एकदम आदळला आणि मोऱ्यांच्या दंडाला धरून त्यांना ओढीतच ते बाहेर पडले.

संगमरवरी, शुभ्र फरशी बसवलेल्या प्रेतगृहात डॉ. दावके त्यांची वाटच पहात होते.

'असा प्रकार कधी आपल्या आठवणीत नाही बुवा !' डॉक्टर उद्‌गारले, 'पण तुम्हीच पहा स्वतः ! खंजिराच्या पात्यानं दोन वेळा वार केलेले स्पष्ट दिसतात. दोन्ही वार वरच्या बाजूनं एकाच ठिकाणी सुरू होतात; पण पुढं त्यांचे मार्ग थोडे अलग झालेले आहेत.'

'म्हणजे नानासाहेबांना दोनदा भोसकलं गेलं की काय ?'

'पहा ना ! खंजीर खुपसला गेला त्या जखमेचं तोंड एकच आहे पण कुणाही माणसाला नेमक्या एकाच जागी दोन वार करता येतील असं वाटतं तुम्हाला ? मला तर नाही वाटत बुवा !'

'मग याचा खुलासा कसा होणार ?'

'माझी कल्पना म्हणाल तर अशी आहे की, खुनीनं एकदा खंजीर भोसकल्यावर तो बाहेर काढला आणि मग त्याचं टोक नेमकं जखमेवर ठेवून तो पुन्हा जोरात खुपसला. दुसऱ्यांदा खुपसतांना खंजीर जरा निराळ्या कोनात धरल्यामुळे त्याचा मार्ग अर्थातच थोडा बदलला. पण असा विक्षिप्तपणा करायची कुणाला आणि का इच्छा व्हावी, समजत नाही मला.'

कामत विचारमग्न झाले. खोलीत दोनतीन येरझारा मारल्यावर त्यांनी चुटकी वाजवली.

'मला त्याचं एक कारण सुचतं आहे, डॉक्टर !' ते उद्‌गारले, 'दुसऱ्यादा खुपसलं गेलेलं हत्यार दुसरं असलं पाहिजे !'

'म्हणजे ?'

'तुम्ही इकडे निघून आल्यावर आम्हाला आणखी काही गोष्टी समजल्या डॉक्टर ! सर्कशीतली एक तरुणी काल रात्री नानासाहेबांना भेटणार होती. आणि ही तरुणी एका सुरामारी करणाऱ्या–म्हणजे सुऱ्यांच्या नेम-

'मान्य आहे. तुम्ही म्हणता तसंच असलं पाहिजे.– पण काळे ! त्या पोरीशी बोललांत का तुम्ही ?' कामतांनी अधीरपणे विचारले.

'तर !' केशवराव काहीसे नाराज झाले. 'मोटारीच्या गाड्यांवरच त्यांच्या रहाण्याच्या जागा आहेत. त्यापैकी तिच्या खास जागेत एका नोकरानं मला नेऊन पोचवलं आणि काही कामासाठी मोठ्या तंबूत गेलेल्या माधवीला बोलावून आणलं. मी तिला माझी ओळख करून दिली, आणि नानासाहेबांना आलेल्या पत्राचा उल्लेख करून, तुमच्या मनात काय आहे असं तिला स्पष्टच विचारलं. एकंदरीत ती बाब खरोखरच गंभीरपणाची मानली गेल्याबद्दल ती जरा घाबरल्यासारखी वाटली मला. सहज गंमत, नानासाहेबांना थोडी भीति दाखवावी म्हणून आपण ते पत्र लिहिलं, तसा त्यांना काही त्रास देण्याचा आपला मुळीच हेतु नाही, असं तिनं आवर्जून सांगितल. खरं सांगायचं म्हणजे सुरे फेकण्याचं काम करणाऱ्या त्या तरुणावर तिचं प्रेम बसलेलं आहे असंहि मला समजलं. संजय पाठक नावाचा तोहि एक महाराष्ट्रीय तरुण आहे. जमलं तर माधवीजवळ एकदा समक्ष भेटीचं ठरवायला नानासाहेबांनी मला सांगितल होतं. त्याप्रमाणं काल रात्री मी त्यांच्या भेटीची वेळ ठरवली होती. सर्कस रात्री आठला सुरू होते आणि नंतर तासाभरातच माधवीचं काम असतं. ते झाल्यावर तिनं नानासाहेबांना भेटावं आणि त्यांच्या मनातली भीति घालवून टाकावी अशी मी तिला सूचना केली, अन् तीहि त्याला तयार झाली.'

'आणि तिनं हा खून केला असावा असं तुम्हाला वाटतं ?' कामतांनी थेटच विचारले.

'मुळीच नाही ! ती तशातली मुलगी आहे असं मला मुळीच वाटत नाही. ठरल्याप्रमाणं ती आली असावी. पण तिनंच हे कृत्य केलं असेल असं काही मला–'

'ठीक ठीक ! आम्ही पाहूं ते. तुम्ही निश्चित रहा काळे !' कामतांनी त्यांना निरोप दिला.

केशवरावांच्या मागे दार लोटले जाईपर्यंत कामत त्याच्याकडे पहात राहिले. मग मोऱ्यांकडे वळून ते म्हणाले, 'दत्तोबांनी सांगितलेल्या गोष्टींशी ही हकीकत जुळते, नाही ? बंद केलेलं दार. आपल्या जुन्या प्रेयसीला भेटतांना व्यत्यय नको असं नानासाहेबांना वाटणं साहजिक आहे. पण खंजिराच्या वारामागं फारच मोठं बळ असावं, असं डॉक्टर म्हणतात... काय मोरे, तुमचं काही मत ?'

'अंहं !' मोरे पुटपुटले.

'या कांचा संभाळा आणि कुणालातरी त्या जुळवायला सांगा. बाकी त्याचा काही उपयोग होईल असं मला वाटत नाही म्हणा ! पण सर्व तपास पूर्ण झाला पाहिजे काय ? मला वाटतं, आपण आता नेर्लेकर ग्रँड सर्कसला भेट द्यावी.'

दत्तोबाने पुन्हा दार ढकलले. डॉक्टर दावक्यांना इन्स्पेक्टरांशी बोलायचे होते. फोनवरून त्यांच्याशी बोलतांना कामतांच्या तोंडातून आश्चर्योद्गार उमटला.

'पाच मिनिटांत आलोच !' त्यांनी रिसीव्हर एकदम आदळला आणि मोऱ्यांच्या दंडाला धरून त्यांना ओढीतच ते बाहेर पडले.

संगमरवरी, शुभ्र फरशी बसवलेल्या प्रेतगृहात डॉ. दावके त्यांची वाटच पहात होते.

'असा प्रकार कधी आपल्या आठवणीत नाही बुवा !' डॉक्टर उद्गारले, 'पण तुम्हीच पहा स्वतः ! खंजिराच्या पात्यानं दोन वेळा वार केलेले स्पष्ट दिसतात. दोन्ही वार वरच्या बाजूनं एकाच ठिकाणी सुरू होतात; पण पुढं त्यांचे मार्ग थोडे अलग झालेले आहेत.'

'म्हणजे नानासाहेबांना दोनदा भोसकलं गेलं की काय ?'

'पहा ना ! खंजीर खुपसला गेला त्या जखमेचं तोंड एकच आहे पण कुणाही माणसाला नेमक्या एकाच जागी दोन वार करता येतील असं वाटतं तुम्हाला ? मला तर नाही वाटत बुवा !'

'मग याचा खुलासा कसा होणार ?'

'माझी कल्पना म्हणाल तर अशी आहे की, खुनीनं एकदा खंजीर भोसकल्यावर तो बाहेर काढला आणि मग त्याचं टोक नेमकं जखमेवर ठेवून तो पुन्हा जोरात खुपसला. दुसऱ्यांदा खुपसतांना खंजीर जरा निराळ्या कोनात धरल्यामुळे त्याचा मार्ग अर्थातच थोडा बदलला. पण असा विक्षिप्तपणा करायची कुणाला आणि का इच्छा व्हावी, समजत नाही मला.'

कामत विचारमग्न झाले. खोलीत दोनतीन येरझारा मारल्यावर त्यांनी चुटकी वाजवली.

'मला त्याचं एक कारण सुचतं आहे, डॉक्टर !' ते उद्गारले, 'दुसऱ्यादा खुपसलं गेलेलं हत्यार दुसरं असलं पाहिजे !'

'म्हणजे ?'

'तुम्ही इकडे निघून आल्यावर आम्हाला आणखी काही गोष्टी समजल्या डॉक्टर ! सर्कशीतली एक तरुणी काल रात्री नानासाहेबांना भेटणार होती. आणि ही तरुणी एका सुरामारी करणाऱ्या—म्हणजे सुऱ्यांच्या नेम-

बाजीचा खेळ दाखवणाऱ्या तरुणाची सहकारिणी–माफ करा हं! सहका-रिणी म्हणजे पत्नी नव्हे, त्याच्याबरोबर काम करणारी–आहे. आता बोला! काही कल्पना सुचते तुम्हाला ?'

' म्हणजे आपल्याला जो खंजीर सांपडला त्यानं नानासाहेबांचा खून झालेला नाही, असंच तुम्हाला म्हणायचं आहे ना? दुसऱ्याच सुऱ्यानं त्यांना भोसकलं गेलं, आणि नंतर–'

' तशीच कल्पना आहे माझी. खंजीर बोथट आहे; पण सर्कशीत नेमबाजीसाठी वापरतात ते सुरे विलक्षण टोकदार असलेच पाहिजेत. शिवाय ते चटकन् ओळखू येण्यासारखे असणार! त्या तरुणीला ही गोष्ट सुचल्या-वाचून कशी राहील? हे हत्यार मागं ठेवून चालायचं नाही याची तिला जाणीव न झाली तरच नवल! नानासाहेबांच्या टेबलाच्या खणात तिला तो खंजीर दिसला आणि .....आलं लक्षात मी काय म्हणतो ते? तुमच्या शोधाशी हे कितपत जुळतं पहा.'

' अगदी बरोबर!' डॉक्टरांनी डाव्या हाताच्या तळव्यावर उजव्या हाताची मूठ आपटली. ' एवढंच नाही, वार दोनदां झालेले असावेत याचा खुलासा केवळ त्या एकाच रीतीनं होऊ शकेल!'

' अच्छा! तुमच्या या शोधानं आमचं काम सोपं झालं डॉक्टर!' कामत म्हणाले, ' चला मोरे! गेलंच पाहिजे आपल्याला.'

० ० ०

गांवालगतच्या मैदानावरील सर्कशीच्या तंबूकडे मोटार वळवतांना कामतांनी खालचा ओठ दाताखाली गच्च दाबून धरलेला होता.

' साहेब!' मोऱ्यांनी शांततेचा भंग केला, ' वार झाला तेव्हा नानासाहेबांच्या हातात पेला होता–'

' आहे माझ्या लक्षात.' कामत अस्वस्थपणे उत्तरले.

मग सर्कशीच्या जागी, फडफडणाऱ्या कापडाच्या त्या छोट्याशा शहरवजा तंबूत जाऊन पोचेपर्यंत दोघेही गप्प होते. एका दांडगटाने त्यांना माधवीचे निवासस्थान दाखविले. जवळ जाताना, एका खिडकीचा पडदा सळसळत असल्याचे कामतांच्या ध्यानी आले.

' आपली वाट पहाते आहे वाटतं!' ते पुटपुटले.

फळयांची शिडी चढून त्यांनी त्या तंबूच्या दारावर बोटांनी टक्टक् केले दारावरचा भाग ताबडतोब एका सुंदर तरुणीने उघडला. तिचे ओठ उजवीकडे किंचित् दुमडलेले होते. डोळ्यात एक निराळीच चमक होती.

' आपणच कुमारी सावे का ?' कामतांनी विचारले.

'का ? काय काम आहे ?' तिने उलट प्रश्न केला.

'मी इन्स्पेक्टर कामत. आणि हे हवालदार मोरे आहेत. काल रात्री नानासाहेब कारुलकरांचा खून झाला, त्याची चौकशी आम्ही करतो आहोत. त्यांना भेटणाऱ्या तुम्हीच शेवटच्या व्यक्ति आहात असं मला कळलं—'

'आत या !' ती तुटकपणे म्हणाली आणि त्यांना आत येऊ देण्यासाठी दाराचा खालचा अर्धा भाग उघडून बाजूला झाली. एका बांकवजा फळकुटावर बसण्यासाठी कापड अंथरलेले होते. त्यावर त्यांना बसायला सांगून ती स्वतः उभीच राहिली.

'काय माहिती हवी आहे तुम्हाला ?' तिने विचारले.

'काल रात्री तुम्ही नानासाहेबांना भेटलात तेव्हा काय झालं ते सांगा सारं.' कामत उत्तरले.

'मी त्याना भेटलेच नाही मुळी !' 'प्रतिभा' ऊर्फ माधवी सावे म्हणाली.

'त्यात काही अर्थ नाही बाई ! नानासाहेबांशी तुमची ओळख होती आणि त्यांनी काल रात्री तुम्हाला भेटीला बोलावलं होतं हे केशवराव काळ्यांनी सांगितलं आहे आम्हाला. ही एक फार गंभीर घटना आहे. तुम्ही आमच्यापासून काही लपवालपवीचा प्रयत्न न करणंच तुमच्या फायद्याचं ठरेल.'

'ठरल्याप्रमाणं मी त्यांच्या भेटोला गेले नाही, हे सांगितलं ना मी तुम्हाला ?'

'का ?'

'का म्हणजे काय ? कशाला भेटायचं मी त्यांना ? त्या माणसाचं मन निश्चित झालं किंवा न झाल तरी मला काय त्याचं ?'

'तुम्ही जाण्याचं कबूल केल होतंत.'

'हो, पण गेले नाही.' ती म्हणाली. पण त्या शब्दात खरेपणाचा अंशहि प्रतीत होत नव्हता.

'तुम्हाला असंच वागायच असेल तर तुमची मर्जी !' कामतानी आपला स्वर एकदम कठोर केला. 'सर्कशीतल्या प्रयोगात तुम्ही वापरतां ते सुरे किती आहेत ?'

'चाळीस.'

'कुठं आहेत ते ?' कामतांची नजर तिच्या नजरेवर खिळली होती. तिच्या दृष्टीच्या रोखाने त्यानी एका सागवानी, लांबट पेटीकडे पाहिले. 'त्यात ? पाहू का मी ?'

१७३९२ २२५९८

'पहा हवं तर !' ती कुऱ्यानेच म्हणाली.

मोऱ्यांनी ती पेटी आणून कामतांपुढे ठेवली. तीत मखमली गादी बसविलेले एकावर एक असे चार कप्पे होते आणि प्रत्येक कप्प्यांत दहा-दहा सुरे होते. निळसर झाक असलेल्या त्या पोलादी सुऱ्यांच्या मुठी कोरीव शिसवी लाकडाच्या होत्या.

त्या सुऱ्यांची सूक्ष्मदर्शक काचेतून पहाणी करून कामतानी एक सुरा हातात घेतला. त्यांच्या तोंडून शीळ उमटली.

'सुरीच्या पात्यांवरचं सगळं रक्त पुसून टाकणं फार कठीण असतं, माधवीबाई !' ते म्हणाले, 'पातं मुठीत बसवलेलं आहे त्या खोबणीजवळ थोडा रक्ताचा अंश राहिलेला आहे–हा इथं ! हे डाग रक्ताचे आहेत ही गोष्ट सिद्ध करण कठीण जाणार नाही ! आता तरी खरं सांगणार का तुम्ही ?'

माधवी काही क्षण निश्चल उभी होती. तिचे पांढरेशुभ्र दात लाल-चुटूक अधरोष्ठात जोराने रोवले गेले.

'हो.' काही क्षणांनी ती उद्गारली, 'मी खरं सांगणार आहे तुम्हाला. मीच खून केला त्यांचा !'

'हा कबुलीजबाब समजायचा का ?' कामतांनी विचारले.

'काय हवं ते समजा तुम्ही !' माधवी त्वेषाने म्हणाली, 'केल्या कृत्याबद्दल मला मुळीच वाईट वाटत नाही. ठरल्याप्रमाणं मी त्यांना भेटले. माझ्या मनात तसा काही हेतु नव्हता. त्यांना काहीही त्रास द्यायचा नव्हता मला. पण तसं मी त्यांना सांगताच त्यांनी लघळपणा सुरू केला. पूर्वीसार-खेच ते माझ्याशी लगट करू लागले. 'असं काही कराल तर ठार करीन' असं मी त्यांना बजावलं, तेव्हा ते नुसतेच हसले. मग–मग खरंच तसं केलं मी.'

'तुमच्या मनात काही गैरहेतु नव्हता तर तुम्ही सुरा कशाला नेलात बरोबर ?'

'होय–कशाला नेला ?' एक तरुण धाडधाड शिडी चढून आत येत ओरडला, 'तिला त्या प्रश्नाचं उत्तर देताच येणार नाही ! कारण ती साफ खोटं बोलते आहे ! तुम्ही हिला भेटायला येताहात हे कुणीतरी मला सांगितलं म्हणून बरं झालं ! बाहेरून तुमचं थोडंसं बोलणं ऐकलं मी .ती असं काहीतरी करील हे जाणून होतो मी ! मला वाचवण्यासाठी ती साफ खोटं बोलते आहे ! नानासाहेब कारुलकरांना मी मारलं ! अन् हे तिला माहीत आहे.'

त्या तरुणाच्या त्या विधानाने कामत थक्क होऊन काही क्षण गप्प



राहिले. त्यांचे आकुंचित डोळे माधवीच्या भीतिग्रस्त डोळ्यांकडून त्या नवागताच्या रुबाबदार, नीटस चर्येकडे वळले.

'होय. संजय पाठक माझं खरं नांव. आमचं एकमेकांवर प्रेम आहे. म्हणूनच ती अपराधाची जबाबदारी स्वतःकडे ओढून घेते आहे.' 'प्रसन्न' ऊर्फ संजय पाठक उत्तरला.

'मीच खून केला त्यांचा !' गच्च आवळलेल्या दातातून माधवीने हा उद्गार काढल्यामुळे इतरांना कसाबसा ऐकू आला, 'मी त्यांना भोसकलं ! कारण–'

'कोण खरं सांगतं आहे हे तावडतोब सिद्ध करता येण्यासारखं आहे!' तिचा सहकारी तिला थांबवून म्हणाला, 'त्यांना भोसकल्यावर काय केलंस तू ? सांग पाहू !'

'मी–मी सुरा परत उपसला आणि इथं आणून स्वच्छ करून पेटीत परत ठेवला.' माधवी उत्तरली.

'आणि दुसरा खंजीर ?'

'दुसरा ?' मनाचा गोंधळ सावरून वेळ मारून नेण्याच्या प्रयत्नात माधवी जास्तच गडबडली. 'म्हणजे ? काय बोलता आहात तुम्ही ? मला समजत नाही.'

'नाहीच समजायचं !' संजय पाठक ओरडला, 'पाहिलंत इन्स्पेक्टर ? खजिराची माहितीसुद्धा नाही तिला ! ती खोटं बोलते आहे हे यावरून स्पष्ट होतं आहे. तिच्याकडे लक्ष देऊ नका तुम्ही ! नेमकं काय घडलं ते मी सांगतो.'

'संजय, असं काही करू नका! माझी शपथ आहे तुम्हांला!' माधवी म्हणाली.

'खरी गोष्ट अशी आहे इन्स्पेक्टर, आपण नानासाहेबांना भेटणार आहोत हे हिनं मला अगोदर सांगितलं. आणि तिला कदाचित् काही त्रास होईल म्हणून मी तिचा पाठलाग केला. जातांना मी पेटीतला एक सुरा मुद्दाम बरोबर घेतला होता. नानासाहेबांनी हिच्याशी लगट करायचा प्रयत्न केला तेव्हा मी उघड्या खिडकीच्या बाहेर उभा होतो. ते दृश्य पाहून मला भयंकर चीड आली! अन् आपण काय करीत आहोत याचं भान न राहून मी त्यांच्यावर नेम धरून सुरा फेकला. ते ठार झाले हे पाहिल्यावर मात्र, सुरा तिथंच ठेवून भागायचं नाही असं माझ्या ध्यानात आलं. तो सहज ओळखता येण्यासारखा होता. तो उपसून काढून मी माधवीजवळ दिला आणि नीट पुसून जागच्या जागी ठेवून देण्याकरता तिला तिथून ताबडतोब निघायला सांगितलं. ती गेल्यावर नानासाहेबांच्या टेबलाच्या खणातला खंजीर मला दिसला. त्या खंजिरानंच त्याचा खून झाला असा देखावा करता आला तर जास्तच चांगलं, अशी माझी कल्पना झाली. मग तो काळजीपूर्वक जखमेत खुपसून मी त्याची मूठ रुमालानं नीट पुसली; बोटाचे ठसे नष्ट केले; आणि खून झाल्याचं सकाळपर्यंत उघडकीस येऊ नये म्हणून दाराला आतून कडी घालून खिडकीतून बाहेर पडलो. ही हकीकत खरी आहे हे तुम्हाला माहीत आहेच! खरं की नाही?'

कामत हंसले.

'नानासाहेबांनी माधवीशी लघळपणा केला तेव्हा आपण सुरा फेकला असं तुमचं म्हणणं आहे?'

'हो. त्यांनी तिला आपल्या बाहुपाशांत घेतलं होतं आणि—'

'तुम्ही खोटं बोलता आहात संजय!' माधवी किंचाळली, 'मला वाचवण्यासाठी खोटं बोलता आहात तुम्ही! मी मुळीच त्यांच्या...'बोलता-बोलताच घेरी येऊन ती खाली कोसळली.

○ ○ ○

कचेरीत बसून टेबलावरील निरनिराळे कागद चाळताना कामतांची चर्या विलक्षण गंभीर झाली होती. मोरे त्यांच्याकडे गुपचुप पहात उभे होते. अगदी सरळ, साधा दिसणारा तो खुनाचा गुन्हा उत्तरोत्तर जास्त जास्तच गूढ बनत चालला होता

दारावर 'टक्टक्' करून साध्या वेषांतील एक पोलिस आत आला.

त्याच्या हातात मोठ्या कसोशीने तुकडे जुळवून चिकटवलेला निळसर, पातळ काचेचा पेला होता.

'हे एवढच जमलं साहेब !' त्याने कामतांपुढे फारच बारीक तुकडे असलेला एक कागद ठेवला. 'हे बारीक कण उरले आहेत; पण पेल्यात एक मोठं खिंडार उरतंय ते भरायला हे कण नक्कीच पुरणार नाहीत. थोडी तरी काच बेपत्ता आहे यातली.'

कामतांनी पेल्याची बारकाईने तपासणी केली.

'चुकून तुकडे तिथं राहिले किंवा हरवलेले नाहीत ना ?' त्यांनी विचारले.

'अगदी नक्की नाही !'

'ठीक आहे छान काम केलंस तू !'

तो बाहेर गेल्यावर कामतांनी मोऱ्यांकडे पाहिले. मग पुन्हा त्यांनी पेल्याची पहाणी सुरू केली. 'नक्की एखादा तुकडा बेपत्ता आहे मोरे ! काय झालं असावं त्याचं ?'

'काय की बुवा !' मोरे पुटपुटले.

'भोसकण्यात आलं त्या वेळी नानासाहेबांच्या हातात पेला होता— निदान तसं आपण समजतो. खुनीनं काचेचा एखादा तुकडा उचलून विजय-चिन्ह म्हणून घरी नेला असेल अशी काही शक्यता नाही ! उलटपक्षी, तो तिथं वावरला असेल तर कदाचित् खरंच ! नवल आहे !' कामतांचे डोळे एकदम चमकले. 'मोरे ! खिडकीजवळ जमिनीवर पडलेला ओरखडा आठवतो तुम्हांला ?'

'हो !' काही न उमजून मोरे उत्तरले.

'असंच असण्याची शक्यता आहे !' कामतांनी चुटकी वाजवली. 'आपण चौकशी केलीच पाहिजे ! ते काम तुमच्याकडे ! नीट लक्षांत घ्या मी काय सांगतो ते ..'

इन्स्पेक्टरसाहेबांच्या सूचना समजावून घेतांना हवालदार मोऱ्यांची चर्या आश्चर्यचकित झाली होती.

'निघा लगेच !' कामत म्हणाले, 'आणि वेळ लावू नका !'

मोरे बाहेर पडल्यावर कामत काही वेळ विचारमग्न अवस्थेत बसून होते. वरचेवर त्यांची नजर दाराकडे वळत होती. त्यांची अपेक्षा पूर्ण व्हायला फारसा वेळ लागला नाही. एका शिपायाने केशवराव काळे येत असल्याची वर्दी दिली आणि तो बाहेर जातो, तेवढ्यांत केशवराव स्वत: आत आले. त्यांच्या चर्येवर उत्कंठा ओसंडत होती.

'तुम्ही तपास फारच जलद गतीनं पुरा केलात इन्स्पेक्टरसाहेब. धन्यवादच दिले पाहिजेत तुम्हाला ! खुनील्या खरंच अटक केलीत ?'

'त्या सुरेफेक्याला आणि त्याच्या प्रेयसीला खाली बसवून ठेवलं आहे. अजून आरोप ठेवलेला नाही मी. त्यापूर्वी तुमच्याशी बोलायचं होतं थोडं. बघायचे आहेत त्या दोघांचे जबाब ?' सर्कशीच्या तंबूतील बोलणी मोऱ्यांनी टिपून घेतली होती, ते कागद कामतांनी केशवरावांना दाखवले.

कामतांनी पुढे केलेले ते कागद वाचतांना केशवराव केसांतून हात फिरवीत होते.

'अजब आहे !' ते पुटपुटले, 'दोघांचंही म्हणणं खरं असणं अशक्य आहे ! दोघांपैकी कुणीतरी खोटं सांगतं आहे हे नक्कीच !'

'दोघांपैकी कुणाचंच निवेदन खरं नाही !' कामत म्हणाले, 'पोरीचं म्हणणं तर साफ खोटंच आहे. त्या पोराच्या जबाबाबद्दल सांगायचं तर— नानासाहेबांचा खून झाला त्यावेळी त्यांनी माधवीला आपल्या मिठीत घेतलं होतं हे त्याचं विधान साफ खोटं आहे. कारण वार झाला त्यावेळी नानासाहेबांच्या हातात सरबताचा पेला होता, हे चांगलं माहीत आहे आपल्याला मोठी अजब परिस्थिति आहे ! दोघांनाही आपलं प्रेम असलेल्या व्यक्तीनं खून केला असं वाटतं आहे. खरं म्हणजे ती दोघंही निरपराधी आहेत.'

'पण ज्या सुऱ्यानं खून झाला तो तुम्हाला मिळाला, असं या कागदांवरून दिसतं आहे.' केशवराव काळे म्हणाले.

'अर्थात् ! आणि तो कुणी वापरला हेही मला माहीत आहे. खरोखरी काय घडलं त्याची हकीकत ऐकण्याची तुम्हाला कदाचित् उत्कंठा असेल.'

'नक्कीच !'

'मग ऐका,' कामत सांगू लागले, 'माधवी ठरल्याप्रमाणे नानासाहेबांना भेटायला खिडकीतून आत गेली आणि अनपेक्षितपणे तिला ते जमिनीवर मरून पडलेले दिसले. आपल्या सहकाऱ्याला संशय, मत्सर वाटत आहे हे तिला माहीत होतं. 'प्रसन्न-प्रतिभा' या सर्कशीतल्या कार्यक्रमात वापरल्या जाणाऱ्या सुऱ्यांपैकीच एक सुरा नानासाहेबांच्या पाठीत खुपसलेला आहे हेही स्पष्ट दिसलं तिला मग संजय पाठकनंच त्यांना भोसकलं, यापेक्षा दुसरा काय समज होणार तिचा ?

'त्या दोघांचं एकमेकांवर गाढ प्रेम आहे.' कामतांचा स्वर मृदु झाला. 'सुरा दिसताच संजयचा संशय घेतला जाणार हे माधवीनं ताडलं. मोठ्या निर्धारानं, आपलं सारं धैर्य एकवटून तिनं तो सुरा उपसून घेतला

आणि मागंपुढं न पहाता, धावतच ती मुक्कामावर पोचली.

'पण,' केशवराव बोलू लागले, 'तसं मानलं तर–'

'जरा थांबा! सांगतो ते एका. खुनीला एक गोष्ट ठाऊक नव्हती. ती म्हणजे, संजय पाठकला या गुप्त भेटीची माहिती होती आणि त्याला एकंदरीत ते बरं वाटत नव्हतं. तो माधवीच्या मागोमाग तिथं गेला, तो नेमका ती रक्तानं माखलेला सुरा घेऊन खिडकीवाटे बाहेर पडत होती त्या वेळी! त्याला नवल वाटलं! काय आहे ते जाणून घेण्यासाठी आणि काही करता आलं तर पहावं म्हणून तो खिडकीवाटेच खोलीत शिरला.

'आत पडलेलं प्रेत त्याला दिसलं आणि हे माधवीचंच कृत्य असावं असा त्याचा समज झाला. तो एखाद हत्यार शोधू लागला. नानासाहेबांच्या खणात एक खंजीर सापडला, तो खंजीर जखमेत खुपसला तर खून कुणी केला याचा निश्चित पत्ता लावणं कठीण ठरेल अशी त्याला कल्पना सुचली. माधवीनंच खून केला असावा असा त्याचा ग्रह झाला, त्याबद्दल त्याला दोष देता येणार नाही. अशा प्रकारे त्या दोघांनाहि आपल्यापैकी दुसऱ्यानं खून केला अशी खात्री वाटू लागली. तो विषय काढून खात्री करून घेणं अर्थातच दोघांनाहि आवडलं नाही. एकमेकांना वाचवण्यासाठी मग दोघंहि स्वतःवर सारं ओढवून घेऊं लागली! फारच मूर्खपणानं,– पण कौतुक वाटावं असंच वागली ती दोघं. तुम्हाला नाही असं वाटत?'

केशवराव काळ्यांची चर्या गंभीर झाली होती. एका शिपायाने येऊन कामतांना काही जरुरीच्या कामासाठी बाहेर बोलावल्याने केशवरावांना काही मिनिटे स्वस्थ बसावे लागले. पाचदहा मिनिटातच कामत परत आले, ते फारच गंभीर चर्या करून.

'तुम्ही सांगितली ती हकीकत खरंच खरी वाटते तुम्हाला इन्स्पेक्टर?' केशवरावांनी कपाळावर आठ्या चढवीत कामतांना विचारले.

'वाटण्याचा प्रश्न नाही! ती खरी आहे, हे माहीत आहे मला.' कामत म्हणाले, 'खुनी कोण आहे हेहि मी जाणून आहे. दोन निरपराधी तरुण व्यक्तींवर आळ घालायला ही चांगली संधि हेरणारा तो माणूस फारच भयंकर मानला पाहिजे. माधवी रात्री नानासाहेबांकडे जाणार आहे हे माहीत असलेली, माधवी–संजयच्या सुऱ्यांपैकी एका सुरा हस्तगत करण्याची संधि असलेली, अशीच ती व्यक्ति असणार. आणि ही पात्रता असणारी एकच व्यक्ति आहे काळे!' कामत काळ्यांकडे रोखून पहात म्हणाले.

'म्हणजे काय?' केशवराव काळे रागारागाने उठून उभे राहिले. 'कृपा करून डी. एस्. पी. साहेबांना बोलवाल तर–'

'खाली बसा !' कामतांनी खरोखरच त्यांना बळेच खुर्चीवर बसविले. 'नानासाहेब कारुलकरांचा खून तुम्ही केलात असा आरोप ठेवतो आहे मी तुमच्यावर !'

'तुम्हांला वेड लागलं असलं पाहिजे ! मी कशाला–'

'आपलं अनमानधपक्यानं बोलायचं तर मी म्हणेन, तुम्ही नानासाहेबांच्या संपत्तीचा अपहार केला असेल, काहीतरी बनवाबनवी केली असेल. विवाह व्हायचा, तो एका खाण–मालकाच्या मुलीशी ठरलेला आणि त्या खाण–मालकाला भांडवलाची गरज. साहजिकच नानासाहेब स्वतःच्या आर्थिक परिस्थितीची मोजदाद करणार, हिशेबाचे आढावे घेतले जाणार. आणि त्याला तोंड देणं तुम्हाला अशक्य वाटलं असावं.'

'निव्वळ भरमसाट अंदाज !' केशवराव ओरडले.

'एक दोन दिवसात ते समजलेच.' कामत हसून म्हणाले, 'त्याचं असं आहे काळे, की अगदी प्रारंभापासूनच या प्रकरणात काहीतरी वेगळी भानगड असल्याचा मला संशय होता. माधवीच्या भेटीचं ठरवल्याचं तुम्ही सांगितलंत तेव्हा–आता अशा प्रसंगी नानासाहेबांनी, एकंदर व्यवस्था पहाणाऱ्या आपल्या माणसाला जवळ रहायला सांगणं केवळ साहजिकच नव्हे, तर आवश्यक होतं. त्यानी ते काम आपल्यावर सोपवलं असं तुम्हीच सांगितलंत मला. शिवाय माधवीकडे थोडा वेळ एकटे बसला होतात तुम्ही. खून खंजिरानं झालेला नाही हे उघडकीला आलं तेव्हाच मी मनात म्हटलं, माधवीला भेटायला गेल्यावेळी तिथला एखादा सुरा हस्तगत करण्याची तुम्हाला सहज संधि लाभण्यासारखी होती आणि तिचा तुम्ही उपयोगही केला असावा. ती पोर हताश होऊन भ्रमिष्ट बनेल–किंवा फार तर पळून जाईल अशी तुमची कल्पना असावी ! आणि दोन्हीपैकी काही झालं असतं तरी तुमच्या पथ्यावरच पडणार होतं. माधवी नानासाहेबांकडे येण्याची साधारण वेळ तुम्हाला माहीत होती. तुम्ही अर्धा तास आधी तिथं गेलात आणि नानासाहेबानी पेला उचलण्यासाठी तुमच्याकडे पाठ करताच त्यांच्या पाठीत सुरा खुपसलात !'

'या अपमानाबद्दल तुम्हाला जाब द्यावा लागेल !' काळे ओरडले, 'काल रात्री मी नानासाहेबांच्या घराकडे फिरकलोदेखील नाही !

'मोरे !' कामतांनी मोठ्याने हाक मारली, आणि मोरे आत येताच त्यांना काय झाले ते सांगण्यास फर्माविले.

'तुमच्या सूचनेप्रमाणं मी आधी पंच घेऊन सर्कशीकडे गेलो.' मोरे सांगू लागले, 'तिथं आम्ही माधवीच्या आणि संजय पाठकांच्या चपला, बूट

अशी सारी पादत्राणं तपासली; पण काच शिरलेलं किंवा काच शिरेल असं काहीही त्यांच्या पायातलं मिळालं नाही आम्हाला. तरी पण त्याची सारी पादत्राणं पंचनामा करून ताब्यात घेऊन आम्ही काळ्यांच्या घरी गेलो.' मोऱ्यांनी हळूच काळ्यांकडे वळून आवंढा गिळल्यासारखे केले. 'त्यांच्या घरी मात्र जाड रबरी तळव्याचे कॅन्व्हासचे बूट सांपडले, त्यापैकी एकाच्या तळव्यात निळसर, पातळ काचेचा एक तुकडा शिरलेला आहे. ते बूट पंचासमोर जप्त केले आम्ही.'

'काल रात्री तुम्ही रबरी तळव्यांचे बूट पायात घातले असावेत असा माझा अंदाज होताच!' कामत काळ्यांकडे वळून म्हणाले. 'कारण आपली चाहूल कुणाला लागू नये अशी तुम्हाला काळजी वाटणं साहजिक होतं. फुटलेल्या पेल्यातला काचेचा एक तुकडा आम्हाला सांपडला नाही आणि खिडकीजवळ जमिनीवर एक चरा पडलेला होता, तो बुटात शिरलेल्या काचेच्या तुकड्यामुळं उमटलेला असावा असं वाटून माझा संशय दुणावला. म्हणूनच, पंचनामा करून तुम्हा तिघांचीही पादत्राणं जप्त करण्याची कामगिरी मी मोऱ्यांकडे सोपवली. माझ्या दृष्टीनं एक सुदैवाचा योगायोग!' कामतांनी हसून उसासा टाकला, 'पण तुमच्या दृष्टीनं ती दुर्दैवी घटना ठरणार काळे!'

म. ग्रं. सं. ठाणे ग्रंथालय शाखा.
ना. क्र. 90302
दि. 9/7/१९७८ कथा

# इतर अंजु प्रकाशने

क्रमांक १

## वृत्तविद्येचे अंतरंग

पत्रकारांना सर्वांगीण मार्गदर्शन

**किंमत ७॥ रुपये**

*

आगामी–

## छबीच्या छायेत

प्रणय भावना आणि रहस्याचा सुंदर मिलाफ
असलेली स्वतंत्र सामाजिक कौटुंबिक कादंबरी

लेखक : शं. ह. देशपांडे

*

## लघुकथा

लघुकथा लेखन तंत्रावरील मराठीतील पहिले पुस्तक,
सुधारित, वाढीव आवृत्ती

लेखक : शं. ह. देशपांडे

त्यांना काय
'तुमच्य.
सांगू लागले, 'तिः